
## मराठी प्रवास वर्णन लेखक-वाचक मंच

प्रवासाची आवड असणाऱ्या सर्वांसाठी

# विश्वभ्रमंती




स्थापना २००९

अंक ९ वा

ई-दिवाळी अंक २०२०


संपादक : डॉ. सुनील कवठे

सहसंपादक : श्रीमती मंगला म. बिर्ला

कार्यकारी संपादक : सौ. स्नेहल भ. सोपारकर


प्रवासवर्णन संदर्भात मराठीत प्रसिद्ध होणारे एकमेव दिवाळी अंक ...

प्रवासाची आवड असणाऱ्या सर्वांसाठी

# मराठी प्रवास वर्णन लेखक-वाचक मंच

नोंदणी क्र. : महा/३२२७/१०/ठाणे ३१.१२.१०

ए-४०१, श्रीसिध्देश्वर सोसायटी, सिध्देश्वर आळी, पारनाका, कल्याण (प.) ४२१३०१.

९३२४७३२२१४ / ९३२०५५१५५१

lekhakvachakmanch@gmail.com

अंक ९ वा

# विश्वभ्रमंती

दिवाळी अंक २०२०

हि दीपावली लेखक, वाचक, जाहिरातदार, हितचिंतक यांना सुखाची,
आनंदाची व वैभवाची जावो ही सदिच्छा !



| | | |
|---|---|---|
| प्रकाशक | : | मराठी प्रवास वर्णन लेखक-वाचक मंच |
| संपादक | : | डॉ. सुनिल कवठे ९८२२०१७५५३ |
| सहसंपादक | : | श्रीमती मंगला म. बिर्ला ९३२०५५१५५१ |
| कार्यकारी संपादक | : | सौ. स्नेहल भ. सोपारकर ९३२४७३२२१४ |
| मुखपृष्ठ | : | उपेंद्र वैद्य, पुणे |
| मुद्रक | : | सुमीत सुभाष नाईक, अक्षरज्योती, ठाणे (प) ९८२०४०२५१० |



अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
जाहिरातदारांशी संपर्क साधताना विश्वभ्रमंतीचा उल्लेख अवश्य करावा.

# विश्वभ्रमंती दिवाळी अंकास राज्यस्तरीय तसेच विविध स्पर्धेमध्ये मिळालेले पुरस्कार



मराठी प्रवास वर्णन लेखक-वाचक मंच
स्थापना २००९

# मराठी प्रवास वर्णन लेखक-वाचक मंच चे निष्ठावंत कार्यकर्ते



**श्री. मिलिंद बल्लाळ**
अध्यक्ष



**डॉ. सुनिल कवठे**
कार्याध्यक्ष



**श्रीमती मंगला म. बिर्ला**
अतिरिक्त कार्याध्यक्षा



**सौ. स्नेहल भ. सोपारकर**
कार्यवाह



**श्री. वसंत सहस्त्रबुध्दे**
संघटक कार्यवाह



**सौ. किरण शि. तोष्णीवाल**



**श्री. अेच. जे. पाटील**



**श्री. गोपाळ मानधने**



**श्री. विश्वास कुळकर्णी**



**श्री. वसंत कल्हापुरे**



**सौ. दिपाली ब. दळवी**




**श्री. विनायक जोशी**



**वंदना भ. वाणी**

कोरोनामुळे संपूर्ण जग हादरले आहे आणि सामाजिक आणि आर्थिक आघाडीवर तर अभूतपूर्व उलथापालथ झाली आहे. जग पूर्वीसारखे तरी राहिलेले नाहीच आणि ते पूर्वपदावर येण्यास तज्ञांच्या मते किमान २१ ते १८ महिने लागणार आहेत. अशा संकटासाठी आपण खचितच तयार नव्हतो आणि त्यामुळे त्यातून बाहेर पडण्यासाठी आपल्याला बराच अवधी लागणे स्वाभाविक आहे. एखाद्या घनदाट अरण्यात हरवल्यावर जी गत होते ती आपली झाली आहे, हेच खरे. आरोग्य सेवांवर पडलेला ताण आणि या क्षेत्राबद्दल आत्तापर्यंत दाखवण्यात आलेली उदासीनता यांचा सर्वच राष्ट्रे फेरविचार करु लागले आहेत. जागतिक आरोग्य संघटना, जगभरातील संशोधक आणि तज्ञ डॉक्टरमंडळी अहोरात्र झटून उपचाराचे निश्चित ठोकताळे निर्माण करीत आहेत. लशीचे संशोधन ही त्याचीच फलश्रुती. या संकटातून हळूहळू काही देश बाहेर पडत असले तरी काही देशांमध्ये अजूनही परिस्थिती गंभीर आहे. याचा सर्वाधिक फटका पर्यटन क्षेत्राला बसला आहे, यात वाद नाही. पर्यटनाला उद्योगाचा दर्जा देणाऱ्या बहुसंख्य देशांचे अर्थकारण पर्यटनावर अवलंबून असते. पर्यटकांवर बंदी घालावी लागल्यामुळे त्यांच्यावर विपरीत परिणाम होणार आहे. त्यामुळे भारतातून परदेशी जाणाऱ्यांची संख्या रोडावली आहे. किंबहुना ती शून्यावर आली आहे, असे म्हटले तरी अतिशयोक्ती ठरणार नाही. कोरोनाकडे संकट म्हणून पाहण्याऐवजी संधी म्हणून पहा, असे वारंवार बोलले जात असते. या विधानात तथ्य आहे. खास करुन या रोगामुळे समाजाचे जे प्रचंड मानसिक खच्चीकरण पहाता ते दूर होण्यासाठी सकारात्मकता आवश्यक आहे. ती अंगीकारता यावी यासाठी तर हा विचार निश्चितच दिलासादायक ठरतो. या विचारास व्यावहारिक पुष्टी देऊ शकते पर्यटन क्षेत्र, परेदश पर्यटनाचे दालन बंद झाले म्हणुन काय, देशांतर्गत पर्यटनाची मोठी संधी त्यात दडली आहे. त्यादृष्टीने प्रयत्न सुरु झाले आहेत. जग बघण्याची अभिलाषा सर्वांनाच असते, परंतु त्या नादात आपण आपला देश पाहण्याचे विसरुन जातो. अशा लोकांना ही संधी कोरोनामुळे का होईना चालून आली आहे. त्याचा लाभ उठवण्याची गरज आहे. पर्यटन क्षेत्रात हजारो मंडळी कार्यरत आहेत, त्यातून कोट्यावधी रुपयांची उलाढाल होत असते. ही व्याप्ती लक्षात घेता आपण पर्यटनाची हौस भागवता-भागवता नकळत देशाच्या आर्थिक आणि सामाजिक स्थिती सुधारण्यास हातभार लावू शकतो. विश्वभ्रमंतीतर्फे आम्ही हेच आवाहन करु.

सुखात रहा, सुरक्षित रहा. दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !



- श्री. मिलिंद बल्लाळ



डॉ. सुनिल कवठे
संपादक



श्रीमती मंगला म. बिर्ला
सहसंपादक



सौ. स्नेहल भ. सोपारकर
कार्यकारी संपादक

## संपादकीय दृष्टीक्षेपातुन...

दिवाळी आली कि फराळ आला. फराळाबरोबर अनेक दिवाळी अंक वाचणे हा मराठी माणसाच्या आयुष्यातील एक अविभाज्य भाग झाला आहे.

मराठी प्रवास वर्णन लेखक वाचक मंचाच्या वतीने विश्वभ्रमंती वर्ष ९, हा प्रवास वर्णनावर आधारीत दिवाळी अंक वाचकांसमोर प्रस्तुत करण्यास मला अत्यंत आनंद होत आहे.

यावर्षी करोनाच्या प्रार्दुभावामुळे अंक छापणे शक्य झाले नाही. कोरोनाचा प्रभाव जागतीक पातळीवर पडला. सर्वच क्षेत्रांमध्ये नुकसान झाले. सर्वात जास्त पर्यटन व्यवसाय आणि हॉटेल यांना झळ बसली. परंतु सर्वप्रथम आम्ही म्हणजे मंचाने पुढाकार घेऊन हा डिजीटल दिवाळी अंक वाचकांना सादर करीत आहोत. मला खात्री आहे पुढील वर्षी वाचकांना अनेक दिवाळी अंक डिजीटल प्लॅटफॉर्मवर प्रसिध्द होतांना दिसतील. सतत ९ वर्षे प्रवास वर्णनावर आधारीत मराठी भाषेमध्ये प्रसिध्द होणारा हा एकमेव दिवाळी अंक आहे. त्यासाठी मी आमच्या लेखकांचा, वाचकांचा आणि मंचाच्या कार्यकर्त्यांचा आभारी आहे. आमच्या लेखकांच्या लेखणीतुन जी दर्जेदार प्रवास वर्णन निघालीत त्याची अनेक साहित्य संस्थांनी नोंद घेतल्यामुळे विश्वभ्रमंतीस अनेक संस्थानी पुरस्कृत केले.

या वर्षीसुध्दा ही मेजवानी वाचकांना आवडेल अशी आशा करतो. २०२१ मध्ये आपणांस काही सहली ठरवायच्या असतील तर या अंकाचा निश्चीतच उपयोग होईल. कोरोनाच्या या काळामध्ये एकमेकांपासुन दूर रहा स्वच्छतेची काळजी घ्या, सुव्यवस्थित रहा.

# DK FLAG FOUNDATION

## Education | Health | Humanity

## Education Initiatives : Beti Padhao Beti Badhao...

Sponsored Ms **Akshata Jagtap** For **Higher Studies** In **France**

Sponsored Ms **Amruta** and Ms. **Shrushti Raghavan** For **Higher Education**

Sponsored Ms **Jyotsana Mallik** and Mr. **Sudhir Rane** For **Bachelor Of Engineering**

Sponsored the wards of the employees of DK Pharma For Education

Adopted Ms **Arti** and Ms **Priyanka** For **MSc** and **MCom** Respectively

Adopted a girl child **Mehek Sharma** and her brother **Krishna Sharma** for their education from Jr. Kg. to HSC

Adopted Mr **Kishan Tadvi** for education at Bhosale Military School - Nashik

Sponsoring School Uniforms to Adivasi Children Since last 20 years

## Health Initiatives : Sponsored The ICU ward - Covid Hospital Ambernath






## Sports Initiatives : Orphan Kids Football Team | DK Football Team







**Dr. Rakesh Bakshi**
Has been designated as the Flag Ambassador by the Flag Foundation Of India and is lovingly called the **Flag Man Of India...**

He Has recently been Conferred upon With the degree of **DOCTORATE** for his exim contribution to the society

## Giving Back to the Society



**In Association With Tivoli CHS, Sponsored Electric Generator System to Blind School Badlapur**



**In Association With Tivoli CHS, Sponsored Solar Water Heater System & Borewell to Faith Orphanage Home**

# अनुक्रमाणिका


| क्रमांक | लेख | लेखक / लेखिका | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| ०१ | अविस्मरणीय अंदमान | डॉ. शुभा चिटणीस | ०१ |
| ०२ | स्टॅच्यु ऑफ युनिटी | श्री. श्रीप्रकाश सप्रे | ०७ |
| ०३ | मी कोविड आणि लॉस एंजेल्स | डॉ. सुनिल कवठे | १० |
| ०४ | लोकप्रिय शहर - सिडनी | सौ. मृणालिनी कुलकर्णी | २१ |
| ०५ | बाली - एक अदभुत बेट | श्रीमती क्षिप्रा शहाणे | ३४ |
| ०६ | मसाईमाराची जादु | सौ. प्राची महाजन | ४३ |
| ०७ | अमेरिकेत मराठी गुरुजी | श्री. शिरीष अयाचित | ४९ |
| ०८ | आर्मेनिया | श्री. प्रविण कारखानिस | ५५ |
| ०९ | आमची व्हिएतनामची सफर | श्री. शशिकांत पानट | ६६ |
| १० | भारताच्या जलसीमा | श्री. रामकृष्ण अभ्यंकर | ८६ |
| ११ | क्रोएशिया, उपवनांचा देश | सौ. प्रतिभा कारंजकर | १०० |
| १२ | हिमालयाचा मी तो यात्रिक | श्री. अनंत गद्रे | १११ |
| १३ | केल्याने तीर्थाटन | सौ. शोभा फणसे | १२० |
| १४ | नावेसरमधील चमत्कार | सौ. अनामिका बोरकर | १२६ |
| १५ | श्री क्षेत्र भीमाशंकर | श्री. अविनाश राजगुरु | १४० |
| १६ | ऑस्ट्रेलियाची सफर | सौ. नलिनी कोळी | १४४ |
| १७ | नी हाव ! (हॅलो) | श्रीमती माधवी कुलकर्णी | १४९ |
| १८ | च्याओ इटालियानो | सौ. अमृता करकरे | १५७ |
| १९ | ट्रेवी फाऊंटन | सौ. शुभांगी पासेबंद | १७२ |
| २० | भुतानची अध्यात्मिक राजधानी | श्री. पां. द. पाटणकर | १७६ |
| २१ | सफर गीर अभयारण्याची | श्री. प्रकाश लब्धे | १८१ |
| २२ | व्हॅन्कुव्हरची आनंदयात्रा | सौ. सुजाता ब्रह्मे | १८८ |
| २३ | कोणार्कचे सुर्य मंदिर | सौ. सुनंदा कापरे | १९४ |
| २४ | पळसाची पाने | डॉ. श्रीकांत नाडगौडा | १९७ |
| २५ | दक्षिणेची देवभुमी | श्री. श्रीपाद टेंबे | २०३ |
| २६ | पुर्वेकडील मुशाफिरी | श्री. अरुण तांबे | २१५ |
| २७ | करोना व्हर्सेस इजिप्त | श्री. मोरेश्वर बागडे | २२० |

# जाहिरातदार

## अंकातील समाविष्ट जाहिराती

डि. के. फ्लॅग फाऊंडेशन

स्वाती पेट्रो प्रॉडक्टस्

जेट केमिकल्स

क्वालिटी केमिकल्स इंडस्ट्रीज प्रा. लि.

ठाणेवैभव - मिलिन्द बल्लाळ

स्टँडर्ड प्रिंटिंग इंकस्


सौ. स्नेहल सोपारकर

श्री नारायणी वेल्थ सोल्युशन्स

शुभेच्छा - सौ. स्नेहल सोपारकर

डि. के. फार्मा






# अविस्मरणीय अंदमान...



## सागरा प्राण तळमळला

डॉ. शुभा चिटणीस
१००६, मे फ्लॉवर, हिरानंदानी मेडोज, ऑफ पोखरण रोड नं.२, ठाणे (प.)-१०
दूरध्वनी : २१७३८१५९ / ९८७०३१२८२८

अंदमानला जाण्याचे स्वप्न कैक वर्षे मी मनात जपून ठेवलेले होते. सावरकर - वाङमय खूप वाचले होते. विशेषत: त्यांच्या काळे पाणी, सोनेरी पाने, सत्तावनचे समर, माझी जन्मठेप या ग्रंथांनी तर मनावर भुरळच घातली होती. या शिवाय साधना जोशी यांनी केलेला सावरकरांच्या कवितांचा जयोस्तुते हा भावानुवाद देखील वाचला होता. सावरकरांचे निस्सीम भक्त, ज्येष्ठ संगीतकार कै. सुधीर फडके निर्मित वीर सावरकर हा चित्रपट पाहून नवशक्तित मी त्या प्रिमियर संबंधाने एक लेखही लिहिला होता. ने



मजसी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला हे लतादीदींचे गीत ऐकून अंत:करण अगदी हेलावून जात असे. प्रसिध्द निवेदिका धनश्री लेले यांचं एक व्याख्यान मी ऐकलं होतं. त्यात त्यांनी विनायक दामोदर सावरकर हा एक त्रयोदशाक्षरी मंत्र म्हटल्याचं आठवत होतं. या सर्वांचा एक संमिश्र प्रभाव म्हणजे माझे स्वप्न! तीव्र इच्छाशक्तीच जागृत झाली होती. आणि म्हणूनच जेव्हा सन्नी ट्रव्हल्सचे संचालक श्री. सतीश गोगटे यांनी २०१९ साली विचारलं येता का अंदमानला?

मनाने मग उसळीच मारली. तात्काळ होकार दिला. आणि २२ जानेवारीच्या पहाटे चार वाजता सुटणाऱ्या गोएअर विमानात आम्ही उभयता बसलो नि सकाळी सात वाजता पोर्ट ब्लेअरच्या विमानतळावर उतरलो सुध्दा. मनात मात्र भिरभिरत होते श्री. माधव खाडिलकरांचे अनादी मी अनंत मी हे नाटक. तसंच हृदयात होते. श्री. श्री. वा. नेर्लेकरांनी संपादित केलेले क्रांतीसूर्य आणि धगधगते यज्ञ कुंड. वि.दा. सावरकर हे त्यांचे लिखित पुस्तक. हया तंद्रीतच अंदमानचे ब्ल्यू सी हे हॉटेल आले जिथे आमचा मुक्काम होता. आमची ही सहल केवळ मौजमजेसाठी आखलेली नव्हती. आपण सर्व भारतीयांसाठी सावरकरांच्या वास्तव्यामुळे अंदमान हे एक तीर्थक्षेत्रच ठरले आहे! क्रांतीकारकांचे कुलपुरुष म्हणून इतिहासावर स्वत:ची चिरस्थायी नाममुद्रा उमटविणाऱ्या सावरकरांचे संपूर्ण आयुष्य म्हणजे आधुनिक महाभारतच म्हणावे इतके ते चैतन्यदायी आहे. ही जाणीव क्षणोक्षणी होत राहून मनात जाग्या झाल्या त्या

काव्यपंक्ती होत्या.

विश्वात फक्त आहेत विख्यात बहाद्दर दोन
जे गेले आईसाठी सागरास ओलांडून
हनुमानानंतर आहे या विनायकाचा मान

अशा या अंदमानाचा संबंध येतो तो थेट त्रेतायुगाशी. श्रीलंकेवर आक्रमण करण्याआधी श्री. प्रभुरामचंद्र आणि हनुमान यांनी या भागाचे सर्वेक्षण केले होते. श्री. हनुमानाच्या पदस्पर्शामुळे या बेटांचे नाव पडले हनुमान बेट. पण येथील स्थानिक भाषेप्रमाणे हनुमानचे झाले अंडुमान. पुढे तेच ओळखले जाऊ लागले अंदमान.



कलकत्त्याच्या दक्षिणेला आणि चेन्नईच्या पूर्वेला ६०० कि.मी. पसरलेले एक बेट आहे. तेच हे अंदमान! ८२४९ चौ.मीटर क्षेत्रफळाचा हा परिसर आहे. केवळ तीन जिल्हे आणि तीन लाख लोकसंख्या, चारही बाजूंनी समुद्र, जवळपास ६५०० कि.मी. लांबीची समुद्र सीमा, आजुबाजुला बेटंच बेटं. त्यातही काही बेटांवर बोटांवर मोजण्या इतकीच वस्ती. उर्वरित कितीतरी बेटं जंगलांनी व्यापलेली असून एकूण ९२ टक्के भाग निबिड अरण्यांनी वेढलेला. वर्षभर इथे भरपूर पाऊस कोसळत असतो. अंदमान, निकोबार आणि त्याचे लगतचा असा हा द्वीपपुंज आहे. त्यात अंदमान हे सर्वात मोठे. मध्ये लहान-लहान बेटे, थोडा समुद्र, पुन: बेटे अशी ओळीने पसरलेली ही एक द्वीपमालाच बंगाल समुद्रात विखुरलेली आहे. अंडाकृती असल्यानेही अंदमान हे नाव पडले असावे. उत्तर अंदमान ५१ मैल लांब, मध्य अंदमान ५९ मैल लांब, दक्षिण अंदमान ४९ मैल आणि रटलंडद्वीप ११ मैल लांब आहे. हया पुंजास मोठे अंदमान असे म्हणतात. त्या विरहित २९ मैल दक्षिणेस लहान अंदमान बेट असून त्याची लांबी ३० मैल व रुंदी १७ मैल आहे. जिथे सूर्य किरणे जमिनीपर्यंत पोचूही शकत नाही अशी दाट अरण्ये जिकडे तिकडे आहेत. मोठया नद्या मुळीच नसून पहाडावरुन वाहणारे ओढे मात्र बरेच आहेत. माशा, जळवा, सापसुरळया, साप भरपूर प्रमाणात. मलेरियाचे प्रमाणही खूपच. रानडुकरेही असतात. रानटी आदिवासी, निकोबार, जावा बेटाच्या आसपास पसरलेल्या द्वीपसंघात

माकडासारखी माणसे आढळतात. अजूनही तीरंदाजी चालू असते. नरमासभक्षी असल्यामुळे सहसा जंगलात आत खोलवर लोक जातच नाहीत.

आता सुधारित झालेल्या भागामुळे अंदमान, सेल्युलर जेल, पोर्ट ब्लेअर ही पर्यटन केंद्रे बनली आहेत. परंतु इंग्रजांच्या राजवटीत जन्मठेपेचे कैदी मुद्दाम या बेटावर पाठवले जात. खुनी, दरोडेखोर, डाकू व अट्टल बदमाश कैदी यांचा त्यात समावेश असे.

महाराजा बोटीवर हातकडी घातलेल्या सावरकरांना कडक शिस्तीच्या पहाऱ्यात चढवण्यात आले होते. त्या आगबोटीवर जन्मठेप्याचे चढणे म्हणजे प्रेताच्या तिरडीवर जिवतपणीच बांधले जाणे होते. त्या जहाजावर पाय टाकताच चढत्या तारुण्याची पोरे ८० वर्षांच्या म्हाताऱ्यासारखी, प्रेतकळा आलेली दिसू लागत.

प्रत्यक्षात सावरकरांना दहा वर्षे काळया पाण्यावर काढावी लागली होती. काथ्या कुटून हात रक्तबंबाळ झाले. तेल घाण्याला बैलासारखे जुंपल्याने अनेकवेळा ते मूर्च्छित झाले. सकाळी सहा ते सायंकाळी ४ या वेळात सलग सात दिवस हातकडीची शिक्षा भोगावी लागली. वाचायला काही नाही. बोलायला माणूस नाही. तेल पाण्याचे काम आणि रुक्ष जेवण या सर्व गोष्टी फार भयंकर होत्या. वेड लागावे किंवा आत्महत्या करावी असे वाटणारे ते नरकप्राय वातावरण होते. पण सावरकर याही वातावरणात सेल्युलर



जेलच्या भिंतींना कागद करुन लिहित होते. लिहिणे कसले? टोकदार खिळयाने कोरुन ठेवणे, पाठ करणे असे चालू असे. कारण दरवर्षी भिंतींना सपोदी लागली की सर्व पुसून जात असे. या बिकट प्रसंगी देखील त्यांनी कमला व गोमान्तक ही दोन काव्ये लिहिली. इतर कैद्यांना धीर देत ते म्हणत असत, घाबरु नका, एक दिवस असा उगवेल की याच कारागृहात तुमचे पुतळे उभारले जातील आणि अंदमान हे भारतीय यात्रेकरुंचे महन्मंगल तीर्थक्षेत्र होईल.

सेल्युलर जेलमध्ये प्रवेश करण्यापूर्वी पूर्वी वाचलेले हे सारे आठवत होते. २९ वर्षे अंदमान आणि निकोबार बेटात शिक्षण विभागात पी.बी.टी., उपशिक्षण अधिकारी, व्हाईस प्रिन्सीपॉल आणि प्रिन्सीपॉल पदावर

काम केलेल्या, अंदमान आणि निकोबार बेटांवर १० पुस्तके लिहिणाऱ्या लेखकाचे श्री. बबन फाले यांचे पुस्तक मी खरेदी केले होते. स्वातंत्र्यवीर सावरकर आणि सेल्युलर जेल (यातना शिबीर) हे त्या पुस्तकाचे नाव. सेल्युलर जेलमध्ये हिंडताना या पुस्तकाची बरीच मदत झाली होती. अंदमान पाहायचे ते व्यवस्थित अभ्यास करुनच, हे माझे ठाम मत होते. सेल्युलरमध्ये दृश्य रुपात पाहताना अंगावर सर्रकन काटा उभा राहात असे.



या सफरीत आमच्या लेखी एक अनोखी घटना घडली. २६ जानेवारी, २०१९ रोजी अंदमानच्या पोलीस मैदानावर पोलीस दलातर्फे संयोजित झेंडावंदन व पोलीस परेड कार्यक्रमानंतर आमच्या सहल संयोजकांनी (श्री. सतीश गोगटे) अचानकपणे जाहीर केले की, पोलीस परेडनंतर आपण पुन: सेल्युलर जेलमध्ये जाणार आहोत. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या कोठडीबाहेर सावरकरांवर प्रा. चिटणीस भाषण करतील. माझे पती श्री. अशोक चिटणीस हे ऐकून थरारुनच गेले. हा एक सुखद व विस्मयकारक धक्का होता. अंदमान मुक्कामी एका सर्प मित्राचे भाषण झाले होते. तसेच कै. निझामपूरकर बुवा या प्रसिध्द किर्तनकाराच्या नातीची आणि श्री. चारुदत्त उपासनींच्या लेकीची तीन श्रवणीय भाषणे



झाली होती. या सगळया सुश्राव्य कार्यक्रमानंतर एकदम सावरकरांवर भाषण देणे? ते ही अंदमानला? विलक्षणच!


सतीश गोगटे खरेच कल्पक संचालक! त्यांच्यामुळे अंदमान येथील अन्य स्थळे पाहता आली. अर्थात सर्वत्र बोटीनेच प्रवास होत असे. अँथोपोलॉजिकल म्युझियम, माऊंट हॅरीयट, हॅवलॉक आयलंड, राधानगरी बीच, नॉर्थ बे कोरल्स आयलंड (नेत्रदिपक रंगीन नजारा) वंडूर बीच येथील चॉटम सॉ मिल, लाईम स्टोन केव्हज येथील ज्वालामुखी, फॉरेस्ट म्युझियम, नॉशनल

मेमोरियल म्युझियम वगैरे प्रेक्षणीय स्थळांना भेटी देता आल्या. सेल्युलर जेलच्या आवारातला साऊण्ड शो बघता आला. विशेष म्हणजे आम्ही ज्वालामुखीची राख (अवशिष्ट दगडी तुकडे) आठवण म्हणून बरोबर आणू शकलो. चांदण्या रात्री समुद्रकाठी बसून मक्याची भाजलेली कणसे खाऊ शकलो. आणखी एक खास आठवण म्हणजे अनुराधा राव या एकाकी राहणाऱ्या, सावरकर भक्त स्त्रीची भेट! अनुराधाला सोबत असते ती हरणं, बुलबुल व मोरांची! रॉस आयलंडमध्ये राहणारी अनुराधा सावरकर प्रेमी भक्त आहे. तिला त्यांच्या अल्पस्वल्प सहवासाचा प्रचंड अभिमान आहे. माझ्या खांद्यावर हात ठेवून तिने मला त्या गर्दीतून बाहेर नेले व हातात ब्रेडचे काही तुकडे ठेवले! तिने एक शीळ मारुन मोरांना बोलावले. तसे हिरवे, निळे-जांभळे पिसाऱ्यांचे मोर पटापट तिथे जमले. त्यांच्या चोचीत मला तिने ब्रेडचे तुकडे भरवायला सांगितले. ते बघून इतर पर्यटकांनी देखील मोरांना भरवणे व त्यांच्यासहित फोटो घेणे सुरु केले. एरव्ही अशाप्रसंगी अंदमानच्या आठवणी गोळा कराव्यात म्हणून स्थानिक दुकानांतून लोकांनी लहान मोठया वस्तू खरेदी केल्या.

सेल्युलर जेलच्या आवारात,



सावरकरांच्या कोठडीबाहेर त्यांच्यावर भाषण करणे हा एक अभूतपूर्व, आनंददायी असा योग आम्हाला लाभला होता. वस्तुत: सावरकर म्हणजे एक द्रष्टा महापुरुष. महर्षि व्यास नि वाल्मिकीच्या कुळातला अमर साहित्यकार, हाडाची काडे करणारा दधीचि! अशा महामानवाला कोटि-कोटी वंदन करीत असतांना त्या महामानवाच्या एके काळच्या वास्तव्यस्थानी हा रोमांचकारी अनुभव जमेस धरला तर आमची ही सहल विलक्षण चैतन्यमयी ठरली. सावरकरांची वाणी खरी ठरली. पुढे त्यांचे पुतळे ठिकठिकाणी लावण्यात आले. तैलचित्रे लागली. सत्कार समारंभ घडले. आमच्या आयुष्यात अशी संधी म्हणजे भाग्याची पाऊले उमटणे होय. अंदमान सहलीत हे घडले. माझे स्वप्न सत्यात उतरले व फार मनोहारी अनुभव विश्व त्याने आमच्यासमोर उभे केले!




# स्टॅच्यू ऑफ युनिटी...



## सरदार वल्लभभाई पटेल

श्रीप्रकाश सप्रे
१०/०१, विजय गार्डन, घोडबंदर रोड, ठाणे (प) - ४०० ६०७
भ्रमणध्वनी क्र.९८२२९००३४०

सरदार वल्लभभाई पटेल यांना लोहपुरुष असे म्हणतात. स्वातंत्र्य सेनानी आणि गृहमंत्री म्हणुन सरदार पटेलांना संपुर्ण देश ओळखतो. देशाच्या स्वातंत्र्य लढयांत त्यांचे योगदान मोलाचे आहे.

त्यांचे भव्य स्मारक बडोद्याच्या जवळ केवडिया या गावात साकारले आहे याची ख्याती बरीच ऐकून होतो.

ते स्मारक बघण्याची आमची खुप इच्छा होती. ती इच्छा ४, ५ व ६ जून रोजी




पूर्ण झाली. मी, पत्नी कविता व मुलगा संवाद असे तिघेजण आम्ही त्या सहलीला निघालो. निवास, भोजन व स्मारकाचे बघण्याचे बुकिंग मुंबईहुन केले होते. ३ च्या रात्री दुरांतोने पहाटे ४ वा. बडोद्याला पोहचलो. तेथे ब्राह्मण सभा येथे राहायची व्यवस्था केली होती. त्या दिवशी बडोदा साईटसिंग करण्यासाठी बाहेर पडलो. लक्ष्मीविलास पॅलेस, झु. नक्षत्र मंदीर म्युझियम इ. बघितले. रात्री तेथील खाऊ गल्लीचाही आस्वाद घेतला.

दुसऱ्या दिवशी ५ तारखेला सकाळी १० ते १२ अशी स्मारक बघायची वेळ आम्हाला मिळाली होती. त्यामुळे सकाळी ७ वा. बस स्टँडवरुन केवडिया गावाची बस पकडली आणि साधारण १० वा. तेथे पोहचलो हे अंतर साधारण ९० कि.मी. आहे.



तेथून रिक्षाने २ कि.मी. वरच्या स्मारकाच्या जागेवर गेलो. तेथुन प्रत्यक्ष पुतळयांच्या ठिकाणी जाण्यासाठी बसेसची सोय आहे. त्या ठिकाणी जातानाच पुतळयाची भव्यता जाणवते. आपण वर

बघुन सुध्दा नजर ठरत नाही. शिवाय आसपासचे सृष्टी सौंदर्य बघुन प्रसन्न वाटते.

स्मारकाची उंच साधारण १८२ मीटर आहे जगातला हा सर्वांत मोठा आणि उंच पुतळा आहे. बसमधुन जेथे उतरवतात तेथुन स्मारकाला जाण्यासाठी सरकते जिने आहेतच तेथुन आपण सुरुवातीला त्यांच्या पायापाशी जातो. तेथुन सरदार प्रकल्प नर्मदा नदीचे पात्र आणि रमणीय परिसर बघता येतो. त्यांच्या चपलेची लांबी साधारण ४० फुटच्या वर आहे. तसेच चपलेची शिवण सुध्दा दिसते. पुतळा जिवंत वाटतो. धोतर, जाकिट, शर्टच्या सुरकुत्या वगैरे बारीक सारीक काम बघुन थक्क होतो.

तेथुन लिफ्टने सरदार पटेलांच्या हृदयापर्यंत जाता येते. ही उंची साधारण ३५ मजले इतकी आहे. तेथून वर पाहिले असता त्यांच्या जाकिटाचे दोन नं.चं बटन दिसते. आपण पुतळयाच्या आतच असतो. तेथुन खालचे सौंदर्य अप्रतिम.

गुजरात विधान सभाचे आमदार १८२ असल्याने स्मारकाची उंची १८२ मीटर आहे. एकुण १६०० टन मिश्रधातू वापरले आहेत. २५० इंजिनिअर आणि ३००० कामगार यांच्या अथक परिश्रमातुन साडे तीन वर्षांत हा पुतळा साकारला आहे.

पुढे काही महिन्यांमध्ये तेथे बोटिंग सुरु



होणार असल्याचे गाईडने सांगितले. प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटावा असे हे स्मारक आहे. साधारण ३-४ तासांत सर्व बघुन होते. जवळच सरदार धरण, व्हॉली ऑफ फ्लॉवर्स बघता येते. सगळीकडे जाण्यासाठी बसेस आहेत. सर्व स्मारक बघण्यासाठी ३५०/- एवढे नाममात्र शुल्क आहे.

आपण परदेशात जातो तेथील कौतुक करतो पण आपल्या अस्मितेचे प्रतीक असलेल्या या स्मारकाला सुध्दा सर्वांनी भेट द्यावी व कौतुक करावे.

अशा रितीने ६ तारखेच्या शताब्दीने मुंबईत परत आलो. अशी ३ दिवसांची छोटी ट्रिप आयोजित करता येईल.



# मी कोवीड आणि लॉस ऐंजेल्स...




डॉ. सुनिल कवठे

MS, FACRSI

कवठे हाऊस, १३७/ए, कानसई सेक्शन, अंबरनाथ (पुर्व), ठाणे

मो.नं. ९८२२० १७५५३

लॉस एंजेल्स म्हटले म्हणजे आपल्या




डोळयांसमोर उभे राहते ते हॉलीवुड सिनेजगातील सर्वोच्च ठिकाण. सर्व जगभरातुन आपले नशीब आजमवण्याकरीता अनेक तरुण तरुणी येथे येतात. ज्याप्रमाणे बिहार आणि युपी मधुन आपल्याकडे बॉलीवुडमध्ये म्हणजे मुंबईमध्ये लोक येतात. तसाच काहीसा हा प्रकार आणि एकदा कोणी तरुण तरुणी येथे आले कि ते या मायानगरीत ते समाविष्ठ होऊन कायमचे येथे स्थायिक होतात. ग्लॅमरचे जग २० ते ३० वय वर्षापर्यंतच उत्तम आहे. त्यानंतर या जगामध्ये शरीराचा ताजेतवालपणा कमी आल्याने सिनेमा किंवा जाहिराती मिळणे यांना कठीण होते. उत्पन्न कमी झाले म्हणुन परत कोणी आपल्या मुळ गावी जात नाही. ते येथेच आपल जीवन सुखात घालविण्याचा प्रयत्न करतात. कधी कधी त्या अट्टाहासापोटी ते रस्त्यांवर येतात. त्याचमुळे कि काय लॉस एंजेल्सच्या रस्त्यावर भरपुर भिकारी दिसतात. जे अमेरीकेतील अन्य शहरांमध्ये दिसुन येत नाहीत.

लॉस एंजेल्समधे खुप दिवस राहिल्यावर काही गोष्टी नजरेत येतात जेव्हा आपण मेलरोज, सॅन्टा मोनीक किंवा हॉलीवुड बुलेवाडवर चाललो तर सर्व सामान्य लोक शरीराने सुदृढ आहेत असे दिसते. त्यांची तजेलदार त्वचा, फॅशनेबल कपडे, तरुणीचा सुबक बांधा आणि पोटाचा घेर न दिसणारे माणसं. फिटनेस फ्रिक लोक जास्त आढळुन येतात.

लगबगीने चालणाऱ्या सुंदर सुंदर ललना आणि त्यांच्या बरोबर चालणारे विविध जातीचे स्वान.

यांना कुत्र म्हणणे म्हणजे शिवी दिल्यासारखे वाटेल.

त्यांना चांगलेच सजविलेले असते. पायात पायमोजे, अंगावर कपडे, गळयामध्ये बो, कधी कधी रंगीत चष्मे सुध्दा लावलेले असतात. काय तो त्यांचा थाट, असे रुबाबात रस्त्यांवर मालकिणी सोबत चाललेले असतात. यांची जागा रस्त्यावर कमी आणि सुंदर मालकिणीच्या कवेत जास्त दिसुन येते. बऱ्याच

लोकांना त्यांचा हेवा वाटणं साहजिकच आहे. असो मला एक जुनी आठवण आठविली तसा व्यवसायाने मी सर्जन आहे. त्यामुळे रोज ऑपरेशन करणे हे माझे नीत्याचे काम ते करतांना ॲनेस्थेसीस्ट हा लागतोच बहुतांशी ॲनेस्थेसीस्ट हे सर्जनचे मित्र असतात आणि गप्पीष्टही असतात. कारण हे अनेक हॉस्पीटलमध्ये निरनिराळया सर्जनस् बरोबर काम करीत असल्याने त्यांच्याकडे सगळीकडच्या ताज्या बातम्या असतात. एकदाचे ऑपरेशन सुरु झाले कि गप्पांचा ओघ सुरु होतो.

ज्यामध्ये एकदा असाच विषय निघाला कि पुढच्या जन्मी तुम्ही काय होणार?

मला त्याने विचारले,

मी सांगितले मी परत सर्जनच होणार कारण मला ऑपरेशन करणे आवडते.

तु काय होशील?

त्याने सांगितले मी पुढच्या जन्मी पॉमेरिअन कुत्रा म्हणुन जन्मास येईन ते सुध्दा लॉस एंजेल्समध्ये.

त्यानंतर ५ मिनिटे तो त्याचे फायदेच फायदे सांगत होता.

वाचकांना मला वेगळे फायदे सांगायची जरुर नाही पण लॉस एंजेल्सला हि छोटी छोटी पिल्ले बघितल्यावर मला माझ्या ॲनेस्थेसीस्टचे म्हणणे पटले.

येथील प्लॉस्टिक सर्जन सुंदर स्त्रीयांना अजुन अधिक सुंदर कसे बनवायचे येथील कॉसमेटीक सर्जन उत्तम प्रकारे जाणतात. ओठ, डोळे, डोळयाखालील चरबी, नाक, गाल, बोटोक्स, उरोज, पोटाचा घेर, नीलंब मांड्या, सीक्स पॅक, ज्याला ज्या रीतीने आकार किंवा शेप हवा असेल त्याप्रमाणे हे जादुगर त्यांना करुन देतात. आपल्याकडील बॉलीवुडमधील अनेक नट-नट्या येथे येतात, राहतात, त्यांचे फोटो शुट करतात. विडीयो फिल्म रिकॉर्ड करतात आणि अधिक सुंदर होऊन परत जातात. मुंबईत परतल्यावर या सुंदर होण्यामागचे श्रेय ते योगा आणि त्यांच्या दैनंदिन नियमित व्यायामाला देतात.

माझी मुलगी लॉस एंजेल्सला राहात असल्यामुळे येथे मी खुप वेळेस आलेलो आहे. सगळं काही पाहुन झालेले आहे.

सर्वसामान्य प्रवासी म्हणुन जेव्हा कोणी लॉस एंजेल्सला भेट देतो तेव्हा याला सहल कंपनीच्या वेळाप्रमाणे काही महत्वाची ठराविक ठिकाणं त्याला दाखविली जातात. भारतामधुन अमेरीका दर्शन सहल जरी २१ दिवसाची असली तरी लॉस एंजेल्सच्या भागाला २च दिवस दिले जातात या २ दिवसात हॉलीवुडची प्रसिध्द होर्डींग, हॉलीवुड स्ट्रीट, रोडीयो ड्राईव्ह, हॉल ऑफ फेम, युनीवर्सल स्टुडिओ, डिझनी लॅन्ड २, ३ दिवसात येवढया जागा बघायच्या म्हणजे दमछाक होणारच. येथुन पुढचा थांबा असतो तो लास वेगास.

मला खुप दिवस येथे राहता आल्यामुळे यामधील माणसे, त्यांच्या सवयी चालीरीती, लकबी, निरनिराळे हॉटेल्स यांची माहिती घेता आली. बरीचशी ठिकाणे निवांतपणे बघता आलीत. हॉलीवुड लिहिलेल मोठे नाव हे खुप दुरुनही लॉस एंजेल्स शहराच्या अनेक भागांतुन आपण पाहु शकतो.

ग्रीफिथ पार्क हे हॉलीवुडच्या डोंगराच्या पायथ्याशी आहे. येथे पूर्ण दिवस लोक आपआपले डबे आणि चटया घेऊन एका दिवसाच्या सहलीला येतात. चटया अंथरुन हॉलीवुडच्या हॉर्डींगला बघत बघत केव्हा तंद्री लागते कळतच नाही.

तेथुन जवळच असलेला हॉलीवुड स्ट्रीटवर जगभरातुन खुप प्रवासी येतात. याचे वैशिष्ट्य असे कि, येथील फुटपाथवर आजी, माजी सिनेमा तारकांच्या हातांचे आणि पावलांचे ठसे गोंदविलेले आहेत. आपल्या आवडत्या नट-नट्यांच्या ठश्यांबरोबर सर्व प्रवासी हौशीने फोटो काढीत असतात. याला हॉल ऑफ फेम असे म्हणतात.

हॉलीवुड स्ट्रीट ज्याला हॉलीवुड बुलेवाड असे म्हटले जाते. अनेक बघण्यासारखी ठिकाणे येथे आहेत. चायनीज थिएटर, कोडॉक थिएटर मॅडम टुसो, वॅक्स म्युझियम किंवा छोटे-छोटे ७ डी थिएटर.

दुसरे महत्त्वाचे ठिकाण रोडिओ ड्राईव्ह. लॉस एंजेल्समधील एकदम हॉटस्पॉट. जगातील सर्व महत्त्वाच्या व महागड्या ब्रॅन्डस्ची दुकाने येथे आहेत. एखादा सेलेब्रिटी जर येथील दुकानांत गेला तर ते दुकान इतर ग्राहकांसाठी बंद करण्यात येते. या सेलेब्रिटी लोकांची प्रायव्हसी जपण्यासाठी हे असे केले जाते. त्यांची खरेदी इतकी जास्त असते कि दुसऱ्या लोकांना ते आतच घेत नाहीत.

येथील दुकानांमध्ये आपण जर एखाद्या वस्तुची किंमत विचारली तर दुकान मालकांना आवडत नाही. कारण यांच्याकडे येणारी मंडळी काही आवडले तर ते सरळ विकत घेतात. किंमत विचारत नाहीत.

रोडीयो ड्राईव्ह



ब्रेव्हरली हिल्समध्ये अनेक नट नट्या राहतात. जे रोडीयो ड्राईव्हर शॉपींग करतात. आयुष्यात पहिल्यांदा रॉलस रॉईस गाडी ती येथेच पाहिली. ज्या ठिकाणी ती पार्क केली होती त्या समोरील दुकान आतुन बंद होते म्हणजे कोणीतरी सेलेब्रिटी तेथे अवश्य होता. जगामध्ये कुठेही एका गिऱ्हाईकासाठी कोणी पूर्ण दुकान बंद करीत नाही.

प्रवासी सहल कंपन्या ब्रेव्हरली हिल्स




एरियामध्ये बसमधून अनेक नट नट्यांची घर दाखवितात. त्यात केटी पॅरी, लिओनार्डो डी कॉप्रीओ, अल पचीनो, जॉनी डेप, जस्टीन वायबर हे त्यातील काही महत्त्वाचे नट.

दुसरी महत्त्वाची गजबजलेली जागा म्हणजे फार्मस मार्केट आणि ग्रोव एरीया. येथे ४०-५० छोटेखानी जेवणाच्या जागा आहेत. जेथे चायनीज, इटालीयन, मेक्सीकन, ओरीऐटल, इथीओपीअन निरनिराळया पध्दतीचे जेवण मिळते. या एरीयामध्ये शॉपींगची दुकाने आहेत आणि नवोदित कलाकार येथे गाण्याचे आणि संगीताचे कार्यक्रम करीत असतात. गवतावर चटई अंथरुन लोक आवडीने त्यांचा आनंद लुटत असतात.

ग्रेव वरुन उजवीकडे वळल्यावर फेअरफॉक्स ॲव्हेन्युवर सुप्रीम नावाच कपड्याचे दुकान आहे. माझ्या नातवाला जो




ब्रेवरली हिल्स शाळेत आहे. त्याला सोडायला या रस्त्यावरुनच जावे लागायचे. रोज सकाळी येथे दुकान उघडण्यापुर्वी जवळ जवळ १०० माणसे आत जाण्यासाठी रांगेत उभी असायाची. पुढचे काही लोक आपला नंबर रांगेत शेवटच्या माणसाला १०० डॉलरीला विकायचे. जेणेकरुन शेवटचा माणुस दुकानात लवकर जाऊ शकेल. सगळंच अजब. आजपर्यंत जगाच्या पाठीवर दुकानात जाण्यासाठी कोणी १०० डॉलर मोजले आहे असे पहाण्यात आले नव्हते पण येथे रोज दिसुन येते. कुतुहल पोटी जेव्हा सुप्रीम या बॉन्ड विषयी माहिती काढली तर हे १९९४ पासून टी-शर्ट, शर्ट, पॅन्ट आणि शुज बनवितात. टी शर्टस ४० ते १४० डॉलर्सपर्यंत किंमतीचे ओरिजनल आहेत जे नंतर लोक ५०० ते १००० डॉलरपर्यंत विकत घेतात. सप्लाय कमी आणि डिमांड जास्त आणि लोकांची याबद्दलची क्रेझ त्यामुळेच हे असं घडतं. यांचे मुख्य दुकान

न्युयॉर्कमध्ये आहे. यांच्या शाखा, लंडन, पॅरीस, टोकीयो, सॅन फ्रॅन्सीस्को येथे आहेत. आता कोवीडमुळे फक्त ऑनलाईन यांच्या कपड्यांची विक्री सुरु आहे. बरेच लोक अमेरिकेत एकटेच असतात. त्यामुळेच कि काय यांना कोणीतरी सवंगडी हवा असतो. त्यामुळे येथे कुत्र्याप्रमाणे मांजरीसाठी सुध्दा कॅट कॅफे आहेत.

एका कॅफेमध्ये विविध जातीच्या २५-३० मांजरी ठेवलेल्या असतात. त्यांच्या बरोबर आपण खेळु शकतो, त्यांना गोंजारु शकतो, त्यांना खाऊ पिऊ घालु शकतो. तासाला साधारण २५ डॉलर्स मोजावे लागतात. आतमधील वातावरण अत्यंत सुंदर, आल्हाददायक असते.

एका दुकानावर लावलेल्या फलकाकडे माझे लक्ष वेधले गेले ज्यावर लिहिले होते डॉग कॅफे. येथे आपल्या मालकाबरोबर त्यांचे कुत्रे संध्याकाळी जेवायला येतात. कुत्र्यांसाठी वेगवेगळया पदार्थाची येथे मेजवानी असते. इतकंच काय तर त्यांच्यासाठी वेगळी बिअर सुध्दा आपण ऑर्डर करु शकतो. लॉस एंजेल्समध्ये कुत्र्यांचा जेवढा थाट आहे. तेवढा जगाच्या पाठीवर कोणत्याही शहरात दिसुन येत नाही. येथे १०-१२ असे कॅफे आहेत. जेथे आपण कुत्र्यांसोबत जेवण करु शकतो.

येथील जवळ असणारे समुद्र किनारे जे खुप प्रसिध्द आहेत. ते म्हणजे सॅन्टा मोनीका,



कॅट कॅफे

वेनीस बिच, कॅटॅलिना बिच आणि आयलॅन्डस. शनिवार, रविवार लोक आनंदाने येथे समुद्र किनारा एन्जॉय करायला येतात.

लॉस एंजेल्स शहरामध्ये २५० हून




अधिक म्युझियम आहेत. त्यातील महत्त्वाची

म्हणजे लॅक्मा, लॉस एजेंल्स म्युझियम, म्युझियम ऑफ आर्टस, नॅचरल हिस्ट्री म्युझियम, ग्रीमीथ ऑब्झरवेटरी, चायनीज अमेरीका म्युझियम आणि हॉलीवुड हेरीटेज म्युझियम.

जर २, ३ दिवसांच्या सहली करायच्या असतील तर युनिवर्सल स्टुडिओमध्ये जाऊ शकता. अॅन्याहॅमल डिसनीलॅन्ड आहे. तेथे अनेक प्रकारच्या राईड्स आहेत. अर्थात ऑरलॉन्डोच्या डिझनीपेक्षा हे खूपच छोटे आहे.

दोन दिवसांची दुसरी सहल सॅन्ट बार्बरा आणि सालवँग या शहरांची होऊ शकते.

२० मार्च २०२० नंतर कोरोनामुळे पूर्ण जगामध्ये लोकांच्या दैनंदिन व्यवहारावर खुप परिणाम झाला. प्रथम युरोपमध्ये इटली, स्पेन त्यानंतर अमेरिका मग भारत, ब्राझील आणि अन्य सर्व देशांमध्ये या आजाराची साथ आली. प्रत्येक देशामध्ये ताळेबंदी तर झालीच पण आपापल्या पध्दतीने आपल्या नागरिकांना मदत करण्यासाठी प्रत्येक देशाने पावले उचललीत. भारताने २० लाख कोटी यासाठी खर्च करण्याची तयारी केली तरी अमेरिकेसारख्या प्रगत देशाने ३ ट्रीलीयन डॉलरचे विधेयक यासाठी मंजुर केले.

अमेरिकेमध्ये रोज असंख्या लोक मरत होते पण दैनंदिन व्यवहार थांबले नाहीत. मार्चमध्ये काही दिवस लोकांनी खुप अन्न साठा केल्यामुळे दुकानांमध्ये काही वस्तुंची कमतरता थोडे दिवस जाणवली. पण नंतर सगळया वस्तु नीट मिळत होत्या. आपल्या इथे एप्रिल महिन्यात फार कडक लॉकडाऊन होते. त्यामानाने अमेरिकेत काहीच नव्हते. लोक मास्क घालुन फिरत होते. अमेरिकन सरकारनं प्रत्येक नागरीकाला १२०० डॉलरची मदत केली म्हणजे एका कुटूंबात नवरा बायको, २ मुले मिळून २४०० अशी १०००, ३४०० डॉलरची मदत केली. साधारणपणे २४००० रुपये. आपल्या इथे ५०० रुपये काही जणांना एकदाच मिळालेत. ज्या लोकांकडे काम नव्हते त्यांना डेबीट कार्ड मिळाले. ज्यामध्ये १९०० डॉलरचा











भरणा केलेला होता. म्हणजे अमेरिकन सरकारने त्यांच्या नागरिकांना सढळ हाताने मदत केली. बहुदा ट्रम्प सरकारनं त्यांच्या नोव्हेंबरमधील निवडणुकीची ही पूर्व तयारी केली कि काय? पण नागरिकांना ऐनवेळी मदत झाली.

लॉस एंजेल्स शहरामध्ये समलैंगींक संबंधाना कायदेशीर मान्यता दिल्यामळे येथे LGBT Community चे खूप सदस्य पाहावयास मिळतात. LGBT म्हणजे लेस्बीयन, गे, बाय सेक्सुल्स आणि ट्रान्सजेंडर. दोन मुलं किंवा दोन मुली एकत्र येथे दिसणं हे सर्वसामान्य दृष्य आहे. दरवर्षी जुन महिन्यामध्ये येथे जगभरातुन ५०००० पन्नास हजार समलैंगीक लोक येथे एकत्र जमतात आणि यांचा हा सोहळा गे प्राईड फेस्टीवल म्हणून ओळखला जातो. वेस्ट हॉलीवुड मध्ये सनसेट स्ट्रीपवर १० किमी एवढी लांब याची परेड असते. ड्रम्स, ताशे आणि संगीताच्या तालावर नाचत नाचत हे आपला आनंद साजरा करतात.

अमेरिका आणि जगभरातील २०० हुन अधिक मोठ्या कंपन्या यात सहभाग घेतात. याचा अर्थ यांचा त्यांना पाठींबा आहे. प्रत्येक कंपनीचा एक चमु, त्यांचे बॅनर घेऊन यात चालत असतात. रस्त्यामध्ये दोन्ही बाजुला सर्व प्रेक्षक बघत असतात आणि अतिशय आनंदाचे, उल्हासदायक असे वातावरण तयार झालेले असते. सॅन्टा मोनीका बुलवाडवर सकाळी १०.३० पासून ही परेड सुरु होते. ती त्यांच्या शेवटच्या टोकाला साधारणत: ४ वाजता संध्याकाळी संपते. तेव्हा यांची खरी पार्टी सुरु होते. ज्यामध्ये मॅरावाना, ड्रग्स, मद्य यांचा रस्त्यावरच आनंद लुटला जातो. प्रेक्षकगण येथे नसतात आणि लॉस एंजेल्स पोलीस त्या दिवशी कानाडोळा करतात पण एकदातरी ही परेड (रंगीबेरंगी) बघण्यासारखी आहे. जी मी गेल्या वर्षी बघु शकलो. यावर्षी ती कोरोनामुळे पुढे ढकलण्यात आली.

याच सॅन्टा मॉनीका बुलवाडवर सॉल्ट ॲन्ड स्ट्रॉ नावाचे प्रसिध्द आईस्क्रीचे दुकान आहे. निरनिराळया प्रकारचे आईस्क्रीम ज्यामध्ये थोडीशी मीठाची चव असते. आधी







आपल्याला चाखायला मिळतात. ७-८ वेगवेगळया प्रकारच्या आईस्क्रीमचा स्वाद घेतल्यावर आपण आपली पसंतीदार आईस्क्रीमची ऑर्डर देऊ शकतो. येथील सॉल्टेड कॅरॉमल खुपच प्रसिध्द आहे.

लॉस एंजेल्सला गेल्यावर घेराडेली मध्ये जाऊन जर आईस्क्रीम खाल्ले नाही तर हॉलीवुडची सहल पूर्ण होणार नाही. हॉलीवुड बुलेवाडरवर हे अतिशय प्रसिध्द आणि जुने दुकान आहे. ज्यामध्ये अनेक विविध प्रकारची आईस्क्रीम मिळतात. बऱ्याच वेळा यामध्ये जागा मिळण मुश्कील असते. येथील वेनीला आणि फज चॉकलेट खुप प्रसिध्द आहे. साधारण १५ डॉलर याची किंमत आहे. आणि ११०० कॉलरीज यामध्ये असतात. एक माणूस म्हणजे आपल्यासारख्या सर्व संपवु शकत नाही. १५० वर्षापासून हे आईस्क्रीम बनविण्याच्या व्यवसायामध्ये आहेत. आता डिझनी बरोबर यांनी भागीदारी केल्यामुळे डिझनीचे सर्व खेळणी, त्यांचे कॅरॅक्टर्स येथे उपलब्ध आहेत. सर्व व्यवसायिक सहली हॉलीवुड स्ट्रीट वर नेतातच. त्यामुळे येथे थोडा वेळ काढून थांबण्यास काहीच हरकत नाही.

आपण भारतामध्ये बऱ्याच वेळा दंगली, दुकानात झालेली लुटमार, गर्दीवरील नियंत्रण न ठेवल्यामुळे सार्वजनिक मालमत्तेची झालेली तोडफोड किंवा बसेस आणि मोटारी यांना आग लावणे हे बघितलेले आहे.

मी प्रथमच लॉस एंजेल्समध्ये लोकांनी एकत्र येऊन बँक तोडतांना आणि मोठी-मोठी दुकाने लुटतांना पाहिले. २४ मे, २०२० रोजी



एका पोलीस अधिकाऱ्याकडून एका आफ्रीकन अमेरीकन, जॉर्ज फ्लॉईड नावाच्या माणसाची हत्या झाली. त्यानंतर अवघे अमेरिका याच्या




निषेधार्थ पेटुन उठले. निरनिराळया शहरामध्ये लोक उत्स्फुर्तपणे रस्त्यावर उतरले आणि त्या चार पोलीस अधिकाऱ्यांवर खटला करण्यात आला.

Black Life Matters (ब्लॅक लाईफ मॉटर्स) असे फलक घेऊन त्यांनी समर्थन




दाखविले. निदर्शक मोठमोठ्याने I Can't Breath असे म्हणत होते. याचे कारण असे होते कि जॉर्ज क्लॉईड ज्याचा पोलीस अधिकाऱ्याकडून मृत्यु झाला. त्याची मान या पोलिसाने आपल्या गुडघ्याने दाबून ठेवली होती. तो सारखा म्हणत होता. मी श्वास घेऊ शकत नाही. I Can't Breath शेवटी ९ मिनिटांनी त्याचा मृत्यु झाला. काही समाजकंटक किंवा गुंडे या गर्दीमध्ये असल्यामुळे त्यांनी माझ्यासमोर चेस बँक तोडली, त्यांचे एटीएम तोडले, ॲापलचे मोठे दुकान लोक जे हातात मिळेल ते घेऊन धावत होते. हा सर्व प्रकार ग्रेव जो वेस्ट हॉलीवुडमधील प्रसिध्द एरिया आहे तेथे झाला. नॅरस्ट्राम नावाचा मोठा मॉल वजा दुकान अक्षरश: लुटले. ही जागा आम्ही जेथे राहात होतो. त्यापासून ५ मिनिटांवर आहे. बघ्याची भूमिका घेत मी हे सगळं प्रत्यक्ष पाहिले. पिशव्या भरभरुन लोक हातात जे मिळेल ते किंमती सामान घेऊन सैरावैरा धावत होते. रस्त्यावर पोलीस एका समांतर ओळीमध्ये पुढे पुढे चालतात आणि आक्रमक लोकांना पुढे पुढे हटवितात. कुठे गडबड गोंधळ दिसत नाही. याचे एक कारण असं कि त्यावेळेस आकाशामध्ये मी ७ हेलीकॉप्टर बघत होतो. ते जणुकाही वरती एका जागेवर स्थिर उभे होते. त्यामधून ते चित्रीकरण करीत होते. यांचे कॅमेरे खुप तेज असल्यामुळे खाली घडत असलेल्या सर्व घटना आपण लाईव्ह टीव्ही वर त्यांच्या-त्यांच्या चॅनेलवर बघु शकत होतो.

दुसऱ्या दिवशी ३४० लोकांना अटक

करण्यात आली. अर्थात हे लोक तेच होते ज्यांनी ॲपल आणि दुसरी दुकाने लुटली. अमेरिकन पोलिसांच्या तावडीतून सुटणं मुश्कीलच याचा अनुभव दिसला.



लॉस एंजेल्स शहरामध्ये एक आगळे वेगळे आकर्षण आहे. येथील हवामान



साधारणपणे १५ ते २५ अंश सेल्सीयस पुर्ण वर्षभर असते. स्वच्छ हवा, सुंदर समुद्रकिनारे, छोटी-छोटी टुमदार घरे, परपल रंगाच्या फुलांची बहरलेली झाडे, शरीराची अत्यंत काळजी घेणारे मनमिळाऊ लोक.

प्रवासी म्हणून किंवा येथे कामानिमित्त येणारा माणूस याच्या प्रेमात पडतो आणि




येथलाच होऊन राहतो. ज्याप्रमाणे मुंबई, पुणेकरांना दुसरीकडे आवडत नाही.



त्याचप्रमाणे लॉस एंजेल्स वासीयांना अमेरिकेच्या दुसऱ्या शहरात आवडत नाही.

# दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा



## सौ. स्नेहल भरत सोपारकर

**B.A., M. A. Sociology, B.Ed.- Maths, History**

भाजपा कल्याण पश्चिम मंडल महिला मोर्चा - सरचिटणीस

महाराष्ट्र शासकीय तांत्रिक प्रशिक्षण महाविद्यालय - समन्वयक

राष्ट्रीय जनगणना मास्टर ट्रेनर, राष्ट्रीय गीत मंच - कोच

पर्यावरण दक्षता सखी मंच - अध्यक्ष

सिद्धेश्वर आळी रहिवासी संघ - अध्यक्ष

"विश्वभ्रमंती दिवाळी अंक" आणि "पांचाळ मित्र अंक" - कार्यकारी संपादक

मराठी प्रवास वर्णन लेखक वाचक मंच - कार्यवाह

संपर्क : निवास - ए / ४०१, श्री सिद्धेश्वर को.ऑप. हौसिंग सो.लि.,
सिद्धेश्वर आळी, पारनाका, कल्याण (प.) ४२१ ३०१

मोबाईल : ९३२४७३२२१४ Email : sbsoparkar55 @gmail.com



# लोकप्रिय शहर...



## सिडनी [ऑस्ट्रेलिया]

मृणालिनी कुलकर्णी (निवृत्त शिक्षिका)
६०१ बी, हिमालय हाइट, भक्ती पार्क, वडाळा (पूर्व),
मुंबई-४०००३७. मो.नं.-९९६९७३७३१८

मोबाईलची व्हॉटस अप क्रांतीची अनोखी भेट म्हणजे आमची ऑस्ट्रेलिया ट्रिप. भारतातून परदेशात गेलेली अनेकजण, जी कोणी कोणाला ओळखही दाखवत नाही, घरी बोलावणे तर दूरच हा अनुभव असतांना मिस्टरांचे कॉलेजचे मित्र डॉ. जोसेफ आणि राणी जोसेफ ह्यांनी स्वतःहून मिस्टरांचा मोबाईल नंबर शोधून आम्हाला ऑस्ट्रेलियाला त्यांच्या घरी राहायला



बोलाविले. त्या दोघांच्या प्रेमळ आग्रहामुळे आम्ही ऑस्ट्रेलियाला जायचे ठरविले. आमचा ऑस्ट्रेलियाचा व्हिसा होताच. सिडनी सोबत अजून पाच शहरे पाहावीत असा विचार करुन आम्ही वीस दिवसाचा ऑस्ट्रेलियाचा दौरा आखला.

डॉ. जोसेफ यांच्या म्हणण्याप्रमाणे आम्ही ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवडयात सिडनीला त्याच्या घरी गेलो. किंग्सफोर्ड स्मिथ सिडनीच्या या जगप्रसिद्ध विमानतळावर डॉ. जोसेफ आल्याने विचारपूस करावी लागली नाही. घराबाहेर राणी जोसेफ स्वागताला उभ्या होत्याच. बंगल्यात प्रवेश करताच समोर वेगवेगळया दिशेला हात असलेल्या खुंटावर विविध आकाराच्या टोप्या पाहताच चित्रपटातील हिरोच्या टोप्या आठविल्या तसेच सून द्वितीच्या बाबांची आठवण झाली. सर्व सोयींनी, वस्तुंनी युक्त अशी हॉलच्या बाजूची गेस्ट रुम आम्हाला दिली. घरात भेटीगाठी होताच प्रवासाचा सारा थकवा पळाला. खास महाराष्ट्रीयन पद्धतीचा उपमा नास्ता, जेवण तयार होते. मैत्रीच्या आठवणींसह इतरही गप्पांना ऊत आला.

परदेशात प्रत्येकाचे स्वतःचे बंगले असतात. जोसेफ यांचा पुढे पाठी थोडी जागा असलेला एक मजली टुमदार बंगला होता. वरच्या मजल्यावर त्यांची व नोकरी करणाऱ्या त्यांच्या दोन मुलींच्या स्वतःच्या स्वतंत्र रुम व्यतिरिक्त खास हॉल तर किचनसहित मोठा डिनर हॉल सोबत खास पार्टी, डिनर, गेस्ट, स्टडी आणि बार रुम. प्रत्येक खोली सोयींनी आणि कलात्मकतेने सजलेली अर्थात राणी मॉमचे कौशल्य आणि बाहेर त्यांचा खास बगीचा... राणी मॉम स्वतः नर्स असून घर आणि नोकरी अशी आपल्याप्रमाणेच

त्यांनीही कसरत केली. आम्ही आलो म्हणून आमच्यासाठी सात दिवसाची रजा घेतली. हवामान बदलत होते. हलकासा पाऊस, गार वारा, माझ्याकडे कार्डिगन असूनसुद्धा बाहेर जातांना त्यांच्याकडील स्वेटर, टोपी, छत्री, चार्जर मला देत होत्या. नव्हे नंतर कायमच्या दिल्या. दुसऱ्या दिवशीच आम्ही त्या घरचे झालो.



संध्याकाळी आम्हाला काही घ्यायचे असल्यास म्हणून भाजी मार्केट, मॉल आणि भारतीय वस्तुंचे दुकान यांना भेट दिली. तीनही ठिकाणी आपल्यासारखीच गर्दी होती, मार्केटमध्ये लहान मोठे गाळे बरेच होते. गजबजाट आपल्याप्रमाणेच. सिडनीने ग्लोबलइंडियन हि संकल्पना चांगल्या पद्धतीने स्वीकारली आहे. भारतीय संस्कृती जतन करु शकतो. दिवाळीची फटाक्यांची आतषबाजी आम्ही अनुभवली. इथे प्रत्येक जण स्वावलंबी, स्वतंत्र आयुष्य जगतात. नोकरी, व्यवसाय व्यतिरिक्त शनि/रविवारी खेळ किंवा इतर आवड चांगल्याप्रकारे जोपासतात. सिडनी हे पर्यटकांचे आवडते शहर आहे. सिडनी हे सर्वात जुने मोठे शहर असून ऑस्ट्रेलियाच्या विकासाची सुरुवात सिडनी पासून झाली. ऑस्ट्रेलिया जगातील सहाव्या नंबरचा मोठा देश आणि जगातील सर्वात लहान खंड म्हणून ओळखला जातो. सिडनी पॉसिफिक महासागरावर स्थित असून न्यू साऊथ वेल्स राज्याची राजधानी आहे. जागतिक दर्जाचा स्थापत्याचा वारसा सिडनीला लाभला आहे. सिडनी हे मुंबई प्रमाणे ऑस्ट्रेलियाचे आर्थिक शहर आहे. आमच्या सिडनी स्थल दर्शनाची जबाबदारी जोसेफ दाम्पत्याने घेतली असल्याने आम्ही निश्चिन्त होतो. समुद्राच्या प्रवासाशिवाय सिडनीची सहल पूर्ण होऊ शकत नाही याचे प्रत्यंतर दुसऱ्याच दिवशी आले.

सर्क्युलर क्वे सिडनीचे प्रमुख नौका टर्मिनलचे घर आहे. समुद्र पर्यटन फेरी सेवा इथून हजारो नागरिक वेगवेगळया ठिकाणी सुरक्षित प्रवास करतात. दुमजली बोटीत आम्ही उघडयावर बसलो. विज्ञान माहित असले तरी समुद्राच्या पाण्याचा निळा रंग मोहवितो. पॉसिफिक महासागराचे निळसर पाणी दुभंगत पांढरा फेस मागे टाकत बोट वेगाने जात होती. गार वारा, समोर

कार्यालयीन उंच इमारती, कमानी पूल आणि पांढरा शिंपला बघत सर्क्युलर क्वे स्टेशनच्या बाहेर आलो. आपल्या प्रमाणेच आपल्या धुंदीत गटागटाने लोक जात येत होते. सीएसटी स्टेशनची आठवण झाली. अनेक दुसऱ्या देशातील पर्यटक होते.



वन्य जीवांविषयी आस्था असणारे आणि सहकुटुंबाने यावे असे सर्वांचे आवडते ठिकाण सिडनीचे तारोंगा (टोरोंगो) प्राणी पार्क. रोपवे ने वर गेलो. ऑस्ट्रेलियातील आणि इतरही वन्य जीवांचे जीवन या तारोंगा प्राणी संग्रहालयात आपण जवळून पाहतो. आम्ही मुक्त आहोत हीच जाणीव येथील प्राणी उघडयावर स्वतंत्रपणे फिरतांना पाहतांना जाणवली. जर्मनीत बर्लिन तेथे ही प्राणी पिंजऱ्यात नव्हते. डोंगरावरच्या पॉइंटस्प्रमाणे प्राण्यांना जवळून पाहण्यासाठी कठडयाच्या गॉलऱ्या आहेत. सर्वत्र एलिव्हेटेड बोर्ड वॉक आहेत. वाघाला आपल्या बछडया सोबत, एशियन हत्तीला आपल्या बाळ हत्तीबरोबर ममतेने खेळतांना, जोडीने उंचावरची पाने खाताना जिराफ, चिम्पाझी, गेंडा, अस्वल, मोठा शिकारी उंदीर, कॉपी बारस, कांगारु, कोआला एनकौंटर, पेंग्वीन कॉलनी, मोठया काचेच्या शोकेसमध्ये जलचर प्राणी, इ. अनेक जैविक विविधता पहातो. मुख्य आकर्षण मुक्त उड्डाण पक्षी (QBE) आणि सील शो याचे. पक्षांच्या शोसाठी निवडलेली जागा इतकी विलोभनीय आहे, शो बघण्यासाठी अर्ध वर्तुळाकार सिमेंटच्या स्टेडियमवर बसताच समोर पॅसिफिक महासागर, ती कमान व तो शिंपला मध्यभागी गोलाकार स्टेज, बाजूला झाडे. निवेदक आपल्या सहकाऱ्यांसोबत आपल्याशी संवाद साधत पक्षांना साद देताच, हाक मारताच बाजूच्या घरटयातून पक्षी बाहेर येतात आपल्याभोवती गोल घिरटया मारतात. आणखीन बरेच... संवादक सांगेल, दाखवेल त्याप्रमाणे क्रिया करतात.असाच अनुभव सील शोमध्ये अनुभवता येतो. संगीताच्या साथीने, सहकाऱ्यांसोबत चुटकुले करीत संवादक सांगेल, दाखवेल त्याप्रमाणे आपण सीलच्या क्रिया पाहतो. चिडिया घर: छोटया पिंजऱ्यात पक्ष्यांना न ठेवता, लांबलचक एका रेषेत असलेल्या बैठ्या चाळीतील खोल्या म्हणजे

ती पक्षांची घरे होत. प्रत्येक खोलीला खिडक्या असून चारी बाजूने काही अंतर ठेवून जाळी व छत आहे. त्यामुळे पक्षी एकमेकांच्या घरी जावे तसे निदान त्या चाळीत विहार करीत होते. साहसाची आवड असेल तर जंगलाच्या रोपवेचा हिस्सा बनू शकता. एका झाडापासून दुसऱ्या तिसऱ्या झाडावर बांधलेल्या दोरीवरुन, फळयांवरुन ओंडक्यांवरुन चालायचे आहे. अर्थात त्यासाठी वेगळे तिकीट पोशाखासह दिले जाते. लहान डोंगरावर गोलाकार मार्गाने कसे चढतो तसाच तॉरोंगा प्राणी पार्कचा मार्ग मला वाटला. जंगलाप्रमाणे झाडे झुडपे, वाहते पाणी, विखुरले दगड, ओढा, धबधबा, आडवे पडलेले ओडके, फांद्या सारे जंगलात आपण जे जे पाहतो तसेच चांगल्या प्रकारे उभे केलेले आहे. आभास नव्हे तर प्रत्येक प्राण्यांच्या अधिवासानुसार प्रत्येक आखणी, चौक उभारलेले आहेत. पाणी, वॉशरुम, बसायला जागा, निवास, वन्य जीवांसंबंधी संवर्धन आणि विज्ञान अभ्यास क्रमही आहेत एकमेकांच्या साथीत पार्कमध्ये तीन चार तास कसे गेले कळलेच नाही.

सकाळपासून खुणवत असलेल्या शिंपल्याजवळ गेलो. लांबून मोहात पडलेल्या तांबूस सर रंगाच्या पायऱ्या चढतांना त्या ग्रॅनाइटच्या प्लॅटफॉर्म उभे राहिल्यावर, थोडेसे शिंपल्यात शिरल्यावर मन आनंदी



झाले. कारण सर्जनशीलतेच्या उत्कृष्ट कलाकृतीपाशी आम्ही होतो. आम्ही चौघे काहीकाळ तेथे फिरलो. एक सेकंद अल्बर्ट हॉलहि आठवला. ऑस्ट्रेलियातील प्रतिष्ठित चिन्हांपैकी एक महत्वाची खूण सिडनी ऑपेराहाऊस युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळाचे नाव दिलेले हे ऑपेरा हाऊस, पोर्ट जॉक्सन येथे पाण्याने वेढलेल्या बेनेलॉन्ग पॉइंटवर वसले आहे. बेनेलॉन्ग हे ऑस्ट्रेलियाचे पहिले ब्रिटिश स्थायिक आदिवासी होता. हे परफॉर्मिंग आर्टचे बंदिस्त नाटयगृह असून येथे नृत्य, नाट्य, संगीत अशा कला सादर केल्या जातात. यामुळे लोकांचे सांस्कृतिक जीवन संपन्न होते. डॅनिश स्थापत्यकार योर्न उटझोन यांनी कल्पलेले व बांधलेली हि संरचना सामान्यत: शेल अर्धवट उघडलेला शिंपला. एकापाठोपाठ तीन अर्धवट उघडलेले शिंपले

आपण पाहतो. ते सौंदर्य मनात साठवत पायऱ्या उतरलो. पायरींवर काहीजण विसावले होते. पुढील मोकळया भागात प्रत्येकाचा कॅमेरा चालू होता. चालत चालत सीसीटीव्हि कॅमेऱ्याच्या उभ्या स्तंभापाशी थांबलो. सर आणि मॅडम यांच्या बरोबर डाव्या बाजूला वळलो. वॉव!! जरा विसावू या वळणावर.... निळे आकाश, समोर निळाशार समुद्र, पांढरा शुभ्र शिंपला आणि पायाखाली नि बाजूला हिरवेगार लॉन, आजूबाजूला रंगीत फुलझाडे, वृक्ष...



निसर्गाच्या या रंगाच्या छटेत हरवून गेलो. सकाळपासूनच्या थकव्याला विश्रांती मिळाली. रंगीत फुलापानांच्या **BITEME** या अक्षर रांगोळीने आमचे स्वागत केले. शांत रम्य ठिकाण, विनामूल्य, कधीही यावे, रोज उघडी, वर्दळ नाही, येथे येतांच झाडाफुलापानांनी मन प्रसन्न होते. विशिष्ट उंचीवर तीन स्तरात विभागलेली हि रॉयल बोटॅनिकल गार्डन आणि डोमेन. प्रत्येक स्तरांवर चालण्यासाठी मार्गिका. बागेत सर्व बाजूने फिरतांना मोकळी हिरवळ जागा, मोकळी हवा, मध्ये-मध्ये रंगीत फुलांचे ताटवे, पाम ग्रोव्हज, ऑर्किड फर्न, तसेच काही वृक्षांच्या बुंध्यांचे आकार लक्ष वेधून घेत कॅमेरात बंद होतात. हि जुनी वैज्ञानिक संस्था असून हजारो वनस्पतींचे संवर्धन आणि संग्रह केला जातो. अशी हि एक आकर्षून घेणारी नैसर्गिक टहल जोसेफ यांच्यामुळे समजली.

घरी परतताना थोडासा लांबूनच पोर्ट जॅक्सन येथील बेलेलॉन्ग पॉइंट भागातच रॉल्फ फ्रीमन यांनी डिझाईन केलेला सिडनी हार्बर ब्रिज बघितला. ऑस्ट्रेलियातील सर्वात प्रसिद्ध सर्वांना आकर्षित करणारा प्रतिष्ठित असा जगातील सर्वांत लांब कमानी स्टील पूल. कमानी रचनेमुळे दि **kothyangar** (कोटाचा **hyangar**) या टोपण नावानी ओळखला जातो. मोठया बोटींना प्रवासाला अडथळा येऊ नये यासाठी १३४ मीटर उंच आहे. हा हार्बर वाहतुकीचा दुवा असून हार्बरच्या उत्तर व दक्षिण भाग जोडणारा पूल आहे. रेल्वे मार्ग, वाहतुकीचे मार्ग, कोड मार्ग, महामार्ग पादचारी मार्ग असा हा रस्ता आहे. साहसी वीरांना ब्रिज चढण्याचे एक जबरदस्त आव्हान आहे. ब्रिज चढून

जाण्यासाठी बऱ्याच प्रकारचे टप्पे आहेत. माहिती करुन घ्या. सवलती असतात. शरीर और पाकीट मे जितना दम हो वैसा चुनाव कर दिजीए. नवं वर्षाच्या स्वागताला कमानी पुलावर आतषबाजी केली जाते. असा हा सिडनीतील तारांकित (बकेट लिस्ट) परिसर. १) वन्य जीव-प्राणिसंग्रहालय तारोंगा; २) कलेसाठी ऑपेरा हाऊस; ३) दळणवळणासाठी हार्बर ब्रिज; ४) विसाव्यासाठी वनस्पती गार्डन; आणि ५) प्रवासासाठी सर्क्युलर क्वे टर्मिनल. देश विदेशातील पर्यटक इथे भेट देतात.



प्रत्येक स्थानाचे महत्व वेगळे असते. घराच्या मागच्या बाजूला असलेल्या बसने आम्ही जॉर्ज स्ट्रीट येथे उतरलो. वास्तू कलेसाठी प्रसिद्ध असलेली १९ व्या शतकातली ऐतिहासिक व वास्तुकलेसाठी प्रसिद्ध असलेली व्हिक्टोरीया बिल्डिंग. यांच्या रंगीत नक्षीकाम केलेल्या खिडक्यांच्या काचा आपल्याला मुंबई युनिव्हर्सिटीच्या कॉनव्होकेशन हॉलची आठवण करुन देतात. आम्ही सिडनीतील पाण्यासमोरील (एक वॉटर फ्रंट पैदल यात्री परिसर) अतिशय गजबजलेला, हलचल असलेला, पादचारी परिसर येथे चौघे आलो. सर्वांसाठी एकदम खुला, बरीच आकर्षण असलेला आकर्षक असा भाग. काय जादू आहे माहित नाही सर्वजण इथे रेंगाळतात. कारण स्थानिक आणि पर्यटक यांच्यासाठी अनुकूल असा मनोरंजन विभाग, खरेदीसाठी सर्व तऱ्हेची दुकाने, नाईट क्लब, खाण्याच्या पिण्याच्या खूप व्हरायटी. हॉटेल रेस्टॉरंटची खूपच भाऊ गर्दी, कॉफी, आईस्क्रीम शॉप. जगातील सर्वात मोठा पडदा असलेला आय मॉक्स थिएटर, लाकडाच्या पुलावरुन चालतांना कठड्याच्या बाजूला मोठ्या प्रवासी बोटी असलेला हाच तो सिडनीतील भव्य जल पर्यटन हार्बर. जल वाहतूक मुख्य फेरी टर्मिनल म्हणजेच प्रसिद्ध डार्लिंग हार्बर ब्रिज.

जोसेफ यांनी सांगितल्यानुसार डार्लिंग हार्बर जवळील अनेक आकर्षणांपैकी प्रत्येकाने पाहावेच त्या सिडनी मत्सालयाला फक्त आम्ही दोघांनी भेट दिली. हे एक सार्वजनिक मत्सालय असून जगातील ऑस्ट्रेलियन गोडया आणि सागरी जलचरांचा मोठा संग्रह आहे. समुद्राच्या आत दडलंय

काय? हे मत्सालय पाहिल्यावर समजते. प्राणी पार्क मध्ये प्राण्यांचा अधिवास उभा केला आहे. तसेच येथे नैसर्गिक समुद्र डोळयांसमोर ठेवून आपण जलचर प्राण्यांची जैवविविधता, त्यांचे अनोखे सागरी जीवन पाहतो. त्यांची देखभाल, संवर्धन हि चांगल्या प्रकारे मांडले आहे. एक छोटा अनुभव आपण प्रत्यक्ष अनुभवतो. एका भिंतीवरुन समुद्राची लाट पुढे पुढे येत आपले पाय भिजविते, चालल्यास लाटांमधून आपण



चालतो असा भास होतो. मत्सालयात वेगवेगळया जागा (थीम) आहेत. जसे शार्क रिफ, सी हॉर्स, समुद्री कासव, जेली फिश, ग्रेट बेरिअर रिफ कॉम्प्लेक्स (इथे स्नॉर्कलींग पाहतो), कोरलचे विश्व...., मला विशेषत्वाने आवडले तो चालण्याची उतरण (उतरता-चढता पूल) आणि अर्धगोलाकार पारदर्शक लांब मोठ्या बोगद्यातून वेगवेगळया प्रकारचे शार्क, स्केट्स, रे व इतर अनेक मोठे मासे तरंगत्या समुद्रात पाण्याच्या पृष्ठभागाखालून यू टर्न घेत पाण्यावरुन वर जात येत असतांना अगदी जवळून पाहतो. वरती (ओपन एअर) खुल्या डेकवर येताच माशांचे पोहणे लक्षात येते.



वरती डेकवर माशांना (फिडींग) खाणं दिले जाते. उस्फूर्तपणे आपण समुद्रावर, समुद्री जीवनावर प्रेम करु लागतो. दोन तासांनी आम्ही दोघे बाहेर आलो. जोसेफ आणि मॉडम सोबत होते. म्हणून नाहीतर डार्लिंग हार्बरमध्ये गर्दीत खाण्यासाठी कुठे शिरायचे, काय मागवायचे हा विचार करावा लागला असता. स्वादिष्ट खाण्याचा आस्वाद घेऊन आम्ही बसने घरी आलो.

उद्या १०० का ३०० पायऱ्या चढायच्या आहेत असे डॉ. जोसेफ यांनी सांगताच माझी धडधड सुरु झाली. मला दम लागत असल्याने जमेल नाही जमेल, जावे का रद्द करावे या दंद्वात रात्रभर झोप आली नाही. आज मॉडम बरोबर नव्हत्या. नास्ता करुन

निघालो. रस्त्यात गर्दी अजिबात नव्हती. गप्पा मारत, डोंगर, निलगिरीची झाडे पहात दोन तास गेले. आम्ही जेनोलान लेणीपाशी पोचलो. आम्हां दोघांचे बुकिंग होतेच. बाजूचा बोर्ड वाचल्यावर लक्षात आले गुहेतील लेणी म्हणजेच चुनखडीचे खडक आणि भूमिगत नद्या पाहण्यासाठी अनेक मार्ग आहेत. बाजूलाच निवास लॉज, हॉटेल, वॉशरुम सर्व सोयी आहेत. पर्यटकांचा एक



ग्रुप आल्यानंतर त्यांच्याबरोबर एका विस्तारलेल्या डोंगराखाली आम्ही जमलो. श्री कृष्णाने करंगळीवर उचललेल्या पर्वताची आठवण झाली. जोसेफ बाहेरच थांबले. मार्गदर्शकाच्या सूचनेनुसार आम्ही सर्वजण चढू लागलो. सर्व वयोगट होता. नवल वाटले सिनियर्स सुद्धा किती भराभर चढत होते. सुरुवातीच्या पायऱ्या वगळता गुहेतील रस्ता खूप अरुंद, निमुळता, नैसर्गिक कमी जास्त उंचीच्या पायऱ्या काही चढ चढल्यानंतर विस्तीर्ण गोलाकार भागात निवेदकाने माहिती सांगितली. मला काही कळले नाही. असे तीन वेळा काही चढ चढून थांबलो. एका विशिष्ट उंची पर्यंतच, दिवे असलेल्या जागेपर्यंतच सर्वजण गेलो. जेनोलान नदी जवळील जेनोलान गुहा निळ्या पर्वतांच्या वाळवंटात स्थित आहे. लाखो वर्षांपूर्वीची सर्वात मोठी व जुनी, चुनखडीची एक खुली गुहा. मी थांबत थांबत चढले. शुद्ध पांढऱ्या, पिवळ्या तपकिरी रंगाच्या छटेत चुनखडीचे पुंजके, लोबकळणारे ग्रँड कॉलमप्रमाणे खाली आलेले हे क्रिस्टल पहिले. सागरी जिवाष्म आणि कॉल्साइट यांच्या अद्भुत सौंदर्याच्या चमकदार रचना पाहतांना मला आपल्या भारतातील विशाखापट्टनमच्या सुंदर गुहेची आठवण आली. तेथे वर न चढता खाली उतरतो. ही ऑस्ट्रेलियाची राष्ट्रीय संपत्ती आहे. हॉटेलमध्ये नास्ता करुन निळ्या पर्वताची जादुई बघायला निघालो.

चुनखडीचा अद्भुत चमत्कार पाहून सरांची गाडी कोताम्बा येथे थांबली. खूपच गर्दी होती. प्रसिद्ध पर्यटक स्थळ. पर्यटकांच्या गर्दीवरुन स्थळाची प्रसिद्धी कळते. प्रतिध्वनी पॉइंटकडे जाताना सुविचाराच्या पाट्याप्रमाणे वाळूच्या खडकावर संदेश लिहलेले काही खडक ठराविक अंतरावर उभे होते. कठडा

बांधलेल्या विस्तारित इको पॉइंटवर उभे राहताच दरीतील खडकाळ वैभव, शुद्ध गार हवा, स्वच्छ मोकळे वातावरण आणि क्षितिजावर पसरलेल्या निळ्या रंगाच्या छटेत, धुराळीत ती पर्वत रांग पाहणे हि एक आनंददायी किमया अनुभवतो. हाच तो जग प्रसिद्ध निळा पर्वत. हे पाहत असतानाच प्रतिध्वनी पॉइंटवर स्थित असलेल्या



युनेस्कोचा जागतिक वारसा लाभलेल्या तीन बहिणींवर नजर स्थिरावते. तीन बहिणींची स्वतंत्र भव्य, खडबडीत निर्माण झालेले तीन दगड (रॉक निर्मिती) त्यांच्या उत्कट प्रेमाची कथा जाणवत काही क्षण तेथे थांबतो. दरीत उतरण्यासाठी, तीन बहिणींकडे जाण्यासाठी वाट आहे.

सिनिक जगताचा, निसर्गाच्या क्षेत्राचा जवळून अनुभव घेण्यासाठी जोसेफ सरांनी कोटाम्बोच्या सिनिक रेल्वे पाशी आणले.

१) सिनिक रेल्वे : कोळशाच्या खाणीतून कोळसा आणण्यासाठी तयार केलेली हि रेल्वे आता पर्यटकांसाठी वापरली जाते. जास्त प्रवासी नेणारी, सर्वात वेगवान, सर्वात जास्त झुकणाऱ्या रेल्वेत बसताच मी अक्षरश: कापत होते. पूर्णपणे उतरत्या स्थितीत ५० अंशाच्या कोनातून बसण्याची स्थितीवरुन पारदर्शक आच्छादन असल्याने गाडी खाली जात असतांना पर्जन्य वृष्टी असलेले डोंगर, निलगिरीचे बन बघत जेमिसन दरीतील बोस्टनला उतरलो. बोर्ड वॉक मार्गिकेमधून चालतांना बाजूला बघायचे मन हि नव्हते आणि वेळ हि नव्हता. मनात भीती होती, उशीर झाला होता, आम्हीच पाठी होतो.

२) केबल कार : तिथून केबल कारमध्ये शिरलो. डोंगर शिखरावरचा ४०५ मीटर प्रवास करणारा हा ट्रक वृक्षराजी बघायला अगदी डोंगराजवळ जातो.

३) सिनिक स्काय-वे : काचेचा मोठा सुरक्षित डबा, मुख्यत: तळाशी काच असल्याने सरळ खाली पाहता येते. किती उंचावरुन जातो हे कळते. ७२० मीटरचा प्रवास, कोटाम्बोच्या धबधब्यावरील डोंगरावरुन जाते. तीन वेगळया वाहनांतून निसर्ग क्षेत्राच्याजवळ गेलो. बाहेर सर उभे होतेच. नाश्ता करुन निघताना पांढरे पीस असलेला कावळा पाहिला. घरी येताच

बांधलेल्या विस्तारित इको पॉइंटवर उभे राहताच दरीतील खडकाळ वैभव, शुद्ध गार हवा, स्वच्छ मोकळे वातावरण आणि क्षितिजावर पसरलेल्या निळ्या रंगाच्या छटेत, धुराळीत ती पर्वत रांग पाहणे हि एक आनंददायी किमया अनुभवतो. हाच तो जग प्रसिद्ध निळा पर्वत. हे पाहत असतानाच प्रतिध्वनी पॉइंटवर स्थित असलेल्या



युनेस्कोचा जागतिक वारसा लाभलेल्या तीन बहिणींवर नजर स्थिरावते. तीन बहिणींची स्वतंत्र भव्य, खडबडीत निर्माण झालेले तीन दगड (रॉक निर्मिती) त्यांच्या उत्कट प्रेमाची कथा जाणवत काही क्षण तेथे थांबतो. दरीत उतरण्यासाठी, तीन बहिणींकडे जाण्यासाठी वाट आहे.

सिनिक जगताचा, निसर्गाच्या क्षेत्राचा जवळून अनुभव घेण्यासाठी जोसेफ सरांनी कोटाम्बोच्या सिनिक रेल्वे पाशी आणले.

१) सिनिक रेल्वे : कोळशाच्या खाणीतून कोळसा आणण्यासाठी तयार केलेली हि रेल्वे आता पर्यटकांसाठी वापरली जाते. जास्त प्रवासी नेणारी, सर्वात वेगवान, सर्वात जास्त झुकणाऱ्या रेल्वेत बसताच मी अक्षरश: कापत होते. पूर्णपणे उतरत्या स्थितीत ५० अंशाच्या कोनातून बसण्याची स्थितीवरुन पारदर्शक आच्छादन असल्याने गाडी खाली जात असतांना पर्जन्य वृष्टी असलेले डोंगर, निलगिरीचे बन बघत जेमिसन दरीतील बोस्टनला उतरलो. बोर्ड वॉक मार्गिकेमधून चालतांना बाजूला बघायचे मन हि नव्हते आणि वेळ हि नव्हता. मनात भीती होती, उशीर झाला होता, आम्हीच पाठी होतो.

२) केबल कार : तिथून केबल कारमध्ये शिरलो. डोंगर शिखरावरचा ४०५ मीटर प्रवास करणारा हा ट्रक वृक्षराजी बघायला अगदी डोंगराजवळ जातो.

३) सिनिक स्काय-वे : काचेचा मोठा सुरक्षित डबा, मुख्यत: तळाशी काच असल्याने सरळ खाली पाहता येते. किती उंचावरुन जातो हे कळते. ७२० मीटरचा प्रवास, कोटाम्बोच्या धबधब्यावरील डोंगरावरुन जाते. तीन वेगळया वाहनांतून निसर्ग क्षेत्राच्याजवळ गेलो. बाहेर सर उभे होतेच. नाश्ता करुन निघताना पांढरे पीस असलेला कावळा पाहिला. घरी येताच

मॉडम घरी असल्याने जेवण तयार. खरंच किती भाग्यवान आम्ही. परत गप्पा सुरु झाल्या.

सिडनी जवळच नव्याने वसलेले शहर **Canberra** कैनबेरा ही ऑस्ट्रेलियाची राजधानी आहे. कैनबराचा अर्थ मिटींग प्लेस. सिडनी पासून जवळच असल्याने



आम्ही टूरिस्ट बसने एक दिवसासाठी कैनबेराला भेट दिली. सर्व देशातील पर्यटक त्या बसमध्ये होते. ऑस्ट्रेलियाचे नविन संसद भवन आणि ऑस्ट्रेलियन युद्धस्मारक आतून पाहिले. त्याच बरोबर ऑस्ट्रेलियाची राष्ट्रीय गॉलरी, राष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान केंद्र पाहून आम्ही परतलो.

संपूर्ण सिडनी प्रवासात जोसेफ पती पत्नी आमच्या सोबत असल्याने, त्यांनीच आखणी केल्याने निर्धास्त मनाने, आनंदाने प्रत्येक क्षणाचा आनंद घेत होतो. मी तुम्हांला गर्दी असलेल्या बॉण्डीबीच ऐवजी दुसरीकडे नेतो. सकाळीच नास्ता करुन मॅडमने बरोबर खाणे इतर प्रवास आवश्यक वस्तू घेतल्या. गाडीने जातांना आजूबाजूला कोठे हि कोणत्याही प्रकारची दुकाने दिसली नाहीत. पेट्रोलपंपापाशी मॅडमच उतरल्या केबिनमध्ये जाऊन कार्डने पैसे भरुन मॅडमनेच गाडीत पेट्रोल भरले. नोकर माणसे कोठेही नाहीत. रस्त्यावरही माणसे दिसली नाहीत. शेजार गप्पा टप्पा काही नाही. आपण बरे नि आपले काम बरे हीच मानसिकता दिसली. गाडीत ऑस्ट्रेलिया विविध क्षेत्रातील धोरणे, राजकारण अर्थकारण भारतातील आठवणी असे विविध विषयावर बोलणे चालू होते. कलात्मक मंदिराचा कळस आणि आजूबाजूला अनेक स्मारके असलेली सुंदर वास्तू पाहण्यासाठी खाली उतरलो. दक्षिण गोलार्धातील सर्वात लोकप्रिय आणि प्रभावी असे न्यू साऊथ वेल्सच्या हेलेन्सबर्ग शहरातील व्यकंटेश्वर मंदिर. पारंपारिक भारतीय मंदिराप्रमाणे असून मंदिराच्या आत भगवान व्यकंटेश्वर आणि लक्ष्मी यांचे निवासस्थान असून सोबत इतरही देवतांच्या मूर्ती आहे. येथे पूजा विधी होतात. ऑस्ट्रेलियातील सर्व हिंदू समाजासाठी हे मंदिर म्हणजे अध्यात्मिक घर आहे. आम्ही दोघांनी मंदिरात जाऊन भगवान विष्णू यांचा आशीर्वाद घेतला आणि मार्गस्थ झालो. येथे पार्किंग आणि वॉशरुमची सोय चांगली आहे. नंतर कळाले जंगलांनी वेढलेले छोटे

हेलेन्सबर्ग शहर सिडनी आणि वोलॉनगोन शहरातील प्रवेशद्वार असून आम्ही तिथूनच सी क्लीफ ब्रिजवर आलो. (Sea Cliff Bridge) सी क्लीफ म्हणजे समुद्र तटकी पहाडी. सी क्लीफ ब्रिजच्या एका बाजूला डोंगर आणि दुसऱ्या बाजूला उघडा पॅसिफिक महासागर. S (एस) आकाराच्या या निसर्गरम्य पुलावरुन जाणे हि आमच्यासाठी आनंदयात्रा होती. दक्षिण कोस्टकडे जाणारा हा एक रस्ता प्रसिद्ध ग्रँड पॅसिफिक ड्राईव्ह चा एक विभाग आहे. पूल बांधल्यापासून पर्यटकांचे प्रमुख केंद्र बनले आहे. बाजूचा बोर्डवर त्याचा इतिहास आहे. एका जागी क्लीफ ब्रिज सी कोस्ट किंवा किआमा कोस्ट वॉक येथे कठडा असून पादचारी मार्ग असल्याने कठडयापाशी उभे राहून आणि चालत चालत सुद्धा प्रशांत महासागराचे विलोभनीय दृश्य डोळयात नि मोबाईलमध्ये साठविले. थोडे पुढे जाताच सर्वांनी आवर्जून पाहावे असे स्थळ किआमा ब्लो होल खडकाळ किनारपट्टीवर समुद्राच्या लाटा, वारा यामुळे सागरी धूप होऊन ब्लो (Blow) ची निर्मिती होते. म्हणजेच खडकांना मोठे छिद्र पडते. तेच ब्लो होल होय. जिऑलॉजी मध्ये ब्लो होल म्हणजे सागरी हिटर किंवा गिझर. ब्लो होल हि नैसर्गिक घटना आहे. ज्वालामुखीच्या खडकातील ह्या छिद्रात पाणी आदळताच वेगाने फवारणी सारखे उंच उडत बाहेर पडते. छिद्रातील पोकळ भागामुळे आवाज घुमतो. इथे जोरदार पाण्याची लाट आत येताच पाणी छिद्रातून तळात जाते आणि जास्त दाबाने उसळत बाहेर पडतांना मोठा आवाज येतो. ब्लो होल बाजूला अनेक मोठ्ठाले खडक पाहतो. थोडया पायऱ्या उतरुन खाली आलो पुन्हा कठडयाजवळून विस्तारलेल्या प्रशांत



महासागराचे रुप पाहतो. किआमा म्हणजे प्रकाश. ब्लो हॉल जवळच किआमा लाइट हाऊस हा सक्रिय प्रकाश स्तंभ पाहतो. तेथेच चालतांना आश्चर्यकारक असा सपाट पृष्ठभाग असून वाराच आम्हाला पुढे नेत होता. वाऱ्याबरोबर चालतांना समोर वाळूचा शांत सुंदर सर्फ बीच. मधुर संगीत ऐकत वाळूवर विसावे असा नयनरम्य परिसर होता.

अजून पुढे एका प्रवेश द्वारातून प्रवेश करताच रस्त्याच्या दोन्ही बाजूला हिरवळ, शांत निर्मनुष्य निर्मल परिसर ने भारावून गेलो.

ते दक्षिण गोलार्धातील सर्वात मोठे बौद्ध मंदिर. न्यू साऊथ वेल्स राज्यातील वोलाँनगोग उपनगरातील (Berkeley) बार्कले रॉडवरचे हे (Nan Tien Temple) नान टीएन मंदिर आहे. भव्य बाग, रोलिंग टेकड्या, कुठेही कोलाहल, नव्हे आवाजसुद्धा नाही. सर्वत्र चीन कलाकृतीची छाप दिसत होती. या कॉम्प्लेक्समध्येच एका टेकडीवर बगिच्यात आठ स्तरीय स्थित असलेला पगोडा आहे. पायऱ्या चढून जाताना दुतर्फा उंच झाडे साथ देतात. पगोडा बाजूच्या हिरवळीवर बोधी सत्वाचे वेगवेगळे भाव असलेल्या चेहऱ्याचे वैशिष्ट्यपूर्ण काही उभे काही बसलेले पुतळे आहेत. तैवानचे फो शुआंग शान मुख्य मंदिर पुढे आहे; जे पवित्र धार्मिक ठिकाण आहे. येथे अनेक कारणास्तव पर्यटक येतात. विविध कार्यक्रमांचे, वर्गाचे, परीषद ध्यानधारणा, तसेच उच्च शिक्षण घेण्याचीही सोय आहे. त्यासाठी सर्व सुख सोयीची उपलब्धता आहे. परत माघारी फिरताना प्रकर्षाने जाणवले आमच्यासोबत मॉडम आणि डॉ. जोसेफ असल्याने रोज एकेक दिवस दुर्मिळ आणि प्रसिद्धही स्थाने आम्ही तणाव रहित मस्त आनंदात त्यांच्या सोबत एन्जॉय करीत होतो. आमचे खूप फोटो काढले. स्वत:च्या गाडीतून फिरविले. बस आणि ट्रेनचाही अनुभव घेतला. खाणे मुख्य घरातच पण बाहेरची चव चाखली. ह्यांनी मित्रांसोबत नॉन व्हेज आणि ड्रिंक्सचा मनापासून स्वाद घेतला. मनापासूनची मैत्री अनुभवली..



त्यांच्याबरोबरीने मॉडमचा खूप मोठा मोलाचा वाटा होता. त्यांनी दिलेल्या भेटी माझ्याजवळ आहेतच. आजही सतत आठवण येते.

डॉ. जोसफ यांचे केरळवासी सर्व भाऊ बहीण ऑस्ट्रेलियातच राहतात. आमची सर्वांशी ओळख करुन देण्यासाठी शनिवारी सर्वांना जेवायला बोलावले. जंगी पार्टी आयोजित केली होती. अर्थात भारताच्या आठवणी निघाल्याच. अशारितीने सिडनीतील स्वप्नवत सात दिवस, मित्राच्या आणि मॉडमच्या सहवासात, निसर्गाच्या सान्निध्यात कसे सरले हे कळलेच नाही. कायम आठवणीत राहील अशी झाली ऑस्ट्रेलियाची ट्रिप. मैत्रबंधाची अनोखी भेट. आणि आम्ही पुढच्या शहराकडे मार्गस्थ झालो. अर्थात ते विमानतळावर सोडायलाहि आले होते.

- With Best Compliments from -

# M/s Standard Printing Inks

**Manufacturers of Offset Printing Inks**

**Happy Diwali & Prosperous New Year**




**: Address :**

**Plot A128, TTC Industrial Area, Khairane MIDC,**
**Navi Mumbai. Tel. : 022 27681407**



# बाली एक अद्भुत बेट

## [इंडोनेशिया]



क्षिप्रा शरद शहाणे
अ/१४, गोदावरी अपार्टमेंटस्, सिंहगड रोड, आनंदनगर, पुणे-५१
दूरध्वनी-९८५०६२३२९८

इंडोनेशिया देश म्हणजे अनेक बेटांचा समूह. १७,५०८ पेक्षा अधिक बेटं असलेला हा देश. यातील जावा, सुमात्रा, न्यू गिनी, बोर्नियो या प्रमुख बेटांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. बाली बेटाची जगाची सकाळ अशी ओळख सार्थ ठरते. बाली बेटावरील



प्रसन्न, आल्हाददायक समुद्र किनारे, आखीव-रेखीव मंदिरे, सर्वत्र सांस्कृतिक संपन्नतेच्या खुणा दिसणारे सुंदर बेट.

डोळयांचे पारणे फेडणारं अनुपम्य निसर्गसौंदर्य पहायचंय? वाट कसली बघताय... चला बालीला फेरफटका मारायला. मुंबई ते डेनपसार हे ५५८१ कि.मी. अंतर विमानाने जायला सात तास पस्तीस मिनिटे लागतील. गरुडा इंडोनेशिया या विमानाने बालीच्या राजधानीत उतरायचे. बालीच्या पारंपारिक शैलीत बांधलेलं विमानतळ अत्याधुनिकता आणि सांस्कृतिकता यांचा सुरेख संगम असलेलं विमानतळ पहायचं..!

विमानतळावर सर्वत्र डयुटी फ्री दुकानं शॉपिंगसाठी खुणावतील. पण त्यासाठी इंडोनेशियन रुपी हे चलन बरोबर असायला हवं! अगदी लाखो रुपयांची खरेदी करणं शक्य आहे. ही गंमत नाही हं! अहो, आपले भारतीय पाचशे रुपये म्हणजे इंडोनेशियन एक लाख रुपये...!!

अगदी ब्राह्ममुहूर्तावर डेनपसार येथे पोहोचलोय. झुंजुमुंजू झालंय... आकाशात लाल सोनेरी छटा पसरलेल्या आहेत. हळूहळू वसुंधरेचा गाभारा तेजाने उजळू लागलाय. निशेचा तम सरुन उष:काल झालाय. 'बाल अरुण' सृष्टीचे स्वागत करण्यासाठी सज्ज झालेला आहे. हसरी, प्रसन्न सकाळ आहे. अगदी छान मोकळा श्वास घेऊन ताजेतवाने व्हा.

बालीमध्ये गुडमॉर्निंग म्हणून स्वागत करण्याची प्रथा नाही. अदबीने हात जोडून 'नमस्कार' म्हणायची प्रथा आहे. विमानतळामधून बाहेर येताच पांढऱ्या

चाफ्याच्या गळयात माळा घालून सुवासिक, प्रसन्न स्वागत झालं. रस्त्याच्या मध्यभागी श्रीराम, अर्जुन आणि घटोत्कच यांच्या भव्य प्रतिमांचे दर्शन घडले. प्रत्येक चौकात



देवदेवतांचे पुतळे पाहून रामायण, महाभारताचे दर्शन घडत होते.

रस्त्यावर गगनचुंबी इमारती नाहीत. एक किंवा दोन मजले असलेल्या टुमदार इमारती, रस्ते स्वच्छ, खड्डे नाहीत, धूळ नाही, रस्त्यांच्या दुतर्फा पांढऱ्या चाफ्याची झाडे. शिस्तबद्ध वाहतूक, कर्कश वाजणारे वाहनांचे हॉर्न नाहीत. पाहता क्षणी सगळे बालीच्या प्रेमात पडलो. उपहार गृहे, दवाखाने, दुकाने यांच्यावरील पाटया वाचताना मोठी गंमत वाटत होती. आपण देवनागरीत उच्चारानुसार लेखन करतो ना तसे इंग्रजीत लिहिलेले होते. जसे **Doctor** शब्द **Daktar** असा लिहिलेला.

प्रत्येक घर, दुकान यांच्या दारात छोटया-छोटया पानांच्या चौकोनी द्रोणात भात, फुले, उदबत्ती, बिस्कीट असा नैवेद्य ठेवलेला दिसत होता. त्यावरुन त्यांची धार्मिक वृत्ती व संस्कृती यांची प्रचिती येत होती. हिंदू संस्कृतीच्या खुणा केवळ मंदिरे, घरे यातूनच नव्हे तर तेथील माणसांच्या आचार, विचार व उच्चार यातून ही दिसत होत्या. प्राचीन भारतीय संस्कृती व संस्कृत भाषा यांच्याशी बाली बेटाची नाळ जोडलेली आहे.

डच-इंडोनेशिया यांच्यात युद्धानंतर वज्रसंधी झाली. त्याचे प्रतीक म्हणून भव्य स्मारक उभारले गेले. या स्मारकाभोवतालचा परिसर कलात्मकतेने नटलेला आहे. डेनपसार शहर फारच सुंदर आहे. बाली बेटाची झलक पहायला मिळाली. मग हे बेट पाहण्याची, त्या विषयी जाणून घेण्याची, उत्सुकता वाढली. येथील एकूण

लोकसंख्येच्या ९४ टक्के लोक हिंदू धर्माचे तर उर्वरित मुस्लिम आणि बौद्ध धर्माचे. बहासा इंडोनेशिया व बालीनीज ह्या येथील



भाषा.

जावामधील हिंदू महापहित साम्राज्याने इ.स. १३४३ मध्ये बाली बेटावर आधिपत्य स्थापन केले; त्यामुळे तेथे मुसलमानांचा प्रभाव वाढू लागला. आपली मूळ संस्कृती आबाधित रहावी, तिचे जतन व्हावे यासाठी हिंदू बुद्धिमंतांनी बालीमध्ये स्थलांतर केले.

बालीमध्ये अचिंत्यची मूर्ती नाही. त्याऐवजी एका रिकाम्या सिंहासनाभोवती पोलेंग हे श्वेत / कृष्ण चौकटीचे वस्त्र लुंगीसारखे गुंडाळले जाते. त्यावर तेदुंग नावाची नक्षीदार छत्री असते. या सिंहासनावरच प्रसाद व फुले अर्पण केली जातात. बालीमधील प्रत्येक घरासमोर एखादे तरी झाड लावलेले दिसते. प्रत्येक घरात कोणत्या ना कोणत्या प्रकारचा व्यवसाय करणारी माणसे दिसतात. मोठमोठी शिल्पे बनवणारे कसबी कारागीर दिसतात. घरापाशीच तयार मूर्ती ठेवलेल्या आढळतात. घराघरात मंदिरे पहायला मिळतात. घराच्या आवारात देव व आपले पूर्वज यांच्या नावाने मंदिरे बांधली जातात. साधारणत: बालीमध्ये २०,००० मंदिरे म्हणजेच पुरा आहेत. अर्थात बाली बेट देवळांचे, देवतांचे बेट म्हणून ओळखले जाते.

बालीला सांस्कृतिक इतिहास आहे. प्राचीन बालीमध्ये पाशुपत, भैरव, शिव शिदान्त, वैष्णव, ब्रह्म, रेखी, सोरा, गाणपत्य असे नऊ हिंदू संप्रदाय होते. चातुर्वर्ण्य व्यवस्था देखील होती. जातींमध्ये रोटी बेटीचे व्यवहार होत असत. बाली संस्कृतीवर प्रामुख्याने भारतीय आणि काही प्रमाणात

चीनी संस्कृतीची छाप आहे. इ.स. ९१४ श्री केसरी बर्मदेव याने स्थापन केलेल्या ब्लांजोंग स्तंभावर आणि इतर शिलालेखातही 'बाली द्वीप' हे नाव कोरलेले आढळते.

डेनपसार येथे फेरफटका मारुन संध्याकाळी 'तनाहत्मोट' या अत्यंत मनोहारी ठिकाणाला भेट देण्यासाठी गेलो. तनाहलोट आणि उलवातु मंदिर ही खास सूर्यास्ताच्या वेळीच बघितली जातात. 'गॉड ऑफ दि सी' म्हणून ओळखले जाणारे तनाहलोट हया मंदिराची बांधणी अप्रतिम आहे. या मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश निषिद्ध आहे. या मंदिराच्या प्रवेशद्वारापाशी येणारे समुद्राचे पाणी पवित्र मानले जाते. समुद्रातील एका विशाल खडकावर 'निया' नावाच्या संताने हे मंदिर बांधले असे मानले जाते. या मंदिरात भरतीच्या वेळी जाता येत नाही.

विदेशी पर्यटकांनी फुलून गेलेला परिसर, समुद्रातील फेसाळणाऱ्या लाटा, उडणारे शुभ्र तुषार, स्वच्छ नितळ जलाशय, निळेशार पाणी. या खडकावरुन त्या खडकावर उडया मारताना लहानपण अनुभवत होतो. विशाल खडकावरील ते मंदिर अस्ताचलगामी सूर्यदेवाच्या अदभुत छटांनी विलोभनीय दिसत होता. तनाहलोट याचा अर्थ समुद्रातील जमीन. त्या जमिनीवरील हे मंदिर. हे मंदिर अगदी आगळेवेगळे, विलक्षण सुंदर. आजपर्यंत असे मंदिर पाहिलेले नव्हते. एक वेगळीच अनुभूती... अवर्णनीय. शब्दातीत अशी!

पहिल्याच दिवशी डेनपसार, तनाहलोट



समुद्रातील मंदिर पाहून आमची बाली दर्शनाची उत्सुकता वाढली. त्या दिवशी मात्र भोजनोत्तर हॉटेलमध्ये गेलो आणि दमलेलो असल्याने निद्रादेवीच्या कुशीत विसावलो. सकाळी लवकर उठून, आवरुन हॉटेलच्या परिसरात फेरफटका मारायला गेलो. शाळकरी मुले संगीताच्या तालावर व्यायाम

प्रकार करताना दिसली. प्रभात फेरी झाली. खूप ताजेतवाने वाटत होते. हॉटेलमध्ये जाऊन न्याहरी करुन बाली दर्शनासाठी सज्ज



झालो.

बालीची राजधानी म्हणजे उबुद...! आज राजधानीत फेरफटका मारणार होतो. उबुद म्हणजे लोककला व निसर्गसौंदर्य यांचा मिलाफ. आयुंग नदीच्या किनाऱ्यावर वसलेले हे उबुद. उबुदला जाताना वाटेत निसर्गसौंदर्य भुरळ घालत होते. हिरवेकंच डोंगर, हिरवीगार भाताची शेते, संत्र्यांनी लगडलेली संत्र्यांची झाडे, ताजी शुद्ध हवा, फारच प्रसन्न वाटत होते. आयुंग नदीच्या काठावर सर्वात पुरातन आणि भारतीय तत्त्वज्ञानाचा पाया असलेले रामायणातील प्रसंग कोरलेले आहेत. दगडांवर वानर, हत्ती, मानवाकृती कोरलेल्या. कोरीव काम अप्रतिम! ही शिल्पे अगदी सजीव वाटावीत अशी. हे कोरीवकाम करणाऱ्या हातांना सलाम केला. त्या कलाकृती डोळयांच्या कॅमेऱ्याने टिपून मस्तिष्कात साठवून ठेवल्या. जाताना वाटेत बाटु पुलान येथे बाटिक प्रिंट कसे करतात हयांचे प्रत्यक्ष दर्शन घडले. त्याच ठिकाणी तयार केलेल्या वस्तू यांचे एका भव्य दालनात प्रदर्शन भरवले होते. अर्थात आवडलेल्या वस्तू खरेदी करण्यासाठी मुभा होती. हे दालन रसिक, चोखंदळ ग्राहकांच्या प्रतीक्षेत होते हे वेगळे सांगायलाच नको.

बातूर टेंपल पहायला गेलो. बातूर टेंपल म्हणजे ब्रिटिश आणि चायनीज संस्कृतीचा संगम. मुख्य मंदिराच्या परिसरात अनेक उपमंदिरे पहायला मिळतात. देवदेवतांच्या प्रतिमा, रंगी-बेरंगी छत्र्या, घोडे यांनी सजलेले मंदिर. या मंदिराचे प्रवेशद्वार भव्य. त्यावरील कोरीवकाम अप्रतिम असे. बालीमध्ये मंदिरात प्रवेश करण्यासाठी वेशभूषा महत्त्वाची असते. अपुरे कपडे, अंगावर पदर

अथवा ओढणी नसल्यास आत जाता येत नाही. पण निराश व्हायचे कारण नाही. मंदिराबाहेरच निळे, पिवळे, किरमिजी रंगाचे सरोंग म्हणजेच लुंगीसारखे वस्त्र नेसण्यासाठी देतात. ही सेवा विनामूल्य असते. हे वस्त्र कमरेभोवती गुंडाळावे लागते.

अयुंग पर्वताच्या उत्तरपूर्वेला असलेल्या बातूर येथे किंतामणी हा जिवंत ज्वालामुखी आहे. याच्या उद्रेकामुळे १० ते १३ कि.मी. बातूर तळे तयार झाले आहे. या तळ्याकाठी अनेक छोटी छोटी गावे वसलेली आहेत. हा परिसर धूर व धुके याने झाकोळलेला असल्याने विलोभनीय दिसतो.

याच परिसरातील पुरा बैसाखी हे मंदिर सर्वात भव्य आणि अत्यंत पवित्र मंदिर. या मंदिराला सर्व मंदिरांची माता समजले जाते. सर्पराज वासुकी याच्या नावावरुन मंदिराचे नाव पडले. हे मंदिर सुमारे दोन हजार वर्षे पुरातन असावे. मार्कंडेय व अगस्ती ऋषींनी बालीमध्ये हिंदू धर्म स्थापन केला असा धर्मग्रंथात उल्लेख आहे. पंधराव्या शतकात बालीमधील मेलगेल या हिंदू राजघराण्याने या मंदिराला राजमंदिराचा दर्जा दिला. हे मंदिर म्हणजे पुरा पेनातरान अयुंग या मुख्य मंदिरासकट एकमेकांना लागून तेवीस उपमंदिरांचे संकुल आहे. पर्वत उतारावर पिरॅमिडसारखे खालून वरपर्यंत असे सहा स्तर असलेली मंदिराची रचना आहे.

बालीतील मंदिरे वैशिष्टयपूर्ण रचनेमुळे लक्षवेधी ठरतात. मंदिरे चार भिंतीत बंदिस्त केलेली नाहीत. निळे खुले आकाश



म्हणजेच मंदिराचा कळस. येथील सगळ्या मंदिरांचा परिसर भव्य असून मुख्य मंदिराला उपमंदिरांनी एकमेकांना जोडलेला आहे. मंदिरांची रचना पवित्र त्रिमंडल या सुत्रानुसार केलेली आहे. प्रत्येक मंदिराच्या सभोवती सुशोभित बाग असते. नृत्य, समारंभ या कार्यक्रमांसाठी काही जागा राखीव असते.

मध्यभागातील आवाराला मध्यमंडल किंवा जबातेंगा म्हणतात. हा भाग धार्मिक विधिंसाठी राखीव असतो.

येथील आवार उंचावर असते. याला उत्तममंडल म्हणजेच 'जेरो' म्हणतात. याची रचना अचिंत्यचे पद्मासन पॅगोडासारखे एकावर एक अनेक छपरे असलेले मनोरे अशी असते. यालाच 'पेल्लिंग्गी मेरु' म्हणतात. याचे दार दुभंगलेले असते यालाच 'चंडी बेंतार' म्हणतात. छपरावरील कोरीवकाम, रंगरंगोटी फारच कलात्मक असते. हीच रचना राजेराजवाडयांच्या महालांसाठी वापरलेली असते.

बाली हिंदू धर्मात पर्वत व ज्वालामुखी यांना उच्च स्थान असल्याने यावरील मंदिरे उच्च दर्जाची मानली जातात. समुद्रकिनाऱ्यावरील बेटाच्या अंर्तभागात बांधलेल्या मंदिरांना 'पुरा सेगारा', 'पुरा देसा' म्हणतात. तर झरा, नदी, तळे इ. पाण्याचा स्त्रोत असलेल्या जागी बांधलेल्या मंदिरांना 'पुरा तिर्ता' म्हणतात. बालीमध्ये अशा प्रकारची वैशिष्टयपूर्ण मंदिरे पहायला मिळतात.

बालीच्या दक्षिणेला जिंबारन या जमिनीच्या चिंचोळया पट्टीने मुख्य बेटाला जोडलेला भूभाग असे दोन्ही मिळून 'बूखित द्वीपकल्प' बनलेले आहे. याच ठिकाणी 'उलवातु मंदिर' आहे. पायवाटेवरुन बरेच अंतर चालत गेल्यावर मंदिर व समुद्र यांचे मनमोहक दर्शन घडते. नऊ दिशादर्शक मंदिरांपैकी एक मंदिर. मंदिराच्या मुख्य दरवाज्याच्या बाजूला गणेशमूर्ती आहे. भगवान विष्णू व गरुड यांच्या भव्य मूर्ती आहेत.

येथे 'केचक' नृत्यनाट्याचा अनुभव



अविस्मरणीय! देशविदेशातील पर्यटकांनी खच्चून भरलेले स्टेडियम. मध्यभागी दीपमाळ व त्याच्या भोवती दर्शकांसाठी पायऱ्या, वर मोकळे आकाश, मागे अथांग हिंदी महासागर... मावळतीचा सूर्य... अशी नैसर्गिक प्रकाशयोजना. अगदी आगळे-वेगळे नेपथ्य. खुला रंगमंच, कोणतेही

पार्श्वसंगीत नाही. वादयांचा वापर नाही. पन्नास साठ कलाकार गोलाकार बसून तोंडाने चक् - चक् - चक् - चक् असा आवाज काढून नृत्यनाटयाला पार्श्वसंगीत देतात. या ध्वनींच्या वैशिष्टयपूर्ण वापरामुळेच या नृत्यनाटय प्रकाराला केचक नाव पडले. यात रामायणातील कथांवर नृत्यनाटय सादर होते. या नृत्यनाटयाला भाषेचे बंधन नाही. देहबोली, अभिनय, वेशभूषा यातून पात्र परिचय, प्रसंग कळतात. सर्व प्रेक्षक याला मनापासून दाद देतात.

केचक नृत्याचा आनंद घेऊन नवव्या शतकातील गजगुहा पाहिली. एका खडकात असुराचे, प्राण्यांचे मुखवटे कोरलेले आहेत. १९९५ मध्ये या गुहेला युनेस्को वर्ल्ड हेरिटेज मध्ये समाविष्ट करण्यात आले. उबुद गावाजवळ ही गुहा गोआगुहा, गजागज नावाची ही गुहा. या गुहेतील मुख्य शिल्प हत्तीसारखे दिसते. १९५० साली केलेल्या उत्खननात येथे अनेक स्नानकुंडे सापडली. ही जागा पूर्वी ऋषीमुनी तपश्चर्येसाठी वापरत असत.

आता आम्ही वॉटरस्पोर्ट्सची धमाल अनुभवण्यासाठी सज्ज झालो. चारही बाजूंना समुद्र किनारा लाभल्यामुळे येथे वॉटर स्पोर्ट्स मोठया प्रमाणात चालतात. बनाना बोट, स्नोर्केलिंग, स्कुबा, सर्फिंग असे अनेक रोमांचकारी खेळ खेळण्याची सोय होती. येथील समुद्राचे पाणी निळेशार आहे. हा समुद्र उथळ असल्याने येथे वॉटरस्पोर्ट्ससाठी गर्दी होती. बेनोआ भागातील नुसा दुआ बीच यासाठी प्रसिद्ध. ग्लास बोटीतून कोरल्स बघत दुसऱ्या किनाऱ्यावर गेलो. तेथे कासवे, अजगर, वटवाघूळ, सरडा, घुबड अशा प्राण्यांचे दर्शन घडले. खूप धमाल केली.

बालीतील उबुद नगरीतील मंकी फॉरेस्ट पहायला गेलो. हे माकडांचे पवित्र स्थान. येथे १८६ प्रजातीतील माकडे मुक्त विहार करतात. आत प्रवेश करताना माकडाचे भव्य शिल्प आहे. अनेक बोलक्या पाषाणमूर्ती आहेत.

DMZ या त्रिमिती गॅलरीला भेट दिली. तेथे फोटो काढून एक वेगळीच मजा अनुभवली. शेवटी सगळयांच्या जिव्हाळयाचा विषय म्हणजे खरेदी. चांदीचे दागिने, कॉफी, सोविनर्स, अशा प्रकारची खरेदी करुन आनंद लुटला. अशाप्रकारे...

वैभवशाली बाली दर्शन...
उलगडे इतिहासाचे सुवर्णपान.
दर्शन घडते हिंदू संस्कृतीचे
अनुपम सौंदर्य, अथांग दर्याचे...




**INKS** | **PIGMENTS** | **RESINS**

- Operating in the Printing Industry for more than 4 decades
- Product Portfolio includes the Fanal Toners, Basic Dyes, Organic Pigments, Flushed Pigments, Resins & Varnishes, Additives, Fluorescent Concentrates, Security Inks, Concentrates for Ink Mixing Kitchen and Printing Inks.
- Applications served - Printing Inks, Plastics, Paints and Coatings
- Backward Integration with the facilities for Pigments, Flushed Pigments and Resins manufacturing
- Backward Integration helps us offer products of consistent quality at optimum price points
- Worldwide distribution network helps offer prompt service

## Kwality Chemical Industries Pvt. Ltd.

Office - W-333/334, T.T.C. Industrial Area, M.I.D.C., Rabale, Navi Mumbai - 400701
Ph. - 022-27603072 / 3 Email - info@kwalitychemical.com

**Enquiries -**

- Organic Pigments and Toners - +91(022) 27603072 / 8080812813 / 9222223332
- Resin, Varnishes and Additives - +91(022) - 27614049 / +91-9819598080
- Inks, Flushed Pigments and Concentrates- +91-9321128080

**- Regional Offices -**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| North - 09311210666 | East - 09331355707 | Mumbai - 09987912500 | South - 09791188398 | West - 09320151552 |



# मसाईमाराची जादू...



## आफ्रिका खंड

डॉ. प्राची महाजन
मिनिमल ऑक्सेस सर्जन, ३४६/ए, पीटी म्हसे मार्ग,
लक्ष्मी नगर, नागपुर - ४४००२२.
मोबाईल : ९८२३२ ६५२३६

अनेकांच्या कल्पनेतील आफ्रिका हा खंड म्हणजे पर्यावरण समृद्ध व वन्यजीवनाने नटलेला एक गूढ, रोमहर्षक प्रदेश, उष्णकटिबंधीय हवामान असलेले, प्रामुख्याने आदिवासी जमातीचे वसतिस्थान, अनेक रोगांना आमंत्रण देणाऱ्या रोगट वातावरणाचा अस्वच्छ भूखंड.

आमचे विमान नैरोबी विमानतळावर उतरले. योग्य ते लसीकरण करुनच आम्ही सावधगिरीने नैरोबीमध्ये प्रवेश केला. शिवाय Mosquito repellents, शाकाहारी अन्नपदार्थांची पाकिटे, असा सगळा जामानिमाही सोबत होताच. पण आम्ही कल्पना केली त्याप्रमाणे तिथे डासही नव्हते किंवा शाकाहारी अन्नपदार्थांची कमतरताही. हा आमच्यासाठी एक सुखद धक्का होता. प्रथमदर्शनीच मला जाणवले की नैरोबी हे शहर वाहनांचा व माणसांचा सुळसुळाट असणाऱ्या एखाद्या सामान्य भारतीय शहराप्रमाणेच होते. काही ठिकाणी रस्त्याच्या कडेला मोठ्या आवाजातील संगीताच्या तालावर नृत्य करणारे लोकही आम्हाला दिसले. माझा असा समज, किंबहुना गैरसमज होता की नैरोबी शहर तितकेसे सुरक्षित नाही. परंतु उंच, सडपातळ, चुणचुणीत, मृदुभाषी केनियावासी माझ्या मनातील त्यांच्या प्रतिमेच्या अगदी विरुद्ध निघाले.

आमची राहायची व्यवस्था असलेले हॉटेल उत्तम दर्जाचे होते. त्यातील सुबक अंतर्गत सजावट, फिरते भोजनालय (Revolving Restaurant) व चविष्ट जेवण ह्यांचा आम्ही पुरेपूर आस्वाद घेतला. रस्त्यांच्या रुंदीकरणामुळे नैरोबीचा चेहरा मोहरा आता बदलतो आहे. टाटा, बाटा, महिंद्रा अशी परिचित नावे रस्त्यांवर सर्रास दिसू लागली आहेत. शिवाय मंदिरे व योगकेंद्रे देखील




अधून मधून दृष्टीस पडतात. वाहतूक

शिस्तबद्ध म्हणावी अशी जरी नसली तरी हॉर्नचे कर्णकर्कश आवाज नसणे ही आम्हाला प्रकर्षाने जाणवलेली एक अतिशय प्रशंसनीय बाब होती. विविध केशरचना केलेले टापटीप स्त्री-पुरुष रस्त्याच्या कडेने चालत होते. सामान्यत: तिथले लोक जरी सडपातळ असले तरी स्थूलपणा हा आधुनिक जीवनशैलीचा प्रमुख दुष्परिणामही अधून मधून आढळून येत आहे.

पुढल्या काही दिवसांत आम्ही कच्च्या, धुळीच्या रस्त्यांवरुन प्रवास करत केनिया मधली प्रमुख अभयारण्ये (Wildlife Parks) अंबोसेली, नकुरु आणि मसाई मारा ह्यांना भेट दिली. प्रत्येक अभयरण्याची भूरचना वेगळी, वनस्पती व प्राणीजीवन वेगळे, काही चट्टेरी-पट्टेरी, काही ठिपके असलेले तर काही




नक्षीदार कलाकृती. विस्तीर्ण अंबोसेली नॅशनल पार्क म्हणजे अवाढव्य आफ्रिकन हत्तींचे माहेरघरच. हा संपूर्ण भाग खुरट्या गवताचा आणि दलदलीचा असल्यामुळे हत्ती, पाणघोडे आणि जंगली म्हशींचे हे आवडीचे



स्थान. त्या दिवशी सिंहाचा एक मोठा कळप बघण्याचे भाग्यही आम्हाला लाभले.

तंजानियाच्या सीमेवर असलेले किलिमंजारो पर्वताचे बर्फाच्छादित शिखर हे आफ्रिकेतील सर्वात उंच शिखर आहे. त्याची उंची समुद्रसपाटीपासून सुमारे ५९८५ मीटर आहे. हे शिखर व त्याला खेटून उभी असलेली आणखी दोन छोटी शिखरे, अतिशय विलोभनीय दिसतात. देवा इतकाच पूज्य मानला जाणाऱ्या किलिमंजारोचे दर्शन विलक्षण मानसिक शांतता आणि आंतरिक समाधान देऊन जाते.

नकुरु तलाव हा केनियाच्या उत्तरेला असलेला एक सुपीक, हिरवागार व निसर्गरम्य भूप्रदेश. तिथे प्रवेश केल्यावर थोड्याच वेळात काळ्या

गेंडयाची नामशेष होण्याच्या मार्गावर असलेली एक प्रजाती आम्हाला पहावयास मिळाली. येथील बहुतांश भाग नकुरु जलाशयाने व्यापलेला आहे. दर वर्षी लाखोंच्या संख्येने येणारे रोहित पक्षी (Flamingo) हे ह्या तलावाचे खास वैशिष्ट्य. हे रोहित पक्षी उत्तर युरोपातून उष्ण प्रदेशात येतात. त्यांचे अन्न मुख्यत्वये पाणवनस्पती व शेवाळे. ह्या वनस्पतींचा हळू हळू ऱ्हास होत असल्यामुळे दरवर्षी येणाऱ्या रोहित पक्ष्यांची संख्याही दुर्दैवाने आता घटत चालली आहे. पांढरे गेंडे, तरस, लांडगे, गरुड व अन्य काही पक्षीही आम्हाला इथे पहावयास मिळाले.




आमचे पुढील ठिकाण होते जगातील सर्वाधिक लोकप्रिय अभयारण्य मसाई मारा. मारा आणि तालेक ह्या दोन नद्या असलेला मसाई मारा १,८०,००० चौरस किलोमीटरचा भव्य, बराचसा सपाट व थोडासा डोंगराळ प्रदेश आहे. वन्यजीव प्रेमींचे हे सर्वात




आवडीचे ठिकाण. जिराफ, झेब्रा, हत्ती, चिंकारे, मुंगूस, काळवीट, रानडुक्कर आणि दुर्मिळ दर्शन देणारे मार्जारकुलातील प्राणी म्हणजेच सिंह, बिबट्ये आणि चित्ते ह्यांचे मनसोक्त दर्शन इथे घेता येते. एका चित्त्याने चिंकार्याची केलेली शिकार हे थरारनाट्यही आम्हांला इथे अनुभवण्यास मिळाले. कोणाच्याही अंगावर सर्रकन काटा उभा रहावा अशी विद्युतवेगाने घातलेली ती झडप होती. सिंहाचे एक प्रणयी जोडपेही आम्हाला दिसले.

हा अनुभव स्तंभित करणारा होता. मारा ह्या नदीचे वैशिष्ट्य म्हणजे तिच्यात वसणारे शेकडो गेंडे आणि मगरी. दरवर्षी अनेक काळवीटे व झेब्रा स्थलांतर करण्यासाठी ही नदी ओलांडतात. हे प्राणी व त्यांचे लहान बच्चे त्यांच्या मूळच्या सेरेंगेती प्रदेशातून अन्नपाण्याच्या शोधार्थ इथे येतात. इतक्या मोठ्या संख्येने स्थलांतर करणारे हे प्राणी म्हणजे जगातील एक मोठे आश्चर्यच आहे. इथे अन्नपाणी पुरवठा मुबलक असला तरी ही अतिशय धोकादायक अशी नदी ओलांडताना अनेकदा त्यांच्या जीवावर बेतते. त्यामुळे ह्या प्राण्यांचे अवशेष इथे विखुरलेले आढळतात. ही तरसांसाठी जणू मेजवानीच असते.

तिथल्या लोकांची अशी समजूत आहे की प्रत्येक प्राण्याचे जीवनचक्र वेगवेगळ्या टप्प्यातून जाते. जन्म, वृद्धी, उत्कर्ष, दुख, संकट व मृत्यू. जीवनाचा मूळ उद्देश्य म्हणजे आपली जनुके व संतती ह्यांची वृद्धी व संरक्षण. प्रत्येक प्रजातीतील मुख्य नर हा संरक्षक असतो तर काही वेळा तोच संहारक ठरतो. इतर श्वापदांपासून आपल्या पिल्लांचे रक्षण करण्यासाठी प्रत्येक प्रजातीतील मादीला जन्मभर संघर्ष करावा लागतो. झडप घालण्यासाठी दबा धरुन बसलेल्या भक्षकाची तुलना मनुष्यावर अचानक कोसळणाऱ्या संकटाशी होऊ शकते. मग तो एखादा गंभीर आजार असो, अपघात असो किंवा एखादी अनपेक्षित दुर्घटना. सरतेशेवटी, डार्विनचा उत्क्रांतीचा सिद्धांत रास्तच म्हणायला हवा. ही पृथ्वी म्हणजे वृक्ष, जंगले, प्राणी, पक्षी, पाणी, पर्वते ह्यांनी भरलेला हा निसर्ग. ही इतकी परिपूर्ण अशी परिसंस्था पाहून अचंबित व्हायला होते. ह्या पृथ्वीवर राहणारे आपण




खरोखरच किती भाग्यवान!

मसाई मारामध्ये मसाई समाजाला हाताशी धरुन **'Eco Tourism'**, अर्थात 'निसर्ग पर्यटन' विकसित केले आहे. त्यायोगे निसर्ग आणि मनुष्य ह्यांच्यातील समतोल अतिशय

समर्थपणे सांभाळला गेला आहे. स्थानिक




हॉटेल मालकांनी त्यांना योग्य प्रशिक्षण व पायाभूत सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. व **Hospitality Sector** म्हणजेच आदरातिथ्य क्षेत्रात त्यांना समाविष्ट करुन घेतले आहे. त्यांचे आदरातिथ्य, शिष्टाचार व खाद्यसंस्कृति ह्यांचा आस्वाद घेणे हा एक अतिशय सुखद अनुभव आहे.

कडयाकुलूपे नसलेल्या तंबूत राहणे, पलंगावर बसल्या बसल्या बाहेरच्या जिराफाचे दर्शन होणे, रात्रभर जंगली श्वापदांचे आवाज कानी पडणे हे सगळे विलक्षण रोमांचकारी अनुभव होते. तेथील स्थानिक लोकांची निसर्गाशी नाळ जोडलेली असल्यामुळे त्यांनाच सुरक्षारक्षक म्हणून नियुक्त केले जाते. मसाई स्त्री-पुरुषांना इंग्रजी भाषा चांगली अवगत आहे. ते उत्तम टूरिस्ट गाईड आहेत व सराईत वाहनचालकही. त्यामुळे रस्ते कच्चे असूनही निसर्ग भ्रमणाचा आनंद पर्यटकाला पुरेपूर अनुभवता येतो.

सारांश, टीव्हीच्या छोट्या पडद्यावरुन नॅट जिओ वाईल्ड वर अनुभवलेली जादू कैक पटीने जास्त 'ह्याची देही ह्याची डोळा' अनुभवणे म्हणजे केनियाची अविस्मरणीय सफर.





# अमेरिकेत मराठी गुरूजी...



## पौरोहित्य

शिरीष व. अयाचित (अयाचित गुरुजी)
लॉस एंजिलीस, कॉलिफोर्निया संयुक्त राज्य अमेरिका
मो.नं. : +१ ६५७४६५७२२६

आपण पर राज्यांत किंवा परदेशात रहात असतांना सामान्यत: काही ही काम असले की सर्व प्रथम विचार येतो की समोरची व्यक्ती कोण आहे. म्हणजे मराठी-गुजराती-भैय्या-मारवाडी इत्यादी. उदा. किराणा स्टोर्सचा मालक, इलेक्ट्रीशियन, मेकॅनिक म्हणा किंवा सरकारी खात्यांतला कर्मचारी व तो आपल्या भाषेचा असल्यास एकदम आपले काम सुलभ झाल्यासारखे वाटते. त्याचप्रमाणे अमेरिकेत पूजेच्या बाबतीत गुरुजी भारतीय असणे गृहीतच असते. पण जर का मराठी गुरुजी मिळाले तर लॉटरी लागल्यासारखा आनंद होतो. असा मला येथे काम करतांना अनुभव आला. आम्ही म्हणजे मी व माझी पत्नी अनुराधा मे २०१७ ला अहमदाबादहून लॉसएंजिलीसला मुलगी शेफाली गोळवेलकर कडे आलो. त्याच सुमारास तिला अमेरिकेचे नागरिकत्व मिळाले, त्यामुळे आम्ही ग्रीन कार्डसाठी अर्ज टाकला. माझे वर्क परमिट मे २०१८ ला आले व माझे काम सुरु झाले. पहिलेच काम लग्नाचे आले. पहिल्या दिवशी देवक-ग्रहशांति व दुसरे दिवशी लग्न. अगदी भारतात करतो त्याप्रमाणे. यजमान व भारतातून आलेली मंडळी अगदी खुश होती. आम्ही अशा प्रकारचे लग्न भारतात देखील पाहिले नाही असे उद्गार पाहुणे मंडळींच्या तोंडून ऐकल्यावर ग्रीष्म ऋतूत बसंतऋतु असल्यासारखे वाटले. नवरा मुलगा महाराष्ट्रात वाढलेला मुळचा बिहारी होता. त्याच्या वडिलांनी आपकी तारीफ तो




वीडीओ द्वारा बिहार तक पहोंच गई असे म्हटल्यावर दोन दिवसांचा कामाचा ताण एकदम उतरल्यासारखे वाटले.

अमेरिकेत पौरोहित्य करतांना सुरुवातीला वाटले होते की येथे बहुतांश उच्च शिक्षित वर्ग, त्यांचा देवावर किती विश्वास असेल, पूजा करतांना किती भक्ती-भाव असेल? पण प्रत्यक्षांत त्याच्या उलट अनुभव आला. भारतात सत्य नारायण पूजा

असली की मी व यजमान दोघेच पूजेला बसले असायचो बाकीची मंडळी दुसऱ्या खोलीत गप्पा गोष्टीत मग्न. कथा सुरु



करतांना मी सांगत असे बाकी मंडळीना बोलवायचे असेल तर ऐकायला बोलवा. यजमानीणबाई स्वयंपाक घरातून सांगायच्या गुरुजी तुम्ही कथा सुरु करा, बाकी लोकं येतीलच. एक कर्तव्य म्हणून पूजा करायची असा भाव असावा असे वाटायचे. इथे मात्र एकदम उलट अनुभव. सत्य नारायण पूजेचे यजमान अमेरिकेत जन्मलेला कॅन्सर स्पेश्यालिस्ट डॉक्टर, घरी पाहुणे पण भरपूर आले होते. पण यजमानाला तिलक करुन पूजा सुरु झाली तेव्हापासून ते कथा संपेपर्यंत यजमानापासून सर्व मंडळी मन लावून पूजा पाहत / ऐकत होती. सोवळे पण तितकेच, कारण माझ्या मते सोवळे म्हणजे स्वच्छता. भारतात बरेच लोक रोज सोवळे (पितांबर) नेसून पूजा करतात व कित्येक महिने धूत नाहीत, त्यावर डाग पडलेले असतात. त्या सोवळयाला मी सोवळे म्हणत नाही. त्यामुळे यजमान मला विचारतात, गुरुजी पूजेला लेंगा कुर्ता घालून बसलो तर चालेल नां? तेंव्हा मी सांगतो धुतलेला अगदी चालेल, सोवळे म्हणजे धूत वस्त्र. सामान्यत: माझ्या सोबत अनुराधाला पण आमंत्रण असते, म्हणजे दंपती भोजन (मेहूण) होईल असे यजमानांचे म्हणणे असते. तिची ओटी भरणे व तिला पण काहीतरी गिफ्ट देणे इथे अगदीच सामान्य बाब आहे. हा अनुभव नवा होता कारण गुजरात मध्ये अशी पद्धत कुठेही पाहिली नव्हती. इतकेच नव्हे तर मेहुणाला चांदीचे ताट, वाट्या, पेला व पंचपक्वानांचे जेवण. सत्य नारायण पूजा म्हणजे उत्सवासारखी असते. अर्थात पूजा पण सर्व साधारणत: शनि-रवि असतात. अहो, इथे मंगळागौर देखील शनिवारी करतात. गणेश चतुर्थी कोणत्याही वारी असो, गणपती

शनिवारीच बसणार. मंडळाचा गणपती तर दुसऱ्या शनिवारी व कधी कधी त्रयोदशीला पण बसवतात. कारण पहिल्या शनिवारी काही मंडळींच्या घरचा गणपती असल्यामुळे



लोकं येऊ शकत नाहीत.

आनंदाची व अभिमानास्पद गोष्ट म्हणजे येथे महाराष्ट्रातून आलेल्या तरुण मंडळींच्या प्रगतीबाबत वाटते. शिक्षणाच्या निमित्ताने आलेली ही मंडळी जीवनांत यशस्वी आहेत. याचे उदाहरण म्हणजे आतापर्यंत मी वास्तुशांतीची १४ कामे केली आहेत. अगदी शास्त्रोक्त पद्धतीने पंचगव्य प्राशन करण्यापासून गणपती पूजन, पुण्यवाचन, मातृका, नांदी, आचार्यवरण, वास्तुमंडल पूजन, हवन, बलिदान, पूर्णाहुती व वास्तू प्रतिमा निक्षेप करण्यापर्यंत यजमान आनंदाने चार साडेचार तासांचा विधी करण्यास बसतात.

आंतर-धर्मीय विवाह : पहिले लग्नाचे काम आले ते भारतात जन्मलेले हिंदू वधू-वर होते. तिथे सर्व भारतीय पद्धतीप्रमाणे रिती रिवाज होते पण त्यानंतर लग्नाची जी कामे आली ती **Inter-Faith** लग्न अगदी सामान्य झाले आहे. (कारण-मीमांसा येथे करत नाही) अशा वेळी **Wedding-Co-ordinator** असतो. सुरुवातीलाच फक्त वर-वधू कडून माझा संपर्क होतो बाकी सर्व गोष्टीं कोऑर्डीनिटर सोबत नक्की करायच्या. सर्व साधारणत: वराचे आगमन झाल्यावर मला ५० ते ६० मिनिटांचा अवधी सर्व विधी करण्यासाठी दिलेला असतो. मंगलाष्टक, कन्यादान, वस्त्रबंधन, मंगळसूत्र बंधन, विवाह होम-लाजा होम व सप्तपदी असे सर्व विधी आटोपायचे असतात. अर्थात त्याप्रमाणे मी तयारी पण केली आहे. संपूर्ण विधी मी स्वत: लिहून तयार करुन त्याची चाचणी घेतली होती. कारण सर्व कार्यक्रमाचे **Schedule** असते व त्या-त्या वेळांत व त्या-त्या वेळी करायचे असतात व करतात. विधीसाठी मी सांगितल्याप्रमाणे स्टेज उभारलेले असते. समोरच्या रांगेत वराकडची

व वधूकडची अगदी जवळची मंडळी बसतात. बाकी सर्व मंडळी पण मंडपात खुर्चीवर बसतात. सर्व मंडळी विवाह सोहळा लक्ष देऊन पाहतात / ऐकतात. मी माझा **Headset with Mic** लावतो. मंगलाष्टकाने विधींची सुरुवात होते. येथे मंगलाष्टकाच्या वेळेस अक्षता टाकत नाहीत, फक्त सर्व मंडळी आपल्या जागीच उभी राहतात. मंगलाष्टक झाल्यावर मी सर्वांचे स्वागत करत आपला परिचय देतो व मी आजच्या विवाह सोहळयाचा आचार्य **(Officiating Priest)** आहे असे सांगतो. हिंदू विवाह म्हणजे काय? हे थोडक्यात सांगून जेव्हा जरुर असेल तेंव्हा मंत्राचा अर्थ किंवा विधीची माहिती देईन असे सांगून विधी सुरु करतो. विवाह-होम तंत्रेण करिष्ये असा संकल्प असतो. सप्तपदी मध्ये मी कालानुसार व येथील पद्धतीनुसार बदल केला आहे. भारतीय जीवन शैलीमध्ये पूर्वी बायका गृहिणी असायच्या त्यामुळे एष एकपदी भव म्हणजे तू मला अन्न पुरवणारी हो म्हणजे स्वयंपाकाची जबाबदारी पत्नीची, मुलांच्या संगोपनाची जबाबदारी तुझी अशा विविध जबाबदाऱ्या पत्नीच्या आहेत असे म्हणायचे. पण आता पती-पत्नी दोघेही नोकरी करतात त्यामुळे हया सर्व जबाबदाऱ्या दोघांच्याही आहेत तेंव्हा दोघांनी पण एकदम शपथ घ्यायची. उदाहरणार्थ **Let us take the first step together to provide for our household a nourishing and pure diet.** हो आता आहाराबद्दल जागरुकता वाढली आहे. त्यामुळे पौष्टिक आहार म्हणायचे. सप्तपदीत काय वचने




द्यायची ते पण वधू-वरांना पाठवून त्याच्यात बदल करणे असल्यास करावे असे सुचवतो, कारण येथील व्यक्ती स्वांतत्र्य. लाजा होमाचे फेरे घेतांना देखील वधू, वराच्या मागून न येतां

त्यांच्या सोबत चालते. शेवटी मी आशीर्वाद मंत्र म्हणून उपस्थित पाहुण्यांना माझ्या पाठोपाठ म्हणावयास सांगतो. नंतर मी विशेष आशिर्वाद मंत्र म्हणतो व शेवटी वधू-वरांची नांवे घेऊन आता हे दोघे नवरा-बायको आहेत असे जाहीर करतो व सोहळा संपतो. त्यानंतर भारतातून आलेले पाहुणे मला येऊन भेटतात व आम्ही आतापर्यंत खूप लग्न पाहिली पण त्यातील विधी व मंत्रांचे अर्थ आज कळले असे सांगतात. कारण भारतात लग्न म्हणजे वधू पक्षावर एक ओझे जे वर पक्षाकडे झाल होत नाही तो पर्यंत असते. गुरुजी विधी करत असतांना बाकी सर्व मंडळी आपापल्या गोष्टीत रममाण असतात. मान-अपमान, रुसणे-फुगवे इत्यादी गोष्टींना इथे थाराच नाही. दुसरे म्हणजे इथे सामान्यत: पाहुण्यांची संख्या मर्यादित असते. सर्व साधारणत: १५०-२००, त्यातही लहान मुले फार कमी व आणली तर त्यांचा सांभाळ करण्यासाठी Nanny (मुलांना सांभाळणारी) ची व्यवस्था असते. बऱ्याच वेळा हिंदू विधी नंतर पाश्चात्य पद्धतीने विवाह समारोह असतो. तो उशिरा रात्री पर्यंत असतो.


मी अहमदाबादला तीन वर्षांचा असतांना आलो व मोठा झालो. त्यामुळे मी गुजराती समाजात देखील कामं करतो. त्यांनी तर लग्नात घोडा मागवला होता व नवरा मुलगा चक्क घोड्यावर बसून DJ सह वरात काढून आला. मुलगी Jewish होती तिच्या बहिणी व मैत्रिणी व मुलाकडील काही मुला-मुलीं हिंदी गाण्यांवर कोरिओग्राफरने शिकवल्याप्रमाणे स्टेप्स घेत होते. अक्षरश: हिंदी चित्रपटांत नाचतात त्याप्रमाणे दृश्य दिसत होतं. पाश्चात्य लोकांना भारतीय विवाह पद्धती म्हणजे नाच-गाणे, वरात व आता बूट लपवणे वगैरे प्रकार खूप आवडतात. यातून शिकण्यासारखे म्हणजे शिस्त. प्रत्येक गोष्ट शिस्तबद्ध असते. त्यामुळे गडबड गोंधळ असे काही नसते. अर्थात भारतात लग्नाची गडबड हे एक कारण देखील हवे असते. अरे आमच्याकडे मुलीचे / मुलाचे लग्न होते नां, त्यामुळे गडबडीत विसरलोच हो असे सांगता येते.

इतकेच नव्हे तर इथे नूतन बालकाचे जावळ काढणे, अन्नप्राशन इत्यादी विधी देखील तेवढ्याच उत्साहाने करतात. एकंदरीत मी माझ्या व्यवसायाचा व कामाचा आनंद घेत आहे.

धन्यवाद व नमस्कार.



# आर्मेनिया...



## चिमुकला देश

श्री. प्रवीण कारखानीस
१९ नव गोकुळधाम, जागृत लेन, वडवली, अंबरनाथ (पूर्व), जि. ठाणे-४२१५०१.
मो.नं.९८६०६४९१२७

आर्मेनिया! मध्य आशियातल्या कॉकेशस पर्वतपठारावरचा हा चिमुकला




देश! अनेकांनी याचं नाव देखील आजवर कधी ऐकलं नसेल, कारण ते ऐकण्यात यावं असं अनेक वर्षांत काही घडलंच नव्हतं. आज मात्र आर्मेनिया आणि त्याचा पूर्वेकडील देश, अझरबैजान यांच्यात जी रणधुमाळी चालली आहे. त्यामुळे आर्मेनिया हे नाव सर्वतोमुखी झालं आहे आणि या देशाबद्दलचं कुतूहल चाळवलं गेलं आहे!

मला आठवतंय, अनेक वर्षांपूर्वी मी मुंबईत काळा घोडाजवळच्या मेडो स्ट्रीटवर म्हणजे नगिनदास मास्टर रोडवर एक जुनं, छोटेखानी चर्च पाहिलं होतं. आर्मेनियातून हिंदुस्थानात आलेले एक ख्रिस्ती संत जॉकोब पीटर यांनी ते १७९६ साली स्थापन केलं असल्याचं मला तेव्हा समजलं होतं. त्याचं नाव आर्मेनियन अपोस्टोलिक चर्च असं होतं. नंतरच्या काळात तसंच चर्च मला कलकत्यातल्या फ्री स्कूल स्ट्रीटवर म्हणजे आजच्या मिर्झा गालिब स्ट्रीटवर दिसलं होतं. त्यावरुन त्याकाळी मुंबई-कलकत्त्यात आर्मेनियन लोक बऱ्यापैकी होते, हे मी तेव्हाच ताडलं होतं.

आर्मेनिया हा त्याकाळी युनियन ऑफ सोविएत सोशलिस्ट रिपब्लिकचा अर्थात यु.ए.एस.आर. चा एक घटक होता. साम्यवादी रशियाच्या प्रभावाखाली खाली होता. त्याआधी तो पर्शियाचा एक भाग होता. पहिल्या महायुध्दाच्या काळात, १९१५ साली तुर्कीच्या इस्लामी सत्ताधीशांनी जेव्हा आर्मेनियन ख्रिस्ती लोकांना ठार मारण्याचा सपाटा लावला होता, तेव्हा हजारो आर्मेनियन ख्रिस्तीजन आपला जीव वाचवण्यासाठी अन्य देशांत निघून गेले. त्यांपैकीच पाच सात हजार लोक समुद्रमार्गे आपल्या हिंदुस्थानात आले, अनेक वर्षे ते इथं मिळेल ते काम करत राहिले आणि १९९१ सालच्या अखेरीस आर्मेनिया जेव्हा सोविएत संघराज्यातून बाहेर पडून स्वतंत्र, सार्वभौम राष्ट्र म्हणून घोषित झाला. त्यानंतर त्यातले बहुतेकजण आपल्या मायभूमीकडे परतले. आता मात्र हिंदुस्थानात आर्मेनियन लोक फारच क्वचित कुठे

असतील. ज्या आर्मेनियन व्यक्तींनी एतद्देशीयांशी विवाह करुन आपले संसार इथं थाटले होते, तेही एव्हाना ख्रिस्तवासी झाले आहेत. त्यांची पुढची पिढी तर इथल्या समाजात, इथल्या संस्कृतीत पूर्णत: मिसळून गेली आहे.

विख्यात ठुमरी गायिका गौहर जान, ज्यांच्या आवाजात हिज मास्टर्स व्हॉईसने १९०२ साली हिंदुस्थानात पहिली ध्वनिमुद्रिका काढली होती, त्यांचे वडील हे आर्मेनियन ख्रिस्ती डॉक्टर होते. अलीकडच्या काळातली मुंबईची एक मॉडेल आणि अभिनेत्री टयुलिप जोशी, जी काही वर्षांपूर्वी पेप्सी, बीपीएल, कोकाकोला, सियाराम, पाँडस् यांच्या जाहिरातीत झळकत होती. जी २००१ सालच्या फेमिना मिस इंडिया सौंदर्यस्पर्धेतली एक स्पर्धक होती. जिनं यश चोप्रा निर्मित मेरे यार की शादी है या चित्रपटात संजना या नावानं आणि मनीष झा निर्मित मातृभूमी-ए नेशन विदाउट वुमेन या सात भाषांमध्ये प्रदर्शित झालेल्या आणि जगभर वाहवा मिळवलेल्या चित्रपटात टयुलिप जोशी या आपल्या खऱ्या नावानं प्रमुख भूमिका केली होती. ती एका आर्मेनियन आईच्या पोटी जन्मलेली अभिनेत्री आहे. टयुलिपची आर्मेनियन आई इझाबेला उर्फ झबेल हयाकियान ही तिच्या तरुण वयात लेबेनॉनच्या राजधानीत, बैरुत शहरात नोकरी करत असताना तिचे आणि कामानिमित्त वरचेवर बैरुतला भेट देणारे सूरतचे गुजराती कापड व्यापारी किशोरभाई जोशी यांचे प्रेमसंबंध जुळले. ते दोघे तिथेच विवाहबध्द झाले आणि पुढे कायमचे मुंबईकर झाले. टयुलिप ही त्यांची ज्येष्ठ कन्या असून तिनं मिठीबाई कॉलेजमधून फूड अँड न्यूट्रिशन या शाखेची पदवी मिळवलेली होती. मर्चंट नेव्हीमधले कॅप्टन विनोद नायर यांच्याशी लग्न केल्यापासून ती आपल्या संसारात रममाण झाली आहे.

आर्मेनियाशी संबंधित हॉलीवुडचा एक इंग्रजी चित्रपट १९८२-८३ च्या सुमारास कलकत्यात पाहिल्याचं मला आठवतंय. त्याचं नाव होतं, फॉर्टी डेज ऑफ मूसा दाह हिंदुस्थानी अभिनेता कबीर बेदी याची या चित्रपटात प्रमुख भूमिका होती. आर्मेनियन लोकांवर होत असलेले तुर्की सम्राटाचे अत्याचार आणि जुलूम यात चित्रित होते. फ्रांझ वेर्फेल या जर्मन - ऑस्ट्रियन लेखकाच्या गाजलेल्या आणि अनेक देशांत बंदी घातलेल्या कादंबरीवर हा चित्रपट आधारित होता.

आर्मेनिया हा प्रामुख्यानं अपोस्टोलिक ख्रिस्ती धर्मियांचा देश आहे. संपूर्ण जगात ख्रिस्ती धर्माला सर्वप्रथम राष्ट्रधर्माचा सन्मान कुणी दिला असेल तर तो आर्मेनियानं दिला आहे. आर्मेनियाच्या आर्मावीर प्रांतात वाघारश्शापत या गावाजवळ असलेलं सतराशे वर्षे जुनं, एट्चमियादझिन कॅथेड्रल हेच जगातलं सर्वांत प्राचीन ख्रिस्ती चर्च आहे, असाही त्यांचा दावा आहे. अलीकडेच, युनेस्कोनं या कॅथेड्रलला सांस्कृतिक वारसा दर्शवणारी वास्तू म्हणून मान्यता दिली आहे. कम्युनिस्ट राजवटीखाली सत्तर वर्षे राहूनही आर्मेनियानं अशी कितीतरी प्राचीन प्रार्थनामंदिरे आजपर्यंत शाबूत ठेवली आहेत. चर्चेसचा देश म्हणूनच याची वेगळी ओळख सांगता येते.

आर्मेनियाचा आकार आपल्या केरळ राज्याइतका सुध्दा नाही. अवघे २९७४३ चौरस किलोमीटर्स क्षेत्रफळ असलेल्या या देशाचा बहुतांश भूभाग म्हणजे समुद्रसपाटीपासून तीन हजार फूट इतक्या उंचीवरचं विस्तीर्ण पठार आहे. इथल्या अरागात पर्वताचं सर्वोच्च शिखर बारा हजार फूट उंचावर आहे. या देशातल्या नद्या फार लांबवर वाहत जात नाहीत. अखुरयान ही सर्वांत लांब वाहत जाणारी नदी अवघी १८६ किलोमीटर्स लांबीची आहे. देशाच्या विविध भागात उगम पावलेल्या अराकस, वोरोतान, देबेद, अगस्तेव अश्या अनेक छोट्या-छोट्या नद्या अखेरीस इथल्या लेक सेवान ला जाऊन मिळतात. त्यामुळे हा जलाशय आर्मेनियाला एकप्रकारे वरदान ठरला आहे. या सरोबरातून फक्त राझदान ही एकच नदी उगम पावते आणि ती दक्षिण दिशेला १४० किलोमीटर्स वाहत जाते.

आर्मेनियाची लोकसंख्या पन्नास लाखांच्या आतच आहे. आर्मेनियाच्या बाहेर अन्य देशात जाऊन राहिलेल्या आर्मेनियन लोकांची संख्या याच्या दुप्पट आहे. आर्मेनियन लोक वर्णानं गोरे आहेत. वृत्तीनं लढाऊ आहेत. स्वदेश, स्वभाषा आणि स्वधर्म यांचे ते अभिमानी आहेत. त्यांच्या भाषेत आर्मेनियाला ते हयास्तान म्हणतात कारण तीन हजार वर्षांपूर्वी या प्रदेशात हया संस्कृती विकसित होती. त्यांच्या पूर्वजांच्या सहिष्णू वृत्तीमुळेच तुर्कीच्या इस्लामी राज्यकर्त्यांना १९१५ साली त्यांची कत्तल-ए-आम करणं शक्य झालं अशी त्यांची धारणा आहे. त्यामुळे आजच्या आर्मेनियन पिढीला असा नेभळटपणा आणि बोटचेपेपणा अजिबात मान्य नाही. आक्रमकता हा या पिढीचा स्थायिभाव आहे. तुर्की सम्राटांनी

आर्मेनियन लोकांचं केलेलं हत्याकांड ही घटना ते विसरलेले नाहीत.

ते स्वत:ला अपोस्टोलिक ख्रिश्चन म्हणवतात. त्यांचा ख्रिसमस डिसेंबर अखेरीस, २५ डिसेंबर रोजी नव्हे तर ५ जानेवारीला साजरा होतो. एकेश्वरवाद त्यांना अमान्य असून ईश्वर निसर्गाच्या अनेक रुपात आहे असं ते मानतात. मरणोपरान्त माणसाचा मृतदेह पुरुन न टाकता तो जाळून टाकण्याची त्यांची प्रथा आहे. अशा देहाची काही राख ते जमिनीत पुरतात, काही



आसमंतात विखरुन टाकतात आणि काही राख नदीच्या प्रवाहात सोडून देतात. एकंदरीत पंचतत्त्वातून निर्माण झालेला देह पंचतत्त्वात मिसळून देतात.

आर्मेनियन भाषेला स्वत:ची स्वतंत्र लिपी आहे. इसवी सन ४०५ मध्ये मेस्त्रा प माश्तोत या विद्वान वैय्याकरणींनं ग्रीक, लॅटिन, रोमन, हिब्रू अशा अनेक लिपींचा अभ्यास करुन कॅकेशस पर्वत पठारावरच्या सर्वसामान्य लोकांमध्ये त्याकाळी प्रचलित असलेल्या हायरेन या बोलीभाषेसाठी स्वतंत्र मुळाक्षरे आणि वर्णलिपी तयार केली. त्यांचं हे ऐतिहासिक कार्य कायम स्मरणात राहावं म्हणूनच पुरातन भूर्जपत्रं, पुरातन कागदपत्रं, पुस्तकं यांचं भांडार असलेल्या आर्मेनियातल्या फार मोठ्या आणि महत्त्वाच्या संशोधनसंस्थेला मेस्त्रा प माश्तोत यांचंच नाव दिलं आहे. त्यांचा अतिभव्य पुतळा त्या संस्थेच्या ग्रंथालयाच्या दारातच स्थापित केला आहे. जगभरातल्या विद्वज्जनांसाठी आणि विशेषकरुन प्राच्यविद्या संशोधकांसाठी, आपल्याकडच्या पुण्यातल्या डॉ. भांडारकर ओरिएन्टल रिसर्च इंस्टिट्युट प्रमाणे आर्मेनियाच्या येरेवानमधलं हे मातेनादारन अर्थात ग्रंथसंग्रहालय, एकप्रकारे वरदानच ठरलं आहे.

आर्मेनियन वैज्ञानिक होव्हानेस अदामियान यांनी १९२७ सालीच

दूरदर्शनच्या पडद्यावर रंगीत प्रक्षेपण कसं करता येईल याबाबत काही मौलिक संशोधन केलं होतं. तर बोरिस बाबायान यांनी १९८०च्या सुमारास सोव्हिएत युनियनसाठी महाकाय संगणक अर्थात सुपर कॉम्प्युटर तयार करण्यात यश मिळवलं होतं. त्यावेळी ते लेनिन पुरस्काराने सन्मानित झाले होते. आर्मेनियन खगोलशास्त्रज्ञ व्हिक्टर हंबर्डझुमयान यांनी तारे आणि ग्रह यासंबंधात अनेक नवनवे शोध लावले होते. अर्मेनियात साडेचार हजार फूट डोंगरमाथ्यावर असलेली वेधशाळा त्यांनीच स्थापन केली आहे. विख्यात क्ष-किरण तज्ञ रेमंड दमादियान, ज्यांनी संपूर्ण शरीराच्या अंर्तभागाची छायाचित्रे घेण्याचं यंत्र, मॅग्नेटिक रेझोनन्स स्कॅनिंग इमेजेस मशीन (एम.आर.आय. मशीन) १९७७ साली तयार केलं, ते अमेरिका-निवासी असले तरी मुळात आर्मेनियन होते. विशेष म्हणजे आर्मेनियाचे विद्यमान राष्ट्राध्यक्ष, आर्मेन सार्गसियान हे स्वत:च मोठे वैज्ञानिक आहेत. ते केम्ब्रिज विद्यापीठात पदार्थविज्ञानशास्त्राचे प्राध्यापक होते. लंडनमध्ये ते आर्मेनियाचे दीर्घ काळ राजदूत होते. संगणक क्षेत्रातले ते बडे असामी आहेत. टेट्रिस आणि वर्डट्रिस हे बुध्दीची कसोटी पाहणारे संगणकीय खेळ शोधून काढणाऱ्या तिघांपैकी ते एक होते. सोव्हिएत संघराज्यातून बाहेर पडल्यानंतरच्या गेल्या पाच ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये आर्मेनियानं कुस्ती, वेटलिफ्टिंग आणि बॉक्सिंग या मर्दानी क्रीडाप्रकारात एकूण २ सुवर्ण, ६ रौप्य आणि ६ कांस्य पदकं मिळवली आहेत. बुद्धिबळ हा खेळही या देशांत खूपच लोकप्रिय आहे. मैदानी खेळात महिलांचा सहभाग मात्र या देशात आज तरी म्हणावा तितका दिसत नाही.

खरं तर, महिलांचा सहभाग या देशाच्या राजकारणात देखील तसा फार नाही. तरीही आर्मेनियन पार्लमेंटच्या एकूण १३२ सदस्यांपैकी ३२ सदस्य या महिला आहेत. लिलीत माकुन्त्स या महिला सत्ताधारी माय स्टेप अलायन्स पक्षाच्या संसदेतल्या नेत्या आहेत तर झरुही बातोयान या महिला, आर्मेनियाचे विद्यमान पंतप्रधान निकोल पशिनयान यांच्या मंत्रिमंडळात श्रम आणि सामाजिक विकास या खात्यांच्या केंद्रीय मंत्री आहेत. पंतप्रधान निकोल पाशिनयान यांच्या सुविद्य पत्नी ॲना हकोबयान या तर हाडाच्या पत्रकार असून आजही त्या हयाकाकन झमानक अर्थात आर्मेनियन टाईम्स या सर्वाधिक खप असलेल्या वृत्तपत्राच्या मुख्य संपादक

आहेत. तथापि अश्या महिला अपवादात्मकच म्हणाव्या लागतील. सर्वसामान्यपणे आर्मेनियन महिला गृहकृत्यातच निमग्न असतात. आर्मेनियात स्त्रियांना समानतेची वागणूक मिळते. त्यांचा आदरही राखला जातो आणि त्या सुरक्षित आहेत. बसमध्ये एखाद्या महिलेवर उभं राहून प्रवास करण्याची वेळ आली तर ती महिला आपल्या हातातली पिशवी किंवा आपल्या कडेवरचं मूल जवळपास बसलेल्या कुण्याही अपरिचित पुरुष व्यक्तीकडेसुध्दा अगदी सहजपणे सुपूर्द करते; एव्हढा भाबडेपणा आणि निरागसपणा त्या महिलांमध्ये आजही आढळून येतो!

आर्मेनियन लोक आपल्या पारंपारिक गाण्याबजावण्यात रमणारे आहेत. आजही इथल्या खेडोपाडी अनेकजण फावल्या वेळात बांसरीसारखे दुदुक नावाचे वाद्य वाजवत बसलेले दिसतात. दुदुक हे अक्रोडाच्या झाडापासून बनवलेलं असतं. त्याखेरीज इथले लोक एक असं एक चर्मवाद्य वाजवतात. ज्याला त्यांच्या भाषेत चक्क ढोल असंच म्हणतात. गंमत म्हणजे त्यांचा ढोल एखाद्या डफळीएव्हढा लहान असतो. सारंगीसारखं दिसणारं, छोट्याश्या धनुष्यानं वाजवायचं चार तारांचं कमांचा हे यांचं आणखी एक पारंपारिक वाद्य आहे. त्याशिवाय झुरना आणि श्वी ही यांची सनईसदृश्य फुंकून वाजवण्याची वाद्यं आहेत. येरेवानमधल्या ऑपेरा हाऊसमध्ये संगीताचे जलसे कायम चालू असतात. गोहर गास्परयान या आर्मेनियातल्या अलीकडच्या लोकप्रिय गायिका होत्या. सिरानुष हरुत्यूंयान उर्फ सुरुषा ही आजच्या पिढीची अत्यंत आवडती गायिका आहे.

इजिप्त, लेबेनॉन, जॉर्जिया यांच्यासारख्या जवळपासच्या आणि अमेरिकेसारख्या अतिदूरच्या देशात जाऊन तिथलेच नागरिक झालेले हजारो आर्मेनियन विविध क्षेत्रात चमकले आहेत आणि आजही चमकत आहेत. साहित्याचे पुलित्झर पारितोषक मिळालेले पीटर बालकियान, बेन बागदिकियान तसंच हे पारितोषक जाहीर होऊनही ते सपशेल नाकारणारे विल्यम सरोयान ही अमेरिकन मंडळी मुळात आर्मेनियन होती. केर्कोर केर्कोरीयान हे अमेरिकेतले अब्जाधीश जे हॉलिवूडच्या मेट्रो गोल्डविन मेयर्सच्या स्टुडिओचेही मालक होते. ते देखील मूळचे आर्मेनियन होते. अमेरिकेच्या नेवाडा राज्यातल्या लास वेगास या शहरात जन्मलेला जगप्रसिध्द टेनिसपटू आंद्रे अगासी याचे वडील

आर्मेनियन होते. त्याच्या पूर्वजांनी पहिल्या महायुध्दाच्या काळात तुर्की सम्राटाच्या अनन्वित अत्याचारांपासून स्वत:ला वाचवण्यासाठी जेव्हा अमेरिकेस पळून आले तेव्हा आपण आर्मेनियन असल्याचं आपल्या आडनावावरुन कुणाला कळू नये यासाठी त्यांनी अगासीयान या आपल्या आडनावातला यान काढून टाकला होता. तेव्हापासून अगासी हेच या कुटुंबाचं आडनाव झालं. एकेकाळचा ग्रँडमास्टर गॅरी



कास्पारोव्ह हा रशियन बुद्धिबळपटू म्हणून जगाला ठाऊक असला तरी त्याची आई ही आर्मेनियन होती.

आर्मेनियात अनेक छान-छान पर्यटनस्थळं असूनही हा देश पर्यटकांना तसा वंचितच राहिला आहे. या देशात रस्त्यानं प्रवेश करावा म्हटलं तर तुर्कस्थान-आर्मेनिया आणि अझरबैजान-आर्मेनिया यांच्या दरम्यान असलेल्या सरहद्दींचे दरवाजे कायम बंदच आहेत. नागोर्नो-काराबाखमधल्या बर्दादझोर येथे सीमोल्लंघन करुन, आर्मेनियात अगदी सहजासहजी जाता येत होतं, तेही यापुढे काही वर्षे शक्य होणार नाही. राहता राहिले, ते फक्त दोन पर्याय. एक तर, इराणमधल्या तेहरानहून प्रयाण करुन पुढे कास्पियन समुद्राच्या सोबतीनं ताब्रिझला पोहोचल्यावर पुढे झुल्फामार्गे उत्तर दिशेला कूच करत, अगारक-नोर्दूज सरहद्दीवर वेळखाऊ तपासणी आटोपल्यावर आर्मेनियात प्रवेश करायचा किंवा मग जॉर्जियातल्या तीबिलीसी गावातून दक्षिण दिशेच्या कॉकेशस पर्वतराजीचं सौंदर्य अवलोकन करत, कोणत्याही तीन-तीन अधिकृत चेक पोस्टवरुन, सहजपणे आर्मेनियात शिरायचं! ज्यांना आकाशमार्गे आर्मेनियात जायचं असेल त्यांच्यासाठी येरेवान आणि शिराक असे दोन आंतरराष्ट्रीय विमानतळ उपलब्ध आहेतच! तरीही निखळ पर्यटनासाठी आर्मेनियाला भेट देणारे भारतीय अभावानेच असतील!

तथापि, थोडेफार भारतीय विद्यार्थी आर्मेनियातल्या वैद्यकीय विद्यापीठांमधून शिकताना दिसतात. इथल्या विद्यापीठांच्या एम.बी.बी.एस. पदवीला आपल्या इंडियन

मेडिकल कौन्सिलची आणि त्याचबरोबर जागतिक आरोग्य संघटनेची मान्यता असल्यानं, सहा वर्षांच्या आवास-निवास-शिक्षण-पुस्तके या सगळयांसाठी लागणारा, सव्वादोन ते अडीच लाख अमेरिकन डॉलर्स इतका म्हणजे अठरा-वीस लाख रुपये इतका खर्च करायला अनेक विद्यार्थी तयार असतात. वैद्यकीय पदवीपर्यंतचं हे शिक्षण येरेवान हायबुसाक युनिव्हर्सिटी, सेंट थेरेसा मेडिकल युनिव्हर्सिटी, येरेवान स्टेट मेडिकल युनिव्हर्सिटी अशा शिक्षणसंस्था इंग्रजी माध्यमात देत असतात. यासाठी केवळ येरेवानमध्ये राहत असलेल्या भारतीय विद्यार्थी-विद्यार्थिनी यांचीच संख्या कायमच दोन-अडीच हजाराच्या घरात असते. अशा विद्यार्थ्यांमुळेच येरेवानमध्ये भारतीय पद्धतीचा आहार आणि उपाहार मिळू शकणारी, मिथुल, कर्मा, इंडिया पॅलेस, इंडियन महक, टेस्ट ऑफ इंडिया आणि नमस्ते इंडिया, अशी निदान पाच-सात हॉटेल्स तरी आहेत.

आर्मेनियाची खाद्यसंस्कृती युरेशियन आहे. खरं तर ती, ना धड आशियाई, ना धड युरोपीय आहे. त्यांच्या आहारात मैद्यापासून बनवलेले इटालियन बगेट असतात, फ्रेंच क्रोझन्स असतात. चहासोबत खाण्यासाठी सामोसाच्या आकाराचे खुसखुशीत गटा असतात ज्यांना इंग्लिश लोक स्कोन म्हणतात. पिझ्झा, ज्याला त्यांच्या भाषेत लबमाजून, झिन्यालोव्ह अशी वेगवेगळी नावं आहेत. तो देखील त्यांचा आवडीचा उपाहार आहे. चीज आणि अंडी वापरुन मैद्यापासून बनवलेली खाचापुरी, तसंच खिमा किंवा बारीक चिरलेल्या भाज्या कोबीच्या पानात तळून बनवलेले दोलमा हे यांचे विशेष पदार्थ आहेत. गव्हाची खीर ते सुपासारखी बनवतात. तिला ते हरीसा म्हणतात. त्यांच्या आहारात भात क्वचितच कधी असतो. लवाश म्हणजे ब्रेड हा मात्र आहारात असतोच. त्यांच्याच देशात पैदा होणाऱ्या पांढऱ्या द्राक्ष्यांपासून बनवलेली वाईन नव्हे तर आर्मेनियन अरारक ब्रॉन्डी पिण्याकडे त्यांचा कल अधिक असतो. टरबूज आणि कलिंगडं यांचं सेवन ते खूप करतात.

आर्मेनियन लोकांमध्ये राष्ट्रमाता ही संकल्पना रुजलेली आहे याचं मला विशेष नवल आणि तितकंच कौतुक वाटतं. येरेवानमधल्या विस्तीर्ण व्हिक्टोरिया पार्कमध्ये अत्यंत प्रेक्षणीय असा मिलिटरी म्युझियम तर आहेच त्याशिवाय तिथे आर्मेनिया-मातेचा अर्थात मदर आर्मेनियाचा, हाती खड्ग धारण केलेला गगनचुंबी पुतळा उभारला आहे जो विलक्षण विलोभनीय

आणि तितकाच प्रेरणादायी आहे. येरेवानमधल्या तमानियान रस्त्यानं काही अंतर चालत गेल्यावर पुण्याच्या पर्वतीएव्हढी एक टेकडी दिसते. टेकडीवर एका बाजूनं चढून जाण्यासाठी तर दुसऱ्या बाजूनं उतरण्यासाठी उत्तम संगमरवरी पायऱ्या आहेत. टेकडीच्या पायथ्याशी अतिविशाल रांजण आहेत. हा परिसर कास्काद अर्थात कास्केड या नावे विख्यात आहे. आर्मेनियन कलाविश्वाची ओळख करुन देणारं हे एक नयनरम्य आणि आगळं-वेगळं पर्यटन स्थळ आहे!

आर्मेनियाचा राष्ट्रीय पक्षी गरुड आहे. यांचा राष्ट्रध्वज लाल, निळया आणि केशरी रंगाच्या तीन आडव्या पट्टयांचा आहे. २१ सप्टेंबर (१९९१) हा यांचा स्वतंत्रता दिवस आहे. होव्हानेस तुमानियान हा यांचा राष्ट्रकवी आहे. १९१८ साली हा देश स्वतंत्र आणि सार्वभौम असताना, आर्मेनियन कवी मायाकायेल नलबंदियान यांनी रचलेलं जे यांचं राष्ट्रगीत होतं. तेच राष्ट्रगीत त्यांनी, सोविएत रशियाच्या संघराज्यातून सत्तर वर्षांनी बाहेर पडल्यानंतरही कायम ठेवलं आहे. ड्रम हे या देशाचं चलन आहे. सर्वसाधारणपणे, अमेरिकेचा एक डॉलर यांच्या ५०० ड्रम इतक्या मूल्याचा आहे. म्हणजेच यांचा १ ड्रम भारताच्या पंधरा पैशांच्या बरोबरीचा आहे. आर्मेनियन चलन अर्मेनियाबाहेर कवडीमोल आहे.

आर्मेनियाला गेल्या दोन वर्षात, इस्त्राएलचे नेतान्याहू, रशियाचे पुतीन, ब्रिटनच्या थेरेसा मे, सौदी अरेबियाचे महंमद बिन सलमान, युनोचे महासचिव, जर्मनीच्या एन्जेला मर्केल इतकंच नव्हे तर अमेरिकेचे डोनाल्ड ट्रम्प या सर्वांनी भेट दिली आहे. या उलट, राजनैतिक संबंध मैत्रीचे असूनही, भारताच्या एकाही राष्ट्रपतींनी किंवा पंतप्रधानांनी या देशाला कधीही भेट दिलेली नाही. वर्ष २०१७ मध्ये आर्मेनियाचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष सेर्झ सार्गसयान यांनी भारताला भेट दिली होती. गतवर्षी, भारताचे



पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि आर्मेनियाचे पंतप्रधान निकोल पशिनयान यांची न्यूयॉर्कमध्ये प्रथमच भेट झाली होती. त्या

भेटीत पशिनयान यांनी मोदींना आर्मेनिया भेटीची विनंती केल्याचं म्हटलं जातंय! अलीकडेच भारतानं आर्मेनियाला पूर्णत: भारतीय बनावटीची चार स्वाती रडार यंत्रं विकत दिली आहेत, ज्यामुळे आर्मेनियाची संरक्षण सिध्दता अनेक पटींनी वाढली आहे. आजच्या घडीला आर्मेनिया आणि त्याचा



पूर्वेकडचा शेजारी देशी अझरबैजान हे एकमेकांवर तोफगोळे डागत आहेत. नागोर्नो काराबाख हा सुमारे ४४०० चौरस किलोमीटर्स क्षेत्रफळाचा भूभाग, ज्यामधले एक लाख प्रजाजन हे आर्मेनियन आहेत आणि तरीही जो भूभाग अझरबैजानच्या अंमलाखाली आहे. त्यावर आर्मेनिया अनेक वर्षे आपला हक्क सांगत आला आहे आणि अझरबैजान त्यावर पाणी सोडून द्यायला पूर्णत: नकार देत आला आहे. अझरबैजान हे शिया पंथीय मुस्लिमांचं राष्ट्र आहे तर आर्मेनिया हे अपोस्टोलिक ख्रिश्चनांचं राष्ट्र आहे. या दोघांच्या युध्दात आपली राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी अनेक देश जसे पुढे सरसावले आहेत. तसेच या युध्दाचं पर्यवसान तिसऱ्या महायुध्दाची ठिणगी पडण्यात होऊ नये यासाठीही अनेकांचे प्रयत्न चालू आहेत. हे दोन्ही देश भारताचे मित्र आहेत. गतवर्षीच भारताचे उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू हे अझरबैजानला जाऊन आले होते. गतवर्षीच या दोन्ही देशांनी महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्ताने विशेष टपाल तिकीट प्रसृत केलं होतं.

या सगळया पार्श्वभूमीवर, युरेशियातल्या आर्मेनियाची सर्वांना अल्प स्वल्प तरी ओळख असावी यासाठी केलेला हा शब्दप्रपंच!





सौ. किरणताई एस. तोष्णीवाल — सौ. स्नेहलताई सोपारकर

सौ. स्नेहलताई सोपारकर यांची भाजपा कल्याण शहर महिला मोर्चा सरचिटणीस पदी नियुक्ती झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन

दीपावलीच्या मंगलमय क्षणाप्रमाणे त्यांची राजकीय कारकिर्द उजळुन निघो हिच अंतकरणापुर्वक शुभेच्छा

शुभेच्छुक : सौ. किरणताई एस. तोष्णीवाल

माजी अध्यक्ष - ठाणे जिल्हा माहेश्वरी महिला संघटना

माजी समिती प्रमुख - विवाह समिती महाराष्ट्र प्रदेश

उपाध्यक्ष - मराठी प्रवासवर्णन लेखक वाचक मंच





डॉ. अजय सोनी — सौ. स्नेहलताई सोपारकर

सौ. स्नेहलताई सोपारकर यांची भाजपा कल्याण शहर महिला मोर्चा सरचिटणीस पदी नियुक्ती झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन

समाजकार्यातुन राजकारण यामध्ये त्यांची उत्तरोत्तर प्रगती होवो याच दिपावलीनिमित्त शुभ शुभेच्छा

शुभेच्छुक : डॉ. अजय सोनी व न्यु लाईफ ऑर्थोपिडीक री-हॅबिलिटेशन सेंटर

अध्यक्ष - भाजपा कल्याण शहर दिव्यांग आघाडी





सौ. पुनम राकेश मढवी — सौ. स्नेहलताई सोपारकर

सौ. स्नेहलताई सोपारकर यांची भाजपा कल्याण शहर महिला मोर्चा सरचिटणीस पदी नियुक्ती झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन

त्यांच्या विद्यमान आणि भावी राजकीय नेतृत्वाला दिपावली निमित्त लक्ष लक्ष शुभेच्छा

शुभेच्छुक : सौ. पुनम राकेश मढवी

अध्यक्ष - भाजपा कल्याण शहर युवती आघाडी





सौ. रेखा रामदास जाधव — सौ. स्नेहलताई सोपारकर

सौ. स्नेहलताई सोपारकर यांची भाजपा कल्याण शहर महिला मोर्चा सरचिटणीस पदी नियुक्ती झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन

त्यांची राजकीय भावी वाटचाल लक्ष दिपाप्रमाणे उजळुन निघो यासाठी लाखो शुभेच्छा

शुभेच्छुक : सौ. रेखा रामदास जाधव

अध्यक्ष : प्रेरणा महिला बचत गट महामंडळ

अध्यक्ष : भाजपा कल्याण शहर महिला मोर्चा





श्री. अजिंक्य अमर पवार — सौ. स्नेहलताई सोपारकर

सौ. स्नेहलताई सोपारकर यांची भाजपा कल्याण शहर महिला मोर्चा सरचिटणीस पदी नियुक्ती झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन

समाजकारणातुन राजकारणाकडे वाटचाल करणाऱ्या मातेसमान असलेले नेतृत्व दिपावलीच्या सणाप्रमाणे दैदिप्यमान होवो याच अंतःकरणपुर्व शुभेच्छा

शुभेच्छुक : श्री. अजिंक्य अमर पवार

कोषाध्यक्ष - भाजपा कल्याण जिल्हा युवा मोर्चा





सौ. जयश्री दिलीप देशपांडे — सौ. स्नेहलताई सोपारकर

सौ. स्नेहलताई सोपारकर यांची भाजपा कल्याण शहर महिला मोर्चा सरचिटणीस पदी नियुक्ती झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन

समाजकारणाशी नाते जोडुन राजकिय गगन भरारी घेण्यासाठी माझ्या समस्त परिवारातर्फे अंतःकरणपुर्व अनमोल शुभेच्छा

शुभेच्छुक : सौ. जयश्री दिलीप देशपांडे

उपाध्यक्ष - भाजपा कल्याण शहर महिला मोर्चा



# आमची व्हिएतनामची सफर...



## ऐतहासिक अनुभव

शशिकांत पानट
लॉस एंजेल्स
ई-मेल : shashi@panat.org

लॉस-एंजेलिसला राहाणारे आमचे मित्र श्री. गोखले ह्यांचा एक दिवस फोन आला की आम्ही व्हिएतनामला जायचे ठरवित आहोत, येणार काय? बॉसला विचारुन कळवितो असे त्यांना सांगुन मी माझ्या पत्नीशी बोललो. तिच्या अनेक (भंडावुन सोडणाऱ्या) प्रश्नांची उत्तरे देताना - त्यापेक्षा गेलो नाही तर बरे- असा सारासार विचार मी केला. हया घटनेवरुन मला असं वाटतं की कोलंबसची बायको मराठी नसावी. अन्यथा जगाला अमेरिका हा देश सापडलाच नसता. त्याची बायको मराठी असती तर तिने बहुधा कोलंबसला अनेकविध प्रश्न विचारुन भंडावुन सोडले असते. शेवटी पत्नीला समजाविण्यात यश मिळविले. खुंटा बळकट करण्यासाठी हे नक्की ना? अशी तिची परवानगी घेऊनच मी गोखल्यांना हसत हसत फोन केला. अरे वा! तुम्ही निमंत्रण दिले आणि आम्ही आलो नाही असे होईल तरी का? माझ्या विनाकारण हसण्याने आणि त्यांच्या अरेच्च्या! मी सहज म्हणुन फोन केला, येतील असे वाटले नव्हते! अशा काहीशा भावना त्यांनी व्यक्त करण्याच्या आतच मी फोन बंद केला. (हयामुळे मी किती स्मार्ट आहे हे वाचकांच्या लक्षात आणुन देणे मी माझे कर्तव्यच समजतो. अमेरिकन कर्पोरेटमध्ये एव्हढी वर्षे नोकरी केल्यानंतर आपल्याला हवे अथवा नको असलेले Communication नेमके कुठे थांबवायचे, हया ट्रेनिंगचा शेवटी उपयोग झाला तर!)

शेवटी जायचा दिवस ऊजाडला. आमचे विमान सकाळी १ वाजुन ५५ मिनिटांनी होते. वास्तविक पाहाता, घरुन चांगले जेऊन खाऊन विमानतळावर वेळेच्या आधी पोहोचण्यासाठी ही वेळ सोयीची होती. मात्र



निघायच्या दिवशीच झोपेचे खोबरे होणार होते. तरीही सर्व जग झोपले आहे आणि आपण मात्र परदेश प्रवासासाठी निघालो आहोत हे आत्मिक समाधान मिळत होते हे मात्र बरीक खरे! आम्ही आमच्या गाडीने विमानतळावर पोहोचलो. आधीच आरक्षित केलेल्या ठिकाणी गाडी पुढील बारा दिवसासाठी पार्क करुन, पार्कींग कंपनीच्या शटलने आम्ही विमानतळावर पोहोचलो.

आमचा विमान प्रवास

कस्टमचे सोपस्कार आटोपुन आम्ही विमानांत बसलो. विमान चीन देशाच्या कंपनीचे असल्याने पुढील काही तास निदान विमानात आहोत तोपर्यंत तरी चायनीज पद्धतीचे जेवायला मिळणार हे ओघाओघाने आलेच. आम्ही त्यांना व्हेजीटेरियन जेवण हवे अशी विनंती केली होती. ते यायच्या आधी आमचे हात नीट पुसले जावे म्हणुन त्या हवाई सुंदरींनी थंडगार पाण्याने भिजविलेले टॉवेल्स (अथवा रुमाल म्हणा हवे तर) आम्हांस आणुन दिले. त्याने हात आणि तोंड पुसताच खुपच फ्रेश वाटले. विमानातल्या काही प्रवाशांनी त्या रुमालाचा उपयोग (कुणी आपल्याकडे पहात नाही ना अशा अर्थाने इकडे तिकडे पाहुन) चेहऱ्यावरील इतर अवयव साफ करण्यासाठीही वापरले.

आम्ही **Order** केलेले त्यांचे ते व्हेजीटेरियन जेवण शेवटी आले. आमच्या व्हेजीटेरियन मेनुमध्ये इतर पदार्थांबरोबर गुरगुट्या भात आणि त्यावर एका पालेभाजीचे तुकडे असा 'बेत' होता. पालेभाजीस फारसा अर्थ नव्हता. पालेभाजी आणि भात हे खाणे कितीही **Healthy** असले तरी वर्षानुवर्षे घृतकल्ल्या मधुकल्ल्या खाणाऱ्या जीवाला हे पचनी पडणे तसे कठीणच! साबुदाण्याची गरमागरम खिचडी अथवा पोहे, त्याच्या बरोबर ताज्या लिंबाची फोड, त्यावर किसलेले खोबरे, सोबत ताक अथवा दही असे खायला सरावलेली आमची जिव्हा!

पण एव्हढ्या तेव्हढ्याने निराश होण्याची



आमच्या आयुष्याला सवय नव्हती! कचऱ्यातुन कला निर्माण करणाऱ्या आमच्या मराठी मनाला हया इवल्याश्या गोष्टीमुळे खचुन जायचे कारणच नव्हते. आता काय बरे करता येईल? असा विचार करीत ग्लासमध्ये ओतलेल्या डिनर वाईनचा घुटका घेत असतांना मी माझ्या स्वयंपाकात पारंगत असलेल्या पत्नीकडे पाहिले. तिने तर तिच्या कामाला सुरुवातही केलेली होती! हलक्या हाताने (म्हणजे चमच्याने) तिने ती भातावरची पालेभाजी काढुन टाकली होती, त्यावर कॉफीबरोबर दिलेले त्रिकोणी डब्यातले क्रीम रिकामे केले होते. कॉफीबरोबर आलेल्या

साखरेच्या पुड्याही त्यावर ओतल्या होत्या. ते मस्तपैकी हलवुन ती दुध, भात साखर हे Combination कोणतीही तक्रार न करता मिटक्या मारीत मारीत मटकावीत होती. त्यामुळे तिचा चेहरा अधिकच उजळला होता. अशा रितीने अडचणींवर मात करुन आहे त्याचे सोने करण्याची आयुष्यभरामधली सवयच शेवटी कामी आली.

बाकी विमानामधली हवाई सुंदऱ्यांची सेवा ही मात्र अगदी वाखाणण्याजोगी होती. हया सर्व मुली चुणचुणीत, तरतरीत, हसतमुख आणि वेगाने हालचाली करणाऱ्या होत्या. (या मुली आमच्या भारतीय विमानकंपनीत का नाही काम करीत बरे?) विमानामध्ये ५१५ प्रवासी होते आणि एकही जागा रिकामी नव्हती. त्या सर्व लोकांना एक तासाच्या आत जेवण पुरवून, जेवणानंतर रिकामे झालेले ट्रे उचलुन त्या Second Serving साठी आणि चहा कॉफी द्यायला येत होत्या. आणि हे सारे करतांना चेहऱ्यावर कोणत्याही प्रकारचा कंटाळा नव्हता. एव्हढे सारे होऊन दोन तीन तासांनी त्या स्वत:हुन पाणी आणुन देत होत्या. त्यावेळी त्यांचे टवटवीत चेहरे पाहिले की वाटायचे कोणत्या देवाने हयांना घडविले आहे. ह्या साऱ्या कोणत्या मातीत वाढल्या आहेत! त्या सर्व चिनी असल्याने त्यांचे डोळे मिचमिचे असले तरी त्या हरीणाक्षी होत्या. डोळे घारे नसल्याने विश्वसनीयही वाटत होत्या! आपल्या सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय भारतीय विमानाच्या सेविकांना (माफ करा, मी हवाई सुंदऱ्यांना हा शब्द वापरु शकलो नाही त्याबद्दल वाचकांची क्षमा मागतो) हयांच्याकडे प्रशिक्षण देऊन मगच कामाला लावावे अशी सुचना आपल्या आंतरराष्ट्रीय भारतीय विमानकंपनीस करावी की काय असा मोह निर्माण झाला.

हो चि मिन्ह (सायगांव) शहरात



आगमन जवळ-जवळ तेरा तासानंतर आम्ही हो चि मिन्ह हया विमानतळावर पोहोचलो. पुर्वी सायगांव हया नांवाने ओळखले जाणारे हे शहर. हो चि मिन्ह हया व्हिएतनामच्या स्वातंत्र्य सैनिकाच्या कृतज्ञतेसाठी ठेवण्यात आले आहे. टूर कंपनीची व्हिएतनामी मुलगी आमच्या स्वागतास हजर होतीच. तिचे शब्दोच्चार फारसे कळत नसल्याने तेच तेच

प्रश्न दोन तीन वेळा विचारावे लागत असत. ती मात्र कोणत्याही प्रकारची नाराजी व्यक्त न करता, किंबहुना त्याच उत्साहात त्या प्रश्नांची तीच उत्तरे हसतमुखाने देण्याचा यत्न करीत होती. विमानतळाच्या बाहेर येताच पहिली गोष्ट जाणवली ती ही की हवेत खुप उष्मा आहे. त्यात आपल्याकडे भारतात असते तशी **Humidity!** त्यामुळे दरदरुन घाम यायला सुरुवात झाली. क्षणभर आपण मुंबईतच आलो आहोत की काय असे वाटु लागले. टूर कंपनीच्या गाडीत जाऊन बसलो आणि त्यांनी थंड केलेल्या त्या गाडीमध्ये बसल्यावर हायसे वाटले. आमची बस **Royal Lotus** नावाच्या हॉटेलकडे जाऊ लागली. वास्तविक विमानतळापासुन हॉटेल केवळ आठ-दहा किलोमीटर अंतरावरच होते. तरी रस्त्यावरच्या गर्दीमुळे पोहोचायला अर्धा तास सहज लागला. रस्त्यांत इतकी घावुक प्रमाणातली गर्दी डोंबिवली नंतर प्रथमच पाहिली. (होय, आपण बरोबर ओळखलेत मी डोंबिवलीचाच). रस्त्यांवर मोटारगाड्यांपेक्षा मोटार सायकलीच अधिक प्रमाणात होत्या. त्यामुळे रस्त्यावरील उजव्या बाजुची शेवटची लेन केवळ मोटार सायकलींसाठीच राखुन ठेवलेली दिसली. गाड्या काय अथवा मोटारसायकली काय, ही वाहने चालविणारे सिग्नलपाशी थांबतीलच हा कायदा कुणी फारसा पाळत नव्हते. (अरे म्हणजे आमच्या डोंबिवलीसारखेच) आमचा बस ड्रायव्हर मात्र स्थितप्रज्ञाच्या भुमिकेतुन शांतपणे आपली बस त्या सर्व गर्दीत व्यवस्थित चालवित होता. लॉस एंजेलिसमध्ये गेल्या ४० वर्षांत असे दृश्य दिसले नसल्याने ते सारे अनाकलनीय वाटले. (परत एकदा मायदेशाची आठवण!) एव्हढ्या मोटारसायकली कशा? हया प्रश्नाच्या चौकशीअंती कळले की, मोटारगाड्यांवर १२० टक्के कर असल्याने सर्वसाधारण व्यक्तीस मोटारगाडी ठेवणे परवडत नाही. त्यामानाने लहान मोटार सायकलींवर कर थोडा आहे. शिवाय त्यांचा आवाजही इकडच्या म्हणजे अमेरिकेतल्या मोटारसायकलींच्या मानाने खुपच लहान आहे. मात्र हार्ली डेव्हिडसनसारख्या मोठ्या मोटारसायकलींवरही भरपुर कर ठेवुन ती लोकांना परवडेनाशी करुन ठेवली आहे. त्यामुळे तशा मोटारसायकली कुठेच दिसल्या नाहीत. मात्र पार्किंगसाठी पुरेशी जागा नसल्याने फूटपाथवरच पार्किंग केले जाते आणि त्यामुळे फूटपाथवरुन चालणे केवळ अशक्यच झाले होते. त्यातच रस्तोरस्ती जवळ जवळ प्रत्येक फूटपाथवर

एका कोपऱ्यांत स्टोव्ह टाकुन खाजगी ढाबे टाकलेले आहेत आणि जागा मिळेल तिथे छोट्या खुर्च्या टाकुन लोक रस्त्याच्या बाजुलाच बसुन खाताना दिसले. एव्हढ्या गरमीमध्ये त्यांचे व्यवहार रोज मरे त्याला



कोण रडे? अशा वृत्तीनेच जणु चालत होते. हया प्रथम दर्शनी दृश्यांतुन सावरता सावरता आमचे हॉटेल आले. हॉटेल चार स्टार आहे असे कळल्याने आमच्या अपेक्षा वाढलेल्या होत्या. आणि खरोखरच त्या पुर्ण झाल्या. अगदी पहिली जाणवलेली गोष्ट म्हणजे आमच्या बसमधुन सर्व प्रवासी खाली उतरायच्या आत हॉटेलचा सेवक वर्ग आमच्या बसच्या खालच्या भागात ठेवलेल्या बॅगा घेऊन लॉबीत पोहोचले देखील होते. क्या बात है! गलथानपणाचा मागमुसही कुठे नव्हता! अमेरिकेत देखील इतकी Efficiency क्वचितच पहायला मिळते! आम्ही हॉटेलच्या प्रवेशदाराशी पोहोचताच दोन सेवकांनी त्या हॉटेलची दोन्ही भव्यद्वारे उघडुन आमचा प्रवेश सस्मित चेहऱ्याने स्वागतार्ह केला. एखाद्या राजाच्या वा राणीच्या दरबारांतल्या आगमनासाठी त्यांचे सेवक बहुधा अशीच दारे उघडत असतील. हॉटेलच्या Registration Desk वर आमचे पासपोर्टस दाखवुन त्यांनी केवळ मिनिटभराच्या आतच त्यांच्या Formalities पुर्ण केल्या आणि तेव्हढ्या वेळांत फळांचा थंडगार ज्युस देऊन आम्हास लॉबीत बसविले. आम्ही हॉटेलमध्ये सकाळी अकराचे सुमारास पोहोचलो असल्याने आमच्या खोल्या तयार नव्हत्या. मात्र आम्ही प्रवासातुन थकुन आलेलो आहोत हयाची जाणीव त्यांना असलेली स्पष्ट दिसत होती. आम्ही ५-१० मिनिटात तुमची खोली तयार करतो म्हणजे लांबच्या प्रवासातुन आल्यामुळे तुम्हाला विश्रांती मिळेल असे आश्वासनपुरक सांगुन त्यांनी आम्हास लागलीच खोल्या दिल्या आणि आम्ही घरातुन निघाल्यानंतर जवळ जवळ २४ तासांनी विश्रांतीसाठी खोलीत पाय ठेवला. हया सर्व प्रसंगातुन त्या सेवकांची सेवावृत्ती अगदी स्पष्टपणे दृष्टीस पडली.

शहराचे पहिले दर्शन

३-४ तासांची विश्रांती घेतल्यावर मात्र खुप

फ्रेश वाटले. आंघोळ आटोपली आणि हो चि मिन्ह शहराचे पहिले वहिले दर्शन घेण्यासाठी आम्ही पायी पायीच फेर फटका करावयास बाहेर पडलो. आता हवेतील उष्मा देखील थोडा कमी झाला होता. हॉटेलच्या बाहेर पडल्यावर पहिली गोष्ट जाणवली ती म्हणजे हॉटेलचे दृश्य वेगळे आणि रस्त्यावरचे वेगळे. रस्त्याच्या दोन्ही बाजुस असलेल्या फुटपाथवर सर्रास ढाबे टाकलेले होते. जागा कमी असल्याने छोटेसेच टेबल आणि लहान मुलांच्यासाठी असतात तशा बसायला खुर्च्या होत्या. त्यावर विराजमान होऊन कामकरी मंडळी संध्याकाळचे डीनर घेण्यात मग्न होती. डीनर बरोबर कसलेसे रंगीत द्रव्यही ते पीत होते. बहुधा सोडा असावा. ढाब्याची मालकीणबाई स्टोववर नूडलसारखा एखादा पदार्थ शिजवित होती आणि गरमागरम असा त्या लोकांना वाढत होती. भुकेने व्याकुळ झालेले ते कामकरी एकाग्र चित्ताने त्याचा समाचार घेत होते. -अन्न हे पुर्णब्रह्म- हा भाव त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. शेवटी जगांत कुठेही जा, जगण्याची धडपड सारीकडे सारखीच! रस्त्यावर जेवायला लागणारी ती मंडळी मात्र मला आनंदी वाटली. दरिद्री अथवा गरीब अशी ती मंडळी, पण दुखाचा अथवा रडकेपणाचा लवलेशही कुठे नव्हता. मुख्य म्हणजे एकही भिकारी नव्हता. किंबहुना आम्हाला पुढील बारा दिवसांत मला एकही भिकारी दिसला नाही. चालत चालत आम्ही मैलभर पुढे गेलो. एका बाजुला उंच इमारती, त्यातुन कामे आटोपुन बाहेर पडणारी सुटाबुटांतली कर्मचारी मंडळी, तर त्याच इमारतीच्या पायथ्याशी गरीबीचे असे हृदयद्रावक दर्शन! जणु काही आमच्याकडचे हे दृश्य जगात जे काही चालले आहे त्यापेक्षा वेगळे नाही असच त्यांना सांगायचे आहे की काय असा मला भास झाला.

थोड्या वेळाने आम्ही हॉटेलमध्ये परत आलो. परत शिरतांना राजाच्या दरबारांत स्वागत व्हावे तसे झालेच. हे हॉटेल सोडेपर्यंत आम्ही नक्कीच हया लक्झरीला सोडु शकणार नाही हयाची खात्री पटली. म्हणजे तसेच झाले. हॉटेलमध्ये शिरतांना ते दोन सेवक इतक्या अदबीने दार उघडीत असत की त्यांनी ते उघडल्याशिवाय आम्हाला आत पायच टाकावासा वाटेना! आणि ती सवय आम्हाला इतकी लागली की एकदा एका बाईने त्या दोन सेवकांना दार उघडायला थोडा उशिर झाला म्हणुन त्यांनी ते उघडेपर्यंत प्रवेशच केला नाही. (अरेच्चा,

ही तर आमची धर्मपत्नी!) असो.

दुसऱ्या दिवशी भल्या सकाळीच इतिहास घडविणाऱ्या एका जगप्रसिद्ध ठिकाणास भेट द्यायची होती. त्यामुळे आज रात्री लवकर झोपणे आवश्यक होते. बरोबरीच्या मित्र मंडळींनी ड्रिंक घ्यायला जायचे ठरविले. माझ्या शरिरात मात्र आता अजिबात त्राण ऊरले नव्हते. गेल्या २४ तासातला मोठा प्रवास आणि वेळेमधला १३ तासांचा फरक आता तु चक्क झोपायला जा असा आदेश माझ्या शरीराला देत होता. निसर्गाचे ऐकावे की आपले भले होते हा कुणीतरी दिलेला उपदेश आठवुन मी अंथरुणावर पडलो आणि केवळ मिनिटाच्या आत निद्राधीन झालो.

ऐतिहासिक स्थळास भेट (कुची टनेल)

रात्रीची झोप खुप छान झाली. त्यामुळे सकाळी मोठ्या उत्साहाने उठुन तयारी केली. आज आम्ही कुची टनेल हया ऐतिहासिक स्थळाला भेट देणार होतो. सायगांव शहरापासुन अवघ्या ५०-६० किलोमीटर अंतरावर असलेले हे जवळ जवळ २०० किलोमीटर लांबीचे जमिनीखाली उकरलेले बोगदे म्हणजे मानवाचे स्व-संरक्षणासाठी केलेले अथक प्रयत्न! एक नाही दोन नाही तर २१ वर्षांच्यावर चाललेल्या फ्रेंच-व्हिएतनाम-अमेरिका युद्धांत हे सर्व सामान्य जनतेच्या बचावासाठी वापरले गेले. ते तयार करण्याची बुद्धी, त्याचे डिझाईन, त्यास वापरलेली हुशारी हया सर्वांचे कौतुक करावे तेव्हढे थोडेच! जनतेच्या बचावासाठी, त्यांना शत्रुच्या भडिमारापासुन दुर ठेवण्यासाठी खेड्यापाड्यांतुन बनविलेल्या हत्यारांपासुन सर्व साधारण माणसांनी हे २०० किलोमीटर लांबीचे बोगदे अक्षरशः ऊकरुन काढले होते. एक मध्यम अंगकाष्टीची व्यक्ती कशीबशी आंत जाईल एव्हढीच त्याची लांबी-रुंदी! एकदा आत गेल्यानंतर घुस अथवा गोफर जसे आपले मार्ग कोरुन कोरुन तयार करुन पुढे सरकतात तशी या लोकांनी केलेली बोगद्याची जमिनीखालची रांग! आतमध्ये गेल्यावर हवा नाही, पाणी नाही अशा परिस्थितीत तासनतास पडुन राहायचे, गुदमरुन अथवा बिळातले विषारी साप वगैरे चावुन मृत्यु झाला नाही तर केव्हांतरी शत्रुचा मारा कमी झाला की श्वास घेण्यासाठी बाहेर यायचे आणि तेव्हढ्यांत शत्रुचा मारा होऊन जीवंत राहिल्यास परत आत घुसायचे! जगण्यासाठी करावी लागलेली केव्हढी ही धडपड! आणि असा प्रकार अनेक वर्षे चाललेला! आजुबाजुची परिस्थिती

आपल्याला घडवते असं म्हणतात. व्हिएतनामची आजची पिढी जी आज दिसते आहे ती हया दिव्यांतुन गेलेली आहे. माणुसकीवरचा त्यांचा विश्वास अगदी पुर्णपणे गेला असता तरी नवल नव्हते. पण आजचे दृश्य निराळेच आहे. मला दिसलेले व्हिएतनाम, त्यातील माणसे ही सहिष्णु, सहनशील, मित्रत्वाचा हात पुढे करणारी, हसतमुख आणि आयुष्यावर प्रेम करणारी वाटली. केवळ दोन आठवड्यांत तयार केलेले हे मत थोडे घाईघाईने बनविलेले आहे ही शक्यता मी नाकारत नाही. मात्र मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात ही म्हण आयुष्यभर शिकलेल्या, वयाची सत्तरी ओलांडतांना त म्हणता तपेले ओळखण्याची आपल्या प्रत्येकाची कुवत तेव्हढी कुचकामी नसते. त्यामुळे वरील लिहिण्यांत आणि व्हिएतनामी मंडळींची ओळख पटवितांना सत्यस्थितीपासुन मी फारसा दुर गेलो नाही असे नम्रपणे वाटते. हे सारे बोगदे पाहाताना पावसाची संतत धार चालुच होती. तशा पावसातही आम्ही ते बोगदे पाहात होतो. खरे तर त्यामुळे युद्धजन्य परिस्थितीची अधिक जाण आली आणि सतत २१ वर्षे त्यामध्ये लपणारे लोक कशा कशातुन गेले असतील याची पुसटशी का होईना पण कल्पना आली. स्वातंत्र्यासाठी प्रत्येक देशाला काहींना काही त्याग करावाच लागतो. त्याला व्हिएतनामही अपवाद नव्हते! फ्रेंचाबरोबर झालेल्या १९४६ ते १९५४ च्या काळांत ही भुयारे तयार केली गेली आणि प्रथम वापरण्यांत आली. हीच भुयारे परत १९६८



च्या युद्धांत वापरली जातील हयाची त्यांना कल्पनाच नसावी. काही विशिष्ठ खोलीवर गेल्यावर ती एकमेकांना जोडली होती. शत्रुसैन्य त्यामध्ये घुसलेच तर फक्त एका सैनिकास शिरता येईल एव्हढीच त्या भुयाराची व्याप्ती होती. आणि शत्रु त्यांत शिरलाच तर तो जीवंत परत जाणार नाही हयाच्या योजनाही त्यात होत्या. खेडेगांवातील लोहाराकडुन तयार करवुन घेतलेल्या मिनी फावड्याने खणायचे आणि बांबुच्या विणलेल्या आपल्या धान्याच्या सुपासारख्या पात्रातुन खणलेली माती वाहायची! शत्रुसाठी तयार केलेले सांपळे

देखील बांबु तासुन अथवा झाडाच्या फांद्यापासून तयार केलेले. निसर्गाने दिलेले प्राण त्याच्याच सहाय्याने खर्च करण्याची संकल्पना! त्या रणभुमीत आयुधे तयार करण्याचे ठिकाण, जखमी सैनिकांना मलमपट्टी वा दवापाणी करण्याचे भुयार, स्वयंपाक करता यावा असे भुयार, तात्पुरती विश्रांती घ्यायचे भुयार अशा सर्व गोष्टी अगदी विचारपुर्वक संकल्पिलेल्या होत्या.

मात्र भुयारांत दिवसेंदिवस लपुन राहात असलेले रहिवासी जिवंत राहातीलच ही शाश्वती नव्हती. अपुऱ्या हवेमुळे मृत्युमुखी पडणारांचे प्रमाण बरेच मोठे होते. मधुन मधुन विषारी प्राण्यांच्या दंशानेही लोक मृत्यु पावतच होते. पुरेशी हवा नाही आणि पुरेसे अन्न अथवा पाणी नाही हयांचा परिणाम म्हणुन बरेचसे रहिवासी मृत्युमुखी पडले. हया साऱ्या परिस्थितीला तोंड देत देत व्हिएतनामने २१ वर्षे लढा दिला आणि आपले स्वातंत्र्य टिकवुन त्याची किंमत दिली. रणाविना स्वातंत्र्य कोणा मिळाले? हे तत्त्व जगातल्या प्रत्येक देशाला लागु पडते. पारतंत्र्याचा दुर्धर रोग बरा व्हायचा असेल तर त्याला जीवानिशी लढा हेच जालीम औषध आहे आणि ते द्यावयाच्या ऐवजी अहिंसा नामक नपुंसक तत्त्वाच्या औषधाचे सोयिस्कर डोस पाजतांना त्याचा साईड इफेक्ट जनतेला षंढत्वाकडे नेतो हा दूरदर्शी विचार हया देशाने अगदी डोळसपणाने केला. तो मार्ग त्यांनी न अंगिकारता मरु अथवा मारु असा सावरकरप्रणित मंत्र उच्चारला म्हणुनच आज व्हिएतनाम स्वातंत्र्याची एव्हढी मोठी किंमत चुकवुनही स्वतंत्रतेने मान ताठ करुन जगतो आहे. इतिहास घडविणाऱ्या त्या जागेला मला माझ्या आयुष्यांत भेट द्यायला मिळाली हे मी माझे भाग्यच समजतो. ही सर्व माहिती देणारी बाई त्याच युद्धांत जबर जखमी होऊन हातपाय गमाविलेल्या एका स्वातंत्र्य सैनिकाची मुलगी होती. त्या युद्धाचा तिच्या आयुष्यावर आणि कुटुंबावर झालेला दुष्परिणाम आम्ही स्वत: डोळयांनी पाहात होतो आणि अनुभवित होतो. बाप अशा रितीने जायबंदी झाल्यावर तिची आईच तिचा बाप आणि आईच तिची आई होती. नुसती युद्धाची जागा पाहुन माझ्या मनाची ही परिस्थिती झाली होती. मग अशा वातावरणांत व्हिएतनामी जनतेने २१ वर्षे कशी काढली असतील? हया सर्व विचारांमुळे मन सुन्न झाले होते. तशाच स्थितीत आम्ही हॉटेलवर परतलो. वातावरणांत का कोण जाणे पण एक प्रकारचे औदासिन्य पसरले होते! वादळी पाऊस

थांबण्याचे चिन्ह दिसत नव्हते! त्या वादळांत मनाचे वादळ केव्हांच मिसळुन गेले होते! त्या बाईचे एक वाक्य माझ्या काळजाला सारखे भिडत होते. After the war we just did not have time to cry? The urgent need was to pull ourselves together as quickly as we could.

नकळत माझ्या मनांत हया दोन ओळी आल्या:

दु:ख करण्यांस आता आसवांना वेळ नाही!
दोन अश्रु ठिबकले, त्यांना पुसाया वेळ नाही!

सायगांव म्हणजेच हो चि मिन्ह!

व्हिएतनामला लाभलेला खंबीर नेता म्हणजे हो चि मिन्ह! हया नेत्याच्या नेतृत्वाखाली देशाचा जो कायापालट झाला त्याची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी जनतेने सायगांव शहराचे परत बारसे केले आणि त्याला हो चि मिन्ह हे नांव दिले. (आपल्याकडे औरंगाबादचे नांव संभाजीनगर केले तर काही विशिष्ट लोकांच्या भावना दुखावल्या जातील अशा प्रकारचे विचार जनतेच्या मनांत भरवुन त्यांचे षंढत्व पिढ्यानपिढ्या टिकुन राहील अशी व्यवस्था राजकारणी करीत आहेत!) सर्व शहरभर दाढीवाल्या मिन्ह काकांचे फोटोंचे मोठ मोठाले बोर्ड आणि हो महत्त्वाचे सांगायचे राहिलेच की, त्या बोर्डांवर देशांतील कविंनी अथवा साहित्यिकांनी लिहिलेल्या कवितांच्या ओळी वा सुविचारांची राखण करणारी वचनेही लिहिली आहेत! नितीतत्त्वांचे आचरण शिकविणारी साहित्य सुमने! आणि तीही भर रस्त्यावर? हया व्हिएतनामी मंडळींना झाले आहे तरी काय? हे काय भलतेच!

साहित्य संमेलनासाठी वर्षभरातुन एकदा एखादी लहानशी देणगी दिली (आणि त्यासाठीही चार अटी टाकल्या) की आपली इति कर्तव्यता संपली असं मानणाऱ्या वैचारिकतेचा बडेजाव कुठे आणि देशांतील तरुण पीढीला, देशवासियांना, आयुष्याला-मनाला-बुद्धीला आवश्यक असलेला उत्तेजनात्मक संदेश उघडपणे देऊन देशभर केलेला आपल्याच साहित्यिकांचा उघड



सत्कार कुठे? साहित्यामध्ये पहिले नोबेल पारितोषिक भारतास मिळवुन देणाऱ्या रविंद्रनाथ टागोरांची आठवण देखील ज्या

देशास येत नाही त्या आमच्या देशाची धन्य होय! आम्ही फक्त आमची संस्कृती किती अगाध आहे असं छाती बडवुन सांगु, डांगोराही पिटू (कारण ते करण्यात आमचा हात कुणीही धरु शकत नाही) पण आपल्या देशांतील साहित्यिकांना देशभर अशा रीतीने रंगमंचावर स्थान देऊन, तरुण पिढीपुढे सतत आठवणींसाठी ही वचने ठेवून खऱ्या संस्कृतीचे पालन करणाऱ्या सर्व साधारण नागरिकाला असा शत्रुत्वाचा संदेश देणाऱ्या हया गरीब व्हिएतनामला मात्र हजार कुर्निसात करुनच सन्मानित करावे लागेल.

प्रत्येक शहराचे असे एक व्यक्तीमत्व असते. हो चि मिन्हचे व्यक्तीमत्व रस्त्याच्या बाजुला टाकलेल्या, कामगारांना गरमागरम अन्न पुरविणाऱ्या टपऱ्या, त्याच्या बाजुला बसुन



आनंदाने अन्न हे पुर्णब्रह्म म्हणून पोटभर जेवणारे कामगार, भाजीची कावड घेऊन दारोदारी भाजी आणि फळे विकणारे विक्रेते, मुलांपासून ते म्हाताऱ्या-कोताऱ्यापर्यंत आणि तरुणापासुन ते भाजीविक्रेत्यापर्यंत सारे जण तिथे एकत्र येतात, जेवतात, सुखदु:खाच्या गप्पा मारतात आणि अगदी आपल्याला जणु लॉटरीच लागली आहे असा भाव नसला तरी खुप आनंदित असतात. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद हा पोटोबा भरल्यामुळे असतो की हा त्यांचा स्वभावधर्मच आहे हे कळायला फारसा मार्ग नव्हता? काहीही कारण नसतांना जगाची जबाबदारी केवळ आपल्यावरच आहे असं समजुन, आहे तोही आनंद घालविणाऱ्यांना हा बदल स्वागतार्हच वाटावा. त्यांच्या आयुष्याचे तत्त्वज्ञान तरी कोणते? मला वाटते ते असेच असावे.

सुख सामोरीच आहे, त्याच्या स्वागतास जावे,

दुख घेऊन ऊराशी, वृथा कां हो ऊगाळावे?

एव्हढी मरणप्राय लढाई खेळुन, मोठी किंमत मोजुन पिढ्यान पिढ्या खच्ची झालेल्या हया व्हिएतनामी मंडळींच्या मनाला दुखाची झालरच नाही असं कोण म्हणेल? मात्र ती चेहऱ्यावर न दाखविता रोजची दिनचर्या, आहे त्यात समाधान मानुन जगण्याचा जणु विडाच त्यांनी उचलला आहे अस वाटलं. हॉटेलात जा अथवा किराणा दुकानांत, भाजीवालीशी बोला वा बियर बारमधल्या

नोकराशी बोला, सारे कसे सेवावृत्तीने भारलेले वाटले. कोणत्या मातीत बनविली गेलेली ही सारी माणसे आहेत? कोणत्या देवाने हयांना घडविले आहे? जगण्याची अविरत धडपड जगातली सारेच करतात आणि ते अपरिहार्यही आहे. मात्र आयुष्याच्या खडकाळ जमिनीवरुन चालतांना, क्षितिजाकडे लक्ष ठेवुन इंद्रधनुष्याची कमान कुठपर्यंत पोहोचली आहे त्या सौंदर्याचा मागोवा घेत घेत चालत राहाण्यात जी मजा आहे, ती घेण्याची मुभा फक्त संकटांना तोंड



देणाऱ्यांनाच असते. इतर ते इंद्रधनुष्य केवळ 'पाहातात', पण त्याचा आनंद क्षणभरच आलेल्या पावसाच्या सरीने आणलेल्या इंद्रधनुच्या कमानीपर्यंतच मर्यादित असतो. सर संपली की इंद्रधनुष्यही जाते आणि ते कुठे गेले कुठे गेले असा छाती पिटणारा शोकच त्याच्या वाटेला येतो. शेवटी धनार्जन काय अथवा अशा प्रकारचे आनंदार्जन काय, ते असे कष्ट करुनच मिळवावे लागते. हे तर खरेच परंतु अशाही परिस्थितीत आपण कशासाठी जगतो आहोत हया संवेदनेचा विचार घट्ट पकडुन आशेचे इंद्रधनुष्य दिसावे म्हणुन पावसाच्या सरी शोधण्यांतही असतो.

मात्र हया शहरात सारेच काही कौतुकास्पद नाही. पादचाऱ्यांसाठी एक अतिशय मोठी नकारात्मक गोष्ट म्हणजे हया शहरातले फुटपाथ अन्नाच्या ढाब्यांनी आणि मोटार सायकली पार्क करणाऱ्यांनी व्यापलेले आहेत. त्यामुळे फुटपाथवरील पादचाऱ्यांना रस्त्यावरुन चालावे लागते. आधीच वाहनांची संख्या अधिक, त्यात त्या बिचाऱ्यांना वाहने चुकवित चुकवितच चालावे लागते. त्यात कधी-कधी लहान मुलांचाही समावेश असतो. सकारात्मक गोष्ट सांगायची तर एकही भिकारी दिसला नाही. देश कम्युनिस्ट आहे म्हणुन म्हणा अथवा भीक मागणे हा गुन्हा आहे अशा वैचारिकतेने भारल्यामुळे म्हणा पण आपल्याकडे (म्हणजे भारतात आणि आजकाल अमेरिकेत देखील) गल्लोगल्ली दिसतात तसे 'भिकारडे' दृश्य येथे नाही.

भौगोलिक दृष्टीतुन पाहिल्यास हा गाव आणि संपुर्ण देशच आतुन बाहेरुन सुंदर आहे. गावाच्या प्रवेशद्वारापासुन ते गाव संपेपर्यंत

सारीकडे फुलांचे ताटवे, छानपैकी कापलेले वृक्ष आणि सुंदर बागा आणि त्या सौंदर्याची पुजा अधिकतम वाढविण्यासाठी मन:शांती देणारी ठिकठिकाणी बांधलेली बुद्ध मंदिरे! प्रत्येक घरासमोर, मग ते हॉटेल असो वा राहण्याचे ठिकाण, कोणत्याही वास्तुच्या प्रवेशालाच देव्हारा, त्यात उदबत्त्या, वाहिलेली ताजी फुले असे छानपैकी धार्मिक वातावरण! माझ्या लहानपणचे मला आठवते. मी बाहेरुन आले की माझी आजी हातपाय धुवुन मगच घरात ये अशी सक्त ताकीद देत असायची आणि सर्व प्रथम देवाला नमस्कार करायला लावायची. हयाची का कोण जाणे पण अचानक आठवण आली. त्यावेळी जसे प्रसन्न वाटायचे, तसेच काहीसे मला हे देव्हारे पाहुन वाटले. आणि त्या देव्हाऱ्यांत देव तरी कोणता आहे म्हणुन चौकशी केली तर त्यांत वास्तुपुरुषाची स्थापना केली आहे हे कळले तेव्हा तर खरोखरच खुप आश्चर्य वाटले. धर्माच्या अधिष्ठानावरच श्रद्धेचा कळस उभा असतो. भारतात आपल्याकडे असलेल्या वास्तुपुरुषाची पुजा करुन गृहशांती करणाऱ्या संकल्पनेचा आणि संस्कृतीचाच हा एक भाग आहे असे वाटले. भारतापासुन हजारो मैल दुर असणाऱ्या हया देशात असणाऱ्या आपल्यासारख्याच सम विचारांची, श्रद्धास्थानांची आणि काही अंशी समान विचारांची बैठक कशी बरे तयार झाली असेल? त्यांच्या म्युझियममध्ये रामायण, महाभारत हयावर चित्रे का असतील? त्यांच्या वाद्यांमध्ये चिपळ्या आणि झांजा अशा प्रकारची वाद्ये कशी बरं आली असतील? आम्ही त्यांच्या लोकल बसमध्ये बसल्यानंतर प्रत्येक वेळी तरुण लोकांनी स्वत:ची जागा आपणहुन सिनियर लोकांना का बरे दिली असेल? कुठेतरी भारतीयांचे आणि व्हिएतनामी मंडळींचे लागे-बांधे नक्कीच जमत असले पाहिजे. संगीताच्या मैफिलीत, द्वंद्वगीतातील दोन गाणाऱ्या व्यक्ती एकाचवेळी पुर्वनियोजनाशिवाय एखादी तान अगदी जशीच्या तशी घेतात आणि जेव्हा समोर येतात आणि त्यावेळी त्यांना जसे एक प्रकारचे आत्मिक समाधान मिळते तशा काहीशा मनाच्या जुळलेल्या अवस्थेत आणि विचारातच आम्ही हया शहराचा जड मनाने निरोप घेतला!

खेड्यातील उद्योगधंदे आणि माणुसकी!

आमचा पुढचा मुक्काम Hoi An नांवाच्या गावी होता. तेथुन एका खेड्यांत आधी बोटीने आणि नंतर पायी चालणे असा हा कार्यक्रम होता. कोणत्याही देशांत शहरी

संस्कृती निराळी आणि खेड्यांतील निराळी. मला वाटतं की खेड्यातील संस्कृती ही शहराच्या तुलनेने बरीचशी मुळ प्रकारची असते. त्यांना 'बाहेरचा' वारा लागलेला नसतो. ते खेडे असेच होते. एखादी स्त्री जशी नऊवारी साडीमध्ये अगदी सहजतेने वावरत असते आणि ते करतांना तिचे मुळ सौंदर्य अधिकच खुलुन दिसते तसे ते खेडे नारळी बागांमध्ये वसलेले असे आणि आपल्याच कामांत गुंतलेले वाटले. लाकडाच्या कोरीव वस्तु तयार करण्याचा उद्योग हे तेथल्या ऊदरनिर्वाहाच्या धंद्याचे वैशिष्ठ असावे. जवळ जवळ प्रत्येक घरटी हेच काम चालु होते. कोणत्याही प्रकारची मशिनरी न वापरता सर्व कामे हातानेच आणि छोटी छोटी अवजारे वापरुन चालु होते. ती अवजारे देखील त्यांनीच तयार केली होती. क्षणभर मला असे वाटले की आपल्याकडे होम डेपो (Home Depot) अथवा लो'ज (Low's) मधली सुप्रसिद्ध कंपन्यांनी तयार केलेली अवजारे हयांना आणुन दिली तर ही मंडळी त्यांच्या अंगी असलेल्या ऊपजत गुणांमुळे त्या लाकडांतुन अजुन कितीतरी सुंदर नक्षीकाम निर्माण करतील. वास्तविक बाहेरच्या जगाचा असा स्पर्श न झाल्यामुळे जे निर्माण केले आहे ते खऱ्या अर्थाने त्यांच्या मुळ कलेचे खरे प्रतिबिंब आहे! त्यावरुन कल्पना आली की पुर्वीच्या काळी अशी कला होती. त्याशिवाय का ताजमहाल सारख्या वास्तुचा जन्म झाला. नि काड्यापेटीमध्ये मावेल अशी नऊवारी साडी आपले कलाकार विणु शकले! मात्र त्या खेड्यांत त्यांनी तयार केलेल्या लाकडी वस्तुंमध्ये मला आपला विघ्नहर्ता श्री गणेशही दिसेल असे मात्र वाटले नव्हते! काय हे आश्चर्य! आमचा श्रीगणेश इतक्या दुर पोहोचला? माझे हात आपोआप जुळले. तेथल्या काम करणाऱ्या मुलीने मला मोडक्या तोडक्या इंग्रजीत विचारलेही की मी नमस्कार का करतो आहे? तिला समजेल असे उत्तर मी देत होतो पण तिच्या इंग्रजीच्या मोजक्याच ज्ञानामुळे तिला ते कळेना! शेवटी आमच्या टूर मॅनेजरची मदत घेऊन तिला श्रीगणेशाची ओळख करुन दिली. हा इतका पॉवरफुल देव आहे हे तिला कळले तेव्हा तिने देखील त्याला नमस्कार केलेला मी पाहिला. माझी खात्री आहे की आतापर्यंत तिच्या दुकानाची विक्री नक्कीच वाढली असणार कारण आपला गणपती कुणाच्याही सहाय्याला धावुन जातो. शेवटी डिसक्रीमिनेशन वगैरे प्रकार हे सारे पृथ्वीवरच नाही का? निदान स्वर्गात तरी ते अजुन पोहोचले नाही असे

वाटते. (म्हणजे नसावेत-आपल्याला काय माहित? पण काही वर्षांनी तिकडे गेल्यावर कळेलच म्हणा!)

अशीच त्या खेड्याची टूर करता आम्ही एका लहान गल्लीतुन जाऊ लागलो. त्या गल्लीत एक घर होते, त्याला आपल्याकडे खेड्यांत असते तसे काट्यांचे कुंपण होते. समोर एक ऐसपैस आंगण! त्यात फक्त कमी होती ती तुळशी वृंदावनाची! ते असते तर ते नक्कीच खेड्यामधले घर कौलारु वाटले असते. त्या घरासमोर स्टार फ्रुटचे एक मोठे झाड आणि त्याला अनेक फळे लदलेली. ते दृश्य मोठेच आल्हाददायक होते! कारण एक तर आपल्याकडे अशी स्टार फ्रुटची झाडे दिसत नाहीत. त्याचे अप्रुप वाटुन आम्ही सारे ते पहायला तिथे थांबलो. तेव्हढ्यांत एक १२-१३ वर्षांची एक गोड मुलगी घरांतुन बाहेर आली. आता माझ्या दारात उभे राहुन हा काय तमाशा आरंभला आहे? अशा अर्थाचे एखादे खास व्हिएतनामी वचन ऐकायला मिळते की काय असे वाटु लागले. त्यातुन त्या मुलीने येताना हातात एक मोठी काठी देखील आणली. त्यामुळे थोडे घाबरायला झाले. पण झाले भलतेच! तिने चक्क आमच्यासाठी ती फळे काढायचे काम सुरु केले. आणि ती काढुन प्रत्येकाला फळे वाटायला सुरुवात केली. कधी नव्हे ते माझ्या गावांत आणि घरासमोर आलेल्या हया पाहुण्यांना काय बरे देता येईल? अशा विचाराने आणि आम्ही त्या फळाच्या झाडाकडे पाहात असल्याने तिने अतिथी देवो भव चा मंत्र पाळला. रामायणामधल्या शबरीसारखेच तिचे वागणे वाटले. अतिशय हसत मुखाने तिचे हे काम चालले होते. आम्हां सर्वांना फळे देऊन ती खुणेने विचारत होती अजुन काढु का? हवी आहेत का? तिच्या त्या औदार्याने स्तिमीत होऊन आणि अतिशय गरीब आहे हे लक्षांत घेऊन तिला मी काही पैसे देऊ लागलो. पण तिने ते घेतले नाहीत. तिच्या डोळयांत अरे बाबा, मी हे पैसे मिळविण्यासाठी नाही रे करत! हा भाव मी चक्क वाचला. तिला विचारुन तिचा फोटो मात्र मी जरुर काढला. इतक्या लहान वयात माणुसकीची एव्हढी चाड असलेल्या त्या मुलीचा फोटो आठवणीत जपायलाच हवा! अशा संस्कारांची मुलगी ज्या घरांत राहाते त्या घराला मातीच्या तुळशीवृंदावनाची गरजच काय? का कोण जाणे पण त्या लहान मुलीचा निरोप घेतांना एखाद्या मायेच्या व्यक्तीचा आता ही आपल्याला पुढे कधीही भेटणार नाही असा निरोप घेतांना जसे वाटते

तसे वाटत होते.

त्या खेड्याचा निरोप घेतांना आपली जमेची बाजु खुप जड झाल्याची सुखद जाणीव झाली.

पौर्णिमेचा ऊत्सव!

संध्याकाळी घरी (म्हणजे आमच्या हॉटेलवर) पोहोचलो त्यावेळी रस्त्या-रस्त्यावरुन बँड आणि संगीताचा जल्लोष सारीकडे असल्याचे दिसले. चौकशी अंती आख्या व्हिएतनाममध्ये पौर्णिमेचा ऊत्सव (Full Moon Celebration) चालु असल्याचे आमच्या टूर मॉनेजरने सांगितले. आपल्याकडे आपण कोजागिरीचा ऊत्सव करतो परंतु त्याचा इतका जल्लोष क्वचितच करतो. मात्र हया मंडळींचा हा ऊत्सव म्हणजे मोठ्या प्रमाणावरच होता. रस्त्यांवर तोरणे उभारली होती. मंडप घातलेले होते. दुकानांतुन आकाश कंदीलापासुन ते कागदाच्या ड्रगनपर्यंत आणि निरनिराळया प्रकारच्या मिठाईपासून ते हया ऊत्सवानिमित्त सालाबादप्रमाणे विशिष्ट पदार्थ ठेवण्यापर्यंत त्याची अथांगता होती. मुले कागदाचे ड्रगन घालुन घराघरातुन नाचत फिरत होती. त्यांना काहीतरी (पैसे अथवा मिठाई) दिल्याशिवाय ती तिथुन हालेनात. आम्हास ते नाविन्य होते त्यामुळे आम्ही त्यांना पैसेच दिले. मुले एकदम खुष! त्या मुलांच्या हसऱ्या चेहऱ्याचे फोटो घ्यायला मी विसरलो नाही. निख्खळ आनंदाची किंमत किती कमी मोजावी लागते हे त्यादिवशी कळले. हिंदु धर्मांत वयाची ८१ वर्षे पुर्ण झाली की त्या व्यक्तीस आयुष्यात सहस्त्रचंद्र दर्शन झाले म्हणुन एक विशेष समारंभ करतात. हयाचाच अर्थ असा की त्या व्यक्तीने तिच्या आयुष्यात किती तरी



पौर्णिमा पाहिल्या आहेत. त्याच विषयावर व्हिएतनामसारख्या देशाने त्यांच्या देशात पौर्णिमेचा ऊत्सव साजरा करावा हे एक आश्चर्यच म्हणावे लागेल. भौगोलिक दृष्टया भारत देश इतक्या दुर असुनही आपले आणि त्यांचे धागे कुठेतरी जमतात हेच खरे!

शेवटचा टप्पा :

आमच्या टूरचा शेवटचा टप्पा (Halong Bay-Ha Noi) हा होता. विमानाने निघुन आम्ही Ha Noi ला

पोहोचलो आणि परस्पर Halong Bay येथे गेलो. त्या रात्री तेथे मुक्काम करुन दुसरे दिवशी आम्हास Halong Bay ची टूर करायची होती. हया भागात निसर्ग निर्मित अशी १९६९ बेटे आहेत. प्रत्येक बेट हे तितकेच सुंदर. इतकी सारी पहाने शक्यच नव्हते त्यामुळे मोजकीच पाहु शकलो. निसर्गाचे ते स्वरुप काही निराळेच होते. प्रत्येक बेटाचे निराळेच वैशिष्ट्य! विशेष म्हणजे व्हिएतनामी मंडळींनी त्या निसर्ग सौंदर्याची पुजा अविरतपणे चालविली आहे. मानव निर्मित असा कोणताही फापट पसारा त्यांनी ठेवलेला नाही. जे आहे ते शक्यतोवर आहे त्याच स्वरुपात राखण्याचा त्यांचा स्तुत्य प्रयत्न आहे. उगीचच अशा बेटांवर घरे वगैरे बांधून त्यांनी त्या निसर्गास गालबोट आणि हात लावलेला नाही. त्या बेटांवर जातांना पाण्यातुनच होडी चालवित फळे विकणारे खुप विक्रेते पाहिले. चालत्या बोटीमध्ये हा फळ विक्रीचा व्यवहार कसा होतो ते प्रत्यक्षच अनुभवण्यास मिळाले. प्रवाशांच्या येण्या जाण्यावरच हया स्थानिक लोकांची उपजीविका चालते ते अंतर्यामी जाणुन बऱ्याच प्रवाशांनी त्या फळविक्रेत्यांना प्रतिसाद दिला. एका बेटावर आम्ही मुक्काम केला. तेथे एक तासभर बसलो. त्या बेटास खाजगी असा वाळुचा किनारा होता त्यामुळे



आमच्या गृपमध्ये बरोबर आलेल्या अमेरिकन मुलींनी त्याचा पुरेपुर फायदा घेतला. आणि कंचुकीसहित समुद्रांत उड्या मारुन व्यवस्थित आंघोळीही केल्या. त्या तयारीनिशी आल्याचे स्पष्टपणे दिसले. (हा तरुण मंडळीतला आणि आमच्यासारख्या सीनियर सीटीझनमधला फरक!) तेव्हढ्या वेळेत आम्ही एक बियर संपविली. होय, त्या बेटावर एक छोटी टपरी टाकुन व्हिएतनामी मंडळींनी काळाची गरज ओळखली होती आणि प्रवाशांना लागतील अश्या गोष्टी सुर्योदयापासुन ते सुर्यास्तापर्यंत विकण्याची व्यवस्थाही केली होती. चार-पाच तास त्या निसर्ग सौंदर्याची पुजा बांधुन आम्ही त्याचा मनोमन निरोप घेतला आणि आमच्या हॉटेलवर परतलो.

इतिहासाची फाडलेली पाने व्हिएतनाम जोडतो आहे.

आमच्या प्रवासाचा हा शेवटचा टप्पा होता. शेवटच्या संध्याकाळी टूर कंपनीतर्फे आम्हाला संध्याकाळचे जेवण होते. तो निरोप समारंभच होता. गेल्या बारा दिवसांत जगाच्या दुरदुरच्या भागांतुन एकत्र आलेले आम्ही ४० प्रवासी बारा दिवसांत एकमेकांचे जवळचे मित्र झालो होतो. जेवतांना मधुनच उठुन एकमेकांबरोबर फोटो घेणे, एकमेकांचे पत्ते, फोन देणे-घेणे आणि मला विसरु नकोस असा संदेश एकमेकांस देणे ही प्रवासाच्या शेवटच्या दिवसाची नित्यकर्मे सारीजण करीत होते.

दुसरे दिवशी सकाळीच काही लोक परतणार होते. त्यानंतर दोन-दोन तासांनी काही लोक त्यांचे विमान पकडण्यासाठी निघणार होते. आम्हीही दुपारी दोन अडीचचे सुमारास निघालो. बसमधुन विमानतळाकडे जातांना **Ha Noi** ची गर्दी दिसत होती. रोजचा नित्याचा व्यवहार चालला होता. हजारो मोटारसायकली रस्त्यांवरुन धावत होत्या. भाजी आणि फळविक्रेते आपला माल विकायचा प्रयत्न करीत होते. रस्त्याच्या बाजुला संध्याकाळच्या जेवणासाठी ढाबे उघडण्याची तयारी चालु होती, प्रत्येक जण आपापल्या कामांत दंग होता. मधुनच दिसणारी बुद्धमंदिरे तिथे वावरणाऱ्या भक्तांना आशेचा आणि उज्वल भवितव्याचा संदेश देत होती. शाळेतल्या लहान मुलांची एक फलटण रस्त्याच्या बाजुला सिग्नलपाशी उभे राहुन रस्ता ओलांडायची परवानगी त्यांच्याबरोबर असलेले टिचर केव्हां देतील याची वाट पहात होती. ही तरुण पिढी व्हिएतनामच्या भविष्याची पावती होती. त्या



मुलांचे ते निरागस चेहरे पाहुन त्यातच कुणी भविष्यात होणारा देशाचा नेता असेल ही शक्यता नाकारता येत नव्हती.

२१ वर्षांच्या लांबलचक युद्धाच्या राखेतुन हे फिनिक्स पक्षी निर्माण झालेले होते. ताठ मानेने जगत होते. आमच्या वाटेला जाऊ नका अन्यथा दुसरी २१ च काय ५० वर्षेही आम्ही लढु असा आत्मविश्वास त्यांच्या

चालण्यातुन, बोलण्यातुन गेल्या १२ दिवसांत आम्हाला स्पष्ट जाणवला होता.



आमच्यासारखे हजारो प्रवासी हया देशांत येत राहातील, त्यांना मोठ्या अभिमानाने ते हेही दाखवतील की आम्ही कुठे होतो आणि आज कुठे आहोत. आणि ते त्यांच्या देशसेवेच्या कामाला लागतील. केवळ बारा दिवसाचाच त्यांचा सहवास झाला असला तरी देखील मला अगदी मन:पुर्वक जाणवलेली त्यांच्या बाबतीतली गोष्ट म्हणजे त्यांच्या वागण्यांत नम्रता होती. पण हांजी-हांजी अजिबात नव्हती, जगण्यासाठी आवश्यक असणारी स्वत:च्या कर्तुत्वाची झाक होती पण फाजील आत्मविश्वास नव्हता. भुतकाळाची दुखद, जीवाला चटके देणारी जाणीव होती, पण त्यामुळे आजचे मिळत असलेले सुख गमावुन टाकण्याचा अनावश्यक वैचारिक गोंधळ नव्हता. त्यांच्या रोजच्या प्रामाणिक कामामुळे, अथक प्रयत्नांमुळे, त्यांच्या अंगी असलेल्या सेवावृत्तीमुळे असं वाटत होतं की, आखखा व्हिएतनाम भुतकाळातल्या घटनांनी त्यांच्या देशाच्या इतिहासातली ओरबाडुन काढलेली, परकीय आक्रमणामुळे फाडुन टाकलेली पाने फेकुन देत नव्हता तर ती शक्य असेल तिथे जोडुन, त्यातुन काय शिकता येईल हा प्रयत्न क्षणोक्षणी करतांना दिसत होता. धन्य हा गरीब देश की जो ताठ मानेने जगायचा प्रयत्न करीत होता.

आमची बस आता विमानतळावर जवळ पोहोचली होती. तेव्हढ्यांत बसमधुन एक बुद्ध मंदिर दिसले. बसमधुनच मी त्या बुद्धमुर्तीस हात जोडुन नमस्कार केला. व्हिएतनामी जनतेच्या हया जगण्याच्या स्पर्धेतील लढाईला आणि प्रयत्नांना बुद्धदेवाने यश द्यावे अशी प्रार्थना मी केली. तेव्हढ्यात विमानतळही आला, बसखाली उतरुन आम्ही आमचे सामान बाहेर काढु लागलो. आता घरी लॉसएंजेलिसला परतायचे वेध लागले होते.

# Proudly Serving Clients for more than 20 years...



Laxmikant Mundada
CEO
9820452002






**Financial Planning**
Define realstic goals for
your business and life
Create a plan to get there confidently.



**Retirement Planning**
Wake up before it's too late,
Take charge of your Retirement



**Child Education Plan**
Realise your dream of giving
your child a bright future

**I am on the MISSION to make difference in People's Life by helping them to achieve FINANCIAL FREEDOM**

## SHREE NARAYANI WEALTH SOLUTIONS

Office No. 38-78, High Street cum Highland Corporate Centre
Kapurbawadi, Thane (West) - 400601.
Email : Shreenarayani09@gmail.com



# भारताच्या जलसीमा...

## सागरी पर्यटन



रामकृष्ण विनायक अभ्यंकर
२/४६, भक्तीयोग सोसा. परांजपे नगर, वझिरा नाका, बोरीवली (प.),
मुंबई-४०००९१. मो.नं.-९८१९८४४७१०

पंचमहाभूतांमध्ये (आप) म्हणजे जलाचा उल्लेख अवश्य आहे. समस्त सृष्टीमध्ये ही पंचतत्त्वे (पृथ्वी, आप, तेज, आकाश, वायू) इत्यादींनी राहिलेली आहेत. आपल्या प्रसिद्ध मंत्रानुसार (आकाशात पतितं तोयं...) सागराचे महत्व समजते. पृथ्वीवर सुमारे फक्त १/५ भाग जमीन असून उर्वरित भागात पाणीच पाणी आहे, अर्थात सागराचे जल हे खारट असल्याने पिण्यास निरुपयोगी असते. बाष्पीभवनापासून (खारे पाणी) बाष्पास थंडी लागून (Vapourisation) परत गोड पिण्याचे पाणी बनविण्याची प्रक्रिया अखेर निसर्गच करीत असतो. हे देखील तितकेच खरे आहे. पाण्याने वेढलेल्या काही भागात बेटे (जमिनीचा वर आलेला भाग) आहेत. तर काही मोठ्या जमिनीच्या भागाला समुद्र दिसत नाही. (सप्त सागराने वेढलेली पृथ्वी असा पुराणातील संदर्भ... श्रीमद भागवतात सापडतो. (उदा. ऑस्ट्रेलिया खंड म्हणजे मोठ्या स्वरुपातील एक बेटच (big island) आहे.

आर्क्टिक/पॅसिफिक/अॅटलांटीक महासागराने वेढलेले अमेरिका खंड तर सागरापासून दूर असलेले चीन, अरबस्थान इ.इ.)...

भारताचे भौगोलिक स्वरुप - आपला भारत ८-३८ अक्षांश व ६८-९८ रेखांशाच्या काल्पनिक चौकडीत विसावलेला आहे. भारतास खूपच मोठे जमीन व जल क्षेत्र लाभले असून क्षेत्रफळाने जगात भारताचा ७ वा क्रमांक लागतो. उपखंड म्हणून समजल्या गेलेल्या भारताची दक्षिणोत्तर लांबी सुमारे ४३०० किमी असून पूर्व-पश्चिम लांबी सुमारे ३५०० किमी आहे. भारताच्या वायव्येस पाकिस्तान, उत्तरेकडे चीन, नेपाळ, तिबेट, भूतान, ईशान्येकडे चीन तर पूर्वेकडे बांगलादेश व म्यानमार (ब्रह्मदेश) आहे. दक्षिण-पूर्वेकडे श्रीलंका आहे. भारताच्या



अतिपूर्वेकडे अंदमान-निकोबार व अति पश्चिमेकडे लक्ष्यद्वीप व मिनीकॉय बेटे आहेत. भारताच्या पश्चिमेकडे सिंधुसागर (अरबी समुद्र) तर पूर्वेकडे बंगालचा उपसागर असून दक्षिणेकडे हिंदी महासागर आहे. उत्तरेकडे पूर्व-पश्चिम पसरलेला (अत्त्युच्य एव्हरेस्ट शिखर सुमारे २९००० फुट उंच

असलेला) बर्फाळलेला हिमालय पर्वत आहे. भारताचा सर्व जल किनारा सुमारे ८००० किमी चा असून पूर्वेकडील अंदमानच्या पोर्ट ब्लेअर किनारा चेन्नई, कोलकोटा, विशाखापट्टम पासून सुमारे १३०० किमी (७०० मैल) जल मार्गाने आहे. तर पश्चिमेकडील कोचीन पासून लक्ष्यद्वीप / मिनीकॉयचे अगत्ती (Agatti) सुमारे ५०० किमी आहे. भारताला गुजरात, महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, केरळची पश्चिम किनारपट्टी तर तामिळनाडू, पौंडेचरी (केंद्र शासित राज्य) आंध्रप्रदेश, ओरिसा, बंगाल इ. राज्यांची पूर्व किनारपट्टी लाभली आहे. थोडक्यात पश्चिमेकडील कच्छ मधील नारायण सरोवर / कोटेश्वर पासून ते पूर्वेकडे गंगासागर पर्यंत भारताला अफाट जल किनारा लाभला आहे. ह्या अफाट लांबीच्या सागरी किनाऱ्यावरुन एक पर्यटक म्हणून भटकंती करणे आता अजिबात अशक्य राहिलेले नाही. हवाई / जल / रेल्वे / मोटार इ. मार्गांनी व्यवस्थित आयोजन करुन सागरी पर्यटनाचा आनंद उत्तमप्रकारे लुटता येतो. तसे करतांना तदनुषंगाने त्या-त्या ठिकाणच्या धार्मिक, संस्कृतिक, व्यापारी, सामाजिक, पारंपारिक, राजकीय, ऐतिहासिक, पौराणिक इ.इ. संदर्भांचा तपशील आपल्याकडे असणे केव्हाही योग्यच आहे असे मला प्रामाणिकपणे वाटते म्हणून अश्याच काही मोजक्या स्थानांचा मांडलेला ह्या लेखातील ओझरता गोषवारा.

भारतीय जल सीमेवरील महत्त्वाची स्थाने.....

१) गुजरात कच्छ (Kutch) : भारताच्या अति पश्चिम सागर किनारी असलेले हे



सुरुवातीचे प्रमुख स्थळ आहे. पाकच्या सिंध प्रांताला बऱ्यापैकी भिडलेला संवेदनशील असलेला हा टापू. सागरकाठीच तेथे एक पुरातन दगडी जेट्टी असून ती ऐतिहासिक बाबीचा संदर्भ नक्कीच देते. फार पूर्वी ह्याच धक्क्यावरुन बोटीने कराचीहून मक्का / मदिनेला जाण्यासाठीचा मुस्लिमांचा राजरोस अधिकृत जलमार्ग होता. जेट्टीपासून (BSF) बोटीने अवघ्या २० मिनिटात (३० नोटीकॉल्स) कराची बंदर गाठता येते.

अवघ्या १० किमी वर आंतर राष्ट्रीय हद्द आहे. इतका हा अति संवेदनशील भाग आहे. नावेनी मासेमारी करणाऱ्या कोळ्यांची नेहमी ये-जा येथून चालूच असते. हद्द ओलांडली गेल्याने नागरिक अडचणीत येतात. ह्याच ठिकाणी सिंधू-सरस्वती नद्या सागरास येऊन मिळतात. कोटेश्वर, नारायण सरोवर, लखपत ही ठिकाणे अगदी सिंध हद्दीजवळ आहेत. एकेकाळचा हा सर्वार्थाने सुसंपन्न असलेला भाग, पण निसर्गाच्या प्रतिकुल जडण-घडणीमुळे व भूकंपामुळे हा परिसर आता नापीक व ओसाड बनला आहे. येथे मोठे प्रसिद्ध व एकमेव देखणे व समुद्राच्या लाटा व तुफान वादळे झेलणारे कोटेश्वरचे शिव मंदिर आहे. यवनी आक्रमणांनी ते बऱ्याचदा लुटले गेले आहे. व परत शिव भक्तांकडून पुन्हा बांधले देखील गेल्याचा त्याचा इतिहास आहे. सुमारे १३०० वर्षापूर्वी चीनी प्रवासी होएत्सुंग व ५००० बुद्ध भिक्षु येथे आले होते. त्यावेळच्या मठ व गुंफाचे अवशेष आजही तेथे दिसतात. कोटेश्वरहून अवघ्या ३ किमीवर नारायण सरोवर आहे. ब्रह्मा, विष्णू, महेशाचे हे एकत्रित व अत्यंत पवित्र स्थान. ऋषी मुनींचे हे तापस स्थळ, विष्णूने आपल्या करंगळी ने जमिनीत खोदून हे अति भव्य गोड पाण्याचे सरोवर बनविले आहे. म्हणून सरोवराचे नाव नारायण सरोवर आहे. आजही भारताच्या कानाकोपऱ्यातून मोठ्या संख्येने भक्तगण नित्याने येतच असतात. तेथे प्रसाद व निवासाची सोय होते. ह्याच किनाऱ्यालगत कांडला, मांडवी, मुंडरा सारखी व्यापारी बंदरे आहेत त्याचप्रमाणे फोर्च्युन तेलाची कंपनी देखील आहे. त्यामुळे सर्वकष कच्छ विकासात खचितच त्याची भर पडते आहे.

गुजरात (सौराष्ट्र) : भारताचा नकाशा नजरेसमोर आपण आणला तर देशाच्या मधोमध पश्चिमेकडे होडीसारखा आकार



दिसतो. हा भाग म्हणजे (सौराष्ट्र) काठेवाड होय. होडीसारखा सागर काठचा महत्त्वाचा भाग म्हणजे ओखा, द्वारका, पोरबंदर, सोरटी सोमनाथ, दीव इ. आहे. ओखा म्हणजे मिठाने बहुतांशाने सफेद (Salt) संपन्न

परिसर. पहावे तिथे मीठच मीठ. हे रेल्वेचे अखेरचे ठिकाण आहे. कारण त्यापुढे सारे पाणीच पाणी. ओखा ते द्वारका दरम्यान मोठी सिमेंट कंपनी (ACC) आहे. भारतातील अधिकांश मीठ येथे पिकविले जाते. ओख्याहून सुमारे ४० किमीवर द्वारकानगरी आहे. देशभरातून येथे नेहमी भक्तगणांची ये-जा सुरुच असते. भगवान श्रीकृष्णाची ही वास्तव्य भूमी. साऱ्या प्रजासमवेत त्यांनी द्वारकानगरी तीनदा वसवली व नंतर ती द्वापारयुगाच्या अखेरीस सुवर्णद्वारका समुद्रात बुडविली. तिचे राहिलेले थोडे अवशेष आजही दिसून येतात. आज द्वारकेत भगवंताचे भव्य दगडी मंदिर आहे. त्याचा कळस दूरवरुन सहजी दिसतो. गाभाऱ्यात श्रीकृष्णाची मोठी चांदीची मुर्ती आहे. तेथून बेट/भेट द्वारका पाहता येते. श्रीकृष्ण-सुदामा



भेट येथे घडली. सुदामा पोरबंदर (सुदाम नगरी) हून द्वारकेस आपल्या गुरु बंधूस भेटण्यासाठी मजल दरमजल करीत भक्त सुदामा आला होता. भेट द्वारकेस जातांना बोटीतून (सुमारे २-२.५ किमी) जावे लागते. सुमारे १० किमी परिघाचे हे बेट असून जवळच शंखासुर महादेवाचे पुरातन दगडी मंदिर आहे. बेटावर सर्वत्र मुस्लिमांचे हिरवे झेंडे फडकताना दिसतात. भारताच्या दृष्टीने ही फार गंभीर समस्या बनू पाहते आहे. त्याचा वास्तविक राष्ट्रीय पातळीवर विचार व्हायलाच हवा. इथून देखील कोळी बांधव मासेमारीसाठी बोटीतून दूरवर जातात. कधी कधी पाकचे बंदी बनतात. द्वारका दर्शन करतांना रुख्मिणी मंदिर, गोपी तलाव, नागेश्वर, हर्षद माता, सर्च लाईट, शंकराचार्यांचे पीठ इ. गोष्टी पाहता येतात. तेथे वारा बराच असल्याने पवनचक्क्या भरपूर आहेत. त्यावर वीज उत्पादन केली जाते. पिण्याचे गोड पाणी मात्र लांबून आणावे लागते. तेथे आहार, निवासाची बरीच सोय आहे. द्वारका-सोमनाथ ह्या सुमारे २२० किमी च्या मध्यावर पोरबंदर हे अति महत्त्वाचे व्यापारी बंदर व शहर आहे. येथून बरेच महामार्ग जातात. श्रीकृष्ण भक्त सखा सुदामा इथलाच. महात्मा गांधींची ही जन्मभूमी. त्यांची ही वास्तू सरकारी बनून सर्वांना दर्शनासाठी ती खुली केली आहे. तेथे भारत मंदिर प्रेक्षणीय असून तेथे संत ज्ञानेश्वर, संत

नामदेव, शिवाजी महाराज आदिंची सुंदर तैलचित्रे व परिचय तेथे माहितीसाठी दिले आहेत. त्याचप्रमाणे पोरबंदरला तारांगण देखील पाहता येते. पोरबंदरहून वेरावळ-सोमनाथला सुमारे (११० किमी) अडीच तासावर वाहनाने पोहोचता येते. सारा बस मार्ग सागर किनाऱ्या जवळूनच जातो. वेरावळ हे उत्तम बंदर असून विशेषत: मत्स्य



उद्योगासाठी प्रसिद्ध आहे. तेथून जेमतेम २० मिनिटांवर प्रसिद्ध सोमनाथ मंदिर आहे. हिंदूंचे १२ ज्योर्तिलींगातील हे श्रध्दा स्थळ असल्याने वर्षभर भक्तांची नेहमी येथे वर्दळ असते. मोहमद गझनीने बऱ्याच वेळा हे मंदिर अक्षरश: लुटले व उध्वस्त ही केले. नेहमीप्रमाणे हिंदुनी परत त्याचा मोठ्या श्रद्धेने जिर्णोध्दार केला आहे. हे फारच सुंदर मार्बलचे मंदिर आहे. त्या नव्या मंदिरालगत समुद्राला लागून एक धातूचा खांब असून त्यावर मोठा धातूचा गोल असून दक्षिणेकडे बाण दाखविला आहे. दक्षिण धृवापर्यंत जाणारा अनिर्बंध जलमार्ग सांगणारी माहिति खांबावरील शिलालेखावर कोरली आहे. नकाशात देखील हेच जाणवते. सरळ दक्षिणेकडे धृवापर्यंत सारे पाणीच पाणी आहे. येथे संगमस्थानी श्राद्धादी कर्मे केली जातात. ह्याच ठिकाणी थोडेसे दूर देहोत्सर्ग ठिकाण असून भगवान श्रीकृष्ण व बलराम यांनी आपला अवतार इथे संपविला आहे. येथे बरीच अन्य धार्मिक स्थाने असून ती वाहनांनी सहजी पाहता येतात. आता सोमनाथ नवीन शहर म्हणून विकसित होते आहे. तेथे निवासासाठी देवस्थानतर्फे उत्तम सोय आहे. अन्य हॉटेल्स देखील आहेत. रेल्वे/बसने पुढे प्रवासी जाऊ शकतो. दिव (Deu) हे केंद्रशासित राज्य असून बसने जेमतेम २ तास तेथे जाण्यास लागतात. किल्ला व बीच हे देखील पर्यटकांचे आकर्षण नक्कीच आहे. अमरकंटक छत्तीस गड येथे उगम पावलेली नर्मदा नदी दगड गोटयातून वाहत जाऊन व सर्वांची जीवने समृद्ध करीत अखेर भरुच येथे सिंधू सागरास येऊन मिळते. सागरी मार्गाने पुढे सरकतांना दमण (केंद्र शासित प्रदेश) आहे. तेथे बीच वर पर्यटक मौज मजा लुटतात. तेथे

जाण्यासाठी वापी हे रेल्वेचे स्थानक सोयीचे पडते. काही वर्षांपूर्वी हा परिसर तस्करीसाठी अधिक ज्ञात होता. अनेक नेहमी लागणाऱ्या गोष्टी परदेशातून येथे उतरवून अन्यत्र पाठविल्या जात. तेथून पुढे खाली सरकल्यावर उंबरगावचा सुरेख किनारा आहे. ही गुजरात व महाराष्ट्राची राज्य हद्द. सुरुच्या गर्द झाडीतून भटकणे म्हणजे वेगळाच अनुभव असतो. त्याच्याच पुढे रामानंद सागर यांच्या रामायण ह्या सुप्रसिध्द मालिकेचे बराचकाळ चित्रीकरण चालु होते. (Vrundavan Studio) सर्वांचे हे मोठे आकर्षण होते.

२) महाराष्ट्र : डहाणू पासून सावंतवाडी पर्यंत सुमारे ४०० किमी ची सुरेख रमणीय व आकर्षक पश्चिम सागरकिनारपट्टी महाराष्ट्रास लाभली आहे. ही किनारपट्टी अनेक किल्ल्यांनी समृद्ध आहे. राज्याच्या रक्षणासाठी हे जलदुर्ग भूईकोट किल्ले इ. ची आवश्यकताच होती. महाराष्ट्राची ती एक शान म्हणावी लागेल. तारापूर येथे प्रसिद्ध (BARC) चे आण्विक केंद्र आहे. केळवे माहिम येथे प्रसिद्ध शितला देवीचे मंदिर आहे. पर्यटकांचे बीचवर मौज मजा करण्याचे उत्तम ठिकाण आहे. सुट्टीला जोडून पर्यटक कुटुंबासमवेत आनंदाने दिवस घालवितात. तेथे खाजगीरित्या पर्यटकांची उत्तम सोय होते. वसईचा किल्ला आजही आपले पुरातन वैभव राखून आहे. पोर्तुगीज, पेशवे, इंग्रज इ. राज्यकर्ते येथे सक्रीय बनलेले आहेत. समुद्रकिनारी थेट अगदी गोराई, अकसा, जुहू, बांद्रा प., शिवाजी पार्क, गिरगाव चौपाटी, चर्चगेट, गेटवे ऑफ इंडिया पर्यंतचा सागरी परिसर म्हणजे पर्यटकांची मौज मजेची भटकंतीची स्थाने जरुर आहेत. मुंबई ही पूर्वीच्या ७ बेटांपासून बनलेली असल्याने व मुंबई ही सर्वार्थाने महत्वाची असल्याने मुंबईचे महत्त्व खरोखरीच अनन्य साधारण आहे. मुंबई ही नुसती महाराष्ट्र राज्याची राजधानी नसून भारताची आर्थिक राजधानी देखील आहे. साहजिकच लाखो लोकांची दैनंदिन ये-जा चालू असते. त्याच सोबत हवाई, रेल्वे व



जल वाहतूक होत असते. माहीमची शितलामाता, मुंबादेवी, सिद्धिविनायक इ. भक्तांनी नेहमी गजबजलेली असतात.

भाऊच्या धक्क्यावरुन बोटींनी कोकणात लोक जात असतात. तेथूनच कोकणचा प्रवास सुरु होतो.... कोकण परिसर ह्या किनाऱ्यावर प्रामुख्याने रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग हे जिल्हे येत असून मुरुड जंजिरा, सुवर्ण दुर्ग, केळशीची महालक्ष्मी, बिर्ला गणेश, सालाव (रायगड) व पूर्णगड, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग आदि महत्त्वाचे किल्ले असून कनकेश्वर, हरिहरेश्वर, सुवर्ण गणेश, व्याडेश्वर, चाणकाई देवी, गणपतीपुळे, भराडेदेवी, आदिवरेची महाकाली देवी, कनकादित्य, द्विभुज गणेश (रेड्डी) आहेत. साहजिकच देव दर्शन व बीच वर मनमुराद भटकंतीही होते. वेंगुर्ल्याजवळ बरीच देवदेवतांची अन्य मंदिरे आहेत. श्रीदेव रामेश्वर ही वेंगुर्ल्याची ग्रामदेवता असून भक्तांचे श्रद्धास्थान आहे. हे १७ व्या शतकातील असल्याचे समजते. गणपती पुळे येथे लांबलचक असलेला बीच फार आवडतो. पाठीमागे जागृत गणेश मंदिर असल्याने लोक मोठ्या प्रमाणात येत असतात. येथे गुरुजी यांचेकडे भक्तांची सर्व सोय होत असली तरी हॉटेल श्री सागर आहार व निवासासाठी सर्वांगानी सोयीचे पडते. (संपर्क श्री. दिवेकर, मो.नं.९८२०६२२३९७) मुरुड येथील शाहूपुरी पासून पाण्यात पर्यटकांना अत्यंत आकर्षण ठरणारा मुरुड-जंजिरा किल्ला



आहे. येथे सिद्दीकीची सत्ता होती. जंजिऱ्याच्या बुरुजातून सिद्दिकी शत्रूवर दगडाचा सतत मारा करुन बंदर व किल्ला सुरक्षित ठेवीत असे. गोवा हद्दीजवळ असणारा विजयदुर्ग किल्ला वास्तुशास्त्राबद्दल बरेच काही शिकविणारा नक्कीच आहे. तत्कालीन असलेली सुरक्षा यंत्रणा आजही आपल्याला आदर्शवत खचितच आहे. त्याचप्रमाणे शिवाजी महाराजांचा प्रसिद्ध तटरक्षक पाण्यातील सिंधुदुर्ग साऱ्यांनाच आकर्षक ठरतो. हे पाहत असतानाच कुणकेश्वर मंदिर मात्र अवश्य पाहावे. हे दगडी पुरातन मंदिर कित्येक वर्षे सागरी लाटा, तुफानांना समर्थपणे तोंड देत उभे आहे. त्यासाठी हे सारे, शांतपणे, तपशीलवार पाहायला मात्र हवे. सावंतवाडीहून पुढे तारकर्ली पासून गोव्याची

हद्द लागते.

३) गोवा : पूर्वी गोवा हे पोर्तुगीजच्या अखत्यारीत होते. त्यानंतर ते केंद्र शासित प्रदेशात होते. काही वर्षापूर्वीच मात्र त्यास स्वतंत्र राज्याचा दर्जा मिळाला आहे. गोव्याच्या एका बाजूस एकापेक्षा एक भव्य, प्रशस्त, सुंदर, मंदिरे व दुसरीकडे बरीच बीचेस आहेत. पर्यटकांना इथली भटकंती खुप आवडते. मांसाहार सोबत काजूच्या (फेणी) दारुचा आस्वाद इथे मनसोक्त घेतला जातो. त्याचप्रमाणे अनेक प्रकारच्या मत्स्य आहारावर पर्यटकांना ताव मारता येतो. पूर्वीप्रमाणे अति स्वैराचारास व नग्नतेस (Nudism) मात्र बंदी आणली आहे. गोव्याचे निसर्ग सौंदर्य मात्र खरोखरीच लाजवाब व दिलखेचक आहे. ठीक-ठिकाणाहून गोव्यास सर्व मार्गांनी जाता येते.

४) कर्नाटक : पश्चिम किनाऱ्यावर कारवार, गोकर्ण-महाबळेश्वर, उडपी, मंगलोर आदि ठिकाणे येतात. ह्या भागास कोस्टल कर्नाटक म्हटले जाते. ह्या दरम्यान बरीच देवळे व बीचेस आहेत. उडपीस श्रीकृष्ण तीर्थ पीठ असून द्वैतवादी मध्वाचार्यांची ही कर्मभूमी. चंद्र मोलीश्वराची चंद्राने व परशुरामाने अनंतेश्वराची येथे स्थापना केली. ह्या स्थानास श्रीकृष्ण मठ



असे म्हणतात. तेथे श्रीकृष्णाची उत्तमोत्तम सुंदर तैलचित्रे आहेत. भक्तांसाठी वास्तव्याची सोय होते. तेथून पुढे मालपे बंदर आहे. राष्ट्रीय महामार्ग १७ समुद्रकाठाने जातो. वाटेत टरटल बीच पाहण्यासारखा असून पुढे मंगलोर हे व्यापारी बंदर व जवळ खाणी आहेत. कारवार (उत्तर कर्नाटक) येथे समुद्र किनाऱ्यावर गोकर्ण महाबळेश्वर हे प्रसिद्ध पुरातन शिव-गणेश स्थान आहे. गुरु चरित्रातील कथासंदर्भ येथे आहे. कैलास पर्वतावरुन शिव लिंग घेऊन लंकेत जात असतांना रावणाने ते लिंग खाली ठेवल्याने रागाने बाल गणेशाला कपाळावर रावणाने जोराने चपराक मारली, त्याची निशाणी आजही मंदिरात दिसते. नारळी, पोफळी,

बागायती व शेतीनी संपन्न असलेला शांत व रमणीय असलेला हा परिसर पर्यटकांना लुभावतो. सर्वत्र जगभर हॉटेल व्यावसायिक म्हणून कार्यरत असलेली शेट्टी/उडपी मंडळी इथलीच. कमालीचे निरोगी, अप्रदुषित असलेले वातावरण इथे प्रकर्षाने जाणवते. **NH-17** वरुन पुढे मंगलोरेला जातांना मुरढेश्वर नावाचे सुरेख शिवस्थान आहे. पूर्वेकडील भागात बरीच मंदिरे आहेत. ते पाहूनच प्रवासी पुढे केरळकडे मार्गस्थ होतात.

५) केरळ : पूर्वीचा मलबार, त्रावणकोर, कोचीन असलेला छोटासा भूभाग व जलभाग म्हणजे हल्लीचे केरळ राज्य होय. भारताच्या अति व अखेरच्या दक्षिण टोकापर्यंत अरबी सागरकिनारी किनाऱ्याची साथ लाभलेला भाग होय. निसर्गाचे लेणे लाभलेला दक्षिणेचा स्वर्ग म्हणून भूषविणारा भाग आहे. ह्या छोट्याशा भागातून जलवाहतूक देखील तितकीच समर्थपणे होत असते. त्याचे कारण म्हणजे भूभागामध्ये घुसलेले सागराचे पाणी. त्याला **Back Waters** म्हणतात. त्या पाण्याच्या सभोवताली भरपूर वनश्री असून जलातून नौका द्वारे प्रवासी व मालवाहतूक सहजपणे केली जाते. ही या राज्याची विशेषताच म्हणायला हवी. कोचीन पासून कोटयाय्यम, अल्लेपी करीत सुमारे चार तासाचा जल प्रवास मस्तपैकी होतो. हा सारा प्रदेश मसाल्याच्या पदार्थांसाठी प्रसिद्ध आहे. एर्नाकुलम-कोचीन येथून शहर भ्रमणासाठी



सहली आयोजित केल्या जातात. कोचीन हे बंदर असून यासमवेत सिनोगाम्स (ज्यु लोकांचे मंदिर), चीनी फिशनेट इ. दाखवले जाते. येथून १५ किमी वर गुरुवायुर मंदिर बघण्यासारखे आहे. अल्लेप्पी हे ठिकाण नौकानयन स्पर्धेसाठी प्रसिद्ध आहे. श्रावणांत ह्या स्पर्धा आयोजल्या जातात. देशी/परदेशी लोक त्याचा आनंद अवश्य लुटतात. हा सारा प्रदेश भात, नारळ शेतीने संपन्न आहे. केरळ राज्यातील जवळ जवळ सर्वच नागरिक साक्षर आहेत. तिरुअनन्तपुरम हे केरळचे खालचे शेवटचे ठिकाण असून ती केरळची राजधानी आहे. तेथील पद्मनाभ मंदिर फारच सुंदर आहे. मंदिरावरील दगडी कोरीवकाम व गोपूर आकर्षक आहेत.

भगवंत शेषावर पहुडलेले आहेत. शहरातील अन्य स्थाने देखील पाहण्यासारखी आहेत.

६) तामिळनाडू : ह्या राज्यातील कन्याकुमारी हे स्थान म्हणजे भारताचे अति दक्षिण टोक आहे. सर्वार्थांनी हे स्थान महत्त्वाचे आहे. समुद्राला लागुनच देवी कुमारीचे महत्त्वाचे दगडी मंदिर आहे. ह्या मंदिरात पुरुषांनी उघड्याने जायचे असते. तिन्ही सागरांचे (Triseas) हे संगमस्थान



होय. जलाप्रमाणे सोबत येणाऱ्या विविध रंगी-बेरंगी वाळूचे शंख, शिंपले येथे दिसतात. त्याचप्रमाणे सूर्योदय व सूर्यास्त फारच सुरेख दिसतो. तिन्ही दिशा मोकळया असल्याने ते शक्य होते. (असाच भूमीचा चिंचोळा सागर वेष्ठित भाग ब्राझील देशात (अमेरिका खंड) सापडतो. कन्याकुमारीच्या पाण्यातील समोरील महाशीला सर्वांचेच आदराचे स्थान आहे. जागतिक धर्म परिषदेत जाण्यापूर्वी स्वामी विवेकानंदांनी तीन दिवस अहोरात्र त्यावर तपश्चर्या केली होती. बाजूकडील शिळेवर तामिळचे प्रसिद्ध कवी वाल्लूवर यांचे स्मारक आहे. भारताच्या ८व्या अक्षांशावरील हे ठिकाण असून सर्वच दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. रामेश्वर हे बंगालच्या उपसागरातील बेटाचे ठिकाण. बस व रेल्वेने समुद्रावरील पुलावरुन बेटावर जाता येते. समुद्रावरुन रेल्वेने जातांना रेल्वे मार्ग मधोमध दुभंगला जाऊन मोठ्याल्या बोटी पुढे सरकतात. नंतर रेल्वे मार्ग पूर्वपदावर येऊन गाडीचा मार्ग खुला होतो. तेथून बोटीने २८ सागरी मैलावर श्रीलंका आहे. रामेश्वर हे १२ ज्योर्तीलिंगातील श्रद्धा स्थान. त्यामुळे नेहमी भक्तांची वर्दळ असते. तेथून नाग पटीनम जवळ वेलंकिनी म्हणजे ख्रिस्ती भक्तांची आरोग्यदेवता आहे. जगातील सर्वधर्मीय लोक येथे येत असतात.

पाँडेचरी (Pondicherry) : पूर्वीचा फ्रेंच राजवटीतील हा प्रदेश. सध्या हा केंद्र शासित प्रदेश म्हणून कार्यरत आहे. जगप्रसिद्ध योगी अरविंद यांचा आश्रम येथे आहे. तो पाहण्यासाठी व अभ्यास व सेवेसाठी बरेच भक्त गण व सेवेकरी येत असतात. प्राचीन काळातील गणेश मंदिर येथे असून कवी सुब्रमनियम भारती यांचे स्मारक आहे.

महाबलीपुरम... दक्षिण भारताच्या सागरकिनाऱ्यावरील कला संस्कृती, धार्मिक

व ऐतिहासिक दृष्टीने संपन्न असलेले व पर्यटकांना आवडणारे स्थळ आहे. पुराणकालीन बळीराजाने वसवलेली ही नगरी होय. पल्लव वंशातील पहिला राजा नरसिंह वर्मा ह्याने उत्तम प्रकारची कलाकृती येथे निर्माण केली. अप्रतिम शिल्प कलेचे हे माहेरघर आहे. उंचावर शिवमंदिर असून तेथे पांडव लेणी आहेत. येथील लांबलचक पसरलेला सोनेरी वाळूचा किनारा (Golden Beach) पर्यटकांचे प्रमुख आकर्षण आहे. येथे सदैव चित्रीकरण सुरुच असते. येथील पिवळी वाळू सूर्यप्रकाशात सोन्याप्रमाणे चकाकते (म्हणून सुवर्ण किनारा). येथून जवळच कांचिवरम धार्मिक स्थान असून रेशमी साड्यांसाठी प्रसिद्ध आहे. पुढे वर सरकल्यावर चेन्नई (मद्रास) कृत्रिम बंदर असून राजधानीचे व व्यावसायिक दृष्ट्या महत्त्वाचे आहे. आयोजित सहलीद्वारा चेन्नई शहर दाखविले जाते. रेल्वे, बस, विमान, बोटीने हे शहर जगाशी जोडले आहे. चेन्नईच्या सागर किनाऱ्यावरील प्रदेश रात्रीच्या विद्युत रोषणाईत फारच सुंदर दिसतो. (जणू मुंबईचे मरीनलाईन्स). तामिळनाडूमध्ये फिरत असताना सर्वत्र तामिळ भाषेचा दुराग्रह अन्य भाषिकांना मात्र चांगलाच त्रासदायक व अडचणीचा ठरतो.

७) आंध्रप्रदेश : पुढे वर सरकताना आंध्र



प्रदेशातील मच्चलीपट्टम, विशाखापट्टम, विजयवाडा, श्रीकाकुलम ही बंदरे आहेत. बंगालचा उपसागर अजिबात शांत नाही. वारंवार कमी दाबाचे पट्टे ह्या भागात उद्भवत असल्याने सतत मोठाली वादळे, आंधी उसळत असतात. परिणामी हा किनारा तितकासा सुरक्षित नसतो. बऱ्याचदा जल वाहतूक त्यामुळे खंडित करावी लागते. महाराष्ट्रामध्ये उगम पावलेल्या गोदावरी व कृष्णा ह्या नद्या बंगालच्या उपसागरात येऊन मिळतात. यांच्या नावांनी आंध्रात दोन जिल्हे आहेत. विशाखापट्टम येथून अंदमानसाठी ठराविक दिवशीच जलवाहतूक आहे. अर्थात हवामानाच्या अनुकूल अंदाजानुसारच. साहजिकच पर्यटक सर्व साधारणपणे हवाई मार्ग प्रामुख्याने स्विकारताना दिसतात.

८) ओरिसा : ओरिसा राज्यातील सागराला भिडलेले जगन्नाथपुरी हे एक उत्तम व सोयीचे पर्यटनयुक्त ठिकाण आहे. जगन्नाथाचे

(म्हणजेच श्री कृष्णाचे) श्रद्धा स्थळ आहे. येथे कृष्ण / बलराम / रुक्मिणी यांच्या लाकडी मुर्ती मंदिरात आहेत. येथला बघण्यासारखा कार्यक्रम म्हणजे रथोत्सव हा असतो. देशभरातील भक्त त्यासाठी अवश्य येतात. पश्चिमेकडे उगम पावलेली मही नदी इथे सागराला येऊन मिळते. येथील बीच पर्यटकांचे मोठे आकर्षण ठरते. पुरीहून जवळच खाऱ्या पाण्याचे चिलका लेक पाहण्यासारखे आहे.

९) कोलकोता : भारतीय पूर्व जल सीमेवरील (अंशत:) शेवटचे ठिकाण. जल वाहतुकीचे येथील डायमंड हार्बर होय. येथून गंगासागर ह्या पवित्र बेटावर जाता येते. हिमालयातील गंगोत्री येथे उगम पावलेली गंगा अनेक राज्यांना संपन्न करीत अखेर बंगालच्या उपसागरास गंगासागर येथे मिळते. तिला गंगेचे मुख असे म्हणतात. मकर संक्रांतीस लाखोनी भक्तगण येथे येतात.

१०) अंदमान निकोबार बेटे : भारताच्या पूर्व सागरी किनाऱ्यापासून पोर्ट ब्लेअर किनाऱ्यापर्यंत सुमारे ७०० मैल विमानाने २ तास तर बोटीने ३ दिवस प्रवासास लागतात. भारताच्या नकाशात ही बेटे म्हणजे लहान बिन्दुसारखी दिसतात. त्यातील फारच थोडी स्थाने सर्वांना खुली केली आहेत. अंदमानला अन्दुमान असे ही म्हणतात. अत्यंत कठोर कारावास व काळे पाणी ही त्याची ओळख



होती. कैद्यांकडूनच तेथील महाकाय तुरुंग बांधून घेतला गेला. (Cellular Jail). स्वा. तात्यारावांना २४ वर्षांची कठोर शिक्षा झाली होती. आज अंदमान बेटे केंद्र शासित प्रदेश झाली आहेत. साहजिकच हा भाग उत्तम पर्यटन स्थळ बनला आहे. ५ दिवसांच्या वास्तव्यात अंदमान परिसर उत्तमरीत्या पाहता येतो.

११) लक्ष्यद्वीप बेटे : भारताच्या पश्चिम सागरी किनाऱ्यापासून सुमारे ५०० किमी दरम्यान एकूण ३६ छोटी छोटी बेटे असली तरी प्रत्यक्ष १०च बेटावर जाता येते. केंद्र शासित प्रदेशात ही बेटे येत असली तरी केरळ पर्यटनात त्याचा उल्लेख केला जातो. कोचीनहून जल मार्गाने विमानाने (Agtti) तेथे जाता येते. कवरत्ती ही बेटाची राजधानी आहे. ह्या बेटांची लोकांची लोकसंख्या सुमारे

जेमतेम अर्ध्या लाखाच्या घरात आहे. अत्यंत



सुंदर, देखणी, रमणीय व निसर्गाची उधळण असलेली ठराविकच बेटे पर्यटनाच्या कक्षेत आणली आहेत. बोटीच्या तळाशी लावलेल्या पारदर्शक काचेमुळे शिंपले, कोरल्स, अनेक रंगांचे मासे इत्यादीचे दर्शन पर्यटकांना घडते. त्याचप्रमाणे पाण्यात डुबकी मारुन (Diving) सागर खजिना अनुभवता येतो. ह्या बेटावरील माणसे बहुतांशी सुन्नी मुस्लीम धर्मीय असून मल्याळीशी साधर्म्य साधणारी आहेत.

पर्यटकांसाठी विशेष सूचना :

१) सागरी पर्यटन करतांना सोयीने उपलब्ध साधनांचा उपयोग करावा.

२) शक्यतेनुसार ३-४ मंडळींचा किमान ग्रुप असावा.

३) आपल्यासोबत कोरडे अन्न कपडे, पाण्याची सोय असावी. हवामान खात्याच्या व पोलिस यांच्या सूचना काटेकोर अवश्य पाळाव्यात.

४) सागरकिनारी भटकतांना कोणताही अतिउत्साह व दु:साहस टाळावेच.

५) प्रत्येकाने सागर किनारा व परिसर आरोग्यदायी व प्रदूषण मुक्त ठेवावा.

भारतीय जल सीमाबद्दल सर्वकष विचार व्हायलाच हवा.. १) कित्येकदा कारखान्यातील रासायनिक द्रव्ये, टाकाऊ द्रव्ये सागरकिनारी सोडल्याने जल प्रदूषणाने जल संपदा धोक्यात येते. त्यांचा नाश होतो. याचा विचार व्हायलाच हवा. २) कित्येक किनाऱ्यावर गैरघटना घडतात. अवैध दारुगोळा, अस्त्र आणली जातात. उदा. खेड जवळ स्फोटके उतरविली गेली होती. ३) जबरी सत्तेच्या हव्यासापोटी जहाजेच्या जहाजे उडविली जात आहेत. (उदा. चीन चे पूर्व भारतावर सागरी युद्धाचे चाललेले प्रयत्न) थोडक्यात भारतीय सुरक्षेचा विचार करतांना जल सीमा केव्हाही नजरेआड करुन चालणार नाही. सतत सतर्क राहायलाच हवे. असे वाटते.

मराठी प्रवास वर्णन लेखक वाचक मंच या संस्थेला व "विश्वभ्रमंती"
या दिवाळी अंकाला तसेच त्याच्या समस्त वाचकांना

# दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा








## श्री अक्षय अरोरा
कार्यकारी संचालक

# JET CHEMICALS PVT LTD.

**Manufacturers of**
**Pharma Intermediates, Saccharin,**
**Sodium Saccharin, API's**

: Factory & Regd. Office :
3/2, Mill Stone, Kalyan Murbad Road,
Village Varap, P. O. Box No. 05, Shahad - 421103
: Head Office :
34, Empire Building, 146, Dr. D. N. Road, Fort, Mumbai - 400 001.
Tel. : 2207 5307



# क्रोएशिया, उपवनांचा देश...



## जादूई दुनियेतला प्रवेश

सौ. प्रतिभा वासुदेव कारंजकर

पत्ता : प्रतिभा हाऊस, शंकर पार्वती गणेश मंदीर रोड, खडपाबांध, फोंडा, गोवा - ४०३४०१. मो.नं. : ८८३०९८८०६९

प्रवासाला जाणे म्हणजे त्याच त्याच नेहमीच्या दुनियेतून एका वेगळयाच जादूई दुनियेत प्रवेश करणे, आणि जर हा प्रवास दूरवरचा आगळया वेगळया देशातला असला तर तो जादूई दुनियेतला प्रवेश ठरतो. पर्यटनाच्या दृष्टीने परदेशी जायचे तर सगळयात प्रसिध्द आणि पहिल्या पसंतीचा पर्याय म्हणजे युरोप हे तर जगजाहीर आहेच. कारण युरोपमध्ये निसर्ग सौंदर्याच्या बरोबर किंवा त्याच्याही वरचढ आपल्याला इतिहासातील महत्वाची ठिकाणे जागोजागी पाहायला मिळतात. शाळा-कॉलेजमध्ये शिकलेल्या इतिहास, सायन्स आणि भुगोलाच्या पुस्तकातील चित्रात पाहिलेल्या



वास्तू जशाच्या तश्या स्वरुपात पाहायला मिळतात. पिसाचा मनोरा, लिओनार्डो-दि-विंची, टॉवर ब्रीज, मोठी मोठी पाती असलेल्या शंकूच्या आकाराच्या लाकडी पाणचक्या आणि पवनचक्या, आयफेल टॉवर, शेक्सपियर, गॅलिलिओ, न्यूटन, नेपोलियन यांची पुन्हा गाठ पडते. शाळेत असताना जे जे वाचले होते त्याची मनातल्या मनात पुन्हा उजळणी होते. लहानपणी हरवलेला मित्र पुन्हा भेटल्याचा आनंद होतो.

पण यावेळी आम्ही गेलो होतो त्या इस्ट आणि सेन्ट्रल युरोप या टूरमध्ये बहुतेक ठिकाणी आम्हाला दुसऱ्या महायुध्दाची सावली पडलेली जाणवली. सुरुवातीची दोन ठिकाणे वगळता पुढच्या प्रत्येक ठिकाणी तिथल्या स्थानिक गाईडने त्या इतिहासाची उजळणी केली. तेव्हाच्या बॉम्बहल्ल्याच्या खुणा दाखविल्या.

सगळे सोपस्कार पूर्ण करुन विमानात बसेपर्यंत पहाटेचं फटफटू लागलं होतं. झोपेचं खोबरं झालं होतं, पण ते सगळं अनिवार्यच होतं. चाकं पोटात घेऊन विमानाने आकाशात झेप घेतली तेव्हा नुकतच धुक्याच्या तलम मच्छरदाणीतून एखादी सुंदर युवती आळोखे पिळोखे देत जागी व्हावी तशी मुंबई जागी होऊ लागली होती. अंधुक दिसणारे दिवे विजून गेले होते. आता सगळीकडे खाली पाणी आणि आजूबाजूच्या ढगातून वाट काढत जाणारं विमान अशी परिस्थिती असल्याने डोळयात आतापर्यंत

साठवून ठेवलेल्या झोपेने ताबा मिळवला.

आम्ही झाग्रेब येथे पोहचलो तेव्हा तिथे दुपारचे अडीच वाजले होते. झाग्रेबचे विमानतळ खूप मोठ्ठ नसलं तरी स्वच्छ, सुबक, सुंदर होतं. आमचा सर्वांचा एक महिन्याचा युरोपचा शेगेंन व्हिसा होता, तो पोलंडच्या कॉन्सुलेटचा होता. आम्ही क्रोयेशियातून प्रवेश करुन वार्सामधून परतणार होतो. तिथल्या वेलकम टू क्रोएशियाच्या बोर्डाने स्वागत केले. क्रोएशियाच्या नावातल्या इंग्रजी ओ च्या जागी लाल कलरचे हृदय म्हणजे हार्ट शेप काढले होते. जे आम्हाला पुढे ठिकठिकाणी सुवेनिअर्समध्ये दिसले. या विमानतळाचं नाव होतं फ्रन्का लुका फ्रान्सोत्झम.

युरोपच्या या टूरला सगळयात जास्त चालावं लागतं याची कल्पना टूर गाईडने आधीच दिलेली होती. प्रत्येक शहरात सिटी टूर म्हणजे शहर दर्शन ज्यात पॅलेस व म्युझियम्स पाहणे; असलाच तर टेकडी वरचा कॅसल पाहणे, शहराच्या मध्यभागी असणारा, समारंभासाठी लोकांनी एकत्र यायचा सिटी स्क्वेअर पहाणे असे सर्व पायीच फिरावे लागते. भलामोठा कोच (बस) कुठे पार्किंगची जागा असेल तिथेच पार्क करावा लागतो. सिटीतल्या जुन्या अरुंद रस्त्यावरुन जायला मोठ्या गाड्यांना बंदी असते.

क्रोएशिया हा देश वेगळयाच नैसर्गिक गोष्टींसाठी प्रसिध्द आहे. या वेगळया गोष्टी



म्हणजे धबधबे, सरोवरे आणि गुंफा. निसर्गरम्य म्हणले तर युरोपमध्ये स्वित्झर्लंड सर्व जगात प्रसिध्द आहे. तसा हिरव्यागार दऱ्याखोऱ्यांचा निसर्ग इथे नाही परंतु मैलोन मैल हिरवी कुरणे आणि त्यातून वसलेली लालचुटूक रंगांची सुंदर घरांची सुबक खेडी मात्र दिसतात. या दोन देशात असे अनेक टूरिस्ट स्पॉट आहेत जे पाहिले की निसर्गाचा अलौकिक चमत्कार दिसावा. आतापर्यंत जास्त असे पर्यटक आलेले नसल्याने हा भाग म्हणजे अन टच, जास्त नॅचरल वाटतो.

झाग्रेब ही क्रोएशियाची राजधानी. क्रोएशियाची लोकसंख्या पंचेचाळीस लाख तर झाब्रेगची सात लाख आहे. इथं वापरलं जाणारं चलन म्हणजे कुना ते Kn असं

लिहितात.

भरपूर पाऊस होता. आता इथे उन्हाळा परतीच्या वाटेवर असल्याने रस्त्याच्या कडेची झाडे रंग बदलू लागलेली दिसत होती. काही झाडांची पानगळ सुरु झाली होती. ठिकठिकाणी लावलेल्या हेजलनटच्या व इतर झाडांमुळे शहराची शोभा अधिकच सुंदर दिसत होती. रविवार असल्याने सुट्टीचा दिवस होता त्यामुळे रस्त्यावर शुकशुकाट होता. रस्ते प्रशस्त व कडेला सायकलसाठी



राखीव लेन असलेले आहेत. बरेच जण सायकल वापरताना दिसतात. लॉजवर सामान ठेवून फ्रेश होऊन हॉटेल समोर असलेल्या बागेत फिरायला गेलो. पार्कमध्ये मुलांना घेऊन आलेले लोक दिसत होते. अगदी छोटी बाग असली तरी तिथे रंगबिरंगी फुले, झाडे, पुतळे, कारंजे लावून ते लोक ती सजवून आपल्यासमोर पेश करतात त्यामुळे ते पहाताना एक वेगळीच आल्हाददायक अनुभूती येते. कॉफी शॉप असो की बस स्टॉप जिथे तिथे फुलांनी सजवलेल्या कुंड्यानची आरास आपलं लक्ष वेधून घेते.

या शहराचे नाव झाग्रेब पडण्यामागे एक गोष्ट आहे. एके दिवशी जवळच्या युध्दातील, उन्हात तहानेने व्याकूळ झालेला मानडा नावाचा एक शूर गव्हर्नर तेथे आला व त्याने तिथल्या एका मुलीला पाण्याची मागणी केली. त्या मुलीने एका मोठया भांड्यातील पाणी मोठ्या लाकडी डावाने (चमच्याने) त्याला पाजले. तिच्या त्या क्रियेला झाग्राबिटी (क्षुधा तृप्ती?) असे नाव होते. नंतर तो योध्दा तिथला राजा झाला तेव्हा त्याने आठवण म्हणून त्या गावाचे नाव झाग्रेब असं ठेवलं.

या गावाची रचना दोन टप्प्यात होती. उंच व खाली असे दोन भाग दिसतात. उंच भागात चर्च, कॅथेड्रल, पॅलेस इत्यादी आहेत तर खालच्या भागात सर्वसामान्यांची घरे, बाजार आहे.

दुसऱ्या दिवशी साईट सीइंगला सुरुवात झाली. अगोदर एका बिल्डींगमध्ये म्युझियम बघायला गेलो जे नेत्रभ्रम (इल्युजन) संबंधित होतं. तशा काही गोष्टी बनवल्या होत्या. त्यात मोठ्ठे शोभादर्शकयंत्र, एकाच वेळी दिसणाऱ्या खूप इमेजेस, चित्रातून चित्र शोधणं, कोडयांचे लाकडी ठोकळे,

मुलांसाठी बुध्दीला चालना देणारे खाद्य पुरवणाऱ्या गेम्स होत्या. सकाळीच पावसाने वेलकम केले, सतत हवा ढगाळ होती. हवेत गारवा होता. दिवसभर पायीच भटकणं होतं. शहराच्या अप्पर म्हणजे वरच्या भागाकडे सेंट मेरीचे चर्च आहे, ज्याचे छप्पर हे रंगबिरंगी



टाईल्स वापरुन बनवले आहे त्यात त्यांच्या झेंड्यावर असलेले चित्र दिसते. तसेच बराक पध्दतीत बांधलेले सेंट कॅथरीन व सेंट स्टीफनचे चर्च आहे. त्यातल्या खिडक्यांवर सुंदर पेंटिंग्ज आहेत जी उजेडात खूपच उठून दिसतात. सेंट स्टीफनचं कॅथेड्रल हे ओल्ड गोव्याच्या चर्च सारखे आहे. म्हणजे आत त्या सेंटची काचेच्या पेटीत बॉडी ठेवली आहे. या वरच्या लेव्हलवरच पार्लमेंट हाऊस ही पहायला मिळाले. तसच पुढे चालत गेल्यावर एका वळणावर बांधलेल्या डोम खाली मदर मेरीची मूर्ती असलेलं ठिकाण लागलं, जिथे बरेच लोक मेणबत्त्या लावत होते. ते ठिकाण रस्त्यावरच होते कारण ती गावाच्या सीमेवरची रक्षण करणारी देवी असं त्यांचा समज आहे व ती नवसाला पावणारी देवी मानली जाते. लोक तिथे नवस बोलतात व तो पूर्ण झाल्यावर आपल्या नावाची टाईल बनवून तिथे लावतात. तिथून खालच्या लेव्हलच्या भागाकडे चालत निघालो पायऱ्या उतरुन खाली आल्यावर एका ठिकाणी फोटो स्पॉट होता जिथून सगळ्या शहराचं विहंगम दृश्य पहायला मिळत होते. ब्राऊन, केशरी रंगांची उतरत्या छपरांची घरं सुबकपणे मांडून ठेवल्यासारखी दिसत होती, कुठेही कचरा नाही, पाणी तुंबलेले नाही. दगड एका ठराविक आकारात, अर्ध वर्तुळात बसवून तयार केलेले रस्ते, चालायला अगदी सोयीस्कर वाटत होते. दगडाची फरसबंदी करताना त्यांच्या नैसर्गिक रंगांच्या छटांचा वापर करुन डिझाईन बनवलेले. यातून त्यांची कलात्मकता दिसून येत होती.

यानंतर भेट द्यायचा पॉइंट होता चक्क कब्रस्तान. हा शब्द ऐकताच तिथे आणि काय पहायला मिळणार? नुसती थडगी तर असतील असं प्रत्येकालाच वाटलं पण प्रत्यक्षात मात्र ती जागा पहाण्यासारखीच आहे हे पटले. युरोप मधली सर्वांत सुंदर अशी ही सिमिटरी आहे असे कळले. एका माणसाने आपली खूप मोठी जमीन ही सिमिटरी बनवण्यासाठी देऊ केली त्याचे नाव होते

हरमन मिरोगॉज म्हणून त्याचे नाव या सिमीटरीला दिलेय. सिटी सेन्टर पासून जरा दूर एका टेकडीवर हे कब्रस्तान (सिमिट्री) वसवली आहे. प्रवेशदाराच्या दोन्ही बाजूस प्रचंड उंच आणि लांब अशी लाल दगडांची भिंत आहे आणि या भिंतीत थोडया थोडया अंतरावर बुरुजा सारखे बांधकाम आहे. प्रवेशद्वारावर तसेच सर्व बुरुजांवर हिरव्या



रंगाचे घुमट आहेत. एखादा भुईकोट किल्ला असावा असे ते बाहेरुन दिसत होते. आत गेल्यावर समांतर असलेले बरेच उभे आणि त्यांना छेदणारे आडवे रस्ते दिसतात. या सर्व रस्त्यांच्या दुतर्फा एखाद्या उपवनात असावेत असे दाट सावली केलेले वृक्ष आहेत आणि विविध प्रकारची फुलझाडेही आहेत. रस्त्यांच्या दोन्ही बाजूस कलात्मक रित्या केलेली, पुतळे, मुखवटे कोरलेली वेगवेगळया रंगाची ग्रॉनाईटची थडगी आहेत. बरीचशी दोन दोन मीटर लांब रुंद अशी आहेत. इथला सर्व परिसर अतिशय नयनरम्य आहे. मृत्यू नंतर आत्म्यालाच नव्हे तर शरीरालाही स्वर्गसुख मिळावे ही इच्छा बरोबर का चूक ते कळत नाही, परंतु असाही एक दृष्टीकोण असतो याचे ज्ञान झाले.

सिमिटरीजपण एव्हढ्या छान सजवल्या जातात याची इथे प्रचीती येते. कलाकृती करायची तर ती थडग्यावरही करता येते. आपल्या प्रियजनाचे हे चिरस्थायी विश्रांती स्थान, मग प्रेमापोटी त्याचे मंदिरही करता येते. जगातील सर्वांत सुंदर वास्तू ताजमहाल हे पण शेवटी थडगेच आहे. इथे एकाच ठिकाणी तशी हजारोंच्या संख्येने थडगी म्हणजे कलाकृती आहेत. अतिशय श्रीमंत लोकांनाच अशी ऐश्वर्यसंपन्न थडगी परवडतील. इथल्या प्रत्येक थडग्यावर त्या त्या व्यक्तीची जन्मतारीख, नाव व मृत्यूची तारीख कोरलेली होती. काही संपूर्ण कुटुंबातील व्यक्तींचे एकत्र, म्हणजे संपूर्ण घराण्याचे एक अशीही थडगी होती. यांचे आकारही खोली सारखे मोठे होते. दरवाज्याऐवजी चारही बाजूस कड्या असलेली ऐसपैस संगमवरी अथवा रंगीत ग्रॅनाईटची गुळगुळीत झाकणे सरकवून त्या घराण्यातील नूतन प्रेताला आत गृहप्रवेश.

(कबर प्रवेश!) देत असावेत. अशी ही थडगी आहेत. अशांना खरेतर थडगे म्हणावेसे वाटत नाही. सुंदर मार्बलचे पूर्णाकृती पुतळे असलेली, लता-वेली आणि फुले यांचा साज चढविलेली, नानाविध पारमार्थिक सुवचने कोरलेली, विविध आकाराची आणि रंगांची ही जणू परग्रहावरील प्राण्यांची वसतीस्थाने होती. त्यातील काही थडग्यावर वेगवेगळया



भावमुद्रेतील पुतळे उभारलेले होते. मृत पावलेली तरुण मुलगी असेल तर तिचे आकाशात झेप घेणाऱ्या मार्बलच्या परी त रुपांतर झालेले होते. एका ठिकाणी इजिप्त मधला पिरॅमिड होता, मेलेला इजिप्टालॉजिस्ट असावा. बऱ्याच ठिकाणी दिव्यांच्या किंवा मेणबत्ती स्टॅन्डच्या सुंदर डिझाईन्स होत्या. काही ठिकाणी येशू ख्रिस्ताच्या मूर्ती किंवा त्याच्या जीवनावरच्या प्रसंगाची प्रतिकृती बनवलेली होती तर कुठे मदर मेरी उभी होती. खरी फुले लवकर खराब होतील म्हणून प्लास्टिकची फुले लावून सजवले होते. प्रत्येकात काही तरी वेगळेपण होते. दोन थडग्यामध्ये पुरेसे अंतर होते. एका ओळीत मांडून ठेवल्यासारखी सगळी थडगी दिसत होती. त्याच्या समोर झाडांची रांग, रंगीबेरंगी फुलझाडांची रेलचेल, दोन्ही बाजूंनी झाडांच्या ओळीतून चालायचा रस्ता व अशा अनेक ओळी. दूरवर रस्त्याच्या मधोमध एक उंच लाकडी क्रॉस व त्यावर येशूचा गोल्डन पुतळा लक्ष वेधून घेत होता. थोडा वेळ आपण कब्रस्तानात आहोत हे विसरायला लावणारी ती एक मनमोहक अशी जागा होती.

क्रोयेशियातलं आमचं पुढचं डेस्टिनेशन होतं प्लीटविक नॅशनल पार्क. झाग्रेब हून तीन तासांचा प्रवास करुन कारलोवक या गावी पोहचलो. आम्ही निघालो होतो. प्लीटव्हिक या ठिकाणी असलेली सरोवरे व निर्माण झालेले असंख्य धबधबे. त्यामुळे या भागाची ओळख सरोवरांचा आणि धबधब्यांचा प्रदेश अशीच पडली. सुंदर स्वच्छ आरस्पानी जलाशयात उतरणारे धबधबे एकाच ठिकाणी इतक्या मोठ्या संखेने आणखी कुठेच दिसत नसतील. हे एकमेवाद्वितीय असे उदाहरण आहे म्हणूनच त्याला जागतिक वारसा

स्थळाचा दर्जा प्राप्त झालाय, पण ते पहाण्यासाठी तुमची भरपूर चालायची मात्र तयारी पाहिजे. कारण तो परिसर खूप मोठा आहे.

एकोणिसशे एकोणऐंशी मध्ये या पार्कला युनेस्कोने वर्ल्ड नॅचरल हेरीटेज साईट म्हणून घोषित केलं. तिथे जाण्यासाठी स्पेशल बसेस आहेत. त्याला दोन डबे मागे जोडलेले असतात. अशा बसमधून थोड्या अंतरापर्यंत म्हणजे मुख्य तळ्यापर्यंत जावे लागते. मग मात्र पुढचा मार्ग चालतच आक्रमायला लागतो. हा एकूण अठरा



किमीचा वॉकिंग ट्रेक आहे. चालण्यासाठी खास लाकडी पट्टया पट्टयांचा वॉक वे बनवला आहे. पर्यटकांना सगळया धबधब्यांचे योग्य दिशेने दर्शन व्हावे त्यासाठी असा खास रस्ता बनवला आहे. तिथे एकूण दोनशेच्या वर धबधबे आहेत. शिवाय बारीकसारीक किती तरी अगणित असतील. या लाकडी फळयांच्या रस्त्यावरुन चालताना शक्यतो स्पोर्टशू चा वापर केलेला चांगला असे आम्हाला आधीच सांगितले होते. चप्पल अडकायची शक्यता असते. म्हणून सर्व लेडीज ना शूज घालायची सुचना दिली गेली होती. या ठिकाणी बर्च, फर या वृक्षांची घनदाट जंगले आहेत. खूप प्रकारच्या ऑर्किड्स बघायला मिळतात. तपकिरी रंगाच्या अस्वलांचे इथे वास्तव्य आहे. इथली सरोवरे किंवा तळे ही त्यांच्या रचनेसाठी प्रसिध्द आहेत. पाण्यातील चुनखडीशी ऑक्सिजनचा संयोग होतो व त्यात गाळ साळ जीवजंतू यांची भर पडते व खडक तैय्यार होतात व ते जलाशयात वेगवेगळे आकार घेऊन उभे रहातात त्यामुळे पाण्याला वेगळी दिशा मिळत जाते ते वाट मिळेल तिकडून प्रकट होऊ लागतात व त्यातूनच असे धबधबे अविरत तयार होत असतात.

तळयाच्या कडेकडेने आमची वॉकिंग टूर सुरु झाली. तळयातलं पाणी इतकं स्वच्छ की तळाचा भाग स्वच्छ दिसत होता. हिरवागार, अनाग्रह निसर्ग दिसत होता. विशेष म्हणजे हवा थंडगार आणि कोरडी होती. कितीही चालले तरी घाम येणार नव्हता. त्या हवेत सर्वांनाच अतिशय उल्हासित, प्रसन्न वाटत होते. आमच्या

ग्रुपमधल्या सर्वांत वयस्क, पंच्याहत्तरी उलटलेल्या बायका आणि पुरुषही तुरु तुरु धावू लागले. चाल सुरु करतानाच हातात एक मॅप दिला होता. त्यावर या जागेचा टोपव्हयू म्हणजे वरुन कसे दिसतात ते दाखवले होते. तर मोठ्ठे चित्र तुम्ही जाणार त्या वाटेचा नकाशा होता. आपण कुठे आहोत हे कळायला. बरोबर मार्गदर्शक गाईड ही होती. ती मात्र भराभरा चालत होती तिचा तो रोजचाच सरावाचा रस्ता होता.

जाता जाता आजूबाजूचा निसर्ग पाहत आम्ही चढ उताराच्या आणि वळणा-वळणाच्या लाकडी ट्रॅकवरुन चालत होतो. पायवाट संपूर्णपणे लाकडाच्या ओंडक्यांपासून बनवलेली होती. दोन गोलाकार ओंडक्यात थोडीशी फट असे. पण काही ठिकाणी तो लाकडी फळ्या एकापुढे एक जोडून तैयार केलेला होता. हा ट्रॅकमधूनच एखाद्या डबक्यावरुन, ओढ्यावरुन जात होता. तेव्हा खालचे पाणी अतिशय नितळ दिसत होते, अगदी खालचा तळ स्वच्छपणे दिसत होता. त्यातून सुळकन जाणारे मासे दिसतात, मधेच एखादे बदक जवळ येऊ पहातं. तेव्हा त्याचं जवळून दर्शन घेता येतं त्याला फोटोत कैद करता येतं. तळ्यात उतरणारे असंख्य धबधबे दिसतात. काही लहान काही मोठे, काही उंच काही बुटके. शाळा सुटल्यावर लहान मुले, मोठी मुले जशी धावत क्लासरुममधून पटांगणात उड्या मारत येतात तशा असंख्य धबधब्यांच्या धारा तळयातल्या पाण्यात उतरताना दिसतात. आज आमच्यावर पावसाने मेहेरबानी केली होती आणि त्यामुळे उन्हात फिरायला मिळाल्याने त्या दृश्यांचा चांगल्या प्रकारे आस्वाद घेता आला. फोटोही उजेडामुळे सुंदर आले. मधेच एखादा चुकार ढग अंधार करुन जायचा. हवा त्यामुळे तात्पुरती कुंद व्हायची. चालणं संपत नव्हत. हे वळण झालं की पुढचं. प्रत्येक वळणावर एक वेगळाच नजारा समोर यायचा. प्रत्येक वळणावर वेगळे धबधबे, वेगळे डोह, पहिल्या पेक्षा पुढचा सरस. काही अल्लड तरुणी सारखे सडपातळ, चंचल तर काही आडदांड, आवाज करणारे. काही लाजून कपारी मागून हळूच डोकावून पाहणारे, तर काही अचानक पुढे उभे ठाकणारे आणि घाबरवून टाकणारे. कुठे एखाद्या थोराड आजोबा बरोबर चाललेली त्याची लहान मोठी नातवंडे भासत होती. कुठे त्यांच्या धारांवर उन्हे पडत असली तर तुषारांतून इंद्रधनुष्य उमलायचे तर कुठे पाण्याचा सारा प्रपातच तेजोमय सूर्य व्हायचा. अगणित धबधबे. काही ठिकाणी

एकांडे तर काही ठिकाणी एकाच कड्यावरुन सात-आठ धबधबे. एखाद्या भव्य झारीतून पाणी ओतलं जाव तसं. खालच्या पाण्याच्या डोहातही कितीतरी वैविध्य. उन्हं अवतरली की शुभ्र पाण्याचा रंग रुपेरी होऊन चमकायचा. एखाद्या जवळच्या धबधब्याचे तुषार अंगावर फवारा उडवत यायचे. वाऱ्यावर स्वार होत अंगावर यायचे. इतके धबधबे की मोजायचं ठरवलं तरी मोजता येणं कठीण होतं. धबधब्याचं तळं म्हणता येईल असे डोहही मध्येच यायचे. मनात आले आपले बालकवी इकडे आले असते तर त्यांना इथल्या धबधब्या



इतक्या अगणित, तऱ्हेतऱ्हेच्या कविता सुचल्या असत्या. एखादा धबधबा फेसाळत लाकडी पट्ट्यांच्या त्या वाटे खालून चहुबाजूने शुभ्र धवल फेस पसरत, फेसाळत जाताना दिसायचा. जणू चंदेरी पूर वाहतोय. तर एखादा मध्येच वाटेतल्या वृक्षांच्या वर आलेल्या मुळांखालून खुदुखुदु हसत, लपून छपून पळायचा. तळयाच्या पाण्याचेही रंग विविध छटांचे कुठे गर्द हिरवा आतल्या प्रवाळामुळे दिसायचा तर कुठे आकाशाचा प्रतिबिंबित झालेला निळसर अस्मानी. सभोवताली अनेक प्रकारची झाडं झुडपं, वेली, उंच माजलेले गवत व त्यातून नाचणारी बागडणारी फुलपाखरे, शांततेला छेद देणारी एखाद्या पक्ष्याची शीळ आणि झुळझुळणाऱ्या पाण्याचा नाजूक कोमल नाद हे सगळं अवलोकन करताना डोळे आणि कान थकत नव्हते. आयुष्यात पुन्हा इथे यायचा योग येईल न येईल. डोळेभरुन बघून घ्यावं. इथे आलेला प्रत्येक जण निसर्गाचा एक भागच होऊन जातो त्याच्याशी तादात्म्य पावतो. एरवी लक्ष वेधणारी व्यवधाने इथे बंद होतात. मोबाईलला रेंज मिळत नाही. तुमची वेव्हलेन्थ निसर्गाशी जुळून एकरुप होते.

तळयाच्या कडेकडेने पाणवनस्पती, प्रवाळ, रानफुलांची रंगीत नक्षी दिसे, स्वच्छ पाण्यात आकाशाचे रंग उतरत होते. एखाद्या मोठ्या धबधब्याच्या सोबत फोटो काढून घेणाऱ्यांची लाईन लागलेली दिसे. काही डोंगराच्या कड्यातून झारीतून पाणी उडावे तसे धबधबे उडताना दिसत होते. आयुष्यात पहिल्यांदाच इतके निसर्ग सुंदर पाण्याचे विविध रुपातले नजारे बघायला मिळाले की

मन तृप्त झालं. निसर्गाने भरभरुन दान दिलेलं स्वच्छ, सुंदर, निर्मल पाणी जिथे तिथे ओसंडून वहात होतं. आसमंतात फक्त पाण्याचा नाद ऐकू येत होता. इतकी निरव शांतता होती. तसं तर सगळीकडेच पाणी तळी, सरोवरे, धबधबे आणि हिरवीगार दाट जंगले दिसतात पण प्लीटविक हे मात्र त्या सगळयांपेक्षा वेगळंच आहे युनिक आहे. हा भूभाग पायऱ्या पायऱ्यांनी खाली उतरत होता आणि त्यावरुन वाहणारी नदीही प्रत्येक पायरीवर धबधबे आणि सरोवरे निर्माण करीत खाली उतरत होती. प्रत्येक पायरीवरचे वेगळे दृश्य. हे अनुभवायला इथे केलेल्या या लाकडी ट्रॅकची योजनाही अफलातून.



सामान्य माणसालाही हे स्वर्गसुख अनुभवण्यासाठी केलेली सोय खूपच नावाजण्यासारखी आहे. आम्ही हे इथल्या उन्हाळयातले दृश्य पाहत होतो. पण थंडीत मात्र त्याचं वाहत्या जागी बर्फ होते असे कळाले. सगळया धारांचं समर्पण ज्या तळयांत होताना दिसत होतं ती तळीही गोठून जातात. खेळणाऱ्या, बागडणाऱ्या मुलाला स्टॅच्यू! असे म्हणावे आणि त्याने आहे त्या पोझमध्ये पुतळा व्हावे तसे सर्व होत असेल. हा सगळयात लोकप्रिय टुरिस्ट स्पॉट असल्याने वेगवेगळया देशातून आलेले हजारो टुरिस्ट वाटेवर भेटत होते. परंतु अठरा किलोमीटर लांब असा आमचा ट्रक असल्याने जराही गर्दी नव्हती. अठरा किमी हा एक ट्रॅक झाला. दोन-तीन किमी लांबी पासून चाळीस-पन्नास किमी लांबीचे सुध्दा ट्रॅक होते. या पार्कच्या प्रवेशद्वारावर मिळणाऱ्या नकाशातून ते विविध रंगानी दाखविलेले होते.

आमचा ट्रॅकने आठ, नऊ किमी चालून झाल्यावर एका ठिकाणी पलीकडच्या काठावर जाण्यासाठी बोटीची सफर होती. त्यात बसल्यावर जरा पायाला विश्रांती मिळाली. पण पैलतीराहून पुन्हा आमची पायपीट सुरु झाली तो रस्ता संपेपर्यंत आणि बसचे दर्शनहोईपर्यंत चालत जाणं भाग होतं. शरीराने जरी आम्ही सगळे थकलेले होतो तरी एक असीम सौंदर्याने नटलेले एक नैसर्गिक ठिकाण आयुष्यात पहायला मिळाल्याच्या समाधानाने आम्ही सगळे तृप्त होतो.

# दीपावली शुभचिंतन

## तरुण गुप्ता

(एम. बी. ए.)

**संचालक**

# स्वाती

## पेट्रो प्रॉडक्टस् प्रा. लि.

**Manufacturers of**
**ENGINE BRAND SACCHARIN,**
**P.T.S. AMIDE, P.T.S. CHLORIDE**
**& FINE CHEMICALS**

प्लॉट नं. बी-१८, केमिकल झोन, एम. आय. डी. सी., जूना भेंडीपाडा,
अंबरनाथ (पश्चिम) ४२१५०१. जि. ठाणे, महाराष्ट्र
दुरध्वनी : २६८२५८१ / २६८४२८५
फॅक्स : ०२५१-२६८४२८५
Email : tarun@swatipetro.com / tarun_g25@rediffmail.com



# हिमालयाचा मी तो यात्रिक...



## सौंदर्यस्थळ

अनंत गजानन गद्रे
सी/२०४, चांदीवाला कॉम्प्लेक्स, नुरीबाबा रोड,
चंदनवाडी, ठाणे (प.)-४००६०१. मो.नं.९८३३६४२४४४

देवा घरचे ज्ञात कुणाला हे नाट्यगीत कानावर पडले की मला नजरेसमोर येते ते काश्मीर व तीन वर्षांपूर्वी मी केलेली लेक्स ऑफ काश्मीर ही एक नितांत सौंदर्याने नटलेल्या काश्मीर खोऱ्यातली ती भटकंती. परंतु त्या भटकंती ट्रेकचा अनुभव सांगण्याआधी थोडे त्या नाट्यगीताबद्दल.

कोणी युरोप ट्रीप, स्वित्झर्लंडच्या टुर करुन आले की आपण त्यांनी तिकडे काढलेले फोटो पाहतो. तिथली ती बर्फाच्छादीत पर्वतराजी, सफेद फेसाळ खळाळत्या नद्या, तिथले छोटेमोठे तलाव, त्यातलं ते निळेशार पाणी, डोंगर उतारावरची हिरवी कुरणे, त्यातून दुर जाणाऱ्या पायवाटा, छोटी-छोटी घरं. हे सगळे फोटो पहात असताना मन अगदी हरखून जाते. आयुष्यात एकदा तरी आपण ते स्वर्गीय सौंदर्य पहावे अशी इच्छा प्रत्येकाने मनात ठेवलेली असते.

काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तरांचल, सिक्कीम, दार्जिलिंगमधल्या हिमालयातील पर्वतराजीमधे आपण जेव्हा भटकंती करतो, तेंव्हा आपल्याला पदोपदी जाणवत रहाते की तसाच निसर्ग इथेही सौंदर्याने भरभरुन आहे. परंतु मग काश्मीर अन स्वित्झर्लंडमधील या सौंदर्यस्थळांमधे फरक तो काय? एक जागतिक पर्यटनात अव्वल नंबर वरती आहे. सौंदर्य जपून सर्व सुखसोयींनी युक्त असे



पर्यटनस्थळ. तर आपल्या काश्मीरमधील ती निसर्गसौंदर्यस्थळे आहेत. दहशतवादाच्या छायेत आता जिथे जिवाचीच सुरक्षितता धोक्यात आहे, तिथे इतर सुखसोयींची कशी आपण अपेक्षा ठेवणार. पण हे अस आहे, अन हे कटू सत्य आहे. आणि म्हणून मनात येते ते हे की माणसाचे नियम या सौंदर्य स्थळाला पण लागू होतात? त्या नाट्यपदात म्हटल्याप्रमाणे-

देवा घरचे ज्ञात कुणाला, विचित्र नेमानेम
कुणी रखडती धुळीत आणिक कुणास लाभे
हेम, विचित्र नेमानेम!

त्या नाट्यपदात म्हटलंय तसे आपल्या काश्मीरचं सौंदर्य देखील काही दशके धुळीत रखडलय तर आल्पसला मात्र सुवर्णपदक लाभलं आहे. तसेच निसर्गसौंदर्य, पण भाळीचं नशिब मात्र दोहोंचे

वेगवेगळे. असो परंतू या नाट्यपदातील एक ओळ मात्र सुखावह आहे. ती म्हणजे हिमालयाचा मी तो यात्रिक व ती ओळ पटणारी ही आहे. कारण हिमालयाचे आकर्षणच असे आहे की तुम्ही एकदा जाऊन आलात की परत परत तिथे जाता व हिमालयाचे यात्रिक होता.

तर आता अशाच माझ्या काश्मिरमधील हिमालयातल्या तलावांच्या परिसरातील एका सफरी बद्दल.

सोनमर्ग ते नरनाग ह्या पायवाटेमार्गे



तलावांच्या काठाने जाणारी ग्रेट लेक्स ऑफ काश्मीर ही ट्रेक ट्रेक दी हिमालयास या कंपनीने आयोजित केली होती. ती सात दिवसाची व तेराहजार फुट उंची गाठणारी होती. अगदी सोप्पी नसली तरी मध्यमस्वरुपाची कठीण होती. यात शिखर चढाई नव्हती. हिमालयातल्या दऱ्या खोऱ्यातली पायी भटकंती, तलावाकाठी मुक्काम असे त्याचे स्वरुप होते. ट्रेक कंपनीने आयोजित केलेली असल्याने त्याचे नियोजन काटेकोरपणे केलेले होते. श्रीनगरला ट्रेक गृपमधल्या सगळयांनी एकत्र जमा व्हायचे होते.

मुंबईहून मी व माझा मित्र डॉ. नितीन जोशी, आम्ही आदल्या दिवशी दुपारी श्रीनगरला पोहोचलो. दुर्नानाग परिसरात आमचं हॉटेल होतं. समोरच अनेक शाकाहारी जेवणाची धाबा टाईप उपहारगृहे होती. जेवण केले, दाल सरोवर चालत जायच्या अंतरावर होते, तिथून रमतगमत एक फेरफटका मारुन आलो. ट्रेकहुन परतल्यावर बोटीतून फेरी मारायची ठरवली. दुसऱ्या दिवशी जेवून निघायचं होत. सकाळी लवकर उठून शंकराचार्य मंदिराला भेट देऊन आलो. दर्शन घेतले. नाश्ता कम जेवण केले.

आजही आम्ही कालच्याच धाब्यावर गेलो होतो. तिथले जेवण अप्रतीम होते. त्यापैकी आलू जीरा, स्टफ करेला, कढी तर फारच चविष्ट शिवाय इथल्या एका वेटरच्या खास स्टाईलने आम्ही आकर्षित झालो होतो. काय काय पदार्थ आहेत हे विचारल्यावर अश्या काही थाटात तो ते सांगायचा की बस

ऐकत रहावे. अन मग ऑर्डर केलेली डिश टेबलवर ठेवतांना लो ज्जी, सर अस तो एका ठराविक लकबीमधे म्हणे. गोड वाटायचं ते कानाला, म्हणतात ना, खिलाओ तो श्टाईलसे.



बारा वाजता कंपनीची जीप आली, आम्हाला न्यायला. एकेकाला सोबत घेत आम्ही श्रीनगर लेह महामार्गावरुन निघालो. सोनमर्ग शहराच्या आधी एका मोठ्या ओहोळाच्या काठी आम्हाला सोडलं. हा ओहोळ म्हणजे सिंद नदीची लहानशी उपनदी होती. ही सिंद नदी म्हणजे लडाखमधली सिंधू किंवा इंग्रजीत जी इंडस म्हणतात ती नाही. ही सिंद अमरनाथ जवळच्या पंचतरणी परिसरात उगम पावते व पुढे ती झेलमला जाऊन मिळते. मुख्य रस्ता सोडून बाजूच्या कच्च्या रस्त्याला लागलो अन आमची मोबाईल रेंज गेली. तिथे जी गेली ती गेलीच. तेंव्हा कल्पना नव्हती की आता पुढचे सात दिवस मोबाईलचा उपयोग टॉर्च व्यतिरिक्त इतर कशासाठीही होणार नव्हता.

फार नयनरम्य होते ते ठिकाण. डोंगरातून वहात येणारे पांढरेशुभ्र पाणी, मागे एका पाठोपाठ एक दिसणाऱ्या पर्वत रांगा, वरती निळे निळे आकाश. थोड्याच वेळात अजुन एक ग्रुप आम्हांला येऊन मिळाला. मग आम्ही सर्व एक टेकाड चढून वर आलो. इथे आजचा आमचा कॅम्प होता. टेन्ट उभारणे सुरु होते. मग त्यांचे वाटप करण्यात आले. आमचा तंबू क्रमांक चार होता. त्यात सॅक टाकल्या. आज जेवायला सुप व गरमगरम खिचडी होती. जेवण झाल्यावर आमच्या ग्रुप लिडरने सगळ्यांना गोल उभे केले. उद्याच्या सुचना द्यायला.

आपल्याला सकाळी सहा वाजता निघायचे आहे. पाच वाजता सगळयांना उठवण्यात येईल. पावणेसहा वाजता तुमची सॅक पॅक करुन टेंट बाहेर ठेवायची आहे. त्यानंतर प्रत्येकाने टेंट उतरवायला पोर्टरना मदत करायची. तो ? कसा काढायचा ते उद्या दाखवण्यात येईल. ट्रेकमधे कुठेही

कचरा करायचा नाही, टाकायचा नाही. रोज कॅम्पमधल्या जेवणाच्या टेंट मागे डस्टबीन ठेवलेले असतील त्यातच तो जमा करायचा, अशा सुचना मिळाल्या.

दुसऱ्या दिवशी बरोबर पाच वाजता आम्हांला उठवले गेले. रात्री तापमान दहा डिग्री खाली उतरले होते. पुढे ते अजुनच कमी होत जाणार होते. त्यामुळे आता यापुढे सात दिवस अंघोळीची गोळी घ्यायची होती. सॅक बांधून बाहेर ठेवली. एक-एक करुन सगळे बाहेर जमा झाले. कालच्या सारखेच लिडरने सगळ्यांना गोल उभे केले. स्ट्रेचिंग करुन घेतले आमच्याकडून. दोन-तीन महत्त्वाच्या सुचना दिल्या की, सगळ्यांनी एका लाईनीतूनच चालायचं. गृप करुन गप्पा



मारत चालायचं नाही. तशी या भागात दहशतवादी कारवाईची भिती नव्हती. कारण इथे पर्यटकांची वर्दळ नव्हती, वस्ती नव्हती, दुकाने, बाजार नव्हते. तरीही सावध राहणे गरजेचे होते. म्हणून एकट्याने इकडे तिकडे भटकायचं नाही वगैरे.

पहिल्या दिवशी दुपारपर्यंत आमचा मार्ग सिल्व्हर बर्चट्रीच्या जंगलातून जाणारा होता. बर्चट्री म्हणजे भोजपत्र किंवा भुर्जपत्र. या झाडांच्या सालींचा उपयोग पूर्वी कागदासारखा केला जायचा. अगदी गुळगुळीत असते ती. फार छान वाटते त्यावर लिहायला. मी गोमुखला गेलो होतो तेव्हा एका ढाबेवाल्याच्या मुलाने मला त्या सालींची वहीच शिवून दिली होती. आजही ती माझ्याकडे आहे. या झाडाचा पाला मेंढ्या फार आवडीने खातात. हिमालयातल्या या भागात दरवर्षी बकरेले म्हणजे मेंढपाळ त्यांच्या मेंढ्यांना चरायला आणतात. कारण ह्या खोऱ्यांमध्ये गवताची खुप मोठी मोठी कुरणे आहेत. पाऊस व नंतर बर्फवृष्टी सुरु झाली की हे सगळे मेंढपाळ खाली पठारावर येतात. तोवर मेंढ्यांवर भरपूर लोकर आलेली असते. मग परत पुढच्या वर्षी बर्फ वितळायला सुरुवात झाली, गवत उगवू लागले की ते परत या डोंगरात येतात. हे असे

त्यांचे चक्र सुरु असते.

भोजपत्राच्या झाडांच्या सावलीतून आमची वाटचाल सुरु होती. चढ हलका होता. झाडांच्या सान्निध्यातले आता हे शेवटचे चालणे होते. कारण आता यापुढे या परिसरातील ट्री लाईन संपते. थंड हवामान, सहा सात महिने असलेला बर्फ यामुळे इथे झाडे वाढू शकत नाहीत. आता फक्त कुरणे दिसणार होती. डोंगर उतारावरची ती कुरणे, त्यात अधून मधून दिसणारी पिवळी, लाल, निळी रंगीत फुलं डोळयाची पारणे फिटवणारी होती. मला ते पाहतांना बद्रिनाथच्या वाटेवरची पुष्पघाटी, कासचे पठार आठवु लागले.

आमच्या या ट्रेकमधे किसनसर, विष्णूसर, गडसर, सासर, नंदकोल व गंगाबल असे तलाव आम्हाला दिसणार होते. सर म्हणजे सरोवर वा तलाव. दुसऱ्या दिवशीचा आमचा मुक्काम होता किसनसर व विष्णूसर या तलावांजवळ. दुपारी तीनच्या सुमारास आम्ही तिथे पोहोचलो. तलावातून वहात येणाऱ्या नदी काठच्या विस्तीर्ण कुरणामधेच आमचा कॅम्प होता. थोडे लांबवर घोडे चरायला सोडले होते. सगळे दृष्य जणू एखादी फोटोफ्रेम भासत होती. इथे एक गंमत सांगाविशी वाटते. हा कॅम्प आम्हाला खुप दूरवरुन नजरेस पडला होता. तो दिसला तेंव्हा वाटलं की चला पोहोचलो आता. परंतु त्या नंतरही आम्ही जवळपास तासभर चालत होतो. इथले डोळ्याला दिसणारे अंतर चांगलेच फसवे असते. असं वाटतं की ठिकाण जवळ आहे, पण ते व्यवस्थीत दूर असते.

तंबूत सॅक टाकल्या, दमायला झाल होत. आमच्या बरोबरचे टेंटवाले, किचन आणि इतर सामान वाहाणारे पिठ्ठू यांचे कौतुक वाटे. ते सकाळी आम्ही निघालो की



आमच्या नंतर ते निघत, अन् मुक्कामाच्या ठिकाणी आमच्या आधी पोहोचलेले असत. नुसतेच पोहोचलेले नाही तर टेंट लावून तयार असत ते आमच्या स्वागताला. एका मोठ्या जगमधे सरबत व परातीत पकोडे किंवा चहा व बिस्कीटं घेऊन.

दोन्ही तलाव आमच्या कॅम्पपासून

एखाद किलोमीटरवर होते. अप्रतीम नजारा होता. निळेशार निवांत पाणी, त्यावर वाऱ्याने उमटणाऱ्या हलक्या लहरी, तिन्ही बाजूने डोंगर, काही ठिकाणी अजुनही असलेला बर्फ, फार मोहक होते. दोन्ही तलाव जवळजवळ आहेत. किशनसर तलाव जरा उंचावर आहे. रात्रीचं जेवण केलं व  झोपी जायला टेंटकडे निघालो. सहज आमचे लक्ष





आकाशाकडे गेलं मात्र! चमचम चांदण्याने संपुर्ण आकाश भरलेले होते. आकाशगंगा अगदी स्पष्टपणे दिसत होती. जी आजवर फक्त पुस्तकातच पाहिली होती. मी माझ्या आयुष्यात ती प्रथमच पहात होतो. अविस्मरणीय होती ती रात्र. त्यानंतरच्या आमच्या मुक्कामात ती कधी दिसायचा योग आला नाही. कारण इतके निरभ्र आकाश पुढे कधी नव्हते दिसले.

आमच्या या ट्रेकमधला सगळयात कठीण असा जो पट्टा होता तो म्हणजे किसनसर ते गडसर या दोन तलावांच्या मधला. इथे आम्हाला गडसरची खिंड पार करायची होती. जिथली उंची तेरा हजार फुट होती. त्या आधी उभा गड चढायचा होता. सुरुवातीची चढाई करतांना डाव्या हाताला असलेले किशनसर तलावाचे मनोहारी दृष्य डोळे सुखावत होते. त्यामुळे होणारी दमछाक मानसिकदृष्ट्या हलकी होत होती. चालतांना जो तो एकमेकांना चियरअप करीत होता. अशा चढाईत वरच्या टोकाकडे सतत न पहाता, न थांबता, छोटी पावले टाकत, धीम्या गतीने पण एका लयीत, चालत राहाणे हा मूलमंत्र आमच्या ग्रुप लिडरने सांगितला होता. त्याचे पालन करीत सगळयांनी खिंड पार केली. खिंड पार केल्यावर सगळयांनी पाठीवरच्या सॅक उतरवल्या व विश्रांती घेतली. नाश्त्याचे डबे उघडले. रोजच्या आमच्या डब्यात एका फॉईलमधे गुंडाळलेला उकडलेला बटाटा, एक अंड असायचं, गोळया, चॉकलेट, किटकॅट असायची व एखादे टेट्रापॅक मधले ज्युस असे. खाऊन, पाणी पिऊन निघालो. आता पुढे उतारच उतार होता. डावीकडे गडसर तलाव दिसू लागला. चारही बाजुनी बर्फाच्छादीत, गर्द

हिरव्या पाण्याचा तो तलाव खुपच सुंदर दिसत होता.

पुढे दोन ठिकाणी आम्हाला आर्मीची चेकपोस्ट पार करायची होती. सगळयांच्या ओळखपत्राचे चेकिंग केले गेले. त्यांच्यातर्फे आम्हाला चहा पाजण्यात आला. सतसरजवळच्या दुसऱ्या तळावर फोटो काढले आम्ही त्या वीरजवानांसोबत. इतक्या खडतर परिस्थितीतही त्यांचे तेथे गस्त घालणे



पाहून प्रत्येकाचाच उर अभिमानाने भरुन आला होता. त्यांच्यापैकी महाराष्ट्रातून कोणी आहे का हे आम्ही शोधत होतो. त्या गस्तीवर बीडजवळच्या एका गावातला जवान आम्हाला भेटला. चार गप्पा झाल्या त्याच्यासोबत. आम्ही त्याला आमच्या जवळ असलेल्या गुळपापडीच्या वड्या, सुकामेवा दिला. परंतु त्या सुक्यामेव्यापेक्षा तिथल्या जवानांना इंटरेस्ट होता तो चटणी, लोणचे यापैकी काही जर असेल आमच्याकडे तर त्यात. तो म्हणाला सगळयात जास्त त्या गोष्टी आम्ही मिस करतो इथे. लक्षात ठेवायला हवं हे पुढच्या अशा भटकंतीत.

शेवटचा आमचा मुक्काम हा हरमुख पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या नंदकोल या तलावाकाठी होता. नंदकोलच्या वरच्या अंगाला गंगाबल हा मोठा तलाव आहे. हरमुख या बर्फाच्छादित पर्वताचे बर्फ वितळून हा तलाव तयार झाला आहे. तलावातील त्या निवांत पाण्यात पडणारे हरमुख शिखराचे प्रतिबिंब भुरळ पाडणारे होते. गंगाबल तलावाकाठी एक मोडके बांधकाम दिसत होते. पुर्वी श्रावण महिन्यात, काश्मिर खोऱ्यातील हिंदू इथे यात्रेकरता येत. गेली काही दशके मात्र दहशतवादी कारवाया व काश्मिरी पंडीतांना करावे लागलेले स्थलांतर त्यामुळे फार तुरळक यात्रेकरु इथे येतात आता.


नंदकोल तलाव ते नरनाग हा आमचा शेवटचा टप्पा होता. संपुर्ण उतरत जाणारा मार्ग होता. थोड्याच वेळात मॉपल, पाईन वृक्षांची टोके दिसू लागली. आम्ही आता कमी उंचीवर पोहोचल्याची ती खुण होती.

सुरुवातीला हलका उतार होता. परंतु शेवटचे तीन किमी चालणे पायांची, विशेषत: गुडघ्यांची वाट लावणारे होते. कारण सतत तिव्र उतार असलेली ही वाट आपल्याला सरळ चार हजार फुट खाली घेऊन येते.



पायथ्याशी नरनाग इथे ऐतिहासिक वारसा असलेला मंदिर समुह आहे. सिंद नदीच्या एका उपनदीकाठी असलेली ही मंदिरे स्थापत्यकलेचा सुंदर नमुना असणार एकेकाळी, आता मात्र खुप पडझड झालेल्या अवस्थेत आहेत ती; व कड्याकुलपात बंद आहेत. वाईट वाटतं हे सगळे पाहून, असो. आम्हाला न्यायला श्रीनगरहून जीप आलेल्या होत्या. मुंबईला परतण्याआधी एक रात्र आम्ही श्रीनगरमध्ये राहणार होतो. आमची ट्रेक संपली होती.

हिमालयातील भटकंतीमधला हा सगळा नजारा पाहिल्यावर अगर जन्नत हैं जमीनपर कहीं, यही पे है हमिनस्तो, हमिनस्तो हे वचन किती खरं आहे याची आपल्याला प्रचिती येते. आशा करुया की या सौंदर्यावर बसलेली धुळ लवकरच पुसली जाईल व काश्मिरातील पर्यटनासाठी पुन्हा एकदा सोन्याचे दिवस येतील.



ठाणेवैभव ठाणे जिल्ह्याचे परिपुर्ण दैनिक

# ठाणेवैभव आणि Know Your Town

## तर्फे दिवाळी शुभेच्छा



मिलिन्द बल्लाळ - संपादक


निखिल बल्लाळ - व्यवस्थापकीय संपादक

पत्ता : दामले अपार्टमेंट, टेंभी नाका, ठाणे (प)

Web : www.thanevaibhav.in

Email : thanevaibhav1975@gmail.com

Tel. : 022 2534 1526, 2534 8594



# केल्याने तीर्थाटन...



## पौराणिकतेशी जोडलेली प्राचीन संस्कृती


सौ. शोभा फणसे

पत्ता : ६०२/१३, मिलेनीयम पार्क, हरिओम नगर, मुलुंड (पूर्व).

मो.नं. : ८४५१९ ९३८६२

आपल्या देशात अशी अनेक पर्यटन स्थळे आहेत ज्यांची माहिती पर्यटन विभागाच्या नकाशावर असतेच असे नाही. पण तरीही ती प्रेक्षणीय असतात, महत्त्वपूर्ण असतात. काही धार्मिक स्थळे आपल्या प्राचीन संस्कृतीशी किंवा पौराणिकतेशी जोडलेली असूनही प्रसिध्दीअभावी लोकांना फारशी ज्ञात नसतात.

आमच्या सदगुरु पूज्य ब्रह्मचारिणी शालिनी विष्णू चिंदरकर यांच्याबरोबर दोन तीनदा यात्रेला जाण्याचा सुयोग आला आणि त्यांच्या मार्गदर्शनामुळे अशा अनेक चाकोरीबाहेरच्या स्थलदर्शनांचा आनंद घेता आला. त्यांपैकीच काही आज मला आठवत आहेत.

आम्ही जगन्नाथपुरीला निघालो होतो. बाय रोड-नाशिक-अमरावती-रायपूर-विलासपूर-संबळपूर असे मजल दरमजल करीत जात होतो. संबळपूर ते अनगुल हा टप्पा म्हणजे नक्षलवादी चळवळीचे प्रमुख केंद्र असलेले घनदाट जंगल-बरगड-एटापल्ली इ. भाग पार करावा लागला. आणि कटकपर्यंत आलो. कटक हे चिंचोळया गल्लीबोळांचे, अरुंद रस्त्यांचे, दाट लोकवस्तीचे, हॅन्डलूम-पॉवरलूमच्या खडखडाटाचे शहर-जुनी राजधानी. तेथून महानदीवरील सुमारे ३ कि.मी. लांबीच्या रोडब्रीजने आपण भुवनेश्वरला पोहोचतो. ओरिसाची आजची राजधानी-मुद्दाम नियोजनपूर्वक आखीव रेखीव, रुंद आणि स्वच्छ रस्त्यांचे हे शहर मंदिरांचे शहर म्हणूनही ओळखले जाते कारण आजही सातशेच्या आसपास मंदिरे या शहरात असून



लिंगराजमंदिर हे त्यातील सर्वांत मोठे आणि महत्त्वाचे मानले जाते. सुमारे १००० ए.डी. च्या आसपास बांधून पूर्ण झालेले हे मंदिर खूपच भव्य आहे. याच्या आंतररचनेत थोडा वेगळेपणा वाटला. गाभाऱ्याकडे जाणाऱ्या

मार्गिकेत मध्ये दोन चौक आहेत. आणि त्यांच्या दोनही बाजुंना उघडणारे दरवाजे आहेत. ज्यामुळे खूप गर्दी असूनही वायूवीजन चांगले होते. गुदमरल्यासारखे होत नाही. या मंदिरातील मूर्ति-लिंग हे हरिहर या स्वरुपातले आहे. म्हणजेच शिवलिंगावरच शाळीग्राम स्वरुप विष्णू ही स्थापित असून त्यायोगे शैव आणि वैष्णव पंथियांचे मिलन घडविले आहे. भारतातल्या अनेक प्राचीन मंदिरांपैकी हे एक असून उत्तम कोरिवकामाने ते देखणे वाटते.

पुढे जगन्नाथपुरीत तेथील सुप्रसिध्द असे श्री जगन्नाथाचे दर्शन घेतले. मंदिरातील महाप्रसाद, बाहेरच्या बाजारातील मिष्टान्ने, शॉपिंग उरकून आम्ही तेथून जवळच असलेल्या काकनपूर येथे गेलो. प्राची नदीच्या तीरावरील या गावात आहे. स्वयंभू मंगलादेवीचे प्राचीन मंदिर-काळया दगडी बांधकामाचे असं म्हणतात की जगन्नाथपुरीतील श्री जगन्नाथाच्या पुजाऱ्यांना स्वप्नात दृष्टांत देवून ही देवी पुरीमंदिरातल्या मूर्ति (दाराब्रह्मांसाठी) लागणाऱ्या योग्य अशा वृक्षांच्या ठावठिकाणांची माहिती देते आणि मग पुजारी वृक्षांच्या शोधात बाहेर पडतात. (काही विशिष्ट लक्षणे असलेलेच वृक्ष त्यासाठी वापरले जातात.)

आणखी असेच वराहनाथ मंदीर पाहिले ! वैतरणी नदीच्या तीरावरील जजपूर गांवानजीक वराहनाथ या गावातील वराहनाथ - श्री विष्णूंच्या वराह अवताराचे या स्थानीच वराहअवताराचे मूळ प्रगटीकरण झाले असे



पुजाऱ्यांकडून समजले. मंदिर पंधराव्या शतकातले असून तेथील लोकल पध्दतीचे म्हणजे कलिंग शैलीतले असून याच्या घुमटावर आतल्या बाजूने सुंदर रंगकाम केलेले आहे. वर्तुळाकार चित्रमाला रंगवली

आहे. मूर्तिंच्या समोर मोठा गरुडस्तंभ उभा आहे. हा मंदिरसमूह असून येथे अन्य मंदिरे आहेत. ओरिसातल्या या ग्रामीण भागात साधे शाकाहारी जेवण मिळणे तसे कठीण असते. पण आम्ही विनंती केल्यावर येथील पुजाऱ्यांचे साधे चवदार जेवण करुन वाढले.

असेच आठवते आहे श्री कूर्मम्! विशाखापट्टमच्या पुढे श्री काकुलम् जवळील हे स्थान. या ठिकाणीच भगवान विष्णू कूर्मावतारात प्रकट झाले होते असे म्हणतात. येथे विष्णूंची मुर्ती नाही तर कूर्माकाराचे एक मोठे फॉसिल-पाषाण आहे. स्वतः आदि शंकराचार्यांनी या मंदिरात एक शाळीग्राम शीला स्थापन केली आहे. या प्राचीन मंदिरात रामनुजाचार्य, चैतन्य महाप्रभू इ. नी ही येवून काही धर्मकार्ये केली आहेत. मंदिराचा गाभारा लहानसा असला तरी बाजूचे मंडप परिसर मोठा आहे. आंध्रप्रदेशातील हे प्रसिध्द तीर्थस्थान असून भाविकांची खूप गर्दी असते. मंदिरासमोर एक पुष्करिणी असून मंदिरात काही कासवें पाळलेली आहेत. आठव्या शतकाच्याही आधी पासून हे मंदिर अस्तित्त्वात असल्याचे समजते.

तंजावरला गेलो असतानाही अचानकपणे स्वतः रामदासस्वामींनी स्थापित केलेला आणि अजूनही कार्यरत असलेला थोरले भीमराज गोस्वामी रामदासी मठ पहाण्याची संधी मिळाली. याचे वर्णन मी गेल्या वर्षीच्या विश्वभ्रमंतीच्या अंकात केले आहे.



आम्ही पाहिलेला लहरतारा म्हणजे कबीरदासजींचे अवतरण स्थान येथेच जवळच असलेल्या तलावात कमलपुष्पावरील शिंपल्यात कबीरदासजी बालरुपात अवतीर्ण झाले. तलावाकाठी रहाणाऱ्या एका विणकर जोडप्याने ते बालक सांभाळले आणि कबीरदास या नांवाने जगाला परिचित झाले. हे स्थान काशीपासून अगदी जवळच आहे. पूर्णपणे विस्मृतीत गेलेले हे स्थान इ.स. १९७४ मध्ये आचार्य

उदीतराज यांनी शोधून काढले. आता तेथे लालसर दगडातील भव्य आणि आकर्षक अशी कबीरमठाची इमारत उभी आहे.

गोरखपूरपासून साधारण २५/३० कि.मीटरवर असलेले मगहर ही पाहिले. हे कबीरदासजींची निर्वाणस्थळी आजुबाजूचं गांव, परिसर गरीब वस्तीचा, पण संत कबीरदासांच्या समाधीचा, परिसर गांवापासून थोडा दूर आणि मोठा आहे. मगहरमध्ये मृत्यू आल्यास माणूस नरकात जातो अशी अंधश्रध्दा त्या काळी प्रचलित होती. ती दूर करण्यासाठी कबीरदासजी मुद्दाम काशीहून मगहरला येवून राहिले. असं म्हणतात की कबीरदासांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मृत्यूशय्येवर फक्त फुलेच मिळाली. मग तेथे हिंदूंनी कबीरदासांची समाधी बांधली आणि अगदी शेजारच्या जमिनीवर मुसलमानांनी दर्गा बांधला. आज दोनही वास्तू सुस्थितीत असून आपण दर्शन घेवू शकतो. सदर वास्तूंचे व्यवस्थापक ट्रस्टच्या इमारतीतच रहातात त्यानी समाधीमंदिरात येवून सर्व माहिती दिली. कबीरांचे तत्त्वज्ञान मानणारा बराच मोठा वर्ग उत्तरप्रदेश बंगाल-ओरिसा, पंजाब येथे आहे असेही समजले. आपल्याला मात्र कबीरदासजी आणि त्यांची निर्गुणी भजने इतकेच माहिती असते. आता अगदी अलिकडे पर्यटनविकास कार्यक्रमाअंतर्गत या समाधी आणि दर्गा परिसरातल्या विकासकामांचे पंतप्रधान मोदिजींच्या हस्ते उद्‌घाटन झाल्याचे वाचनात आले.

येथून अगदी जवळच असलेले गोरखपूर-गोरक्षनाथांची समाधी असलेले गोरखपूर; असे वाटत होते पण तेथे गेल्यावर मला समजले कि गोरखपूर ही गोरक्षनाथांची तपोभूमी आहे. तेथे त्यांची समाधी नाही. असेही समजले की नवनाथांची जन्मस्थळी आणि समाधी कुठेही नाही. गोरखनाथ गोरखपूरमध्येच प्रथम अवतीर्ण झाले असे म्हणतात. मंदिर पूर्ण संगमरवरी असून परिसर खूप विस्तीर्ण आहे. अत्यंत नेटकेपणाने सुशोभित केलेला आहे. स्वच्छता, शांतता शिस्त पूर्ण पाळली जाते. मुख्य मंदिरालगतच गोरक्षनाथांची धुनीही आहे. आदित्य योगीराज याच गोरक्षपीठाचे पीठाधीशही आहेत. मुख्यमंत्री होण्यापूर्वी ते मंदिराच्या प्रांगणातच रहात असत. मंदिराची मोठी गोशाळा आहे. बरीच सामाजिक कामेही चालतात. सर्व नाथपंथीय संन्यास्यांच्या मूर्ती, त्यांच्या नांवानिशी अल्पपरिचय आणि इतरही काही पौराणिक मूर्ती असलेले. एक संग्रहालय परिसरातच आहे. ज्ञानेश्वर माऊलींची मूर्तीही येथे पहाण्यास मिळाली.

मंदिर आणि परिसर खुपच प्रेक्षणीय आहे.




अगदी अल्प दरात भोजन आणि नाष्टा मिळणारे मंदिराचे कँन्टीन समोरच आहे. पुर्ण शाकाहारी व चवदार जेवण मिळते. मकरसंक्रांतीला गोरखनाथांचा येथे मोठा उत्सव आणि जत्राही असते.

गोरखपूरला आणखी एक मजेशीर पण विचित्र गोष्ट पहायला मिळाली. गोरखपूर स्टेशन लगतच्या रस्त्यावर काही मंडळी टेबल टाकून परदेशी करन्सी आणि रुपयांची देवघेवीचा व्यवहार करत होती. आताच्या योगीजींच्या उत्तर प्रदेशात कदाचित हे चित्र पुसले गेले असेल; नक्कीच!

जगन्नाथपुरीतील आदि शंकराचार्यांनी स्थापन केलेले गोवर्धन पीठ, त्यांची मोठी वेदपाठशाळा आणि त्यांनी स्थापन केलेली मुरलीधर श्रीकृष्णाची मोहक मूर्ती आठवते आणि राष्ट्रीय एकात्मतेची त्यांची दूरदृष्टीही जाणवते. असाच आठवतोय गंभीरा मठ, चैतन्यमहाप्रभूंची तप:स्थली. त्यांच्या खडावा, कमंडलू आणि तेव्हांपासून तेवत असलेला दिवा यांचे येथे दर्शन होते. यांच्या श्रीकृष्णभक्तीच्या तत्त्वज्ञानावरच आजचे इस्कॉन उभे आहे.

हे सर्व पहातांना आपल्या प्राचीन महान संस्कृतीची जाणीव होते आणि आपण या मातीत जन्म घेतल्याचा सार्थ अभिमान वाटू लागतो.



# नावेसरमधील चमत्कार...



## एक अविश्वसनीय अनुभव

श्रीमती अनामिका बोरकर

पत्ता - अ/१८, वुडलँड अपार्टमेंट, गांधी भवन मार्ग, कोथरुड, पुणे - ४११०३८

मो.नं.९८१९८६९०९०

डोंगर पोखरुन उंदीर त्यात खोलवर बीळ करतात, कुठूनही कुठेही जाऊ शकतात, मध्येच जमीनीवर येऊन त्यांचा कार्यभाग उरकतात, माणसांची चाहूल लागताच पटकन बिळात नाहीसे होतात हे आपण पूर्वीपासून ऐकतो. पण माणसेही हे सगळे करु शकतात यावर विश्वास बसणे जरा कठीणच आहे. मध्यंतरी एकदा वर्तमान पत्रात आलेल्या वाळवंटात सापडलेल्या खूप पूर्वीच्या जमिनीखालील गावाची बातमी वाचली आणि टर्कीमध्ये आम्ही बघितलेल्या दोन गावांची आठवण झाली.

अंदमानमध्ये पाहिलेले जमिनीखालचे



जपानी बंकर काय किंवा व्हिएतनाम मधील सैनिकांसाठीची टनेल्स काय या ठिकाणी थोडे दिवसांसाठी केलेली काही कामापुरतीच वस्ती. युध्दजन्य परिस्थितीमध्येच यांचा उपयोग. पण टर्कीमध्ये डोंगरांचा उपयोग आधी रहिवाश्यांसाठी भूमीगत गावे आणि नंतर पर्यटकांसाठी हॉटेल्स तयार करण्यासाठी केलेला पाहून खूप गंमत वाटली. कप्पाडोकीयातील नवासेर मधल्या प्रॉव्हीन्स मधील ऊर्गुप या छोट्याश्या गावात आम्हाला डोंगरातली मजा बघायला जायचे होते.

आम्ही गेलो तेव्हा गाव पाहून थोडी निराशाच झाली आमची. इस्तंबूल पासून आम्ही आमच्या सहलीला सुरुवात केली होती. इस्तंबूल पासून पुढचा सगळा प्रवास बसने होता. चांगली घरे, छान रस्ते, पिस्ते, ओलिव्हची झाडे सगळेच कसे एखाद्या कुशल चित्रकाराने चित्र रेखाटावे तसे सुबक आटोपशीर रेखीव. आम्ही गेलो होतो त्यावेळी तिथली मेपल्सची झाडे ऐन बहरात होती. सगळा प्रवास गुळगुळीत रस्त्यांवरुन सहज घरंगळत केल्यासारखा होता. वळणावळणाच्या रस्त्याच्या दुतर्फा असणारी मेपल्सची झाडे खूप सुंदर दिसत होती. मुळातली हिरवीगार झाडे आता हळूहळू लालसर, पिवळी, केशरी रंगात रंगलेली दिसायला लागली होती. सगळा प्रवास कसा पोटातले पाणीसुध्दा न हलता चालू होता.

टर्कीची प्रेक्षणीय ठिकाणे आहेत त्यापैकी ट्रॉयच्या प्रसिध्द लाकडी घोड्याला आम्ही भेट दिली आणि सगळा ग्रीक रोमन युध्दाचा इतिहास उजळवला होता.

गॅलेपोलीच्या युध्दभूमीवर पाऊल टाकतांना ते सगळे डोळयासमोर साकारत होते. याला एकमेव कारण होता आमचा गाईड, पक्का गोष्टी वेल्हाळ आणि त्याची भाषाही रसाळ. त्यामुळे शाळेत ऑप्शनल टाकलेले सगळे परत शिकायला मिळाले. गॅलेपोलीच्या स्मशानभूमीपाशी लिहिलेली पाटी अजूनही मनावर कोरलेली आहे. युध्दानंतर वैर विसरावं कसं हे शिकवणारा उत्तम संदेश यावर लिहिलाय. त्या पाटीवर लिहिलेले माझ्या मुलांनो, तुम्ही कोणत्याही धर्माचे, देशाचे असा, पण तुम्ही इथे माझ्या कुशीत



चिरनिद्रा घेत आहात. तुम्ही जरी वेगवेगळया देशातून आला असाल तरी आता माझ्या कुशीत आलात म्हणजे माझी मुलंच झालात. तुम्हाला इथे नक्कीच शांतता मिळेल. हे वाचल्यावर खरच उर भरुन आला. आमच्या गाईडच्या ओघवत्या कथनातून गॅलेपोलीचे युध्द जसे काही डोळयांसमोर घडतंय असे साकार होत होते. त्या धुंदितच पामुक्कलेला पोहोचलो.

पामुक्कालेला पांढराशुभ्र कॉटन कॅसल बघितल्यावर तर टर्कीला आल्याचं सार्थकच झालं. त्याचे दिवसाचे रुप वेगळे, रात्रीचे वेगळे. सूर्यप्रकाशाचा परिणाम कॅसलच्या अगदी वेगळयाच कमलपात्राच्या आकारावर दिवसभर वेगवेगळया छटा उमटवत होता, दिवसभर पांढऱ्या रंगात हिऱ्यांच्या तेजाने तळपणारी तर संध्याकाळी केशरात न्हाहून निघालेली तर रात्रीच्या चंद्र प्रकाशात कॅसलची चुनखडीपासून बनलेली कमलपात्रे चांदीचा रंग लेऊन लखलखत होती. डोळयांची तृप्ती होणे म्हणजे काय ते त्यावेळी समजले. पामुक्कले, चनक्कले ही गावे खूपच नीट नेटकी, शहरी छापाची होती. व्यापारासाठी पूर्वीपासून खूप प्रसिध्द असलेला रेशीमरस्त्याचा काही भागही या सहलीत बघायला मिळाला. बाहेरचा देखावा चलचित्रात बध्द करत आम्ही रेशीम रस्त्याचा काही भाग बघत बघत टर्कीच्या कप्पाडोकीया भागातील नावेसर प्रॉव्हीन्स मधील ऊर्गुपला गेलो.

आमचा रस्ता आता ज्वालामुखीच्या उद्रेकाने तयार झालेल्या डोंगराळ भागातून होता. एवढे दिवस पाहिलेलं नयनरम्य दृश्य

हळूहळू बदलायला लागलं. नेपल्स, ऑलिव्हची झाडे कमीकमी होत नाहिशीच झाली म्हणाना! आता करडया, राखाडी रंगाचे बोडके डोंगर आमच्या गाडीची सोबत करीत दोन्ही बाजूंनी पळायला लागले. त्या डोंगरावर मध्ये मध्ये गोल भोकेही दिसत होती. रस्ताही आता बऱ्यापैकी खडबडीत झाला होता. इकडे कुठे आलो, रस्ता चुकलो तर नाही? अशा शंकाही मनात डोकावायला लागल्या. गाडीबाहेर बघण्यासारखं काही फारसे दिसत नसल्याने इतक्या दिवसांच्या भटकंतीचा शीण जाणवायला लागला. मनावर एक प्रकारचा उदास, कंटाळवाणा भाव दाटायला लागला. इथे म्हणे कुठेतरी चेटकिणी ची धुराडी होती आणि ती बघायला आम्ही इथपर्यंत आलो होतो! मला तर चेटकीण वगैरे शब्दांचाच तिटकारा, त्यामुळे टर्कीची माहिती गोळा करताना मी हा भाग ऑप्शनलाच टाकला होता. नाईलाज म्हणून या असल्या करडया नीरस भागात दोन दिवस काढणे भाग होते.

दुसरे काहीच करण्याजोगे नसल्याने नजर नाईलाजाने बाहेरच्या रखरखीत दृश्याकडे जात होती. वाटेत एखाद दुसरे गाव लागत होते. गाव कसले १५-२० घरांचा समुहच म्हणाना! घरेही सगळी एकजात राखाडी कबऱ्या रंगाची, एक मजली, लहान लहान, एकमेकांना खेटून उभी असलेली. क्वचितच कुठे खेळणारी मुलं किंवा म्हातारे बघायला मिळाले. डोक्यावर मुसलमानी



पध्दतीच्या टोप्या, अंगात पठाणी पध्दतीचा गुडघ्याखाली येणारा अंगरखा, खाली तुमान हाच पोशाख सगळीकडे. बायकांच्या अंगात पंजाबी कपडे आणि डोक्यावर ओढण्या. सगळे मळ खाऊ रंग. कुठेही आकर्षकपणा नाही. असली १०-१५ तरी गावे एव्हाना मागे पडली असतील. यापैकी कुठल्या तरी गावात २ दिवस काढावे लागणार आहेत या कल्पनेनेच कसेतरी होत होते. पण आता आलो होतोच तर तसेच पुढे रेटायला हवे होते. टर्कीपासूनचे गाईड किंवा आमच्या बरोबर मुंबईहून असलेले टूर मॅनेजर मस्त डुलक्या काढत होते. असेच एक गाव लागले आणि आमची गाडी मोठा धक्का खाऊन थांबली. तो पर्यंत संध्याकाळ झाली होती. आजूबाजूच्या मळकट वातावरणात

आणखीनच उदास छाया पसरली. काही नाही तर निदान आजचा प्रवास तरी संपला या सुटकेच्या विचारानेच खूप बरे वाटले. गाईडच्या हाताच्या इशाऱ्यावर सगळी पलटण हातातल्या लोंबणाऱ्या पिशव्या घेऊन चालू लागली. डाव्या हाताला मघाशी बघितल्यासारखी छोटी छोटी घरे आणि उजव्या हाताला डोंगर. डोंगरावर चढणाऱ्या काही पायऱ्या दिसत होत्या अरे बापरे! आता काय डोंगर चढायचा की काय? नुसत्या कल्पनेनेच पाय दुखायला लागले. आमचे मॅनेजर साहेब पायऱ्या चढता चढता आम्हाला बोलावू लागले. पायऱ्यांचा रस्ता डोंगराच्या पोकळीत शिरत होता हे आम्ही जसे जवळ पोहोचलो तसे जाणवले.

अहो, आपण काय डोंगरातल्या गुहेत राहायचे की काय? मी नाही राहणार बाई! आधीच सांगून ठेवते!

हया गुहेत कसे रहायचं? मला तर कॉटशिवाय झोपताच येत नाही. कुठून इथं आलो देव जाणे

अशा सगळयांच्याच प्रतिक्रिया ऐकू येऊ लागल्या. गाईड आणि मॅनेजर अजिबात लक्ष न देता सामान उतरवण्याच्या सूचना चालकाला द्यायला लागले.

आता गाईडच्या मागे जाण्याशिवाय गत्यंतर नव्हते. मुकाट्याने आम्ही रखरखीत दिसणाऱ्या डोंगराच्या पोटात शिरणाऱ्या पायऱ्या चढायला लागलो. १०-१५ पायऱ्या चढून गेलो, उजवीकडे वळलो अन् पाहतच राहिलो... मस्त बहरलेल्या बोगनवेलींनी केलेल्या कमानीखालून सुबक पायवाट



होती. तिच्या दोन्ही बाजूंना पायवाट प्रकाशित करणारे छोटे तेलाचे दिवे १ फूट उंचीच्या दगडी चौथऱ्यावर विराजमान झाले होते. त्यांच्यामागे आमचे स्वागत करायला रंगीबेरंगी फुलझाडे हजर होती आणि पायवाटेवरचा डोंगराचा वरचा भाग कापून आकाश दिसण्याची सोय केलेली होती. रस्त्यावरुन यातले काहीही दिसत नव्हते. त्यामुळे अनपेक्षितपणे दिसलेले मनाला खूपच भावले. हे तर काहीच नव्हते अशा एकापेक्षा एक थक्क करणाऱ्या गोष्टी त्या डोंगराच्या पोटात लपलेल्या होत्या. आम्हाला नेणारी पायवाट एका कंदील, मेणबत्त्या, पणत्यांनी प्रकाशमान केलेल्या स्वागतकक्षात थांबली. छोटासा दगडाचा सुबक चौथरा

डेस्कचे कर्तव्य बजावत होता. तसेच दगडी बाक, खुर्च्या कापसाच्या गाद्यांनी सजलेल्या होत्या. आधी वाटले की ही दगडी टेबल, खुर्च्या कशासाठी मुद्दाम बनवली असतील? मग जसे इकडे तिकडे निरीक्षण केले तेव्हा कळले की हे टेबल खुर्च्या सगळे बाहेरुन आणलेले नव्हते तर ते डोंगर पोखरुन त्यातल्याच दगडांतून तयार केलेले होते. नाव, गाव, पासपोर्ट सगळयाची नोंद झाल्यावर आमची रवानगी आमच्या खोल्यात झाली. बसमधून उतरताना आराम करण्याचा केलेला विचार हे आत्तापर्यंत कधीही न पाहिलेल्या प्रकारचे खूप वेगळे हॉटेल पाहून कधीच पळून गेला. गाईडने अगोदरच तुमचे तुम्हीच फिरुन हॉटेल पहा, नवा अनुभव घ्या असे सांगितल्यामुळे उत्सुकता वाढली होती. स्वागतकक्षातून आम्ही आमची खोली शोधू लागलो. समोर दोन माणसे एकावेळी चालू शकतील एवढाच रुंद बोळवाजा लांबलचक रस्ता दिसला. त्या बोळात शिरायला दरवाजाऐवजी लांबट गोल भोक होते. त्याला पॉलिश, ग्रॅनाईट वगैरे तर सोडाच पण दारही नव्हते. त्या गोलातून पुढे गेलो तर डावीकडे खोल्या लागत होत्या. एका खोलीनंतर पुन्हा दरवाजा, दुसरी खोली. प्रत्येक खोली आतून जरी स्वच्छ, हवेशीर असली तरी ती डोंगर पोखरुन केलेली होती हे स्पष्ट कळत होते. भिंतींना रंग नव्हता पण गुळगुळीत होत्या.



भिंतीत कोनाडे व त्यात कंदील ठेवले होते. कृत्रिम फुलेही अधे मध्ये ठेवली होती. एक प्रशस्त बेड, एक कपाट, एक टेबल, दोन खुर्च्या एवढेच सामान पण छान सजावट होती. बेडच्या समोरच्या भिंतीत प्रशस्त खिडकी सौम्य रंगाच्या पडद्याने खोलीची शोभा वाढवीत होती. जेवणघरही तसेच डोंगर पोखरुन बनवलेले होते. सगळेच जरी खूप खूप वेगळे वाटत होते तरी त्यात भीती वाटत नव्हती. एव्हाना आपण डोंगराच्या पोटात राहणार आहोत याची जरी कल्पना आली होती तरी त्यात गूढपणा अजिबात नव्हता. जेवणघरात पोहोचेपर्यंत १०-१२ तरी खोल्या ओलांडल्या असतील. त्यामुळे हॉटेल बऱ्यापैकी मोठे असावे याचा अंदाज आला. जेवणघराच्या नंतर जिना दिसला. तिथेही काही खोल्या होत्या म्हणे. पण हे सर्व

बघण्याची ताकद नव्हती. खोलीत येईपर्यंत भिंतीतले कोनाड्यात बसवलेले दिवे आमचा मार्ग उजळण्याचे काम चोख करत होते. खोलीला दार होत हे पाहून खरोखर खूप हायसं वाटलं. विजेचे दिवे नसल्याने कंदिलाच्या प्रकाशात वावरतांना चुकल्या चुकल्यासारखे वाटले. खिडकीच्या बाहेर अंधार होता. शहरात सतत राहत असल्याने अशा गडद अंधाराची सवय नव्हती. पंखा नाही पण खिडकीतून छान वारा येत असल्याने झोप पटकन आणि गाढ लागली. पहाटेच्या कोवळया सूर्यकिरणांनी गुदगुल्या करुन उठवल्यावर प्रसन्न वाटले. न्याहरीसाठी परत जेवणघराकडे जाताना कालचाच मार्ग खूप वेगळा वाटत होता. जरी डोंगर पोखरला असला तरी पण आतून सगळे गुळगुळीत, ताशीव होते. सगळे हॉटेल आता फिरुन पाहिल्यावर विश्वासच बसेना की डोंगराच्या पोटात असे काही करता येते. जिना चढून वर गेल्यावर परत खालच्या मजल्याचीच प्रतिकृती दिसली. प्रत्येक खोलीची खिडकी डोंगराच्या बाहेरच्या मोकळया बाजूला येत होती. खिडकीतून इतर डोंगर रांगा दिसत होत्या. दर तीन चार खोल्यानंतर बाहेर पडायला छोटी वाट होती. त्याच्या पुढे मस्त मोकळा सज्जा होता. साहजिकच पाय तिकडे वळले. डोंगराच्या सुळक्यांमधून कोवळे ऊन पसरले होते. बाहेर पक्षी म्हणजे कबुतरेच जास्त होती. ती मजेत उडत होती.



वारा अगदीच सौम्य होता. दूर आकाशात काही वेगळेच पक्षी उडताना दिसत होते. नीट निरखून पाहिले तर ते पक्षी नसून पर्यटकांना हवाई सफर घडवणारे वायूचे फुगे होते. ते जसजसे जवळ यायला लागले तसतसे त्यांचे विविध रंग, त्या फुग्याच्या खाली हवेवर सूक्ष्म झोके घेणाऱ्या भल्यामोठ्या वेताच्या टोपल्या आणि त्यातले पर्यटकही दिसायला लागले. त्यांचा हवाई मार्ग आमच्या हॉटेल जवळून जात होता. म्हणजे टर्की मधले एक आकर्षण ओपन एअर म्युझियम जवळच होते तर. कधी एकदा ते पाहू असे झाले होते.

उर्गुप पासून साधारण ९-१० किमी वर आमची बस थांबली. ते एका डोंगराचे पठार होते. आम्ही पठाराच्या कडेच्या टोकापाशी गेलो आणि बघतच राहिलो. तीन डोंगरांच्या

पठाराचे मिळून भलेमोठे वर्तुळाकार कडे तयार झाले होते आणि कडेवरुन खालच्या दरीतले उभे सुळके दिसत होते. हाताची बोटे ताठ उभी करावीत तसे ते सुळके दिसत होते त्यांच्या वरच्या टोकाला वेगवेगळ्या



आकाराच्या मजेशीर काळपट चॉकलेटी दगडी टोप्या दिसत होत्या. त्या बोटासारख्या सुळक्याशिवाय एक बुरुजासारखा गोलाकार, एक थोडीशी रंगवलेली खांब असलेली इमारत, अशा बऱ्याच गोष्टी दिसत होत्या. आम्ही थोडा उतार व थोड्या पायऱ्या उतरुन त्या दरीत उतरलो असता ते सगळे आकार खूपच भव्य दिसायला लागले. तपकिरी, करडया क्वचित राखाडी पांढऱ्या रंगाची उंच उंच बोटे, तसल्याच मातकट जमिनीवर पाय रोऊन उभी होती. उभी होती म्हणण्यापेक्षा आकाशाकडे बोटे करुन काहीतरी दाखवत असल्यासारखी दिसत होती. हीच ती प्रसिध्द चेटकिणीची धुराडी. हे निसर्गाचे कौतुक पाहायला जगभरातून लाखो पर्यटक इथे येत असतात.

येथील धुराडी किंवा पऱ्यांच्या चिमण्या १० फुटापासून २०० फुट उंची पर्यंतच्याही दिसतात. त्याचे जमीनीलगतचे घेरही वेगवेगळे आहेत. कारण या काही बांधलेल्या, मोजून मापून केलेल्या इमारती नाहीत. त्यांचे आकार नैसर्गिकरीत्या तयार झालेले आहेत. लाखो वर्षांपूर्वी याच्या आसपासच्या डोंगरामध्ये खूप मोठा ज्वालामुखीचा उद्रेक झाला होता. त्या ज्वालामुखीतून हजारो टन राख बरेच दिवस बाहेर उडत होती. तिचे असंख्य थर या दरीत पसरले गेले. त्या राखेचे थंड झाल्यावर दगड तयार झाले पण ते लाव्हारसासारखे कठीण दगड बनले नाहीत, तर वाळूच्या दगडांपेक्षाही मऊ झाले. काही ठिकाणी मऊ, भुसभुशीत, गुळगुळीत असे अनेक प्रकार त्यात निर्माण झाले. त्या नंतर झालेल्या शक्तीशाली भूकंपाने या नवीन तयार झालेल्या जमीनीवर बेसॉल्ट्चे कमीजास्त जाडीचे पांघरुण घातले. मागोमाग प्रचंड प्रमाणात पाऊस आला आणि तोही कित्येक वर्षे चालला. त्यामुळे जमीनीच्या फटीतून झिरपलेल्या पाण्याने जमीन दुभंगवण्याचे काम केले. जमीनीची धूप होऊ लागली. परंतु सगळयात वरच्या बेसॉल्ट्सारख्या

कठीण थरामुळे त्याखालचा सगळाच भुसभुशीत थर वाहून न जाता जिथे पाणी मुरले तिथलीच जमीन वाहून गेली. वर्षानुवर्षे ही धूप चालूच राहिल्याने आज दिसताहेत त्या बोटांच्या आकारातल्या, बुरुजाच्या आकारातल्या, डोक्यावर गोल, चपटे, निमुळते टोपी घातल्यासारख्या वेगवेगळया आकृत्या. याला तूफा किंवा हूडा असे म्हणतात. एकूणच हा भाग डोंगरांमुळे, निसर्गाने केलेल्या उलथापालथीमुळे



जगापासून खूप दूर पडला, लपलेला राहिला. या सर्व काळात तुर्कस्थानात प्रचंड अस्थिरता होती. रोमन, ग्रीक, अरबी लोकांची एकसारखी युध्दे होत होती. त्यामुळे ख्रिश्चन धर्मगुरुंनी याभागात आपली चर्चेस व धर्माच्या अभ्यासासाठी धर्मगुरुंना रहाण्यासाठी खोल्या बनवायचे ठरवले. सहज कोरतायेण्याजोगता दगड त्यांना इथे अनायासेच सापडला. या बोटांसारख्या दिसणाऱ्या तूफांमध्ये त्यांनी चर्चेस, रहाण्याच्या खोल्या बनवल्या. त्या आतून छान गुळगुळीत करुन रंगवल्या. येशुच्या जीवनातले अत्यंत कुशलतेने चितारलेले अनेक प्रसंग आजही बघता येतात. यासाठी त्यांनी काळा, निळा, लाल व सोनेरी असे रंग वापरले. सर्व रंग मोरचूद, वेगवेगळया रंगीत दगडांची पावडर यापासून बनवलेले नैसर्गिक रंग होते. भिंतीचा गिलावा ओला असतानाच चित्रे रंगवली आहेत. त्यामुळे गिलावा वाळत असताना तो या रंगातला ओलसरपणा शोषुन घेई व चित्राचे रंग पक्के, वर्षानुवर्षे टिकणारे होत. अशा वेगळयाच पध्दतीमुळे ती चित्रे आजही खूपच स्पष्ट आहेत. सोनेरी रंगात चक्क सोने वापरले आहे. त्यामुळे काही अंधाऱ्याभागात ते चमकते सुध्दा. या अशा आडवळणी भागात बरेच वर्षे धर्मगुरु रहात होते. १-२ पिढ्या सहज तिथे लपून राहिल्या. बरीच चर्चेस आपल्याला तिथे पहायला मिळतात. १९८४ साली हे ठिकाण जागतिक वारसा म्हणून नोंदवण्यात आले. जगभरातून प्रवासी हे बघायला इथे येऊ लागले आणि मग त्या अनुषंगाने नावेसर, गोरेमी, उर्गुपची भरभराट झाली. खूप मोठा परिसर या तूफांनी व्यापला आहे. एकावेळी सगळे पहाणे शक्य होत नसल्याने काही

लोक इथे वस्तीही करतात. आम्ही उर्गुपमधे जसे डोंगरातल्या हॉटेलमध्ये राहिलो तसे इथेही मोठे प्रशस्त हॉटेल बांधले आहे. या आकारामध्ये प्रथम कबुतरांनी रहाण्यासाठी भोके कोरली. त्या आरपार जाणाऱ्या भोकातून दिव्यांचा उजेड दिसावा त्याप्रमाणे सूर्याची किरणे चमकत. दुरुन बघताना ते बोटांसारखे उभे आकार, त्यावरच्या चित्रविचित्र आकाराच्या टोप्या आणि त्यात रहाणाऱ्या लोकांच्या चुलीतून येणारा धूर,



त्याच्या भोकातून चमकणारा प्रकाश म्हणून या आकारांना चेटकिणीची धुराडी किंवा पऱ्यांच्या चिमण्या म्हणतात ही माहीतीही आमच्या गाईड महाशयांनी दिली. खूप गंमत वाटली. मला मात्र त्या भागाला 'ओपन एअर म्युझीयम' म्हणतात तेच जास्त आवडले. किती बघाल तेवढे नवल तिथे पहायला मिळते. याला कबुतरांची गावे असेही म्हणतात. या जमीनीच्या धूप होण्यामधून आजूबाजूची जमीन शेतीसाठी सकस झाली खरी पण ही ज्वालामुखीच्या राखेतून तयार झाल्यामुळे यात शेतीसाठी आवश्यक फॉस्फरस अजिबात नसतो. हा फॉस्फरस कबुतरांच्या विष्ठेमध्ये मुबलक असतो. त्यामुळे आता इथे मुद्दाम कबुतरांनी वस्ती करावी यासाठी पोषक वातावरण तयार केले आहे. अधूनमधून मुद्दाम इतर ठिकाणाहून कबुतरे आणून इथे सोडतात. सगळया माहितीची खूप गंमत वाटली. आपल्याला ज्यांचा त्रास वाटतो त्या कबुतरांना टर्कीचा पत्ता द्यावा असे ही मनात आले.

यानंतरचे आश्चर्य म्हणजे जमीनीखालची गावे किंवा डोंगराच्या पोटातली गावे. कपाडोकिया भागातली सगळी जमीन अशा गावांनी पोखरलेली आहे हे कोणी सांगितले असते तर विश्वास बसला नसता. माझी कल्पना होती की जमिनीखालची गावे म्हणजे बोगदा आणि त्याला जोडलेल्या दोन्हीबाजूंना असणाऱ्या खोल्या. पण प्रत्यक्ष तिथे गेल्यावर अंगावर काटाच उभा राहिला. आम्ही उर्गुपहून परत एकदा ओपन एअर म्युझीयम ओलांडून एका डोंगराच्या मध्यापर्यंत आलो. करडया रंगाचा, रखरखीत डोंगर उन्हात जास्तच कोरडा दिसत होता. आम्ही उतरलो त्याच्या समोरच एक लोखंडी गज असणारे दार होते व खाली

जायला पायऱ्या होत्या. उंच माणसाला वाकूनच जावे लागेल इतकीच त्याची उंची होती. माझी उंची कमी असण्याचा कधी नव्हे तेवढा आनंद त्यावेळी मला झाला.

हेच ते जगप्रसिध्द कप्पाडोकिया भागातले नावेसर प्रांतातले देरिंकुयु भूमीगत गाव. पायऱ्या उखीरवाखीरच होत्या, त्यामुळे सांभाळून चालावे लागत होते. १०-१२ पायऱ्या उतरल्यावर एक बऱ्यापैकी मोठी खोली लागली. गाईड महाशयांची रसवंती चालू झाली. खोलीच्या एका भागाला एक मोठे भोक होते. त्यातून सूर्यप्रकाश आत येत होता. वाकून पाहिले तर ते भोक खूप खोल होते. साधारण १५०-१८० फूट तरी असावे. ही पावसाचे पाणी साठवण्यासाठी केलेली सोय होती.



देरिंकुयू हे जगातील सर्वात खोल म्हणजे अंदाजे २०० फूट खोलवर पोहोचलेले गाव आहे. साधारणपणे २०००० लोकांना या गावात आश्रय घेता येईल एवढी जागा जमीन खोदून तयार केली आहे. पहिल्यांदा लागली ती जागा म्हणजे शेळया मेंढया ठेवायची पागा. सहजपणे जमिनीवर जाऊन गवत खाणे सोपे जावे म्हणून ही जागा सगळयात वर असणे आवश्यक. त्यानंतर ८-१० पायऱ्यांचा तसाच सरपटता, तुटका जिना उतरुन खाली गेलो. आता जमिनीच्या खाली साधारणपणे २० फूट आल्याने प्रकाश कमी झाला होता. हवा थोडी कुबट झाली होती. जरी विजेचे छोटे दिवे मिणमिणत होते पण त्यांचा उजेड प्रकाश पाडण्याऐवजी धूसरताच वाढवत होता. या मजल्यावरची खोली थोडी प्रशस्त होती. याचा उपयोग जेवणघरासाठी होई. ही गावे ख्रिस्त पूर्व ८व्या ते ७व्या शतकात तयार केली गेली. शत्रूपासून जास्त करुन अरबांपासून वाचण्यासाठी ही गावे खोदली गेली. सुरुवातीला प्रत्येक कुटुंबाने आपापल्या घरातील तळघरातून जमिनीत खाली खोल्या खणल्या होत्या. शत्रू किंवा लुटारु येताना दिसले की घरातले लोक आपापला दस्त ऐवज गोळा करुन पटकन भुयारात शिरत आणि खोल्यांचा आश्रय घेत. जशी गरज वाढेल तशी खोल्यांची व्याप्ती वाढवली जाई. मुळचा दगड भुसभुशीत असल्याने खोल्या सुध्दा सरळ रेषेत खोल खणता येत नसत. थोडे डावीकडे, थोडे

उजवीकडे असे करत खणावे लागे. अशा प्रकारे ही गावे तयार झाली.


या भुयारी गावात लोकांना हल्लेखोर परत जाईपर्यंत राहावे लागे. कधीकधी काही महिने काय पण वर्षे सुध्दा जात. त्यामुळे तिथेच नवीन पिढी जन्म घेई, वाढे, वृध्द निजधामाला जात. त्यामुळे तीही व्यवस्था आतल्या आत करावी लागे. मुलांच्यासाठी धार्मिक शिकवण देण्यासाठीही जेवण घराचा उपयोग होई. त्याच्याही खालच्या मजल्यावर दारु गाळण्याची यंत्रे, दारुचे रांजण, धान्य साठवण्याचा जागा आणि स्वयंपाकघर होते. तिथेच पलीकडे मोठा भोकाभोकाचा दगड दिसला त्यात तांबे ओतून जाळी बनवायचे म्हणे. हवेचे व्हेन्टीलेशन चांगले व्हावे म्हणून आणि भिंतींना आधार मिळावा यासाठी ही जाळी उपयोगात येई म्हणे. स्वयंपाक घराचा आकार इतर जागेपेक्षा मोठा होता स्वयंपाक करताना चुलीतील धूर बाहेर पडून शत्रूला आपला पत्ता लागू नये यासाठी खूप काळजी घेतली जाई. वेगवेगळया कुटुंबातील माणसे एकत्र राहत असली तरी चूल मात्र एकच असे. या खोलीच्या भिंती काळया झाल्यामुळे कळत होते की सगळा धूरही तिथेच कोंडून रहात असणार. तिथे रहाणाऱ्या लोकांच्या रहाणीमानाची आता कल्पना यायला लागली होती. या मजल्याच्या खाली झोपण्याच्या खोल्या होत्या. खोल्यांना दारे वगैरे नव्हतीच. फक्त छोटेछोटे लंब गोलाकृती भोक आणि अधून मधून खांब. त्याच्या खाली चर्चची जागा होती. शत्रूला जरी आपण सापडलो तरी चर्च सापडून त्याची विटंबना होऊ नये म्हणून ही काळजी.



दिवसचे दिवस असे मोकळया हवेत न जाता राहावे लागे. तेंव्हा साहजिकच मानवी देहधर्माची विल्हेवाट ही तिथेच लावावी लागे. मोठमोठे रांजण यासाठी वापरात येत. तसेच सूर्यप्रकाश पारखा झाल्याने येणारी आजारपणेही असतं त्यातच मृत्यूही येई. त्या सर्वांची शेवटची जागाही हे असे रांजणच असत. ज्यावेळी बाहेर जाणे शक्य होई त्यावेळी हे रांजण वरती नेऊन त्याची विल्हेवाट लावली जाई. नुसते ऐकुनही अंगावर काटा आला. या रांजणाची जागा ६व्या मजल्या नंतर खाली. मागे ज्या मोठया

खोल भोकाचे वर्णन केले होते त्या भोकातूनच वर जाता येत असे एकच माणूस जाऊ शकेल एवढीच त्या भोकाची व्याप्ती होती. मोठ्ठया दगडी चाकाचा त्या भोकावर झाकण म्हणून उपयोग केला जाई. अधून-मधून त्यातून कोणीतरी त्या भोकाच्या तोंडावरचे दगडी चाक बाजूला करुन टेहळणी करे. जर काही धोका नसला तर मंडळी वरती येऊ शकत.

अगदी १४व्या शतकापर्यंत हया गावात लोक शत्रूपासून वाचण्यासाठी आश्रय घेत. ज्यावेळी ऑटमनचे राज्य आले तेव्हाही शरणार्थींना ठेवण्यासाठी याचा उपयोग होई.



अशी साधारण ४० गावे आत्तापर्यंत सापडली आहेत. यापैकी हे देरिंकुयू हे शहर व कायमाक्ली ही शहरे सर्वांत मोठी म्हणजे ७-८ मजली खोलीची. बाकीची बरीचशी दोन मजली, काही ३ मजली. १९६३ साली एका नावेसारच्या नागरिकाला त्याच्या घराची पुनर्रचना करताना भिंतीमागे एक लपलेली खोली सापडली आणि त्यामुळे या शहरांचा शोध लागला. आणि उंदराने बीळ करावे तशी जमीन पोखरुन केलेली ही शहरे सापडली. यातील बरीचशी शहरे एकमेकांना



बोगद्याने जोडलेली आहेत. आता या शहरांचा समावेश जागतिक वारसा मध्ये करण्यात आलाय. १९६९ नंतर आवश्यक त्या वायुवीजनाच्या सोई करुन ही शहरे पर्यटकांसाठी खुली करण्यात आली. तरीही त्यातले ४-५ मजलेच आम्ही तरी बघू शकलो. ६व्या मजल्यावर कायकाय साठवणूक केलेली होती. त्याचे वर्णन ऐकून तिथे जाण्याची माझी तरी हिंमतच झाली नाही. जितके पाहिले होते तेवढेच खूप होते. सारखी भीती वाटत होती की जर हा भुसभुशीत दगड आपण आत असताना घसरला आणि आपण आतच अडकलो

तर.... वरती आल्यावर स्वच्छ सूर्यप्रकाश पाहिल्यावर जीवात जीव आला. दोन्ही शहरे पाहून पाय जाम दुखले.

हॉटेलवर परतल्यावर मनात वेगळीच भावना निर्माण झाली. ज्वालामुखीतून उसळलेल्या राखेतून जन्माला आलेल्या डोंगरामधून खोदलेल्या हॉटेलमध्ये आपण रहात आहोत या भावनेने खूप ग्रेट वाटले.



दुसऱ्या दिवशी सकाळी बलून मधून ओपन एअर म्युझीयम सकाळच्या सूर्योदयाच्या कोवळया उन्हात कसे वेगळेच दिसते याचा अनुभव घेतला. सूफी पंथाच्या अल्लाच्या उपासनेचा अनुभवही घेतला. त्यावेळी होणाऱ्या नादमय संगीतातून देवत्वाचा साक्षात्कार झाला. अगदी वेगळया लाल रंगात न्हालेली एकमेकांना चिकटून ठेवलेल्या तोतापुरी आंब्यांच्या अढीसारखी दिसणारी लव्ह व्हॅली पाहीली, सूर्यास्ताचाही रंग उधळण्याचा खेळ बघितला. टर्कीला येताना कल्पनाही केली नव्हती इतक्या गोष्टींचा अनुभव मिळाला. नावेसरमधला



ज्वालामुखीच्या उद्रेकातून तयार झालेला निसर्गाचा चमत्कार आणि त्याचा माणसाने आपल्या सोईसाठी करुन घेतलेला उपयोग मनात कायम घर करुन राहिलाय.



# निसर्ग सृष्टीतील रमणीय स्थळ

## श्री क्षेत्र भीमाशंकर



अविनाश कृ. राजगुरे,
न्यू कृष्णार्पण कॉलनी, श्री वियाणी सायन्स कॉलेज रोड, अमरावती - ४४४ ६०७
व्हाट्स ॲप नंबर भ्रमणध्वनी क्र.९३२६९२५५३१

अखंड भारतामध्ये अनेक देव-देवतांची प्राचीन काळापासुन पूजा, भक्ती, उपासना केली जाते. त्यापैकी आराध्य दैवत शंकर म्हणजे शिव हा सर्व सामान्यांचा आवडता असा देव आहे.

महादेव अर्थात भगवान शंकराच्या १२ ज्योतिर्लिंगाच्या तेजोमय व पवित्र स्थानांचे



महत्व अथांग आहे. सर्व स्थळांवर कलात्मक जुनी भव्य शिवालये उभी असुन समुद्री किनारी २, नदीच्या किनाऱ्यावर ३, उंच पर्वत शिखरावर ४ व मैदानी प्रदेशात लोकवस्ती जवळ ३ अशी ही १२ मुख्य ज्योतिर्लिंगे भारतात विखुरलेली दिसतात.

संपूर्ण भारतात सदरहु ज्योतिर्लिंगे कल्पितपैकी ६ वे महत्वाचे स्थान असलेले भीमाशंकर सृष्टी सौदर्याने नटलेले अत्यंत रमणीय व सुरेख असे धार्मिक क्षेत्र म्हणून जग जाहीर आहे. सह्यांद्री पर्वताच्या ज्या शिखरावर भीमाशंकर शिवस्थळ वसलेले आहे त्या शिखराला व अरण्याला डाकिनी असे संबोधतात.

मंदिराच्या वरील भागास मोठे पठार असून श्रीक्षेत्र भीमाशंकर शिवमंदीर दर्शनास दगडी पायरी मार्गाने, टप्प्या टप्प्याने खोल उतरावे लागते. जसे पाताळात जातो असा भास होतो. मंदिराजवळील दगडी कुंडातूनच भीमानदीचा उगम झाला आहे. लगतच डाकिनी, शाकिनी व पंचदेवाचे मंदिर आहे. नाना फडणवीसांच्या काळात बांधलेले समोरच् हेमाडपंथी मंदिर असून १२ ज्योतिर्लिंगापैकी एक आहे. मंदिराचा मोठा गाभारा असून त्यात मोठी महादेवाची पिंड आहे. जवळच श्रीराम मंदीर, साक्षी विनायक मंदीर, गुप्त भीमा, कमळजा देवी मंदीर वसलेली आहे.

शिवलिंगाच्या दर्शनाने, पुजनाने सर्वांची स्त्री पुरूषांची दु:ख व अज्ञानरुपी अंध:कार नष्ट होतो. अर्पण केलेला प्रसाद ग्रहण केल्याने सर्व पापांचे परिमार्जन होते. मनुष्य जीवन पुण्यमय, शांतीमय, सार्थक, कृतार्थ, सुखी व समाधानी होते अशी श्रध्दा आहे. प्रत्यक्षात भक्तीरुपाने प्राप्त झाल्याची अनुभुती येते अशी अख्यायिका आहे.

१९८५ पासून अभयारण्य म्हणून घोषित केलेले असून आजही तेथे घनदाट जंगले आढळतात. त्यांचे एकूण अभयारण्य

क्षेत्रफळ १३० चौरस कि.मी. आहे. पुणे शहरापासून श्रीक्षेत्र भीमाशंकर संस्थान, भोरगिरी ता.खेड जि.पुणे हे सुमारे १२५ कि.मी.अंतरावर असून तीर्थक्षेत्राबरोबरच पर्यटनाला आनंदमय करणारे अत्यंत आकर्षक व पौराणिक असे हे स्थळ आहे. पुणे येथून जातांना प्रथमत: राजगुरू नगर, मंचर, तळेघर तद्‌नंतरच श्री क्षेत्र भीमाशंकर येईल. खेड तालुक्यातील थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिध्दीस आलेले आहे.

भीमाशंकर येथे वाहनाने जातांना



डोंगराच्या घाटातून, वनराईच्या हिरवळीतून वळण घेत शरीराला झोंबणारा थंडगार वारा याचा विशेष आनंद लुटता येतो, अनेक चंदनाची, सागवानची व पळसाची झाडे बघावयास मिळतात. खडकाळ जमिनीतून वाहणारे असंख्य लहान सहान पाण्याचे झरे न्याहळत भरपूर नैसर्गिक सौंदर्याचा आस्वाद घेत रंगीबेरंगी अनेक सुंदर फुलांचे अप्रतिम दर्शन घडते. अभयारण्य परिसरात बॉम्बे पॉइंट, वनस्पती पॉइंट, कोकण कडा, नागफणी कडा सोबतच हनुमान तळे, अंजनीमाता मंदिराचेही दर्शन होते. मार्गाने अनेक धोकादायक वळणे, डोळ्यांना भिववणारे उंच उंच कडे पाहावयाला मिळतात. समुद्रसपाटीपासून हे स्थळ ११४० मीटर उंचावर असून येथे पाऊसही भरपूर प्रमाणात पडतो.

अभयारण्यात झाडा झुडपांच्या सानिध्यात आश्रय घेणारे अनेक वन्य प्राणी जसे सरडे, मुंगूस, साप, खवले मांजर, मोर, लाल व काळसर मुखी असलेले वानरं, कोल्हे, लांडगे, बिबट्या, वाघ, रानडुक्कर, ससे, तरस आदी प्राणी गर्द झुडपातून रांगून रात्री पानथळ स्थळी विसावतात. अभयारण्यातील विशेष वैशिष्ट्यपूर्ण शेकरू खारी (तांबूस रंगाची) जगप्रसिध्द आहे. येथील जंगलात निलगिरी, चिंच, कडुनिंब, शिरिष, राणजाई, अर्जुन, धावडा, टेंभुर्णी, सातपर्णी, तेंदू, बेल, बिबा, महारुख,बाभूळ, पांगरा, पळस, अंजन, जांभूळ, भेंडी, उंबर, आंबा इत्यादी अनेक निरनिराळ्या वृक्षांचीही रेलचेल बघावयास मिळते.

सृष्टी सौदर्य व संपत्तीने ओतप्रोत

भरलेले जंगल बघून एकंदरित पर्यटकांचे मन उत्साही होते. सोबतच मोह, पिंपरी, खैर, शिवण व बांबू वाढवून त्यांच्यापासून येथील लोक आवडीने अनेक उपयुक्त वस्तू बनवितात. लपेटलेल्या असंख्य वेली, गर्द जंगल, जंगलात धावडा, कुडा, मुसळी, हळद, जटामासी तसेच नॉनोथॉमनस, सेशागिरिया व पॉराकॉरी ऑप्सिस अशा अनेक औषधी वनस्पती सोबतच कुणी मध तर कुणी डिंक गोळा करतांना दिसतात.



फेसाळणाऱ्या पाण्यांचे तुषार, अत्यंत नयनरम्य असे धबधबे मनाला मोहित करतात. येथे वृक्षांची तोड नसल्याने जंगलातील अनेक वर्षांच्या वृक्षांची महावृक्षे झालेली असल्याचे आढळते. वादळवाऱ्यामुळे काही वृक्षे कोलमोडून पडल्याने रस्त्यावर शोभीवंत अशा नैसर्गिक कमानी तयार झालेल्या दिसतात. मार्गावर अनेक पाखरांची लटकती घरटी, गर्द वृक्षांच्या फांदीतून हळूवार डोकावणारे निळसर, निरभ्र आकाश, मध्येच, वाफेने भरलेले पांढरे ढग व त्यातून शरीराला हळूवार स्पर्श करणारा गारवा अत्यंत सुखद वाटतो. सदरील परिसरास वनश्रीचे एक अनोखं वरदान प्राप्त झालेलं असल्याचे जाणवते.





# माझा ऑस्ट्रेलिया प्रवास...



## एक अविस्मरणीय अनुभव

सौ. नलिनी कोळी
१०, वृंदावन सोसायटी, मॉडेल इंग्लिश स्कुल, पांडुरंगवाडी, डोंबिवली (पुर्व)
मो.नं. : ८१०८५७६३५५

आतापर्यंत मी अनेक परदेशी प्रवास केले, पण ऑस्ट्रेलियाचा महिला विशेष असा प्रवास होता की, मी कधीच विसरु शकत नाही. म्हणून ऑस्ट्रेलियावर लिहिण्याचा हा छोटासा प्रयत्न ! ही प्रेरणा मला माझे फॅमिली डॉक्टर श्री. सुनिल कवठे यांच्याकडून मिळाली.

आम्ही चाळीस अतिथींनी विणा वर्ल्डसोबत ऑस्ट्रेलियासाठी प्रस्थान केले, तेव्हा आमच्या मनात COVID-19 ची भीती. संपूर्ण जगात कोरोनाने थैमान घातले होते. वाटले होते जाऊ नये. पण असा योग परत कधी येईल हे माहित नव्हते. म्हणून आम्ही सगळयांनी मुंबई विमानतळावर ठरवले की आता आपण ऑस्ट्रेलियाचा प्रवास आनंदात करायचा आणि बाकि कसलाही विचार करायचा नाही.

प्रवास लांबचा होता, जवळजवळ १५ तासांचा ! आम्ही पहिल्यांदा चेन्नईला उतरलो, नंतर Via सिंगापूर आम्ही मेलबर्न विमानतळावर उतरलो तिथले वातावरण पाहून मन एकदम प्रसन्न झाले. आणि मनातली भीतीही नाहिशी झाली. आम्ही आनंदाने मेलबर्नची प्रेक्षणीय स्थळे बघण्यास सुरुवात केली.

मेलबर्न हे शहर यारा नदीच्या तीरावर वसले आहे. हे शहर २५ जून १८५० साली वसवले असून हे शहर व्हिक्टोरियाची राजधानी आहे. आणि लोकसंख्या जवळपास ५० लाखांच्या आसपास आहे.

पहिल्यांदा आम्ही सेंट पॉट्रिक कथेड्रलला गेलो नंतर नगर भवन (Townhall), संसद भवन (Parliament House) त्याचबरोबर फिटझो गार्डन (Fit



Garden) सुध्दा बघितले. हे एक Victorian पद्धतीचे गार्डन असून येथे विविध प्रकारचे तलाव, कारंजी, शिल्पकला आणि खूप मोठे वृक्ष आहेत. त्यानंतर आम्ही Captain Cook Cottage बघितले. हे नाव जेम्स कुक या Royal Navy Captain यांच्यावरुन देण्यात आले. जेम्स कुक हे एक नकाशा तयार करणारे शोधक प्रवासी होते. त्यांनी सगळयात पहिल्यांदा

महासागराचा अचूक नकाशा काढून ब्रिटिश साम्राज्याला ऑस्ट्रेलियाची दारे खुली करुन दिली.

नंतर आम्ही ऐतिहासिक सिटी सर्कल आणि सेंट्रल मेलबर्न पाहीले. आमची (Tram) ट्रमची फेरी फेडरेशन स्क्वेयरला संपली. हा एक मध्यवर्ती चौक असून या इमारतीचे स्थापत्य अतिशय वेगळे आहे. सार्वजनिक कार्यक्रम, कला, संस्कृती यासाठी हे प्रसिध्द असून कोणत्याही महत्वाच्या प्रसंगी लोक येथे जमतात. संध्याकाळी आम्ही **George Bass** या प्रवाशाने शोधलेल्या फिलिप **(Philip)** बेटावर गेलो. तेथे लहान पेंग्विन समुद्र किनारपट्टीवर येतात आणि आपल्याला जगप्रसिध्द पेंग्विन परेड पहायला मिळते.

जगातील सर्वांत सुंदर आणि नैसर्गिकता जपलेले ठिकाण म्हणजे द ग्रेट ओशन रोड इथे आम्ही हेलिकॉप्टरमधून १२ अपोस्टलस्, शिपव्रेक कोस्ट आणि पोर्ट कॉम्पबेल नॉशनल पार्क बघण्याची एक अपूर्व संधी अनुभवली. ही हेलिकॉप्टर राईड तर अगदी स्वप्न असल्यासारखेच होती आणि ती माझ्यासाठी अविस्मरणीय आहे.
सायंकाळी आम्ही मेलबर्न क्रिकेट मैदानावर गेलो. ICC-T20 महिला विश्वचषक अंतिम सामना बघण्याचा योग आला. ही उत्सुकता



काही वेगळीच होती. मी कधी स्वप्नात सुध्दा विचार केला नव्हता की मी मेलबर्न स्टेडियममध्ये विश्वचषक सामना बघणार. हे क्षण कधीही विसरण्यासारखे नाहीत. मी ते माझ्या मनात जतन करुन ठेवले आहेत. मेलबर्न क्रिकेट मैदान फुटबॉल खेळण्यासाठीही प्रसिध्द आहे. हे मैदान जगामध्ये अकराव्या स्थानावर आहे.

त्यानंतर आम्ही ऑस्ट्रेलियाच्या क्वीन्सलँड या राज्यातील सर्वांत मोठे शहर म्हणून प्रसिध्द असलेल्या केर्न्सला गेलो. येथे ग्रेट बॅरियर रिफ प्रसिध्द आहे. ग्रेट बॅरियर रिफ हा जगातील सर्वात मोठा रीफसमूह आहे आणि हे जगातील सात नैसर्गिक आश्चर्यपैकी एक आहे. येथे आम्ही जगातील सर्वांत पारंपारिक उष्णकटिबंधनीय कुरांडा

रेनफॉरेस्ट पाहिले. येथे आम्ही 7.5 km लांब असलेल्या स्कायरेल रेनफॉरेस्ट केबलवेने Barron Gorge National Park आणि धबधबे बघण्याचे नेत्रसुख घेतले. संध्याकाळी Aboriginal Cultural मध्ये Boomerrang कसे फेकायचे हे शिकलो.

त्यानंतर आम्ही Gret Barrier Reef जे ऑस्ट्रेलियाच्या कोरल समुद्रात स्थित आहे त्याची मनसोक्त आणि संपूर्ण सैर केली. तसेच इथे आम्ही स्कुबा डायव्हींग, स्नोरकेलिंग यासारख्या अनेक साहसी खेळांचा आनंद अनुभवला.

यानंतर आम्ही क्वीन्सलँडची राजधानी असलेले सर्वांत मोठे शहर 'ब्रिस्बेनला' पोहोचलो. हे ब्रिस्बेन नदीच्या काठावर वसले आहे. येथील लोकप्रिय असलेले South Bank Waterfront तसेच Town Hall अशी अनेक उल्लेखनीय ठिकाणे पाहिली त्यानंतर आम्ही Gold Coast कडे वळलो. जे जागतिक दर्जाचे एक प्रमुख पर्यटन स्थळ आहे आणि इथले सर्फिंग बीच, थीम पार्क, नाइटलाईफ हे सर्व बघण्यासारखे आहेत. इथे Surfer's Paradise Beach अतिशय सुरेख आहे. बीचवर आम्ही खूप आनंद लुटला.

त्यानंतर आम्ही कुरंबिन वन्यजीव अभयारण्याची सैर केली. इथे ऑस्ट्रेलियन वन्यजीवाचा एक अनोखा अनुभव आम्हाला मिळाला. येथे ऑस्ट्रेलियन मूळ प्राणी आणि पक्ष्यांच्या अनेक प्रजाती आहेत. प्रचंड मोठया कळपाने कांगारु येथे वावरतात तसेच कोआला, अस्वल असे बरेच प्राणी आहे.

यानंतर आम्ही सिडनीला पोहोचलो. सिडनी हे शहर टास्मान समुद्राच्या



किनाऱ्यावर वसले आहे. येथे ओपेरा हाऊस आणि सिडनी हार्बर ब्रीज अशी प्रेक्षणीय स्थळे आम्ही बघितली. तसेच आम्ही येथील प्रसिध्द असे बोंडी बिच पाहिले.

ओपेरा हाऊस बद्दल थोडक्यात म्हणजे हे सिडनी शहरातील एक बंदिस्त नाटयगृह

आहे. हे जर्न उत्झोन या डॉनिश स्थापत्यकाराने कल्पनेने बांधले आहे. ओपेरा हाऊसमध्ये नृत्य, नाटके, ऑपेरा संगीत असे अनेक कार्यक्रम होतात. हे जगातील सर्वात वर्दळीच्या नाटयगृहांपैकी एक आहे. वर्षामध्ये जवळजवळ १५०० कार्यक्रम आयोजीत केले जातात. ओपेरा हाऊस हे ऑस्ट्रेलियातील सर्वात मोठे पर्यटक आकर्षण केंद्र आहे. तसेच हे जवळील सिडनी हार्बर ब्रीजसोबत ते सिडनी व ऑस्ट्रेलियाच्या सर्वात मोठया खुणांपैकी एक



मानले जाते. संध्याकाळी आम्ही जहाजावर रात्रीचे जेवण केले आणि रात्रीच्या वेळी ओपेरा हाऊस खूपच छान दिसत होते हा अनुभव काही निराळाच होता.

अशा रितीने आम्ही आमची ऑस्ट्रेलियाची सहल संपवली. तेथील ९ दिवस कसे संपले हे आम्हाला कळलेच नाही. मनसोक्त खरेदीचा आनंद लुटला. ऑस्ट्रेलियामधील प्रत्येक शहर लांब असल्यामुळे आमचा सर्व प्रवास विमानानेच झाला.

आमचा परत येण्याचा दिवस उजाडला तेव्हा मात्र आमच्या मनावर खूप तणाव आला. कारण आमचा प्रवास सिडनी ते बँकॉक आणि मुंबई असा होता. कोरोना व्हायरसचा आजार जगभर पसरत होता. त्यामुळे आम्ही सर्वजणी घाबरलो होतो पण वीणा वर्ल्डने आम्हाला खूप धीर दिला. शेवटी आम्ही मास्क आणि सॅनिटायझरचा वापर करुन मुंबई विमानतळावर पोहोचलो.

विमानतळावर आमच्या सगळयांचे **Temperature** मोजले आणि आम्ही सहिसलामत विमानतळाच्या बाहेर आलो आणि अशा रितीने आमच्या सहलीचा पूर्णविराम झाला.



# नी हाव ! (हॅलो)...



## शेजारचे देश

श्रीमती माधवी कुलकर्णी,
पत्ता - १३, श्रीप्रसाद को-ऑप. हौ. सोसायटी लि.,
ब्राह्मण सोसायटी, नौपाडा, ठाणे (प.)-४००६०२. मो.नं.९८३३८८२१५०

आपल्या मायभूमीच्या शेजारचे देश प्रथम बघायचे, शेजाऱ्यांना जाणून घ्यायचं या नियमाला जागून, आम्ही कुटुंबीय मागल्या वर्षी हार्बर सिटी, इंटर नॅशनल कॉमर्स सेंटर, अशा जगप्रसिध्द हाँगकाँगला जायचं ठरवलं! माहिती गोळा करतांनाच स्वच्छ समजलं की आपली आठवडाभराची भेट चुटपटती असणार! एवढं सगळं अनुभवायला, पहायला वेळ कमी पडणार! शहर, बेटं, इमारती, प्रवास, अन्न खरेदीचे गणित कसे जमणार? पण, लगेच कामाला लागलो. नेट वरुन ई व्हिसा मिळवला, विमानाची तिकीटं काढली, हॉटेल बुकींग केलं आणि बॅगा भरायला घेतल्या! सर्व सोपस्कार पार पाडून, प्रवास सुरु झाला. छोटया डोळयांच्या एअर-होस्टेसनी सगळयांना खाऊ-पिऊ घालून निवांत केलं. कॅप्टनची हाक ऐकून सारे जागे झाले. चिनी वा युरोपिअन ब्रेक फास्ट हवा, असे विचारण्यात आलं. मी चिनी ब्रेक फास्ट मागवला. त्यात काँजी, नूडल्स व ग्रीन टी मिळाला. विमान एका अगदी चिंचोळया बेटाच्या, चेक-लॉप-कोक या विमानतळावर लिलया उतरले. हा एक जगप्रसिध्द नावाजलेला विमानतळ आहे. सर्व सोपस्कार अगदी शांतपणे - चटदिशी पार पडले. आता आम्हाला विमानतळाच्या बाहेर जाण्यासाठी, एक चालक विरहीत छोटी ट्रेन आली.



सामानासह ती आपल्याला वेगाने विमानतळाच्या दरवाज्यापाशी पोहचवते. स्वयंचलीत दरवाजे, उभं रहायला भरपूर जागा, बाहेर बघायला मोठाल्या खिडक्या पाहून टेक्नॉलॉजीत पुढे असणाऱ्या देशाची चुणूक दिसली. बाहेर शहराकडे जायला, टॅक्सी-बस, एअरपोर्ट एक्सप्रेस अशा ट्रान्सपोर्ट असतो. एअरपोर्ट एक्सप्रेस आरामदायी, स्वच्छ आणि वेगात दौडत आम्हाला सेंट्रल या प्रसिध्द भागात घेऊन आली. तिथून टॅक्सीने आम्ही हॉटेलवर पोहचलो.

हाँगकाँग मधे शिरतांना जाणवते व आवडते ते इथल्या वाहतूक व्यवस्थेचे जाळे ! मेट्रो-बस, मिनी बस, टॅक्सी, रेड बस तर आहेतच पण इथे एक विशेष गोष्ट आहे, ती म्हणजे ट्रम ! शहराच्या एका टोकाकडून दुसऱ्या टोकाकडे नेणारी, गरीबालाही परवडणारी, शहराच्या अंतरंगातून धावणारे

ट्रम रुट सोपे आणि सुरक्षित आहेत ! टॅक्सी सोडता आपण ऑक्टोपस कार्ड या सर्व ट्रान्सपोर्ट मधे वापरु शकतो. हे ऑक्टोपस-कार्ड अगदी सोइस्कर आहे. काही दुकानांमधेही चालते. गंमतीची गोष्ट म्हणजे काही स्टेशन्सवर, ब्रीजवर ते तुम्हाला काही पैसे चकटफु भरुन देते.

प्लॅनप्रमाणे आम्ही प्रथम पिक या प्रेक्षणीय स्थळाला निघालो. ट्रमने प्रवास करुन आम्ही एका टेकडीच्या पायथ्याशी पोहचलो. तिथून एक विशेष पिक ट्रम घ्यावी लागते. ती म्हणजे इंजिनिअरींगची कमाल आहे. अक्षरश: तिरकी होऊन ती डोंगर चढते. मोठाल्या खिडक्यांतून दिसणाऱ्या, इमारती, निसर्ग बघत हा मजेदार प्रवास कधी संपला कळलेच नाही. काही ट्रेकर्स चढून येतांना दिसले. इथला ट्रेकींग ट्रेलही अप्रतिम आहे. पण, वेळेअभावी आम्ही तो मोह टाळला. एका पटांगणात देखणी पिक टॉवर उभा होता. एखाद्या कढईसारखा या इमारतीचा आकार आहे. या टॉवरवरुन एका अद्‌भुत रम्य असं, हाँगकाँग शहराचं, व्हिक्टोरिया हार्बरचं, निसर्गाचं दृश्यं दिसते! प्रसिध्द इमारती तुम्हाला सहज ओळखू येतात! तुम्ही सर्व गॅलरीभर फिरु शकता, दुर्बिणीतून पाहू शकता, फोटो काढू शकता! इमारतीमध्ये अनेक उत्तम रेस्टॉरंटस्, दुकाने आहेत! आपलं कलासक्त मन मोहून जातं!

व्हिक्टोरिया हार्बर हे हाँगकाँगचं वैभव आहे! निळयाशार पाण्याच्या किनारी



एकीकडे हाँगकाँग शहर तर दुसऱ्या काठावर काऊलून आहे. यात अनेक बोटी ये-जा करतात. स्टार फेरी आपल्याला दुसऱ्या किनाऱ्यावर नेते-आणते, तेव्हा शहर अप्रतिम दिसते! जंक बोट नावाच्या शिडवाली होडीचे अत्यंत जुनी मॉडेल, आपल्याला सफर घडवते. आपण येथे बोटी भाडयाने घेऊन दिवसभर फेरफटका मारु शकतो, गंमतीत गळ टाकून मासेमारी करु शकतो! तीरांवरही काही मोजकी मंडळी गळ टाकून आरामात बसलेली दिसतात. काही लक्झरी बोटीसुध्दा डौलाने आत-बाहेर करत असतात. विखुरलेल्या अनेक बेटांवर बोटींनी आपण जाऊ शकतो. शाळा-ऑफीससाठी रोज बोटीनें प्रवास करणारे आहेत. रात्रीच्या वेळी रोज मोफत सिंफनी ऑप लाईटस हा सुरांवटीवर चालणारा लेझर

किरणांचा शो असतो. नभावर अनेक रंगीत दिव्यांनी, रांगोळया काढत हा नयनरम्य खेळ दिसतो.

हाँगकाँग मधली म्युझियम्स जरुर पहायला हवी. विशिष्ट दिवशी ती विनाशुल्क पहायला मिळतात. काऊलून परिसरात - हाँगकाँग म्युझियम आहे. अनेक सुंदर चित्र-शिल्पांचा संग्रह आहे. हिस्ट्री म्युझियममध्ये या देशाचा इतिहास ते वर्तमानाचा आढावा



आहे. सायन्स म्युझियम तर इंटरॲक्टीव्ह आहे. आपण स्वत: प्रयोग करुन पाहू शकतो. अनेक शाळांच्या ट्रीप्स आल्या होत्या व विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर कमालीची उत्सुकता दिसत होती! तेथील टी म्युझियमही माहितीपूर्ण आहे. चहाचे प्रकार, त्यांचे महत्व ते अगदी तो साग्रसंगीत कसा प्यावा इथपर्यंत मजेदार माहिती मिळते. या सर्व म्युझियम्सच्या बाहेरील दुकानांत छान छोटे मोमेंटोज मिळतात, त्या जरुर घ्याव्या.

काऊलून काठावर - शिम-शा-शू परिसरात ॲव्हन्यू ऑफ स्टार्स आहे. ब्रूस ली, जॉकी चेन वगैरे प्रसिध्द स्टार्सचे पुतळे व त्यांच्या हातांचे सिमेंटमध्ये ठसे आहेत. त्यांच्याबरोबर सेल्फी इज अ मस्ट! क्लॉक टॉवरही याच परिसरात आहे व त्यामागील भिंतीवर एक अप्रतिम भित्तीचित्र आहे. याच्या बरोबर समोरील काठावर हाँगकाँग ऑब्जरव्हेशन व्हील आहे म्हणजे मेरी गो राऊंड!

गंग हे फॉट चॉय! हे काय अगम्य वाक्य लिहीलंय, असं वाटलं ना? अहो, मी तुम्हाला कॉन्टनीज भाषेत, नव वर्ष शुभेच्छा दिल्या! ते चांद्रीय कॅलेंडर वापरतात, त्यानुसार त्यांचे सणवार येतात. नवीन वर्षाचा सण, २० जानेवारी ते २० फेब्रुवारी या दरम्यान कधीही येऊ शकतो. हा सण चांगला पंधरा दिवसांचा असतो. याचे वैशिष्टय म्हणजे प्रत्येक वर्षाला प्राण्याचे नाव असते. असे १२ प्राणी आहेत. मागील वर्ष, उंदीर वर्ष होते. उंदीर हा हुशार, विचारी, संधीचा उपयोग करणारा, खूप प्रसवणारा, शांतताप्रिय प्राणी आहे. तुम्ही कोणत्या प्राण्याच्या वर्षी जन्माला आलात यावर तुमचे आरोग्य, नाते संबंध, सुबत्ता वगैरे ठरते, असे मानले जाते. याला स्प्रींग फेस्टीवल ही म्हणतात. शेती फलदायी होण्यासाठी प्रार्थना करतात. शीम सू सा, ला छान मोठी परेड

होती. फ्लोटस् ऑर्केस्ट्रा, नाचणारे ग्रुप्स याने धमाल उडवून दिली होती. हार्बर फ्रंटवर आभाळात लेझर किरणांनी सुंदर रांगोळया घालत फटाके फुटत होते. त्यावर जमलेला प्रचंड जनसमुदाय आनंदाने चित्कारत होता. फटाक्यांनी दुष्ट आत्मे पळून जातात म्हणे! विविध आकाराचे-कमळ, मासा, ड्रगन, लाल कंदीलाने, शहर लालम-लाल झाले होते. कंदील हे आशा, यश, आनंदाचे



प्रतिक मानले जाते. नवदाम्पत्याला कंदील भेट देण्याची प्रथा आहे. कंदिल जाळून त्याच्या राखेच्या आकारावरुन नवे येणारे बाळ, मुलगा की मुलगी हे सुध्दा समजते, असे मानतात. वयाने, मनाने मोठी माणसं- लहानांना रेड पॅकेटस पैसे घालून देतात. ऑफीसातले बॉसेसही ज्युनिअर्सला ही भेट देतात. मस्त कमाई! दिवसा घरातला कचरा बाहेर टाकत नाही. कारण, गुडलकही फेकलं जाईल!! केस न कापणे, धारदार वस्तू न वापरणे, वस्तूंची मोडतोड न करणे हे पाळले जाते. जगभरात विखुरलेले हाँगकाँगवर घरी परतात. आपल्या सारखं त्यांचे पालक, सहचरी वा सहचरीणी शोधली का विचारतात तेंव्हा एखादी मैत्रिण वा मित्र भाडयाने घेऊन जातात, वरकमाईची कल्पना!

या सुमारास मला आवडलेल्या दोन गोष्टी म्हणजे लायन डान्स व ड्रगन डान्स! सिंहाचा मुखवटा व कापडी कातडं पांघरुन हा सिंह सोबतच्या वाद्यवृंदाच्या ठेक्यावर धमाल नाचतो. आपला जबडा उघडून खायला पैसे मागतो. तसंच उंच काठयांवर भला लांब लचक ड्रगन सुध्दा वाद्य वृंदाच्या तालावर आपले अंग नागमोडी हलवत, कधी डोकं तर कधी शेपटी उभारत डौलदार नाचतो. याचा नाच पहाणाऱ्या गर्दीजवळ येऊन त्यांना आशिर्वादही देतो. ड्रॅगन्स घरांत, दुकानांत, ऑफीसमध्ये आमंत्रण देऊन पैसे ठेवलेल्या जागांना आशिर्वाद मागतात त्यांची प्रथा आहे. प्रथम मी जेव्हा हे डान्स पाहिले, तेव्हा खुळावल्यासारखी त्यांच्या मागे खूप लांब चालत गेले, हे आज आठवून खूप हसू येतय!

हाँगकाँग मधली देवळंही बघण्यासारखी आहेत. त्यांचे देवही बारीक

डोळयांचे, लाल नक्षीदार कपडे घातलेले असतात! त्यांची प्रार्थना म्हणजे पाय मुडवून जमिनीवर बसून, हातात फूटभर लांबीची उदबत्ती घेऊन, कमरेतून वारंवार लवणे! फळे, फुले वाहतात. रेटारेटी गडबड, आवाज मात्र नसतो. नवसाच्या उदबत्त्या चांगल्या ३ फुटी, आईसक्रीम कोनासारख्या असतात आणि त्या १५-२० दिवस जळतात. एकदा वरती टांगलेल्या उदबत्तीची राख माझ्या कोटावर पडली. मी वैतागलेली पाहून एक गृहस्थ मिश्किल हसत म्हणाले, अहो, हा शुभसंकेत आहे. मलाही नकळत हसू फुटले. मॉन-मो-टेंपल हॉलीवूड रस्त्यावर आहे. हे एक नॉशनल मॉन्यूमेंट आहे. इथे साहित्याचा देव व युध्दाचा देव आहे. एकाच देवळात हे दोघे एकत्र नांदतांना पाहून मौज वाटली. या देवळाच्या दाराबाजूला ज्योतिषीही होता. हॉलीवूड रस्त्यावर अनेक अँटीक शॉप्स आहेत. टेन थाऊझंड बुध्दा मॉनेस्टरी अतिशय देखणी आहे. हाँगकाँगला कोळयांच्या देवतेचे देऊळही आहे.

हाँगकाँगला लॉन्टाऊ आयलंड आहे. त्यावर जगप्रसिध्द सर्वात मोठया बसलेल्या बुध्दाची ब्राँझची मुर्ती आहे. त्याला बीग बुध्दा असेही म्हणतात. उंचावर असल्याने तो लांबूनही दिसतो. भरपूर पायऱ्या चढून जावे लागते. शेजारी अतिशय प्रसिध्द व महत्त्वाची पोलीज मॉनेस्ट्री आहे. पायथ्याशी नॉन पिंग खेडयात अगदी अधिकृत बुध्दिस्ट



शाकाहारी जेवण मिळते. या आयलंडला जातांना, केबल कारने जावे म्हणजे सुंदर देखावे दिसतात. इथल्या सुंदर बीचची मजा घेता येते! पण पाणी थंडगार असते. डॉल्फीन पहायला मिळतात. इथे ट्रेकींग ट्रेल्स ही आहेत.

मंडळी हिंडून-फिरुन दमलात नं चला तर मग पोटपुजा कशी असते पाहू! शहरभर अनेक उत्तम रेस्तरॉज आहेत. तसेच छोटी दुकाने व हातगाडयाही आहेत. चायनीज, कॉन्टोनीज, एशियन, कॉन्टिनेन्टल पदार्थ इथे मिळतात. अधिकृत चायनीजमध्ये मसाले वा फारसे तिखट नसते. बरं कां! रेस्तरॉमधे विविध प्रकारचे ग्रीन टी मिळतात. प्रथम सर्द केलेल्या चहाने आपले बाहुल्स, चॉपस्टीक्स विसळून दयायचे असते म्हणे! चॉपस्टीक्स कशा धराव्या, घास कसा घ्यावा असे नियम

आहेत व ते पाळावे, अशी अपेक्षा असते. तेव्हा जातांना होमवर्क करुन जा!

ब्रेकफास्टला मस्त कॉंजी मिळते. त्यात अनेक भाज्या व चवदार भाताच्या पाण्याबरोबर, दाटसर सूप असते. डंपलिंग्जचेही विविध चविष्ट प्रकार असतात. एक तर मोदका सारख्या डंपलिंगमध्ये मस्त खूप होते! स्प्रींग रोल्स, न्यूडल्स स्टेपल फूड! शाळकरी मुलं शाळा सुटल्यावर चणे, शेंगदाणे न खाता काडीला टोचलेलं फिश बॉल्स-चिकन बॉल्स सॉसबरोबर खात घरी जातात. इथला मिल्क टी म्हणजे टी कमी, मिल्क पावडर जास्त, खूप दाट व त्यात वेगळी छोटी फ्रुटस वा सब्जा टाकलेला



असतो. खूप व्हरायटी असते. एक ग्लासात पोटच भरते! इथले सोयामिल्कही मला आवडले. तसंच आवडलेला प्रकार म्हणजे हॉट-पॉट! एका गोल-खोल कढईत, दोन भाग केलेले असतात. त्यात दोन वेगवेगळी सुप्स उकळत असतात. व हे आपल्या टेबलवर असते बरं का! आपण मोठया टेबलवर मांडलेल्या आवडणाऱ्या भाज्या व मास हे तेवढे घेऊन यायचे. आणि समोरच्या हॉट-पॉटमधे शिजवायचे-खायचे! हवे असल्यास सर्व अर्क उतरलेले सूपही प्यायचे! गप्पा-गोष्टी करत हे जेवण अगदी २-३ तास चालते. इथे ब्रेडचीही भरपूर व्हरायटी मिळते. पेस्ट्रीज-केक्स सुमसुमीत गोड असतात, पण मऊ लुसलुशीत क्रीमचा स्वाद खुश करुनच टाकतो. मून केक इथे विशेष प्रसिध्द आहे. नूडल्सचेही खूप प्रकार पहायला मिळाले. ग्रीन टी चे खूप प्रकार मी खरेदी केले. मला जस्मीन टी खूप आवडलं! एकदा बाजारात फिरतांना अंडयांच्या दुकानासमोर उभी होते. लहान-मोठी, पांढरी-तपकीरी नीळी अंडी पाह्यली व त्यात राख लावलेली अंडी पाहून हे काय? असा विचार करत उभे होते. भाषेचा अडसर न् काय! एक तुकतुकीत चेहऱ्याच्या आजीबाईला माझा बघण्याचा अर्थ समजला. तीने एक शब्द उच्चारता व्होलकॉनो! मला कळले. ज्वालामुखीच्या राखेत भाजलेली ही अंडी होती! हसत-हातवारे करत तिने सांगितले चीप! आज स्वस्त आहेत घे! मी ही हसू लागले व चाखायला दोन-अंडी घेतली.

ती उघडल्यावर पांढऱ्या भागावर एक राखाडी रंगाचा थर होता व अंडे खारट होते! मजा वाटली! तसंच इथलं स्नेक सूप अतिशय आरोग्यदायी व नजाकतीचे मानतात! धीर करुन ऑर्डर दिली व रस्त्याकडे बघत बसले. एक वाफाळता बाऊल आला व त्यात कुठेही फुस्सचा लवलेश दिसला नाही. जे तुकडे होते ते चिकनसारखे तलम-अलवार होते! मी त्या जगप्रसिध्द दुकानदाराचे आभार मानत बाहेर पडले. सणासुदीला तुम्ही काय शिजवता याला अर्थ असतो. उदा. अंडी म्हणजे सुदृढ कुटुंब, लॉबस्टर, श्रींप, मासे म्हणजे पैसेवाले, भाजलेले डुक्कर म्हणजे शांत - समंजस कुटुंब, बदक म्हणजे लॉयल्टी, चिकन म्हणजे एकसंध! टोफू म्हणजे आनंद, भाज्या, सीवीड, कमळकळी, मशरुम, बांबू यांनाही वेगळे अर्थ आहेत. असली सगळी मजा-खाऊनही इथली मंडळी अगदी स्लीम-ट्रीम तुकतुकीत चेहऱ्याची, वय लपलेली कशी, याचाही शोध लागला. इथे विविध फंगसचा वापर जेवणात असतो. घ्या! पोट भरल्यावर करायची असते खरेदी! इथे मोठमोठाले मॉल्स आहेत. तसे नाईट मार्केट आहे. नाईट मार्केट संध्याकाळी उगवते व पहाटे अंतर्धान पावते. दोन्हीकडे ब्रँडेड माल मिळतो. पण, किंमतीत घासाघीस मॉलमधे करता येत नाही, ती इथे करता येते. सेल्स टॅक्स नसल्याने किंमती योग्य असतात.



व्हरायटी बघूनच आपला मोह ताब्यात ठेवणे अशक्य बनते. टुरिस्ट भरपूर खरेदी करतांना दिसतात. वांग-चाय, टेंपल स्ट्रीट मार्केट खूप लोकप्रिय आहे. नाही म्हणता म्हणता मी ही कपडे, पर्सेस, चपला, मेकअपचे सामान आणि परफ्युम घेतले. इलेक्ट्रॉनिक वस्तू इतर कुटुंबीयांनी घेतल्या. चॉकलेट, कुकीज, ग्रीन टी, गुड लकच्या वस्तू मित्र-मैत्रिणीसाठीही घेतल्या! खरा खरेदीचा आनंद मिळाला.

आठवडाभराच्या मोहमयी हाँगकाँग ट्रीप नंतर घरी पोहचलो. दाल खिचडी खाऊन, गुंगलेल्या डोळयांनी परत जायची स्वप्न बघत, दुलई लपेटून शांत झोपून गेलो! पण आज हे सर्व लिहितांना कित्येक प्रसंग, आठवणी, पुन्हा ताज्या झाल्यात व अगदी प्रसन्न वाटतयं!



# च्याओ इटालियानो !!!



## इटली भटकंती

अमृता करकरे

हेमश्री अपार्टमेंट, फ्लॅट नं. १०२, हॉटेल अँब्रोसिया समोर, परांजपे ग्लोरिया जवळ, भुगाव रोड, वावधन खुर्द, पुणे - ४११०२१

जगाच्या पाठीवर कुठेही जा, पळसाला पाने तीनच, मनुष्य स्वभाव कसा तर सर्वत्र सारखाच. अशी वाक्यं नेहमी ऐकायला मिळतात. परंतु गेल्या वर्षी केलेल्या



इटलीमधील भटकंतीत विविध देशातील लोकांना भेटल्यानंतर त्यांच्यातील स्वभाववैशिष्ठ्ये ठळकपणे जाणवली.

अमेरिकेतील भ्रमंतीत दिसतात स्वमग्न अमेरिकन्स. आपापसात फारच कमी संबंध. दोन वर्षांपूर्वी अमेरिकेत तब्बल तीन महिने राहिल्यानंतरही शेजारी कोण राहतं हे समजायला मार्ग नव्हता. कुतुहलापोटी सहजच चौकशी केली असता समजलं की, तिथे एक आजी राहते जी क्वचितच दिसते वा लोकांशी बोलते. रस्त्यावरुन फिरतांनाही क्वचित कोणी स्मितहास्य करेल पण त्यातही औपचारिकताच. बऱ्याचदा वाटतं की, ही माणसं किती स्वावलंबी आहेत. यांना दुसऱ्यांची कधी गरज भासत नसेल? नाही म्हणायला आपल्याकडेही विशेषत: मोठ्या शहरांमध्ये आता अशीच संस्कृती रुजत चालली आहे.

इटलीमध्येही थोडाबहुत असाच अनुभव येणार असं वाटलं होतं. पण ही भटकंती वेगळाच अनुभव देऊन गेली. तिथं भेटलेली मध्यमवर्गीय सामान्य माणसं दिलखुलास, मनमोकळी, उत्सवप्रेमी, सोहळयांचा आनंद घेणारी, संगीत-कला-नृत्यात रमणारी, आल्यागेल्यांना चाओ अशी हांक देऊन उत्स्फूर्त गळाभेट घेणारी, छंद जोपासणारी व प्राप्त परिस्थितीतही आनंद निर्माण करणारी वाटली, अगदी भारतीयांप्रमाणेच. फेसबुक, व्हॉटस्अप सारख्या आजच्या लोकप्रिय समाजमाध्यमांवर मित्रमैत्रिणींचा घोळका वाढविण्यापेक्षा अशा खऱ्याखुऱ्या मित्रमैत्रिणींची भेट किती आनंददायी असते याची अनुभूती या दौऱ्यानं दिली. तेथील निसर्गही आपल्याला बरचं काही शिकवित असतो. इटलीतील माणसं खरचं खूप साधीभोळी म्हणजे चटकन मदतीसाठी तत्परतेने हात पुढे करणारी. अशा लोकांना भेटल्यावर तुम्ही स्वत:लाही ओळखत जाता, स्वत:च्या मनात डोकावू लागतात. या अनुभवातून मला जाणवलं की, बऱ्याचदा आपल्याच धारणा उथळ असतात आणि त्या

वेळोवेळी तपासून घ्यायला हव्यात. त्यासाठी कदाचित पर्यटन हा सर्वोत्तम मार्ग असावा.

माझी ही भटकंती सर्वार्थाने वेगळी यासाठी म्हणता येईल कारण, निरनिराळया इटालियन कुटुंबांसमवेत राहून त्यांची संस्कृती, जीवनशैली मी अनुभवली. एका संघटनेच्या कॅम्पसाठी इटलीला गेले होते. पाच दिवसांच्या या आंतरराष्ट्रीय स्नेहमेळाव्यात १४ देशाच्या प्रतिनिधींबरोबर ओळख झाली. त्यांच्याशी झालेल्या मनमोकळया संवादातून त्यांचे विचार जाणून घेता आले. सांस्कृतिक आदान-प्रदान हाच मुख्य उद्देश असलेल्या या संघटनेच्या माध्यमातून इटली हा देशही मला सर्वांगाने बघता आला.

विविध देशांचे व्यक्तिवैविध्य, त्यांची जीवनशैली, संस्कृती, त्यांचे आचार-विचार, घरसजावट, आहार-विहाराची रीत जवळून अनुभवता आली. त्यांच्या मनातील भारत आणि भारतीय जीवनशैलीविषयीचे कुतुहल व आदरामुळे त्यांना बोलतं करणंही सोपं होतं.

वैभवशाली रोमन साम्राज्याच्या खुणा आणि समृध्द इतिहास पावलोपावली जपलेल्या इटलीमध्ये, व्हॉटिकन सिटीतील कलोझियम, त्यातील मायकेल अँजेलोची पेंटिंग्ज, पिसाचा झुकलेला मनोरा, व्हेरोनामधील रोमिओ-ज्युलिएटची सुप्रसिध्द गॅलरी ते बॉलीवुड चित्रपट निर्मात्यांचं लाडकं स्थळ असलेलं रोमँटिक व्हेनिस, फॉनोमधील कॉम्प, तेथील गमतीजमती याविषयीही लिहिण्यासारखे बरंच आहे. पण



या लेखात ओळख करुन देणार आहे ती इटलीत मला भेटलेल्या काही माझ्यासारख्याच सर्वसामान्य परंतु आगळयावेगळया व्यक्तींची. त्यांना भेटून माझ्या जाणीवांच्या कक्षा कशा विस्तारल्या, माझा त्यांच्यासंबंधीचा दृष्टीकोन कसा बदलला हे सांगण्याचा प्रयत्न करणार आहे. फॉनोमधील कॅम्पशिवाय इतर पाच-सहा इटालियन कुटुंबांमध्ये राहून त्यांचं आदरातिथ्य, प्रेमळ पाहुणचार अनुभवल्यानंतर त्यांच्याशी तर वेगळेच ऋणानुबंध निर्माण झाले. या सहनिवासातून परकीय संस्कृतीचे पदर तर उलगडलेच

शिवाय परस्परांची मनाची कवाडंही अधिक खुली झाली.

फॉनोच्या कॅम्पमध्ये तुर्कस्थान, रशिया, पोलंड, हॉलन्ड, फिनलॉन्ड, इस्त्रायल, स्पेन, उरुग्वे, बोत्स्तवाना आणि इटलीच्याच विविध प्रांतातून आलेल्या सोलो ट्रव्हलर, पॅकर्स आणि बऱ्याच महिला-पुरुष आणि मुलांचा सहभाग होता. एकूण काय एक आंतरराष्ट्रीय स्नेहमिलनच होतं ते. मौजमजा, मस्ती, गायन, नृत्य, हस्तकला प्रात्यक्षिके, विविध देशांचे पारंपारिक खेळ, सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण, समुद्रसफर, कर्तव्य आणि संघभावनेतून कामांचे विभाजन, त्यातून परस्परांविषयीची आपुलकी याचे दर्शन तर झालचं पण याव्यतिरिक्त अनुभवलं ते परस्पर सामंजस्य, सलोखा आणि जागतिक शांततेसाठी तेथील एनजीओज, व्यक्ती, संघटनांकडून होत असलेले प्रामाणिक प्रयत्न. समाजात आज दिसणारी मनामनांमधील दुही, पूर्वग्रह नष्ट करुन परस्परांमध्ये सामंजस्य निर्माण करण्यासाठी शांतीचा संदेशच या कॅम्पमधून मिळाला.



१. फोटो ओळी...... सॉम्युअल त्याचे आई-वडील आणि मुलगी एलिसा

अँड्रीअँटिक समुद्रकिनारी सहलीला जाण्याकरता बसमध्ये असाच भेटलेला एक इटालियन, सॉम्युअल. काही वर्ष तो थायलंडमध्ये असताना एका थाई मुलीशी लग्न केलं. त्यांना एलिसा नावाची दोन वर्षांची मुलगी. त्याचे आई-वडीलही आले होते. सत्तरीच्या घरात असलेले त्याचे वडील, दोन तीन प्रकारची वाद्य तर वाजवायचेच शिवाय तरुणांना लाजवेल अशी सुरेल शीळ घालत. सुप्रसिध्द इंग्लिश गाणी गात फिरायचे. सॉम्युअलने, आपण काही वर्षे भारतात राहिल्याचे सांगत, वॉव... इंडिया, व्हॉट ए ब्युटिफुल कन्ट्री असं कौतुकानं सांगितलं. बोलताबोलता त्याला आठवलं ते भारतात खाल्लेलं कैरीचं लोणचं. यम्मी डोळे मिचकावून अगदी उत्स्फूर्त, सहज स्वादिष्ट दाद त्याने दिली. इटलीला परत आल्यावर काय करतो असं विचारल्यावर तो बोलता झाला आणि म्हणाला, शाळा या संकल्पनेवर माझा विश्वास नाही. त्यामुळे घरुनच काही पालकांच्या मदतीने विद्यार्थ्यांना शिक्षणाचे

धडे देतो. इटलीतील शिक्षण यंत्रणा विद्यार्थ्यांनी कोणता अभ्यासक्रम निवडायचा कसा आणि कोठून शिकवायचा याची मुभा देते. मुलांना परीक्षा द्यायला मात्र शाळेत




जावचं लागतं. **Learn from Home** या पर्यायाची व्याप्ती इटलीत वाढत चालली आहे. त्यामुळे कदाचित शिक्षणासंबंधीच्या कायद्यावर सरकार कडक निर्बंध आणेल अशी भीती आहे. सॉम्युअलची या धारणेवरील एवढी प्रगाढ श्रध्दा दिसली की, या संभावित सरकारी हस्तक्षेपाची भीती त्याच्या चेहऱ्यावरुन लपली नाही. सध्याच्या कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर बोलायचे झाले तर त्याने आणखी एक महत्त्वाचा मुद्दा सांगितला तो लसीकरणाचा. लहान मुलांसाठीच्या लसीकरण मोहिमेला त्याचा विरोध आहे. या संबंधी इटलीत चालविण्यात येणाऱ्या चळवळीचा तो सदस्यही आहे. त्याच्या मतानुसार मुलं जन्मल्याजन्मल्या त्याला कोणतीही रोगप्रतिबंधक लस देण्याची आवश्यकता नसते. विशेषत: विकसीत देशामध्ये तर नाहीच नाही. लसीकरणामुळे मुलांची रोगप्रतिकारशक्ती वाढणे तर दूरच उलट त्यांना वारंवार आजाराचा सामना करावा लागतो. दरवर्षी इटलीत घेण्यात येणाऱ्या लसीकरण मोहिमांचा आढावा घेतला तर लसीकरण झालेली मुलेच आजारी पडण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याचे वर्षभरातील आकडेवारीतून स्पष्ट होते. औषध कंपन्यांच्या लॉबीने लसीकरण ही मात्र जमातीला दिलेली भेट आहे. असे सॉम्युअलने उपरोधिक मत मांडले. त्याने आपल्या मुलीला अद्याप कोणतीही लस दिलेली नाही आणि देणारही नाही असं निर्धारपूर्वक सांगितलं. सध्याचा कोरोनाचा जगभरातील हाहा:कार बघता त्याचं हे मत स्वीकारणं योग्य की अयोग्य हे ठरविणं गरजेचं आहे.

सॉम्युअलच्या या सडेतोड मतामुळे माझेही विचारचक्र अधिक वेगानं फिरु लागलं. भारतात बाळ जन्मल्यावर पहिल्या काही महिन्यातच सुरु होणाऱ्या लसीकरणाच्या वेळापत्रकाचा आग्रह, विविध प्रसार माध्यमावरुन होणारा त्याचा प्रचार आठवला. याच्या अगदी उलट होते

सॅम्युअलचे विचार. दोहोंमधील कोणता विचार तर्कसंगत हे काळच ठरवेल. पण एक नक्की, सॅम्युअलची स्वत:ची धारणा आणि विचारांवरील अढळ निष्ठा आणि ते अंगिकारण्याचं धाडस प्रभावित करणारं होतं. याचा विचार करत असतानांच आमची बस समुद्रकिनाऱ्यावर पोहोचली.



२. फॉनोमधील नितांत सुंदर समुद्रकिनारा

मुलायम वाळूऐवजी रंगीबेरंगी सागरगोटे असलेला हा सुंदर किनारा. शांत, निळयाशार, अथांग समुद्रात किनाऱ्यावर छोटयाछोटया लाटा घरंगळत येत होत्या. दूरवर काही शिडाच्या जहाजांबरोबरच भले मोठे प्रवासी क्रूझही दिसत होते. उन्हाळा असल्यामुळे पोहायला येणाऱ्यांची गर्दी, त्यांचं संगीतावर थिरकणं, जिलॉटो पार्लसवरील गर्दी, हाय-हॅलो. तो नजारा मनात भरुन घेत असतानांच बाजूला कोणीतरी काही माहिती देताना ऐकलं.



३. बार्बरा आणि ल्युसिअनो

ते होते, बार्बरा आणि ल्युसिअनो हे जोडपं. वैशिष्ठ्यपूर्ण देहयष्टी, गव्हाळी रंग, चेहऱ्यावर मंद स्मितहास्य आणि डोळयांत मित्रत्त्वाचे भाव. थोडा वेळच ते आमच्याशी बोलले. त्यांच्याशी झालेल्या संवादातून मला कळली ती, त्यांची समाजाप्रती असलेली ऋणभावना आणि कृतिशीलता. या भावनेपोटीच त्यांनी फॉनोच्या किनाऱ्यावरील एक छोटासा भाग हॉटेलच्या माध्यमातून चालवायला घेतला होता. त्या भागाचे त्यांनी लास्पियाग्गा डेल टॅलेन्टी (सीसाईड टॅलेन्ट) असे नाव ठेवलं आहे. ते हे सर्व कशासाठी करतात तर अपंग, मतिमंद, निर्वासितांना मदत करण्यासाठी. इटली सरकार निर्वासितांनी देश सोडून जावा म्हणून कायम त्यांचा पिच्छा पुरवत असलं तरी तेथील निर्वासितांना घरं बांधून देण्यासाठी सामाजिक

बांधिलकीच्या भावनेतून निधी उभारण्याचं काम ते करतात. त्याचं जगणं सुसह्य करण्यासाठी धडपडतात. बिग फीश किंवा मरिना बीचवरील कॅफेही अपंग लोक चालवतात. (या जोडप्याचं कार्य अधिक जाणून घ्यायची इच्छा असेल तर त्यांचे संकेतस्थळ
www.bancadelgratuito.it हे आहे.)



मार्था : कॅम्पमध्ये भेटली अवघी २० वर्षांची अवखळ मार्था. सळसळत्या उत्साहानं प्रत्येक कार्यक्रमात हिरीरीने भाग घेणारी चुणचुणीत इटालियन तरुणी. तेथे लहान मुलांना मी फावल्या वेळेत क्रेप कागदाची फुले करायला शिकवताना ती उत्सुकतेनं आली. स्वतःहून आवडीने फुलं बनवायला शिकली. तिने भराभर वेगवेगळया रंगांची ७-८ फुले तयार केली आणि आपल्या सोनेरी केसांत माळूनही घेतली. बहुतेकांप्रमाणेच तिलाही भारतीय पेहरावाचे खूप आकर्षण. एका कार्यक्रमाला मी साडी नेसली त्याचेही केवढे कौतुक वाटले सगळयांना. मी नेलेला चुडीदार, कुर्ता आणि ओढणी मार्थाला भेट दिली त्याचे तिला इतकं अप्रुप वाटलं की, त्यासाठी मार्था आणि तिच्या आईच्या डोळयात थॅंक्यू-थॅंक्यूचा भाव ओसंडून वाहत होता.

मार्थाच्या निळयाभोर डोळयांतून मला नेहमी उत्सुकता आणि जगण्यातील वैविध्य जाणून घेण्याचे कुतुहल दिसायचे. तिला जर्मन, इटालियन, स्पॅनिश, इंग्रजी, रशियन या सर्व भाषा येत होत्या. तिथे बोलणाऱ्या लोकांची दुभाषक म्हणून ती उत्साहाने काम करायची. पुढच्या सत्रपरिक्षेसाठी कोणती भाषा घ्यावी हे ती मला विचारत होती. आर्टे मायग्रॉन्टे या इटालियन संघटनेची ती स्वयंसेवक आहे. इटलीत आलेल्या निर्वासित, निराधारांनाच नव्हे तर व्यसनाधिन लोकांनाही ती आणि तिचे मित्र-मैत्रिणी दर पंधरवड्यात एक दिवस एका उद्यानात भेटतात. त्यांच्यासह तिथे ते संगीत, कला,

नृत्य आणि काही क्रीडा प्रकार यांचा सराव करतात. सर्वजण घरुन आपल्याबरोबर काही ना काही खाद्य पदार्थ घेऊन येतात आणि त्यांच्याबरोबर सहभोजन करतात. उद्देश हाच की अशा लोकांमध्ये काही आनंदाचे क्षण शेअर करणे. जेणेकरुन त्यांच्यात जीवन जगण्याची नवी उमेद निर्माण होईल. निर्वासित, अनाथ आणि समाजाकडून दुर्लक्षित, एकाकी जीवन जगणाऱ्या लोकांसाठी आम्ही हे कार्य करतो असे सांगून, तिने स्वत:बद्दलची माझी उत्कंठा आणखी वाढवली. अवघ्या विशीतील ही तरुणाई समाजाच्या विकासासाठी देत असलेले योगदान किती धाडसी, तरीही कौतुकास्पद आहे. कॅम्पच्या अखेरच्या दिवशी गुडबाय फॉनो, गुडबाय टू ऑल म्हणून सर्वांचा निरोप घेऊन बोलोनिया एअरपोर्टला जायला निघाले. बाहेर दारातच मार्था दिसली. मला पाहिल्याबरोबर आल्या पावली मागे वळली आणि तिच्या खोलीत जाऊन मी दिलेला पंजाबी ड्रेस घालून दाखवायला आली. तिच्या केतकी, गौरवर्णीय कांतीवर तो रंग खूपच खुलून दिसत होता. न राहवून तिच्याबरोबर एक सेल्फी घेतला आणि गाडीत बसले. त्या अस्सल भारतीय पेहरावात मार्थामध्ये आम्हाला एखादी भारतीय तरुणी दिसत होती. गाडीने जसजसा वेग घेतला तशी गुडबाय करणाऱ्या अल्लड मार्थाची लहानशी मूर्ती हळूहळू नजरेआड झाली असली तरी ती मनात कायमचं घरं करुन गेली.



सिनेझिया - साधारण पन्नाशीतील घटस्फोटित शिक्षिका. तीन मुलांची आई. सळसळत्या उत्साहाने आम्हाला दुपारी १ वाजता पिसा स्थानकावर घ्यायला आली होती. गुडघ्यापर्यंत पांढरी शुभ्र कॉप्री आणि त्यावर झिरझिरीत पांढराच अंगरखा घातलेल्या सिनेझियाने भेटताक्षणी व्यक्त केलेल्या दिलखुलास स्वागताने मी इतकी

भारावले की, तिला प्रथमच भेटतेय असं वाटलचं नाही. गाडीत बसले आणि ती पिसाचा जगप्रसिध्द झुकलेला मनोरा दाखवायला घेऊन गेली. त्यानंतर गेले



लुक्का या तिच्या गावाला. हिरव्यागार टेकड्यांनी वेढलेलं लुक्का हे कंट्रीसाईड गाव पाहून व्वाव, एखादे निसर्गचित्रच जणू काही अशी उत्स्फुर्त भावना मनात आली नसती तरच नवल. जाताना रस्त्यातच तिचा १८ वर्षाखालील मुलगा फेड्रीको त्याच्या मित्राबरोबर भेटला. त्याला पाहिल्यावर माय सन अशी प्रेमळ हांक देणाऱ्या सिनेझियाच्या चेहऱ्यावरील आनंद आणि डोळयांमधील भाव बघताक्षणीच जगाच्या पाठीवर कुठेही गेलं तरी आई ही आईच असते. देश, भाषा, धर्म, प्रांत या सर्वांच्या पलिकडे जाऊन तिच्या भावना सारख्याच असतात याचा प्रत्यय आला. त्याच्यापेक्षा मोठा सॉम्युअल, अगदी आपल्याकडील एखाद्या बॉलीवूडमधील हिरोप्रमाणे. एका रेस्तरॉमध्ये काम करुन पैसे कमवणारा. तिसरा मोठा मुलगा (आता नांव आठवत नाही) बाहेरगावी गेला होता. रात्री सर्वजण एकत्र तिच्याघरी जेवलो. खूप गप्पा झाल्या. गप्पांमधून एक वेगळीच माहिती मिळाली. फेड्रीकोला मी सहज विचारलं फॉनोच्या कॅम्पला येणार का तर त्याने दिलेल्या उत्तरातून अचंबित व्हायला झालं. तो म्हणाला, मला तर आवडेल पण... मी अजून १८ वर्षांचा झालो नाही. मला कळेना याचा संबंध काय. तेव्हा सिनेझियानं सांगितलं की, तो सज्ञान होईपर्यंत त्याला कोर्टाच्या आदेशाप्रमाणे महिन्यातील १५ दिवस माझ्या घटस्फोटित पतीकडे राहायला जावं लागतं. १८ वर्षांचा झाला की, तो त्याच्या मर्जीने कोणाकडेही राहू शकतो परंतु मला खात्री आहे की त्याच्या दोन भावंडांप्रमाणे तो देखील मला सोडून जाणार नाही. तब्बल २४ वर्षे संसार केलेल्या सिनेझियाच्या वैवाहिक जीवनाच्या वाटा वेगळया झाल्या असल्या तरी, मुलांनी त्यांना अप्रत्यक्षपणे एकत्र बांधून ठेवलं होतं असंच मला वाटतं. सिनेझियाची मुलांवरची माया, त्यांच्याशी प्रेमळ संवाद ऐकून जगाच्या पाठीवर कुठेही जा माणसाच्या भावना, संवेदना, स्वभाव, सारखेच वाटायला

लागतात. दुसऱ्या दिवशी सिनेझिया तिच्या मैत्रिणीकडे घेऊन गेली. अँजोलिना तिचं नांव. तिच्याकडच्या चार सायकली घेतल्या आणि आम्ही चौघेजण लुक्का शहराभोवती असलेल्या परकोटावरुन संपूर्ण शहरभर सायकलभ्रमंती केली. अँजोलिनाने तिचं बालपणीचं राहत घर दाखवलं. वरच्या मजल्यावरील खोलीच्या खिडकीतून झाडाला लटकून ती कशी खाली येत असे हे सांगताना तिच्या डोळयांतील मिश्किल भाव पाहून रम्य ते बालपण याची आठवण झाली. लुक्कामधील दीडशे वर्षे जुन्या पिझ्झा शॉपमध्ये ती मला घेऊन गेली. गावातल्या सर्वांत मोठ्या चौकातील ठबीस्ट्रोठ मध्ये गेल्यावर तर काय, कॉफीच्या एका कपावर आमचा गप्पांचा फडच रंगला. जेमतेम दोन दिवसांच्या वास्तव्यातील सिनेझिया, तिची मुले, मैत्रिण अँजोलिना यांच्याशी निर्माण झालेले ऋणानुबंध आता कायमचेच राहणार यात शंका नाही.

अलेसा उर्फ चंद्रा : फ्लोरेन्सला भेटलेली अलेसा. हिने स्वत:ची ओळख सुरुवातीपासूनच चंद्रा म्हणून करुन दिली होती. तिचे हे अस्सल भारतीय नांव ऐकून आणि तिला प्रत्यक्ष भेटल्यावर तर मला ती



इटालियन की भारतीय असा संभ्रमच निर्माण झाला. थोडासा पुरुषी तरी भारतीय महिलेसारखा तोंडवळा. अस्सल भारतीय वाटेल अशी तिची वेशभूषा, गांधी विचारांची पुरस्कर्ती असल्याने घरात महात्मा गांधींचा फोटो, बुकशेल्फमध्ये गांधींचे साहित्य. गांधींचा अहिंसेचा विचार केवळ मनात रुजवला नाही तर गेली अनेक वर्षे आचरणातही आणणारी चंद्रा अभिमानाने सांगते, आम्हाला मांसाहार वर्ज्य आहे. चंद्रा अनेक वर्षे भारतात राहिलेली. गांधी विचारांचा वारसा तिला तिच्या वडिलांकडून मिळाला. काही वर्षांपूर्वी त्यांनाही तामिळनाडूतील एका स्वयंसेवी संघटनेने शांतता पुरस्कार देऊन सन्मानित केलं होतं.

आजही चंद्रा त्यांचे कार्य आणि समाजसेवा काही सामाजिक संघटनांच्या माध्यमातून करत आहे. पुण्यातील माहेर या वंचित महिलांच्या पुनर्वसनाचे कार्य करणाऱ्या संस्थेसाठी तिचे खूप मोठे योगदान आहे.



अहमद, वॉगी कॉरीनासोबत इटलीतील सुप्रसिध्द तुस्कानी प्रांतातील सॉन बॉनिफेशिओ असचं निसर्ग सौंदर्याने नटलेलं टुमदार गांव. संपूर्ण गाव वाईनरीजने बहरलेलं. तेथे मला भेटले कॉरीना आणि अरमानो हे दांपत्य. संधीप्रकाशाने उजळून निघालेल्या उंच टेकाड्यावरील त्यांच्या फार्महाऊसवर पोहोचले तेव्हा कॉरिनाने तिच्या गडगडाटी हास्यानं स्वागत केलं. ती फिजीओथेरपिस्ट तर अरमानो शिक्षक. या दांपत्याला स्वत:ची तीन मुलं. समाजाप्रतीचा ऋणभाव केवळ बोलण्यापुरताच नाही तर आचरणात आणणारं हे इटालियन दांपत्य. टेर्रफर्मे या संघटनेशी बांधिलकी असलेलं. इटलीत बेकायदा आलेल्या अजाण मुलांना दत्तक घेणारे पालक मिळवून देण्यासाठी कार्यरत असलेली ही संघटना. चार वर्षांपूर्वी अहमद आणि वॉगी ही जुळी भावंड (आता ते १५ वर्षांचे आहेत) बेकायदा इजिप्तहून इटलीच्या किनाऱ्यावर उतरली. त्यांना त्यांच्या वडिलांनीच बोटीत बसवून सोडून दिलं होतं. बोटीवर इतर मुलांबरोबर खूप हालअपेष्टा सोसून काही आठवड्यांनी ही मुलं इटलीमधील सिसिलीत पोहोचली. सिसीली, लोम्बार्डी आणि व्हेनिटो या शहरांमध्ये या संघटनेची कार्यालये आहेत. काही दिवस सांभाळ केल्यावर संघटनेनं, या मुलांना सधन दांपत्यांनी दत्तक घेण्याचे आवाहन केले. कॉरिना आणि अरमानो दोघांनी आपल्या मुलांचेही विचार लक्षात घेऊन या दोन निराधार मुलांचं पालकत्व स्वीकारण्याचा निर्णय घेतला. हा विचारपूर्वक घेतलेला कौटुंबीक निर्णय आणि त्याबरहुकुम आपण उचललेलं पाऊलही

योग्य दिशेनेच उचललं असल्याचा आत्मविश्वास त्यांच्यात दिसला. ही मुलंही आता या कुटुंबात इतकी समरस झाली आहेत की, त्यांना कॉरिना आणि अरमानो स्वत:चेच आईवडील वाटतात. ते अहमद आणि वॉगीला फॉनोच्या कॅम्पलाही घेऊन आले होते. त्यानंतर त्यांना बोटीवर भेटलेल्या इतर मित्रांची भेट करवून देण्यासाठी ते ज्या गावात होते तेथे घेऊन जाणार होते. कॉरिना आणि अरमानो समाजाचे ऋण कसं फेडतात ते कोणत्या शब्दांत व्यक्त करायचं? नव्हे खरं तर त्यातून बोध घेऊन आपणही असं धाडसी पाऊल उचलू शकू कां? हा माझ्यापुढे खरा अनुत्तरित प्रश्न आहे.




व्हेनिसमध्ये भेटलेली व्हॉलिना. व्हेनिस या जगप्रसिध्द पर्यटन शहरापासून जवळच असलेल्या मेईस्ट्रे स्थानकावर मला घ्यायला आली होती. जेमतेम ५ फूट उंची, गव्हाळी रंग, वय साधारण ५० च्या आसपास. भारतात तब्बल ९ वर्षे राहिल्यामुळे बऱ्यापैकी हिंदी भाषेचा सराव. तिला एक १५ वर्षाचा मुलगा. त्याचे नांव लक्ष्मण. ऐकल्यावर मला पुन्हा एक आश्चर्याचा धक्का बसला. पांढरी शुभ्र हाफ पॅन्ट, गुलाबी रंगाचा टी-शर्ट, गव्हाळी रंग, कुरळया केसांना खूप सुगंधी तेल लावलेलं आणि तेही भारतातून आणल्याचं सांगत होती. अवघ्या दोनच दिवसांच्या परिचयात तिने तिचा जीवनसंघर्षाचा पट माझ्यापुढे मांडला. एखाद्या व्यक्तीच्या वाटेला छोट्याशा आयुष्यात दुर्दैवाचे किती फेरे येऊ शकतात? तरीही ती व्यक्ती प्रचंड संघर्ष करुन स्वत:ला कशी सावरते, हसतमुख राहून दुसऱ्याला कसा आनंद देते हे मला व्हॉलिनाला भेटल्यावर कळलं. ती थोडीथोडकी नव्हे तर तब्बल ९ वर्षे भारतात राहिलेली. काही वर्षे ऋषिकेशमध्ये काढली. त्यानंतर तामिळनाडूत गांधीग्राममध्ये. जेमतेम १५-१६ वर्षांची असेल तेव्हा आईला सोडून वडील दुसऱ्या बाईबरोबर निघून गेले. तिला २ वर्षांनी मोठा एक भाऊही होता. आईला काय करावं, दोन्ही मुलांना कसं वाढवावं या प्रश्नांना उत्तरं मिळत नव्हती आणि त्यातच तिला नैराश्याने इतकं ग्रासलं की, वयाच्या ३५व्या वर्षी दोन्ही मुलांना देवाच्या भरवशावर सोडून तिने आत्महत्या केली. दुर्दैवाने एव्हढ्यावर या भावंडांची पाठ सोडली नाही. एक दोन वर्षात तिच्या भावानेही आत्महत्या

केली. वडिलांनी वाऱ्यावर सोडल्यामुळे भरकटलेल्या अवस्थेत नातलगही सांभाळायला तयार नव्हते. तरुण वय, भविष्यात काय वाढून ठेवलं आहे याची चाहूल लागलेल्या व्हॉलिनाने भारताबद्दल खूप चांगलं ऐकलं होतं. लहानपणापासून जगण्यासाठी केलेल्या संघर्षात होरपळलेल्या व्हॉलिनाला, मन:शांती मिळेल तर ती भारतातच, गंगामातेच्या किनारी असा ठाम



विश्वास होता. परंतु पैशाविना तिथेही कसं होईल या विचाराने तिने पैशासाठी अमेरिका गाठली. एक-दोन वर्षे अमेरिकेतही जाऊन तिथे मळ्यांमध्ये काम करुन थोडेबहुत पैसे कमावले. ती तुटपुंजी कमाई घेऊन भारतात येऊन तिने थेट ऋषिकेश गाठलं. ऋषिकेशमध्ये गंगाकिनारी एका आश्रमात राहात असताना तिथे एका कथित गुरुशी ओळख झाली. त्याच्या मदतीने विस्कटलेली जीवनाची घडी पुन्हा व्यवस्थित बसविता येईल ही तिची भाबडी आशा. सुसह्य जीवन जगण्यासाठी तिने मांडलेला जीवनाच्या सारीपटावरील डाव सोपा नव्हता कारण दुर्दैवाचे फेरे अद्याप संपलेले नव्हते. या गुरुबरोबरच कालांतराने तिने विवाह केला. मात्र ज्या विश्वासाने तिने हा आधार घेतला तो आधार डळमळू लागला आणि विश्वासघाताच्या गर्तेत स्वत:ला सांभाळण्याची तिची धडपड अयशस्वी ठरली. व्हॉलिना पूर्णपणे कोलमडली. तरुण वय, परका देश, अनोळखी लोकं यांच्या आडसट्यात अडकलेली एक अबला नारी. तिच्याकडे पाहण्याची समाजाची नजर तेव्हा दूषित होती. अमेरिकेतून आणलेल्या तुटपुंज्या पुंजीवर तिने तेथे एक छोटासा जमिनीचा तुकडा विकत घेतला होता. तिथेच एक छोटेसं घर बांधलं. या कामात तिच्या या गुरुने तिला मदत केली. आणि व्हॉलिना एका परिपूर्ण कौटुंबीक जीवन जगण्याचं स्वप्न पहात होती. कोणत्याही स्त्रीला आई होण्याची जी आंतरिक ओढ असते त्याला अनुसरुन व्हॉलिनालाही मुल हवं होत. तिला दिवसही गेले. परंतु गरुला मात्र त्याच्या साधुत्वाच्या आड येणारी पितृत्वाची

जबाबदारी नको होती. व्हॉलिना गरोदर राहिल्यावर, तो मी नव्हेच चा पवित्रा



घेतल्यावर तर व्हॉलिनाच्या पायाखालची वाळूच सरकली. ऋषिकेशला स्थायिक होण्याचं तिचे स्वप्न तक्षणी धूसर होत गेलं. नाईलाजाने तिला ऋषिकेश सोडण्याचा निर्णय घ्यावा लागला आणि ती पोहोचली थेट तामिळनाडूत. तिथे काही कामानिमित्त आलेल्या चंद्राशी तिची ओळख झाली. तिच्या मदतीने तेथील गांधीग्रामच्या इस्पितळात मुलाला जन्म दिला. त्याचेच नांव लक्ष्मण ठेवले. तो लहान असेपर्यंत तिथेच राहिली. भविष्यात काय तर तेव्हा तरी अंधारच होता. कारण आता व्हॉलिना एकटी नव्हती. एका मुलाची जबाबदारी होती. काय करावं समजत नव्हतं. आगीतून सावरुन पुन्हा फुफाट्यात पडण्याची तिची हिम्मत नव्हती. अखेर तिनं पुन्हा इटलीला जाण्याचा निर्णय घेतला. ज्या मायभूमीने बालपणापासून जीवनाचा खडतर संघर्ष अनुभवायला लावला त्याच मायभूमीत परत जायचा तिने निर्णय घेतला. परदेशात मन:शांतीच्या शोधात ती आली होती पण तिथे तिला मन:स्तापच झाला. असं असूनही आजही कथित गुरुविषयी मनात अजिबात कटुता नाही उलट आदरभावच दिसतो. जीवनात एवढा मोठा धोका पचवल्यानंतरही भारताबद्दलचे तिचे आकर्षण यत्किंचितही कमी झालेले नाही. यहां (इटली) सबकुछ है, लेकीन कुछ भी नहीं हैं. जो कुछ है वो गंगामैय्या के पासही है. आयुष्य उध्वस्त करणारे अनुभव घेऊनही थेट गंगामैय्याशी नातं जोडणाऱ्या व्हॉलिनाचा मुलगा लक्ष्मण आता १५ वर्षांचा आहे. त्याचे शिक्षण पूर्ण होऊन तो एकदा मार्गी लागला की, आपण पुन्हा ऋषिकेशला जाऊन उर्वरित आयुष्य गंगाकिनारीच व्यतित करणार असल्याचं निरागसपणे सांगते. मुझे क्या चाहिए, दो टाईमकी दाल-रोटी और गंगा किनारे की शांती हे तिचे शब्द ऐकल्यावर तथाकथित विकसीत देशांच्या मानाने भारतीय संस्कृती या विदेशींना किती आश्वस्त करते हे

जाणवलं. सध्या व्हॉलिना रिअल इस्टेट एजंट म्हणून काम करुन तिचा आणि लक्ष्मणचा चरितार्थ चालवते.

प्रत्येकाची कहाणी वेगळी, संघर्ष वेगळा, जीवनाकडूनच्या अपेक्षा वेगळया, ध्येयं वेगळी. त्या सर्वांच्या सहवासातून मी काय अनुभवलं तर सॅम्युअलचा प्रस्थापित सरकारी धोरणांविरोधात लढण्याचा निर्धार, बार्बरा-ल्युसिअनोची समाजाप्रती असलेली ऋणभावना, तरुणपणीच समाजसेवेचे भान असलेली आणि इतरांमध्येही जागवणारी मार्था, सिनेझियातील भावलेली प्रेमळ आई, महात्मा गांधींची तत्त्वे दैनंदिन जीवनात आचरणारी चंद्रा, कॉरिना आणि अरमानोचे समाजभान, कृतज्ञता. आजकाल समाजात दुर्मिळ होत चाललेली अशी ही माणसं. त्यांच्यातील या असामान्य गुणांमुळे त्यांच्या प्रेमाच्या कक्षा इतक्या रुंदावल्या आहेत की, पाय जमिनीवर ठेवून माणसानं माणसाशी कसं वागायला हवं, नाती कशी जिवंत ठेवायला हवीत याचा परिपाठच देऊन जातात. प्रचंड जीवसंघर्षातही हार न मानता स्वत:बरोबर मुलाला सावरणारी व्हॉलिनाची अर्थपूर्ण जीवन जगण्यासाठीची धडपड पाहिली. आपलं जगणं नेमकं कशासाठी आहे. जीवनाचं ध्येय काय, ते कसं सार्थकी



लावता येईल याचा शोध घेण्याचं भान असलेल्या या सर्वांचा जीवनाचा विस्तीर्ण कॅनव्हास पाहिला. आणि आपण किती संकुचित चाकोरीबद्ध जीवन जगतो याची जाणीव झाली. त्यांची मनाची श्रीमंती स्वत:मध्ये काही अंशी बाणवता आली तरी माझी इटली भटकंती सुफळ-संपूर्ण होईल असे विचार मनात घेऊनच मी परतीच्या प्रवासाला बोलोनिया विमानतळावर पोहोचले.



# ट्रेवी फाऊंटन...



## एक जगप्रसिद्ध वास्तू

शुभांगी पासेवंद
२०२, आनंदी भुवन, वीर सावरकर मार्ग, महाराष्ट्र विद्यालयासमोर, ठाणे (प)
मो.नं.९८६९००४७१२

इटली रोम येथील ट्रेवी फाउंटन युरोप टुरमध्ये दाखवले जाते. इटली हे शेंगेन व्हिसात येते. ट्रेवी फाऊंटन ही एक जगप्रसिद्ध वास्तू आहे. फाऊंटन म्हणजे



कारंजे साधारण समज असतो. मात्र येथे फाऊंटन म्हणजे पाण्याचा स्रोत अथवा झरा अशा अर्थाने फाऊंटन हा शब्द वापरला आहे. ट्रेवी म्हणजे तीन रस्ते जिथे मिळतात तो चौक / तिकाडना होय. ट्रेव्ही नावाच्या चौकात असलेल्या झऱ्यावरुन ट्रेवी फाऊंटन हे नाव पडले आहे.

एका स्पर्धेद्वारे डिझाईन मागवून हा झरा आकर्षक करायचे ठरले. इटालियन आर्किटेक्ट, स्थानिक माणुस निकोला साळवी आणि त्याच्या सहकाऱ्यांनी हा झरा बनवायला सुरुवात केली. पण साळवी यांचे मृत्युनंतर अकरा वर्षांनी तो पूर्ण झाला. ग्युसेपे पानिनी ने साळवींचे ट्रेवी फाऊंटनचे ते काम पूर्ण केले. लोटो या एक प्रकारच्या लॉटरीने पैसे जमवून ट्रेवीसाठी ते खर्च करुन बांधकाम पूर्ण केले. रोमच्या कलोजियमला वापरलेला ट्रव्हरटाईन प्रकारचा दगड या झऱ्यासाठी वापरला. हा दगड कापताना, कोरताना, पुतळा बांधला जाताना अनेक मजुरांचा मृत्यु झाला. या झऱ्यात पाणी वाया न घालवता, रिसायकल केले जाते. ओशनस या रोमन जलदेवाचा, शिंपल्याचा रथ अशी मूर्तीरचना आहे. दोन समुद्र घोड्यांनी ओढला जाणारा रथ, ज्यातील एक घोडा रागिट, दुसरा शांत आहे. टेमिंग द वॉटर अशी थिम आहे. पायाशी कलश कलंडलेला आहे. हातात तुतारी सारखे वाद्य आहे.

शहांऐशी फूट बाय एकशे एकसष्ट फूट एवढ्या लांबी रुंदीचा आणि दगडाचा बनवलेला हा झरा लोकप्रिय आहे. बरोक पध्दतीची, वास्तुरचना आहे. टॉर्ट कार्ड मधील चित्रासारखी रचना आहे. साधारणत:

प्रत्येक वास्तूभोवती एखादी कथा गुंफली जाते. अनेक कथांनी लोकप्रियतेसाठी ट्रेवी



गाजले. नाणे फेकणे आणि स्वप्नपूर्ण होणे, अशा कल्पनांनी ट्रेवीचं महत्त्व वाढवलं जातंय. प्रवेश फी नसली तरी तीन युरो तरी पर्यटक यात टाकतात. चवथ्या शतकातील रोममधील १३५२ झऱ्यामधला हा एक होता. सत्राशे बासष्ट साली हा ट्रेवी फाऊंटन नव्या रुपात बनवण्यात आला. एकोणीसशे चौपन्न साली थ्री कॉईन्स इन द फाऊंटन अशी अमेरिकन विनोदी फिल्म आली होती. ट्रेवीची लोकप्रियता त्यानंतर खूप वाढली.

रोज सहा लाख युरो इथे पाण्यात टाकलेले नाण्यांच्या रुपात जमा होतात. काही तरी दान केले तरच देव परत काहीतरी परतफेड, भेट देतो हे तत्त्व त्यात आहे. अमाप पैसा जमतो, मिळतो. एका तरुणीने तहानलेल्या सैनिकांना हा झरा दाखवला. ऑक्वा व्हर्गो असेही नाव त्या मुलीच्या नावावरुन या झऱ्याला पडले आहे. तीन रस्त्यांचे एकत्र येण्याचे जागी वसलेला म्हणून ट्रेवी नाव त्या जागेला पडले होते.

तीन कॉइन्स जर ट्रेवी फाऊंटनमध्ये टाकल्या तर सुख मिळते. एक नाणे टाकल्यास रोमला परत येणं होते. मैत्रीण मिळण्यासाठी दोन नाणी टाकावी लागतात. इच्छा असल्यास त्या मैत्रिणीशी विवाह होण्यासाठी तीन नाणी टाकल्यास त्या मैत्रिणीपासून आपल्याला विवाहसुख मिळते. उजव्या हाताने डाव्या खांद्यावरुन आणि झऱ्याकडे पाठ करुन ही एक ते तीन नाणी फेकायची असतात. ही नाणी टाकल्यावर रोम शहरात या जागी पुन्हा यायला मिळते अशी ही अंधश्रद्धा आहे. दर रात्री ती नाणी गोळा करुन कॉरिटास या इटालियन

चॅरिटीला दिली जातात.

या ट्रेवी फाऊंटन मधुन नाणी चोरणाऱ्याला गुन्हेगार ठरवले जाते. ३४ वर्षे रात्री चोरी करणारा चोर २००२ साली पकडला गेला.



साधारणपणे प्रत्येकच देशाचे पर्यटनस्थळांचे यादीत टॉपमध्ये एखादी बाग, एखादा राजवाडा अथवा एखादा झरा प्रसिद्ध असतो. जागतिक किर्ती मात्र काही जणांच्या नशिबी असते. जी ट्रेवी फाऊंटनला मिळाली आहे. या जागीही अनेक चित्रपटात ट्रेवी फाऊंटनचे चित्रीकरण आहे. आणि ला ला डॉईसे व विटा या चित्रपटातील नटी ह्या फाऊंटनसमोर अंघोळ करतांना दाखवली आहे. आता फाऊंटनमध्ये पाण्यात उतरायला बंदी आहे. पण प्री वेडिंग फोटो शुट चालु होती.

या झऱ्याचे ठिकाणी प्रचंड गर्दी असते त्यामुळे खिसे कापूंचा आणि किरकोळ विक्रेत्यांचा धंदा जोरात असतो, सांभाळून राहावे. पासपोर्ट गेला तर सहलीचा आनंद संपतो. जर शहराच्या आजूबाजूने, ट्रेवी फाऊंटनमध्ये चक्कर मारली तर मात्र खुप आनंददायी वाटते. इटालियन जिलेटो आईस्क्रीम इथे उभे राहून खातात.

फिल गुड भाव माऊंटन्स आणि फाऊंटन्समध्ये भारंभार वजनाने असतो.




# भूतानची अध्यात्मिक राजधानी



## बुमथांग - जाकार

पां.द. पाटणकर
६७०, शुक्रवार पेठ, पुणे - ४००००२
फोन : ०२०-२४४९५०८५

महागुरु रिंपोचे भूतानमध्ये प्रथम जाकारला आले व त्यांच्या उपदेशाने प्रभावित होऊन इथल्या राजाने बुध्द धर्म प्रथम स्विकारला, म्हणून याला बुध्द धर्माचे जन्मस्थान असेही म्हटले जाते.



भौगोलिकदृष्टया बुमथांग भूतानच्या अगदी मध्यावर थोडे पूर्वेलाच झुकलेले आहे. बुमथांगच्या खोऱ्यांत उरा, चुमे, तांग आणि चेएखोर (जाकार) एवढे विभाग येतात. बुम म्हणजे पवित्र पाण्यांचे भांडे किंवा सुंदर मुली आणि थांग म्हणजे सपाट जागा किंवा शेत. त्यामुळे बुमथांगच्या नावातच त्याचे महात्म्य येऊन जाते. बुमथांगमध्ये चाळीसहून जास्त पुरातन मंदिरे अथवा धार्मिक स्थाने आहेत. आश्चर्य म्हणजे या भागातील काही जमाती पुरुषाच्या लिंगाची पूजा करतात. अनेक घरांच्या लाकडी चौकटीवर असे लिंग कोरलेले असते. मानव वंशाचे प्रतिक म्हणून त्याकडे पाहिले जाते. पर्यटकांना इथं खरेदीसाठी खूप वाव आहे. इथे बनविले जाणारे लोकरीचे गरम कपडे, ब्लँकेटस वगैरे घराबाहेर विक्रीसाठी टांगलेले असतात. त्यात याकचे केसही वापरले जातात. याकच्या दुधापासून बनविलेल्या चीजच्या वडया विक्रीला ठेवतात. सफरचंदाचा रस व वाईन ही प्रसिध्द आहे. इकडचा स्विस फार्म प्रसिध्द आहे. मध, दुधाचे पदार्थ, सफरचंदे, बटाटे, भात, गहू वगैरे उत्पादन चांगले होते. बुमतांगखा ही बोलीभाषा इथे वापरली जाते. पारोकडून इकडे येताना ३५९६ मीटर्स उंचीवरील युतोंग-ला ही खिंड ओलांडावी लागते. बुमथांगहून जाकार, कुर्जे, तामझिंग व कोंचोगसुम हे विहार जवळ आहेत. आणखी काही महत्त्वाचे विहार पुढीलप्रमाणे सांगता येतील-

चोएड्राक विहार : संपूर्ण चुमे खोऱ्यावर नजर ठेवता येईल अशा ३८०० मीटर्स उंचीच्या पर्वतावर हा विहार आहे. आठव्या शतकात गुरु रिंपोचे वाघिणीवर बसून इथे आले व तपश्चर्या केली अशी श्रध्दा आहे.

शुगड्राग सिंग्ये झोंग : चमरवार शहरापासून १३ किलोमीटर अंतरावर हा किल्ला आहे. तिथेच ध्यानमंदिरही आहे.

थार्पालिंग विहार : छुमे खोऱ्यात ३६०० मीटर्स उंचीवर हा विहार आहे. इ.स.१३६३ मधील इथला विहार भग्न झाल्यावर भूतानच्या पहिल्या राजाने याचा जीर्णोध्दार केला.

केंचोगसुम विहार : चमरवार शहरापासून दहा-बारा किलोमीटर अंतरावर हा विहार आहे. अलिकडे सन २०१४ मध्ये याचा जीर्णोध्दार करण्यात आला आहे. येथे अनेक पुतळे, तैलचित्रे व प्रचंड मोठी घंटा आहे. घंटेचा आवाज तिबेटची राजधानी ल्हासापर्यंत जातो असे सांगतात.

कुर्जे ल्हाखांग : चमरवार शहरापासून १५ मिनिटांच्या मोटार रस्त्यावर हा विहार आहे. पारोजवळच्या किच्यू लाखांगपासूनही एक पायवाट इकडे येते. परिसरांत अनेक मंदिरे आहेत. त्यापैकी एकात गुरु रिंपोचे यांचा १२ मीटर उंचीचा पुतळा आहे.

तामझिंग ल्हाखांग : वरील कुर्जे ल्हाखांग जवळची नदी ओलांडून इकडे येता येते. या विहारामध्ये अनेक भित्तीचित्रे व पुतळे आहेत.

रेन्चोसुम ल्हाखांग : चमरवार शहरापासून १५ मिनिटांच्या मोटर रस्त्यावर हा विहार आहे. इथेही अनेक पुतळे, चित्रे, घंटा वगैरे आहेत.

बुली ग्युंबा (फुर्लिंग ग्युंबा) : चौदाव्या शतकात दोर्जी लिंगपाने हा ग्युंबा बांधला. तो इथे ध्यानाला बसला असता त्याचे डोक्यावरील टोपी लांब उडून पडली. तिथेच त्याने हा ग्युंबा बांधला. हया दुमजली ग्युंबाच्या तळमजल्यात त्याची ती टोपी,



त्याचा पुतळा आणि एक सोन्याने मढवलेला स्तूप आहे तर वरच्या मजल्यावर बुध्दाचा पुतळा आहे.

चाखार विहार : कुर्जे ल्हाखांगकडे जाताना वाटेत डेकिलिंग शहर व त्यानंतर हा विहार लागतो. नदीच्याकडेला एका टेकडीवर दोर्जी लिंगपानेच हे मंदिर बांधले आहे. इथेही पुतळे वगैरे आहेत.

जम्पा ल्हाखांग : चमरवार नदीच्या काठावर एका उंच पठारावर हा भूतानमधील सर्वांत जुना ल्हाखांग आहे. याच्याच उत्तरेला एखाद्या किलोमीटरवर कुर्जे विहार आहे. ही

अतिशय पवित्र जागा आहे व इथे बसून गुरु रिंपोचे यांनी तांत्रिक बौध्द धर्मावर अनेक प्रवचने दिलेली आहेत. आठव्या शतकातील हया विहारात एका बाजुला गौतम बुध्दाचे चित्र आहे तर दुसऱ्या बाजुला गुरु रिंपोचे यांचे आठ अवतार चित्रीत केलेले आहेत. आतील सभागृहात गम्पाच्या भव्य मूर्तीच्या दोन्ही बाजुंना बोधिसत्त्वाच्या चार मूर्ती आहेत. प्रदक्षिणा मार्गावर बुध्दाची हजार चित्रे



असून कडेनी प्रार्थनाचक्रांची माळ आहे. हे मंदिर बरेच मोठे असून अनेक पुतळे, मंदिरे यांनी भरगच्च आहे. येथील जम्पा ल्हाखांग फेस्टिव्हल प्रसिध्द आहे.

बुमथांग जिल्हयाचे मुख्यालय जाकार हे असून हे मोठया शहरासारखे आहे. २८०० मीटर्स उंचीवर हे वसले असल्याने हवाही उत्तम असते. गावात दोन मुख्य रस्ते असून त्याच्यावर उपहारगृहे, दुकाने, इंटरनेट कॅफे इ. भरपूर आहेत. याची वस्ती वाढत वाढत आता नजिकच्या डेकिलिंग गावाशी जोडली गेली आहे. येथील 'जाकार झोंग' किल्ला ऐतिहासिक असून इ.स. १५४९ मध्ये तो बांधलेला आहे. जाकार चा अर्थ पांढरा पक्षी असा होतो आणि त्यामागे एक दंतकथाही आहे. त्याकाळचा इथला राजा डागी वांगछुक येथे एक विहार बांधत असताना एक पांढरा पक्षी इथे घिरटया मारत एका टेकडीवर बसला. राजाने हा शुभशकुन मानून तेथेच हा किल्ला उभारला. इ.स.१६४६ ते १६८३ मध्ये याचा विस्तार करण्यात आला, पण पुन्हा इ.स. १८९७ च्या भूकंपात याची हानी झाली. राजाने पुन्हा याला दुरुस्त केले. किल्ल्याच्या मध्यभागी एक उंच मनोरा असून आपल्याकडील किल्ल्यांप्रमाणेच इथेही खडकांत पाण्याचे एक बांधीव टाके आहे. सध्या इथे बुमथांग जिल्हयाचे मुख्यालय व बौध्द मठाचे कार्यालय आहे.

जाकार परिसरातील काही विहार पुढीलप्रमाणे-

ल्होड्राक खाईचू विहार : जाकारच्या पूर्वेकडील टेकडीवर १९७० साली हा विहार बांधण्यात आला. सभागृहात गुरु रिंपोचे, शाक्यमुना इ. चे भव्य पुतळे आहेत. सध्या इथे साडेतीनशे बौध्द भिख्खू निवासाला आहेत.

पेडत्सेलिंग विहार : घनदाट जंगलात इ.स. १७६९ साली किल्ल्यासारखा हा विहार बांधलेला आहे. रामनामाचा एक कोटी जप केल्याचे आपण ऐकतो. पण हया विहारात नामग्येल ल्हुंडुप हया संत भिख्खूने १०० कोटीचा त्यांच्या मंत्राचा जप केलेला आहे. त्यावेळेस त्याला जोवो देवतेने दर्शन दिले होते.

मेबार त्शो : चमरवार शहरापासून २० कि.मी. अंतरावर या नावाचे एक सरोवर आहे. संत तुकारामाची गाथा इंद्रायणी नदीतून वर आली तशी या सरोवरातून गुरु रिंपोचे यांचे ग्रंथ पेमा लिंगपा याने इ.स.



१४०० साली पणतीसकट वर आणले होते. इथल्या खडकावर त्यांचे चित्र कोरले आहे.

कुंगझांड्रा विहार : वरील सरोवराच्या मागील डोंगरावर हा विहार आहे. मध्य भूतानच्या तांग खोऱ्यात ३३५० मीटर्स उंचीवर हा पंधराव्या शतकातला विहार आहे. इथेही अनेक पुतळे व औषधी पाण्याचा झरा आहे.

उरा विहार : बुमथांग भागातील हा सर्वात उंच विहार आहे. सेरथांग खिंडीतून याचा रस्ता जातो. गुरु रिंपोचे यांच्या नावाचे इथे मंदिर आहे.

थोवाड्रा विहार : तांग खोऱ्यातील ३४०० मीटर्स उंचीवरचा हा विहार पारोच्या ताकसंग विहारासारखा अवघड जागी आहे. इ.स. १२३८ मध्ये हा विहार उभारण्यात आला होता.

न्यिमालुंग विहार : सन १९३८ मध्ये बांधलेल्या या विहाराचे अलिकडे सन २००२ मध्ये नूतनीकरण करण्यात आलेले आहे. विहारात गुरु रिंपोचे यांचा पुतळा व त्यांच्या शिष्यांची अनेक चित्रे काढलेली आहेत. सध्या येथे शंभरच्या जवळपास बौध्द भिख्खू निवासाला आहेत. ध्यानमंदिरही आहे. शेड्रा, संगीत अशा विषयांचे शिक्षणही दिले जाते.



# सफर गीर अभयारण्याची...



## अनुभव संपन्न प्रवास

ॲड. प्रकाश लब्धे
करोलिया मॉन्शन, सेंट पॉल स्ट्रीट, हिंदमाता, दादर, मुंबई-४०००१४
मो.नं.९८२००९०१५२ / ९३२००९०१५२. टेलिफोन नं.२४१६८१९४

आनंदाचे क्षण वेचावयाचे असतात आणि ते साजरे करावयाचे असतात. सकारात्मक क्रियाशील माणसंच त्याचा उपभोग घेतात. वर्तमान काळात आनंदाने जगत, भविष्यावर लक्ष केंद्रित करत आणि त्याचे योग्य प्रकारे आयोजन करणारी माणसं नव्या उमेदीने जगत असतात. काळाचं चक्र सतत फिरत असते. माणसाचे जगणंही तसंच असते. वेळ महत्त्वाची असते आणि ती वेळ जगभरातल्या सुंदर सुंदर ठिकाणांना भेट देऊन खर्च केल्यास आनंद, समाधान तर मिळतोच पण हा प्रवास अनुभव संपन्न करतो आणि जगणं शिकवुन जातो.

आम्ही सर्व भावंड दिवाळीत एकत्र येतो आणि सण साजरा करतो तसे इतरही सण साजरे करत असतोच, पण एकत्र येऊन गोडधोड खाणे, गप्पागोष्टी करणे हे सर्व दिवाळीतच होते. तसेच वर्षअखेरीस मिळणाऱ्या सुट्यांचा सद्उपयोग करण्यासाठी प्रवासाचे नियोजनही करतो. नोव्हेंबर २०१८ ची दिवाळी साजरी करताना खुशबु गुजरात की हया गुजरात सरकारच्या जाहिरातीने आम्ही आकर्षित झालो आणि तेथील ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि अभयारण्य सारख्या स्थळांना भेट देण्यासाठी आम्ही रेल्वे आणि निवासस्थानाचे ऑनलाईन बुकिंगही केले.

जुनागड हे गुजरात मधील सौराष्ट्र भागातील एक सुप्रसिध्द स्थान, जगभरातुन पर्यटक प्रसिध्द अशा गीर अभयारण्यात सिंहांना पहावयास येत असतात. जगभरात फक्त आफ्रिकेशिवाय इतरत्र कोठेही न आढळणारा हा जंगलाचा राजा फक्त गीरच्या अभयारण्यात पहावयास मिळतो. हया जंगलात ते सर्वाधिक संख्येने आहेत. विविध जंगली श्वापदांनी, विविध पक्षांनी आणि विविध वृक्षवनस्पतींनी समृध्द असलेले हे अभयारण्य १४२४ कि.मी. क्षेत्रफळामध्ये पसरलेले आहे.

दिनांक २२ सप्टेंबर, २०१८ रोजी



सकाळीच वृत्तपत्र हातात पडले आणि ही बातमी वाचुन मन हेलावुन गेले. गुजरातेत गीरच्या जंगलात ११ दिवसात ११ सिंहाचा मृत्यु ही बातमी सर्व वृत्तपत्रामध्ये ठळक

अक्षरांमध्ये छापुन आली होती. आशियायी सिंहाचे एकमेव निवासस्थान म्हणुन गुजरातमधील गीर अभयारण्य ओळखले जाते. सन २०१० साली प्राणीगणनेनुसार या अभयारण्यात ४११ सिंह होते. त्यांची संख्या वाढून २०१५ साली ती ५२३ झाली होती. सिंहाच्या मृत्युची धक्कादायक बाब उघडकीस आल्यावर गुजरात सरकारने त्यांच्या मृत्युच्या चौकशीचे आदेश दिले होते. यामध्ये ६ नर सिंह, ३ मादी सिंह आणि २ नर बछडयांचा समावेश असुन यापैकी ९ दलखानिया विभागात तर दोन जशाधर विभागात त्यांचे मृतदेह सापडले. या सर्व मृतदेहांचा व्हिसेरा जुनागड येथील प्राण्यांच्या रुग्णालयात पाठविण्यात आलेला होता. प्रमुख वन संरक्षणाच्या अध्यक्षतेखाली



नेमण्यात आलेल्या समितीने चौकशी केली असता, ११ पैकी ८ सिंहाचा मृत्यु हा आपसातील भांडणात एकमेकांवर केलेल्या हल्ल्यामुळे झालेल्या जखमांमुळे झाला असावा असा अंदाज वर्तविला होता. प्रमुख वनसंरक्षक अधिकारी जी.के. सिन्हा यांनी अभ्यासाअंती असा निष्कर्ष काढला आहे की, मनुष्य-शिकार ही सिंहाच्या मृत्युमागील हे एकमेव कारण नसुन सिंह म्हातारा, आजारी किंवा जखमी झाला तर सिंहाची त्या हद्दीतल्या वर्चस्वासाठी आपसात लढाई होते, तसेच एखाद्या सिंहाने एखाद्या कळपाच्या प्रमुखाला लढाईत हरविल्यास त्यातील छाण्यासाठी तो ठार मारतो' अशी माहिती त्यांनी दिली.

मृत सिंहाच्या शवविच्छेदनानंतर त्यांची फुफ्फुसे निकामी झाल्याने त्यांचा मृत्यु झाला असे गुजरातच्या वनविभागाने जाहीर केले. तसेच वनधिकाऱ्याने अशीही माहिती दिली की, गीर जंगलातील सिंहाच्या मृत्युच्या पार्श्वभुमीवर खबरदारीचा उपाय म्हणुन वनविभागाने ३६ सिंहाना ताब्यात घेऊन त्यांना जशाधर आणि जमवाला येथील प्राणी मदत केंद्रात ठेवण्यात आले आहे.

गीरच्या जंगलामध्ये पिढ्यांन पिढ्या राहणाऱ्या कुटुंबांच्या वस्तीला नेस म्हणुन संबोधले जाते. ते गवळी जमातीचे असुन गेल्या कित्येक वर्षापासुन ते वन्यजीवांचे संगोपन करतात. प्रामुख्याने सिंह, बिबटया, कोल्हा इत्यादी जंगली मासांहारी प्राण्यांना एखादे जनावर मेल्यावर त्यांना खाद्य म्हणुन

पुरवितात. अभयारण्यातील गावामध्ये राहणाऱ्या हया रेंजर्सना जंगलाची संपुर्ण माहिती असते. त्यांना जंगलातील प्राण्यांच्या सवयी तसेच त्यांच्या ठावठिकाणाही ठाऊक असतो. त्यामुळे जंगल सफारीसाठी आलेल्या पर्यटकांना सिंह नक्की कोणत्या ठिकाणी दिसेल हयाची खात्रीदायक बातमी हे रेंजर्स गाईडना देत असतात. परंतु गुजरात सरकारने पुर्नवसनच्या नावाखाली हया मालधारी जमातीला जंगलातुन बाहेर काढले. सिंहाचे पालनहार करणारी ही कुटुंबे सध्या रस्त्यावर आली असुन सिंहाकडे लक्ष देणारे कोणीही नसल्यामुळे वन्यजीवांचे अस्तित्व धोक्यात आले आहे, असे 'खम्मा गीर' हया संस्थेच्या संस्थापकांनी सांगितले.

भारत देशात बिहार पासुन नर्मदा नदीपर्यंत सिंहाचे वास्तव्य होते. परंतु सिंहाचा इतिहास जाणुन घेतला तर आपणास असे दिसुन येईल की, सन १८३४ पासुन दिल्ली येथुन, सन १८४२ पासुन भावलपुर येथुन, सन १८६५ पासुन बुदलाखंड आणि आखली (राजस्थान) येथुन सिंहाचे अस्तित्व हळुहळु नाहीसे झाले. जुनागडच्या नवाबांनी सिंहाना संरक्षण देणारे कायदे केल्यामुळे सन १९०४ ते १९११ हया कालावधीमध्ये सिंहाच्या संस्थेत वाढ झाली. स्वातंत्र मिळाल्यानंतर गुजरात शासनाच्या वन विभागाने एशियन सिंहाचे गीर अभयारण्यात धोक्यात आल्याचे पाहिल्यावर वन विभागाचे जंगली श्वापदांचा बचाव, त्यांची काळजी, त्यांचे संरक्षण आणि त्यांची वृध्दी हा



कार्यक्रम राबविला. गीर राष्ट्रीय अभयारण्याचे मुख्य केंद्र शासन गीर येथे आहे. सन १९६५ साली गीर हे अभयारण्य घोषित केल्यावर बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या माध्यमातुन गीर जंगलातील सिंहाची विशेष काळजी, संगोपन आणि संरक्षण प्रकल्प राबविला जात आहे.

विविध जंगली प्राण्यांनी आणि पक्षांनी समृध्द असलेले हे जंगल असुन गुजरात सरकारने हा परिसर संरक्षित जंगल म्हणुन घोषित केलेला आहे. जुनागड, अमरेली आणि गीर-सोमनाथ हया जिल्हयातील हे जंगल खडकाळ आणि तुटक-तुटक पसरलेल्या टेकडयांनी बनलेले आहे. हया टेकडयावरुन वहाणारे जलस्त्रा।त

वेगवेगळया दिशांनी वाहन नदयांना मिळतात. हया जंगलात हिरन, सरस्वती, दातारडी, शिंगोडा, माहुंड्री आणि घोडावडी हया नदया वाहतात. त्यामुळे गीरच्या



जंगलात विविध प्रकारची झाडे-झुडुपे तसेच सर्वत्र हिरवळ असुन त्या स्थळाला निर्सगाचा वरदहस्त आहे. स्वच्छ, निर्मळ पाणी, प्रदुषणविरहित थंड हवा आणि सर्वत्र हिरवीगार झाडे, वनस्पती हयामुळे हे ठिकाण पर्यटन क्षेत्र म्हणुन जगाच्या नकाशावर ठळकपणे दिसुन येते. हे अभयारण्य उत्तम विकसित असुन पर्यटकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदु बनलेले आहे. हया अभयारण्यात सिंहाना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात मचाणावर बसुन पहाण्याचा आनंद लुटता येतो. तसेच जंगलातील वन्य प्राण्यांचे सहजासहजी दर्शन व्हावे हया हेतुने वनधिकाऱ्यांनी देवालिया येथे संरक्षित कुंपण केलेले ४१२ हेक्टरचे पर्यटन क्षेत्र विकसित केलेले आहे.

हया अभयारण्यात सिंहाबरोबर चित्ते, तरस, कोल्हा इ. मांसाहारी आणि चितळ, निलगाई, सांबर, चिंकारा, रानडुक्कर इ. विविध शाकाहारी प्राणीही आढळतात. तसेच विविध प्रकारचे पक्षी मोर, पोपट, घुबड, सुतारपक्षी, पारवा इ. नजरेत पडतात. हया वनात विविध प्रकारची झाडे, झुडुपे, वनस्पती, वेली, गवत ही आढळुन येतात.

आम्ही दिनांक १६ डिसेंबर, २०१८ रोजी रात्रौ ८:३० च्या सौराष्ट्र मेलने वेरावळला जाण्यासाठी निघालो दुसऱ्या दिवशी सायंकाळी रेल्वे स्थानकावर उतरलो व तेथुन सोमनाथ ट्रस्टच्या अतिथीगृहात विश्रांती घेऊन रात्रौ सोमनाथ मंदिराच्या गाभाऱ्यात महादेवाच्या दर्शनासाठी प्रवेश केला. महादेवाचे दर्शन मी मनः पटलावर टिपुन घेत असता आरतीला सुरुवात झाली. मंदिराचे उत्कृष्ट कोरीवकाम पाहुन मी विस्मयचकीत झालो. कानावर पडत असलेल्या आरतीचा आणि डमरुचा आवाज आणि गाभाऱ्यात दरवळत असलेल्या सुगंधाने माझे मन संमोहित झाले. आरती थांबली तसे मी भानावर आलो. बाजारपेठेत खरेदी केली. हॉटेलमध्ये पोटपुजा करुन

आम्ही अतिथीगृहावर विश्रांतीसाठी पोहोचलो आणि निद्रादेवीच्या स्वाधीन झालो.

जाग आली ती पक्षांच्या किलबिलाटाने उठुन बसलो तो दिवस १८ डिसेंबर २०१८ चा सोमनाथ संस्थेच्या प्रांगणात असलेल्या उपहारगृहात नास्ता केला. आशिया खंडातील सिंहाचे माहेरघर असलेल्या गीरच्या



अभयारण्याकडे सोमनाथहुन सकाळी नऊ वाजता तवेरा जीपने निघालो सुमारे ४५ कि.मी. अंतरावर असलेल्या सासन गीर येथे आम्ही दुपारी एकच्या सुमारास पोहोचलो. उमंग हया विश्रांती स्थानावर आम्ही राहिलो. तेथे आम्ही काठीयावाडी पध्दतीचे जेवण केले.

त्यानंतर आम्ही वनाधिकाऱ्यांची परवानगी घेऊन आणि त्यांनी दिलेल्या दोन उघडया जीपने दुपारी २:३० वाजता गीरच्या अभयारण्याकडे निघालो. आमच्याबरोबर त्यांनी दोन गाईडसही दिले होते. ते आम्हास वेळोवेळी सुचना देत असत आणि जंगलाची माहितीही सांगत असत. हिरव्यागार वृक्षांनी वेढलेल्या जंगलातुन आमची जीप हॉर्न न वाजविता धावत होती. वातावरणात गारवा जाणवत होता. जंगलातील गवताळ प्रदेशात चरताना आणि बागडताना आम्हास स्पॉटेड हरणांचा कळप दिसला. फ्लॉश बंद असलेल्या कॅमेरातुन आमचे चित्रिकरणही चालु होते. पक्षांचा गुंजारव कानी पडत होता. गाईड आम्हास विविध पक्षी दाखवित होता. त्यास गरुड, सुतारपक्षी, मोर, पोपट होते. निलगाई, सांबर चारशिंगाचा कळप आमची गाडी बघताच धुम ठोकत होता. माकडेही उडया मारताना दिसत होती. जंगलातील माती काळया रंगाची असल्यामुळे येथील वारुळेही काळी होती. कोकणातील वारुळांपेक्षा ती उंच होती. गाईडने आम्हांस लांब अंतरावर विश्रांती घेत असलेला सिंह दाखविला. आमची गाडी धावत होती आणि मी माझ्या मन:पटलावर निसर्गसौंदर्य टिपुन घेत होतो. येथील वाळलेले उभे गवतही सिंहाच्या आयाळीसारखे दिसते. त्यापुढे त्या गवतात सिंह उभा असेल तर ते फॉरेस्ट रेंजर्सच सांगु शकतात. गवतात हालचाल न

करता उभ्या असलेल्या सिंहाची करडी नजर रेंजर्सच ओळखु शकतात. त्यामुळेच अभयारण्यात पर्यटकांना जिपमधुन उतरण्यास बंदी होती.

एका ठिकाणी आमची जीप थांबली इतरही गाडया तेथे थांबलेल्या होत्या. गाईडने नजरेनेच आम्हास दहा-बारा फुटावर विश्रांती घेत असलेली एक सिंहीण दाखविली तिला पहाताच भितीचे दडपण मनावर आले. तिच्या नजरेकडे नजर जाताच भयकंपीत झालो. माश्या तिच्या तोंडाभोवती घोंघावत



असल्याने ती बैचेन होती, सतत मान हलवत होती. काही वेळाने ती उभी राहीली आणि तोंडवर करुन डरकाळी फोडली. जंगलात आवाज घुमला. तीच्या प्रत्येक हालचालीत माझे पाय घट्ट रोवल्यासारखे वाटत होते. सर्वांगाला कंप सुटला होता. गाईड हलक्या आवाजात आम्हास सुचना देत होता. आमचीच जीप उघडी असल्यामुळे आमची घाबरगुंडी उडाली होती. अकस्मात आलेला तो सोनेरी मनात आठवित होतो खरा, पण सर्वांगाला घाम फुटलेला होता. पुन्हा एकदा डरकाळी फोडुन सिंहीण आम्हास पाठ दाखवत, मागे न बघता शांतपणे जंगलात निघुन गेली. आमची जीप निघाली. पाहिले तर बाजुच्याच एका झाडाच्या आडोशाला हातात शस्त्र म्हणुन काठी घेतलेले फॉरेस्ट रेंजर्स उभे होते. त्यांनीच बहुतेक गाईडला जंगलातील कोणत्या भागात सिंहीण विश्रांती घेत आहे याची माहिती भ्रमणध्वनी मार्फत दिली असावी. त्यामुळेच आम्हास सिंहीणीचे दर्शन झाले. सायंकाळी साडेसहापर्यंत आम्ही अरण्यात फिरत होतो. अंधार झाला तसे आम्ही हॉटेलवर परतलो. फ्रेशअप झालो. वनाधिकाऱ्यांनी पर्यटकांसाठी आयोजित केलेल्या गीर च इन्फोरमेटिव्ह शो पहाण्यासाठी म्युझियम मध्ये गेलो. शो पाहिला म्युझियम पाहिले. तेथील दुकानात खरेदी केली. परत त्याच उमंग हॉटेलमध्ये काठीयावाडी- शेवन साग हयाचे भोजन केले. सांयआरती करुन गप्पागोष्टी करता निद्रादेवीच्या पाशात कधी अडकलो गेलो हे कळलेच नाही.




# व्हॅन्कुव्हरची आनंदयात्रा...



## स्वप्नातलं वाटावं असं गाव

सौ. सुजाता स. ब्रह्मे
पत्ता : फ्लॅट नं. ३०१, गंधार को. ऑप. हौ. सोसायटी, आयडियल कॉलनी,
कोथरूड, पुणे - ४०० ०३८. मो. नं.९८२३४ ३३३८५.

आम्ही यावेळच्या व्हॅन्कुव्हर ट्रीपमधे बान्फ आणि जास्पर नॅशनल पार्क पाहायचे असे ठरवत होतो. पण कोरोना बंदीमुळे सगळे **Time Table** उलटेपालटे झाले. तरी त्यातल्यात्यात सारंगचे काम संपले की तो आम्हाला कुठेतरी लांब घेऊन जायचा. कधी संध्यारंगात डुंबणाऱ्या ढगांची शोभा पहायला, तर कधी आजूबाजूच्या टेकड्यांवरुन दिसणारे चमकते व्हॅन्कुव्हर पहायला, तर कधी वेगवेगळया बीचेस वर. या शनिवारी सकाळीच तो म्हणाला, लवकर आवरा आपण लॉन्ग राइडला जाऊ. पटकन ठरले त्यामुळे आम्ही तिघेच निघालो. कार्तिकी अन नोवा (आमची सून आणि




छोटी ३ वर्षांची नात) घरीच थांबल्या. शहरातून बाहेर पडल्याबरोबर डाव्या बाजूला निळाभोर पॅसिफिक, त्याला सिमित करणारे डोंगर, आणि छोटीछोटी हिरवीगार बेटे, आणि उजव्या बाजूला आकाशाला हात लावू पाहणारे उंचच उंच डोंगर, असा वळणावळणाचा रस्ता चालू झाला. आणि थोडयाच वेळात सारंगने गाडी डावीकडच्या रस्त्यावरुन आत वळवली, **Porteaucove** या पिकनिक स्पॉटच्या दिशेने. समुद्रात जाण्याचा फील यावा म्हणून साधारण एक-दिड किमी लांबीचा लाकडी डेक समुद्रात बांधला आहे. मधेमधे उंच मनोरे बांधून वरुन पाहायचीही सोय केली आहे. डेकवर अगदी टोकापर्यंत जाण्याची सर्वांना मुभा असते. (अशाच प्रकारचा डेक आम्ही व्हाईट रॉक बीचला पाहिला होता.) निळया सागराचे गोलाकार दिसणारे अथांग दर्शन अन घनदाट हिरवे डोंगर असे दृश्य डोळयात साठवून घेतले. अलीकडे मोठमोठया डेस्कवर बरेचजण खाणेपिणे, गप्पा करत बसले होते. एक ग्रुप वॉटर-स्पोर्टस साठी निघणार होता तर दुसऱ्या ग्रुपची चक्क स्नॉर्केलिंगची तयारी चालू होती.

पुढे शॅनॉन फॉल्स नावाचा धबधबा आहे तिथे गेलो तर पार्किंग फुल, त्यामुळे थांबता आले नाही. आज मधेच पाऊस अन मधेच ऊन असा पाठशिवणीचा खेळ चालू होता. त्यामुळे वातावरण अगदी आल्हाददायक होते. रस्त्याच्या कडेने जांभळया अमरन्थचे अन फॉक्सग्लोव्ह चे आकर्षक तुरे आणि पिवळया बटरकप्सच्या लडीच्या लडी उलगडलेल्या होत्या. सगळं

रस्ताच इतका सुंदर होता की तो कॅमेऱ्यात पकडून चलतचित्र घेण्याची सतीशची धडपड चालू होती. आणि मी पण पळत्या गाडीतून मोबाईल-चित्र घेण्याचा प्रयत्न करत होते. एक नॅरोगेज रेल्वे लाईन रस्त्याच्या शेजारुन धावताना दिसायची तर मधेच गायबही व्हायची. प्रत्येक वळणावर गाडी वळली की दृश्यात बदल होत होता. बरेच पुढे गेल्यावर सारंग म्हणाला, चला आता अजून पुढे व्हिस्लर ला जाऊया. मागे एकदा नोवा अगदी तान्ही असताना, स्वप्नातलं वाटावं असं एक गाव पाहिले होतं, ते परत पहायला मिळणार म्हणून खूप आनंद झाला.

व्हिसलर हे एक छोटंसं टुमदार गाव आहे, जिथे २०१० साली ऑलिम्पिकच्या Snow Sports Competetions Organize केल्या होत्या. तिथे पोहचल्यावर लांबलचक पसरलेली हिरवळ आपलं स्वागत करते. एक छोटासा रंगमंच आणि ओपन-एअर थिएटरमधे हिरवळीवर टूरिस्ट आपापल्या सतरंज्या किंवा खुर्च्या घेऊन पहुडलेले असतात, एकीकडे रंगमंचावरच्या गायन-वादनाचा आस्वाद घेत. एखाद्या सिनेस्टुडिओमध्ये असावी अशी ही ऑलिम्पिक नगरी आहे. सगळीकडे दगडी रस्ते, आत कुठेही वाहनाला परवानगी नाही, मधेमधे बसायला नक्षीदार बाक, फुलांनी लगडलेली झाडं, नैसर्गिक वाटावे असे छोटे छोटे पूल अन त्याखाली झुळझुळ वाहणारं पाणी, चौकांमध्ये उभे केलेले टोटेनपोल (म्हणजे मोठाल्या लाकडी ओंडक्यांवर देवता, प्राणी, पक्षी इ. कोरलेले असतात), दुकानं आणि हॉटेल्सच्या बाहेर आणि खिडक्यांमध्येही विविधरंगी फुलांनी अगदी ओथंबलेल्या मोठमोठया हंडया, आल्हाददायक हवेत हातात कॉफी किंवा बियरचे मग घेऊन रंगीबेरंगी कपडे घालून



मनमोकळे हिंडणारे टूरिस्टस... असं एकूणच आनंददायी वातावरण. त्यात कुठेही ताण नाहीत, बंधने नाहीत, एकमेकांशी बरोबरी, स्पर्धा नाही. जो तो आपापल्या इच्छेनुसार आनंद मिळवत असतो. याच आनंदात भर घालत एक लांबलचक रोपवे (गंडोला) थेट डोंगरावर २२०० मीटर वर घेऊन जातो. जिथे बर्फावरचे स्पोर्टस् सुरु असतात. रोपवे ने जाताना दृष्टीस पडतात शुभ्र-धवल बर्फाने आच्छादलेल्या

खोलखोल दऱ्या, उंचच उंच वृक्षराजी, आणि सदोदित माथ्यावर बर्फ मिरवणारी पर्वत-शिखरे. नजर जाईल तिकडे पांढरा रंग! अशा वातावरणात स्कीईंग चालू असतं किंवा स्लेज.. गाडयांवरुन लोक धावत असतात.

यावर्षी करोनामुळे रोपवेवरचं हे जग सगळं बंद होतं. त्यामुळे वर जाता आलं नाही. पण बाकीच्या वातावरणात काहीही उणेपणा जाणवला नाही. नेहेमीप्रमाणेच फुलांनी नटलेलं गाव अन आनंदात भटकणारे टूरिस्टस! आम्हीही उत्साहाने सगळीकडे हिंडलो अन नंतर स्पगेटी फॉक्टरी या प्रसिध्द इटालियन हॉटेलमधे जेवण करुन बाहेर पडलो.

आजवरच्या सर्व छोटयामोठया पिकनिक्स वर कळस चढवणारा हा आजचा Whistler भेटीचा दिवस होता. आणि अनपेक्षितपणे जायला मिळाल्यामुळे तो फारच आनंददायी झाला.

व्हॅन्कुव्हरच्या एअरपोर्ट-एरिया जवळ आहे आयोना बीच. तिथे दोनदा जायला मिळालं. अलीकडे मोठा चक्राकार बहुपदरी, बहुमजली हायवे आणि पुढे बीचच्या रस्त्याला वळल्यावर एकदम शांतता!, तुरळक वाहने. ४-५ कार्स फक्त आधी आलेल्या. त्यावेळी करोना भीतीची सुरुवात होती, त्यामुळे लोक फारसे बाहेर पडत नव्हते. पण कर्फ्यू वगैरे काहीच नाही. गर्दी कमी आणि आम्ही न पाहिलेलं बीच, म्हणून सारंग मुद्दाम घेऊन आला. शांत गंभीर




वातावरण, दूरवर समुद्राचं... अथांग निळंभोर दर्शन. सूर्य मावळायला अजून थोडा वेळ होता. गाडी पार्किंगमध्ये ठेऊन आम्ही चालतच पुढे गेलो. कुठेच माणसांची चाहूल नव्हती. पण वेगवेगळया पक्ष्यांच्या किलबिलाटाने आमचं स्वागत झालं. समुद्राच्या बरेच अलीकडे पाणथळ जागा, अन.. झाडी बरीच आहे. त्यामुळेच खूप पक्षी दिसत होते. त्यात कावळयासारखे काळे पण पंखांच्या जागी चमकदार भगव्या रंगाचा फटकारा मारावा असे रेड विंग ब्लॉक बर्डस् हिरव्यागार झाडीत उठून दिसत होते. पाहता पाहता सूर्य अस्ताला जायला निघाला आणि सगळया आकाशाचं रुपच पालटलं. इतका वेळ निळाईत डुंबलेलं आकाश पश्चिमेकडे

लालिम्याने रंगून गेलं. झाडांनी किती मुकुट



घातले डोकीस सोनेरी असे आठवत सभोवार पाहिलं तर काय, झाडांबरोबरच विस्तीर्ण असा गोलाकार दिसणारा किनारा, त्यावरची मऊ रेती, पाण्यात तरंगत असलेले झाडांचे ओंडके, निळे निळे पाणी याबरोबरच सूर्यास्ताचे दर्शन घ्यायला आलेले लोक.... सारेच त्या अवर्णनीय अशा सोनेरी मुलाम्याने न्हाऊन गेले होते. त्या दृश्यावरुन नजरच हलत नव्हती किती वेळ. मग आम्हीही पुनरागमनायचं असं म्हणत त्या गगनराजाला मानवंदना देऊन निघालो.

परत जेव्हा आयोना बीचवर गेलो तेव्हा पतंग नेला होता. मोकळया जागेत सारंगने पतंग बाहेर काढला आणि तो आणि सतीश पतंग उडवू लागले. नोवाला पण खेळाचा हा प्रकार खूप आवडला असावा. कारण ती चक्क २० मिनिटे मांजा हातात धरुन उडवत होती. मग मी आणि कार्तिकी झाडं, पक्षी आणि आकाशाचं निरीक्षण करत खूप लांब फिरुन आलो. मोठया लेन्सच्या दुर्बिणी आणि कॅमेरे घेऊन काही ग्रुप आले होते. अमेरिकन रॉबिन, ग्रॅकल याचबरोबर, कॅनेडियन गीज पण खूप दिसले आम्हाला. नंतर सूर्यास्त पाहायला गेलो तर एवढ्या थंड हवेत एका जोडप्याचं लग्नाचं फोटोशूट चालू होतं. पांढरा वेडिंग ड्रेस घालून मावळत्या सूर्याला साक्षी ठेऊन ते दोघे निरनिराळया पोजेस घेऊन कॅमेऱ्यापुढे उभे राहत होते. थंडगार वारा आणि माणसे याचे त्यांना भान नव्हते बहुधा. परत एकदा तो मावळतीचा अदभुत देखावा डोळयात साठवून घेत आणि अजून एक संध्याकाळ अविस्मरणीय झाल्याच्या खुशीत आम्ही घरी निघालो.

असे भलेमोठे बीचेस व्हॅन्कुव्हरला तीनही बाजुनी आहेत ज्यामुळे त्याची रमणीयता खूपच वाढली आहे. पोर्ट मुडी, जेरिको बीच, इंग्लिश बे अशासारखी वेगवेगळी नावे या बीचेस ना दिली आहेत. बाहेर कुठे जायचे म्हटले की सगळयांनाच उत्साह येतो. याला आमची छोटी नोवा सुध्दा अपवाद नसते. गाणी गुणगुणत ती तिच्या सीटवर बसून मुकाटयाने बेल्ट बांधू देते. मग कारचे वरचे शटर ओपन करुन आम्ही निसर्गाच्या आणखी जवळ जाऊ पाहतो. निळे स्वच्छ आकाश प्रतिबिंबित झाल्यामुळे अधिक सुंदर

भासणारा पॅसिफिक समुद्र, किनाऱ्यावरचे काळेशार खडक, स्वच्छ पांढरी मऊ रेती आणि त्यावर सुटीचा आनंद मनमुराद लुटणारे लोक असेच दृश्य बहुतेक बीचेस



वर दिसते. Barbeque चे सामान बरोबर असते, शिवाय काहीजण फोल्डिंग खुर्च्या, टेबले, एवढेच काय Portable टेन्ट, सायकल्स सुध्दा कार मधून आणतात. कोणालाही त्रास न देता एन्जॉय करत असतात. जगा आणि जगू दया याप्रमाणेच मस्त रहा आणि राहू द्या अशी शिकवण देणारे हे लोक बरेच काही शिकवुन जातात.





# कोणार्कचे सूर्य मंदिर ...



## शिल्पकलेचा उत्कृष्ठ नमूना

सौ. सुनंदा कापरे, कल्याण

४, सदगुरु छाया, रामबाग लेन नं. २, कल्याण (प) - ४२१३०१

मो.नं. : ९७०२३४०८५५

ओरीसा राज्यात प्रेक्षणीय ठिकाणे अनेक आहेत. ओरीसाच्या राजधानीचे शहर म्हणजे भुवनेश्वर. इतिहासातील ओरीसा राज्यास अनेक ठिकाणी कलिंग, उत्कल, कोंगाडा त्याचप्रमाणे ओद्रादेश इ. नावाने संबोधले आहे. ओरीसा राज्याला प्राचीन कलाकृती, भव्य मंदिरे, उत्तमोत्तम हस्त शिल्प असे अनेक प्रकार लाभलेले आहेत. फुले-फळे, वनसंपदा इ. ची निसर्गाने मुक्त उधळण केली आहे. पुरीचे जगन्नाथ मंदिर, कोणार्कचे सूर्य मंदिर तसेच राजधानी भुवनेश्वरचे लिंगराज मंदिर म्हणजे ओरीसाचा सुवर्णत्रिकोण समजण्यात येतो. भुवनेश्वर व जगन्नाथ या दोन्ही शहरांना मंदिराची शहरे म्हटले जाते.

कोणार्क सूर्यमंदिर - जगन्नाथ पुरी ते कोणार्क मंदीर साधारण ४० कि.मी. चे अंतर आहे. ८० फूट रोड, रोडच्या दोन्ही बाजूस नारळ, सुपारी, आंबा, काजू इ. झाडे आहेत.



त्यामुळे वातावरणात गारवा जाणवला. कोणार्कला जाताना रस्ता समुद्रकिनाऱ्यावरुन जात होता. समुद्रात नुकतीच भरतीची वेळ सुरु झाली होती. गाडीतून उतरुन समुद्रात पाय भिजवून घेतले. पाणी दुपारच्या वेळी सुध्दा गार होते. मऊ-मऊ वाळूत पाय रोवले जात होते. निसर्गाचा हा वेगळा अनुभव घेऊन कोणार्क मंदिरात पोहोचलो.

मंदिर म्हणजे शिल्पकलेचा उत्कृष्ठ नमूना आहे. म्हणूनच कविवर्य रविंद्रनाथ टागोरांनी म्हणून ठेवले आहे की, दगडाच्या भाषेने मानवाच्या भाषेस पराभूत केलेले आहे. हे मंदिर म्हणजे सूर्यदेवाच्या उपासनेचे प्रमुख स्थान आहे. या मंदिराचे बांधकाम इ.स. १२०० मध्ये उत्कल नरेश लागुला नरसिंह देवजीने केले आहे. मंदिर निर्माण करण्याकरीता १२०० मजूर (शिल्पकार) १२ वर्षे झटत होते. पुर्ण बांधकाम दगडी आहे. बांधकामाकरीता पूर्ण खर्च सरकारी खजिन्यातून केला गेला. आमच्या गाईडने सांगितले की, मुख्य शिल्पकार जो होता, त्याची बोटे तोडली गेली कारण परत दुसरीकडे असे सुंदर शिल्प बनू नये.

सूर्यमंदिराचे शिल्पकाम व कौशल्य पाहून येणारा पर्यटक आश्चर्यचकीत व दंग होऊन गेला नाही तरच नवल! मंदिराच्या मुख्य गेटवर पुर्व दिशेकडे सिंहाने हत्तीला दाबून ठेवले आहे असे एक शिल्प आहे. हत्ती म्हणजे दौलत ऐश्वर्य व सिंह म्हणजे शौर्याचे प्रतिक. ऐश्वर्य प्राप्त झाले तरी त्यामुळे गर्व होऊ नये, म्हणून शौर्याने त्यास दाबून ठेवले आहे. मुख्य गेट ९.४ फूट लांब व

४.९ फूट रुंद आहे. उंची ९.२ फूट आहे. त्याचे वजन २७.४८ टन आहे. गेट पुर्णपणे दगडा पासून बनवलेले आहे. सूर्य देवतेच्या तीन आकृतीचे शिल्पकाम केलेले आहे.



दक्षिण दिशेची सूर्य देवत्ता ८.३ फूट उंचीची असून ती सूर्योदयाच्या वेळची आहे. पश्चिम दिशेकडची सूर्यदेवता मध्यान्हीची आहे. ती ९.३ फूट उंच आहे व उत्तर दिशेकडची सूर्यास्ताच्या वेळची आहे. ती ३.४९ मीटर उंचीची आहे. सूर्य मंदिर म्हणजे एक प्रकारे सूर्य देवतेच्या रथाचे आकृतीचे शिल्पकाम केलेले आहे. रथास एकूण २४ चक्र (चाके) आहेत. प्रत्येक चक्रात आठ आऱ्या आहेत. त्याचा व्यास ९.९ फूट आहे. ती सर्व चक्रे शिल्पकलेनी परिपूर्ण आहेत. दक्षिण दिशेच्या बाजूस युध्दाला सज्ज अशा घोडयाचे चित्र आहे (शिल्प आहे.) याची लांबी १० फूट व रुंदी ७ फूट आहे. घोडयाचे शिल्पास ओरीसा राज्याने त्यांची मुद्रा म्हणून मान्यता दिलेली आहे. या मंदिरातच एक रंगमंदीराचे शिल्प आहे. त्यात १२८ वेगवेगळया मुद्रांचे शिल्पकाम केलेले आहे. तसेच गर्भगृह आहे.

आता बरीचशी पडझड झालेली आहे. आम्ही गेलो तेव्हा दुरुस्ती चालू होती. पण पडझड झालेला भाग पर्यटकांसाठी बंद होता. बाजीराव पेशव्यांनी हया वास्तूस भेट दिली होती असे सांगण्यात येते. चार बाजूच्या असलेल्या द्वारास (गेट) अनुक्रमे पूर्व, उत्तर, दक्षिण व पश्चिम बाजू म्हणजे धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यांचे प्रतिक मानले जाते. सूर्यपत्नि छाया देवीचे शिल्प उत्तर दिशेस आहे. सौर परिवार नागभूषण, वैभव-हत्ती, शौर्य-सिंह, चतुरंग सैन्य-घोडा. सूर्यदेवतेच्या मुकुटाचे शिल्पकाम इजिप्तच्या नरेशा प्रमाणे साकार केलेले आहे. त्यामुळे अत्यंत नयनरम्य व अप्रतिम झालेले आहे. ते पाहून पर्यटकांचे मन आचंबीत/आश्चर्यचकित झाल्याशिवाय रहात नाही. याप्रमाणे सूर्यमंदिराची सफर करुन आम्ही पुरीस परत आलो. जगन्नाथाचे दर्शन घेतले. खूप-खूप आनंद झाला. जीवनाचे सार्थक झाले असे वाटते.



# पळसाची पाने...



## कॅलिफोर्निया २००८

डॉ. श्रीकांत नाडगौडा,
पत्ता - नीरा आपार्टमेंट, फ्लॉट नं.२, मृत्युंजय सोसायटी, मयूर कॉलनी,
प्लॉट नं.३४, कोथरुड, पुणे-४११०३८. मो.नं.९६५७१८८५८१

आम्ही उभयतां जेव्हा कॅलिफोर्नियात २००७ साली गेलो होतो तेव्हा अल्पावधीतच आम्हाला कुठेही जा पळसाला पाने तीनच



दिसतील ह्या मराठीतल्या लोकप्रिय वाक्यप्रचाराचं अनेक वेळा प्रत्यंतर आलं. कॅलिफोर्नियातल्या स्यान रेमॉन या आपल्याकडच्या विठ्ठलवाडी वडगाव सारख्या उपनगरात आम्ही आमच्या मुलाकडे मुक्कामास असताना सकाळी मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडलो होतो. मुलाने आणि सुनेने दिलेल्या सर्व सूचना लक्षात ठेवून फुटपाथवरुन जात असताना डाव्याबाजूच्या एका मॉलमधून एक पस्तिशीचं जोडपं बाहेर आलेलं आम्ही पाहिलं.

महिलेच्या हातात ग्रोसरीनं भरलेल्या दोन पिशव्या होत्या. त्या दोघांना पलीकडच्या फुटपाथवर जायचं असावं म्हणून ते सिग्नलची वाट पाहत उभे होते. तेवढ्यात ती महिला तिच्या जोडीदाराला काहीतरी म्हणाली ओ एस् एस् असं म्हणून पुढे होत त्या तरुणाने मोबाईल बंद करुन खिशात ठेवला आणि तिच्या जवळची एक जड पिशवी हातात घेतली. त्या महिलेच्या डोळयात लटका राग दिसत होता. तिने त्याला एक चापट मारली. यू नॉटी अशा शब्दात तिच्याकडून त्याला सर्टिफिकेट मिळालं सिग्नल मिळाल्यानंतर दोघेजण पलीकडे चालत गेले. माझी पत्नी मला म्हणाली, सगळे पुरुष इथून तिथून सारखेच बघा, ती रागावली तेव्हा कुठं ह्या म्हसोबाने तिच्या हातातली पिशवी घेतली. मी म्हणालो अगं ते पळसाचं पान आहे. म्हणजे? हिने विचारल्यावर मी म्हणालो अगं, जगाच्या पाठीवर कुठल्याही मनुष्यवस्तीत जा, पती-पत्नीचे स्वभाव तुला सारखेच दिसतील. त्यांचं एकमेकावरचं प्रेम असो की एकमेकाबरोबरचा वाद असो, शब्द वेगळे

असतील, भाषा भिन्न असेल, पण अंतरीचे सुर तेच असतात आणि भावना देखील तीच असते. याचं प्रत्यंतर आम्हाला आम्ही केलेल्या अल्पशा विश्व भ्रमंतीत अनेक वेळा



आले आणि दर वेळी माझी पत्नी आणि मी एकमेकाकडे पाहून मिश्कीलपणे हसलो आहोत.

एप्रिल २०१५ मध्ये एम्सटरडॅमला आम्ही पर्यटक म्हणून गेलो होतो. तिथे कुकेनहाफच्या ट्यूलीप गार्डनमध्ये आम्ही फुलांच्या बागेत हिंडत होतो. त्यावेळी एका जर्मन जोडप्याशी गप्पा मारण्याची संधी मिळाली. श्रीयुत जेफ्री आणि त्यांच्या सौभाग्यवती टेसी उर्फ सॅली. मी माझ्या परिचयाचा भाग म्हणून भारतातील पुणे शहरात एका वाणिज्य महाविद्यालयात अकौंटन्सी शिकवत होतो आणि आता निवृत्त झालो आहे हे त्यांना सांगितले. ते ऐकून ते एकदम खूष झाले. मी न विचारता देखील त्यांची तीन मुले कुठे कुठे आहेत आणि त्यांच्या संसारात ती कशी रमली आहेत ते त्यांनी मला सांगितले. पुण्यात मी एका ज्येष्ठ नागरिक संघाचा सभासद आहे हे मी त्यांना सांगताच त्यांनी मला एम्स्टरडॅममधल्या त्यांच्या ज्येष्ठ नागरिक संघाची माहिती सांगितली. आपल्या पत्नीबद्दल ते म्हणाले, खरं सांगायचं तर, ही माझी पत्नी टेसी आहे ना, तीच सगळं घर चालवते. आज ह्या गार्डनमधे येण्याची कल्पना तिनंच मांडली होती. पण, त्यामुळे एका भारतीय शिक्षकाला मी भेटलो. नंतर तेच पुढं म्हणाले, ही नुसतीच माझी पत्नी नाहीए, तर मैत्रीण पण आहे आणि सेक्रेटरी सुध्दा आहे. मी मनातल्या मनात म्हटले जेफरी साहेब, अहो, आमची युरोप ट्रीप खरं म्हणजे माझ्या सौभाग्यवतीनेच ठरवलेली आहे. आम्ही आमच्या पत्नीला गृहिणी, सखी, सचिवः म्हणत असतो. शेवटी काय, कुठंही जा, पळसाला पानं तीनच असतात.

आम्ही एप्रिल २०१५ च्या युरोप ट्रीपमधे जेव्हा पॅरिसच्या मध्यवस्तीत एका लॉजमध्ये मी उतरलो होतो. तेव्हाचा अनुभव काहीसा

असाच आहे. हॉटेल शॅब्रोल ऑपेरा असंच काहीसं त्याचं नाव होतं. दुपारची वेळ होती. हॉटेलच्या लाऊंजमध्ये मला न येणाऱ्या फ्रेंच भाषेतील एक मासिक मी उगाच चाळत होतो. खरं म्हणजे त्यातले रंगीत फोटो बघत होतो. तिथे काऊंटरवर एक सत्तरीला स्पर्श केलेले मॅनेजर मिस्टर डिके कसलासा अल्बम चाळत होते. माझ्याकडे पाहून मंदसे हसले आणि मला हॅलो म्हणाले. मला तेवढे निमित्त पुरेसे होते मी लगेच त्यांच्या जवळ गेलो भाषेची अडचण म्हणून मी माझ्या हातात नेहमी एक स्क्रिब्बलींग पॅड ठेवत असतो त्यात मी ठळक इंग्रजीत माझी माहिती लिहीत असतो. माझं नाव, वय, पर्यटक म्हणून कुठून आलो इत्यादी माहिती त्यामध्ये मी लिहीत असतो. माझ्या जवळचे पॅड मी त्याला दाखवले. त्याला खूप आनंद झाला. हे महाशय आपल्या प्रिय पत्नी बरोबरचे जुने फोटो जे एका अल्बममध्ये होते बघत बसले होते. यांची पत्नी पॅरिसमध्ये शिक्षिका म्हणून काम करत होती. आता तिला बरं वाटत नाहीये असं ते म्हणाले. पत्नीच्या आजारामुळे व्यथित झालेले त्यांचे करुण डोळे थोडेसे ओले झाले होते. माझ्या पत्नीचे गुडघे दुखत असतांनाची माझी अशीच झालेली अवस्था मला आठवली आणि त्याचबरोबर पळसाच्या पानांची ही आठवण झाली.

अमेरिका, लंडन, पॅरिस, स्विर्त्झलँड, सिंगापूर, श्रीलंका या सगळया ठिकाणी आम्ही निसर्ग निर्मित आणि मनुष्य निर्मित आश्चर्ये तर पाहिलीच पण त्याच बरोबर जगभरचा मनुष्य स्वभाव, त्याच्या भावना, भावना मधील तरलता सर्वत्र समानच आहे याचं ओझरतं दर्शन वारंवार घेतलं.

भयाची भावना मनुष्याच्या मानसिक विकासासाठी आवश्यक आहे का असा



प्रश्न मला नेहमीच पडतो. भीती वाटते तरी आपण भयपट पाहतोच ना? भय कथा वाचतोच ना? ती मानवी मनाची एक गरज असावी. दरवर्षी एकतीस ऑक्टोबरला अमेरिकेत हॉलोविन डे असतो. बहुसंख्य

घरांच्या दारात डोळ्यांची उघडझाप करणारे बल्ब लावलेल्या मानवी कवट्या बघायला मिळाल्या. २०१६ च्या ऑक्टोबर मध्ये मुलाकडे जॉर्जिया स्टेट मध्ये गेलो होतो. एका घराच्या लॉन शेजारच्या फुटपाथ वरुन संध्याकाळचा फेरफटका मारत असताना अचानक एक किंकाळी ऐकू आली म्हणून बघितले तर आमच्यापासून शंभरेक फुटांवरुन जाणाऱ्या जोडप्यातील स्त्री दोन्ही कानांवर हात ठेवून ओरडत होती. जवळ जाऊन पाहिले तर त्या लॉनवर संपूर्ण अंगाभोवती पांढऱ्या कापडात गुंडाळलेली ममी दोन्ही हातपुढे करुन उभी आणि शेजारच्या घरातून शाळकरी मुलांचा हसण्याचा आवाज येत होता. त्या स्त्रीला सुध्दा लक्षात आले असावे की अरे हा हॅलोवीन आठवडा आहे. मी माझ्या पत्नीला म्हणालो, बघ, आपण भारतीय म्हणतो ना भूतं आहेत, अतृप्त आत्मे आहेत, पिशाच्चं आहेत. चंद्रावर जाऊन आलेले अमेरिकन लोक सुध्दा भूतांना मानतात पळसाची पानंच गं ती.

आपल्याकडच्या नोटांवर नसेल पण अमेरिकन डॉलरची नोट बघा त्यावर एक वाक्य छापलेले दिसेल. **In God We Trust** देवावर आमचा विश्वास आहे. ते लोक आपल्याप्रमाणे पूजा, जपजाप्य करत नसतीलही. पण देवावर त्यांचा विश्वास आहे.



आम्ही भारतातील शहरी लोक पोपट, मांजर, कुत्रं पाळतो. आपल्याकडे ग्रामीण भागात गाय, बैल, गाढव, घोडे पाळतात. पाश्चात्त्य देशात शहरी भागात **Yaak** प्राणी जास्त करुन पाळलेला दिसतो. कुत्र्याचं त्यांच्याकडे ट्रेनिंग सेंटर आहे. त्याच्यासाठी फूडविकरणारी दुकाने आहेत. एवढंच काय पण कुत्र्याचा मालक काही दिवस बाहेर गावी जाणार असला तर डे-केअर सारखे डॉग

केअर सेंटर्स सुध्दा आहेत. आम्ही बैल पोळयाला बैलाला कुंकुम तिलक लावतो.



त्याला पुरणाची पोळी खाऊ घालतो, याचं तिकडचं रुप म्हणजे ते कुत्र्याला कपडे करतांना दिसतात. स्यान रे मोनला आम्ही असतांना आमच्या मुलाच्या शेजारी श्रीमती मार्गा नावाची एक वृध्दा राहत होती. तिचा लाडका टॉमी नावाचा कुत्रा होता. त्याला स्वेटर, जॉकेट घातलेले मला आठवत आहे. त्या टॉमीला हाड हाड करु नका असं आमच्या सूनबाईने आम्हाला बजावले होते. एकदा मी त्या मार्गा बाइशना त्यांच्या कुत्र्याकडे बघून सहज म्हणालो व्हॉट अ लव्हली टॉमी. हे एकून त्या मॉडम माझ्यावर एकदम खुश झाल्या. आपल्या मुलाबाळाचं कौतुक ऐकल्यावर आपण नाही का खुश आहोत अगदी तसंच. पळसाचे पान हो दुसरे काही नाही.

अशाप्रकारच्या कितीतरी प्रसंगांचे दाखले देता येतील. आम्ही उभयतांनी केलेल्या या अल्पशा विश्वभ्रमंतीचं एक ठळक वैशिष्ट्य जर सांगायचं म्हटलं तर मी असं म्हणेन की - इंग्लंड, अमेरिका सारख्या देशातील जनता असो की न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, आफ्रिकेतली जनता असो रंग, रुप, भाषा, चालीरीती याबाबतीत आम्ही भारतीय त्यांच्यापेक्षा वेगळे जरी असलो तरी त्यांचे आणि आमचे आयुष्यातले जीवन जगतानाचे अनुभव सारखेच आहेत. कारण ते सहभावनाशील मानवाच्या मनाचे दृश्य प्रतिबिंब आहे. आम्ही सगळे मानव एकाच नावेतील तीन प्रवासी आहोत.



# दक्षिणेची देव भूमी...



## तामिळनाडू आणि पाँडिचरी

श्रीपाद टेंबे

पत्ता : ए-३०१, पारिजातक को-ऑप. हौ. सोसायटी, नवश्या मारुती मंदिराच्या मागे, सिंहगड रस्ता, पुणे-४११०३०. मो.नं.९१५८०८८०४२

नेमेची येतो पावसाळा या धर्तीवर आमच्या दस का दमच्या टीमने यावर्षी कुठे फिरायला जायचे यावर बराच काथ्याकूट केला. आणि न संपणाऱ्या चर्चेचे गुऱ्हाळ संपल्यावर चेन्नई, महाबलीपुरम, तंजावर, पाँडिचरी, मदुराई, रामेश्वरम, कन्याकुमारी आणि परत असा कार्यक्रम निश्चित केला. चेन्नई येथे वास्तव्यास असलेले श्री व सौ करंदीकर यांनी मोठया आनंदाने यजमानपद स्वीकारले. सगळयांना सोयीच्या पडतील अशा तारखांना त्यांनी एक आठवडयासाठी भरगच्च कार्यक्रम आखला. चेन्नई टू चेन्नई



प्रवासासाठी मिनी बस, मुक्कामाच्या ठिकाणी राहण्यासाठी हॉटेल आरक्षण इत्यादी सर्व गोष्टी तयार होत्या. फक्त आम्ही चेन्नई येथे पोहोचण्याचा अवकाश होता. ठरल्याप्रमाणे सगळेजण वेळेवर चेन्नईला पोहचले. अंत नसलेल्या गप्पागोष्टी संपल्यावर आणि कधीही न थांबणाऱ्या भिंतीवरील घडयाळाने रात्रीचे बारा वाजून गेल्याचे व सकाळी साडे सहा वाजता चेन्नई शहर दर्शन करण्याची आठवण करुन दिली.

ठरल्याप्रमाणे आमच्या दस का दमच्या गँगने शार्प साडे सहा वाजता आपल्या चेन्नई दर्शनच्या मोहिमेवर प्रयाण केलं. आमचा पहिला थांबा श्री कपालेश्वर मंदिर हा होता. श्री कपालेश्वर मंदीर हे चेन्नईच्या मायलापूर या भागात टँक मार्केट मध्ये वसलेलं आहे. हे मंदिर भगवान भोले शंकर यांना समर्पित आहे. कपालेश्वर हे ना कपाल डकपाळ. आणि अलेश्वर हे भगवान शंकराचे उपनाम या पासून बनलेलं आहे. हे मंदिर सातव्या शतकात द्रविडांच्या वास्तुकारीचे उत्तम उदाहरण आहे. भगवान शंकराचे आशीर्वाद घेतल्यावर आमचा मोर्चा पार्थसारथी मंदिराकडे वळला. पार्थसारथी मंदिर शहराच्या ट्रीपलीकेन या भागात स्थापित आहे. पार्थसारथी या शब्दाचा संस्कृतमध्ये अर्थ अर्जुनाच्या रथाचा सारथी भगवान कृष्णासाठी आहे. इतिहासातील नोंदीनुसार या मंदिराची निर्मिती आठव्या शतकामध्ये पल्लवांच्या शासन काळात झाली. पल्लव काळात या मंदिराच्या भागाचा उपयोग बंदराच्या रुपात करण्यात येत असे. मंदिराचे गोपुर आणि वास्तुशिल्प याचे वर्णन करण्यास

शब्द अपुरे आहेत, इतके ते प्रेक्षणीय आहे.

चेन्नई मधील देवदर्शन आटोपता-आटोपता सकाळचे दहा वाजत आले होते. इकडे कावळयांनी अर्थातच पोटात ओरडण्यास सुरुवात केली होती. या कावळयांची गम्मतच आहे नाही! पृथ्वीवर कुठेही तुम्ही रहा हे कावळे वेळ झाली की सुरुवात करतात ओरडायला, भलेही त्यांच्या ओरडण्याचा आवाज कोणालाच ऐकू येत नाही पण आपला चेहरा आणि शारीरिक हालचाली नक्कीच बोलू लागतात. जवळच असलेल्या अस्सल दक्षिण भारतीय उपहारगृहात चविष्ट पदार्थांचे सेवन करुन सगळेजण धन्य झाले. पोटपूजा करुन आम्ही लागलीच मरीना बीच रस्त्यावरील राष्ट्रीय कला संग्रहालय बघण्यासाठी निघालो.

राष्ट्रीय कला संग्रहालयाच्या इमारतीचे डिझाईन आकर्षक आणि लक्ष वेधून घेणारे होते. याचे डिझाईन हेनरी इरविन यांनी तयार केले. या राष्ट्रीय कला संग्रहालयात खूप जुने पेंटींग्स आणि प्रतिमा इत्यादी गोष्टींचा खूप मोठा संग्रह आहे. तंजोरची प्रसिध्द कांच पेंटींग्स, सतराव्या शतकातील पेंटींग्स, हस्तशिल्प या सगळया गोष्टींचा संग्रह प्रेक्षणीय आहे. खरं सांगायचं म्हणजे हे संग्रहालय बघण्यासाठी एक पूर्ण दिवस देखील अपुरा आहे. आमच्याजवळ वेळ फारच कमी असल्यामुळे आम्ही हे संग्रहालय शांतपणे बघण्याचा कार्यक्रम आटोपता घेतला. जवळच संथोम कॉथेड्रल बेसलिका होते. या चर्चची निर्मिती सेंट थॉमस यांच्या मृत्युनंतर एक हजार वर्षांनी करण्यात आली असं त्याठिकाणी सांगण्यात आले. चर्चचा संपूर्ण परिसर एकदम शांत आणि भारावून टाकणारा होता.

संध्याकाळचे सात वाजत आले होते. चेन्नई की हसीन शाम मरीना बीच के नाम होती त्यामुळे बसमध्ये बसूनच दिव्यांच्या



झगमगाटात मरीना बीच आणि रस्त्याच्या आजूबाजूला असलेल्या लाईट हाऊस, चेन्नई म्युनिसिपल कॉर्पोरेशन, तामिळनाडू राज्याचे

पोलीस मुख्यालय, महात्मा गांधी पुतळा, क्वीन मेरी कॉलेज, लेडी विलिंगडन कॉलेज ऑफ एजुकेशन, स्वामी विवेकानंद यांचे निवासस्थान दुरुस्तीच्या कामासाठी पर्यटकांसाठी बंद होते., माजी मुख्यमंत्री अण्णा दुराई आणि जय ललिता यांची समाधी, इत्यादी ठिकाणाचे दर्शन घेतले. विस्तीर्ण असा लांबच लांब आणि नजरेत न मावणारा समुद्र किनारा व अनेक प्रेक्षणीय ठिकाणं आणि राज्य सरकारची कार्यालये याच भागात असल्यामुळे इकडे सदैव



पर्यटक आणि स्थानिकांची गर्दी असते. रात्रीचे दहा वाजत आले होते. दिवसभर चेन्नईच्या दमट हवामानामुळे सगळेचजण थकून गेले होते व सकाळी सात वाजता महाबलीपुरम येथे जायचे होते त्यामुळे आम्हाला प्रवासाचा पहिला दिवस संपवणे क्रमप्राप्तच होते.

चेन्नईपासून पासष्ठ किलोमीटर दूर असणाऱ्या, युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत सामील असलेल्या आणि भारतातील प्रसिध्द ऐतिहासिक स्थळ म्हणून लोकप्रिय असलेल्या महाबलीपुरम येथे जगातील दोन शक्तिशाली देशांचे प्रमुख भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी आणि चीनचे राष्ट्रपती श्री. शी जिनपिंग यांच्या भेटीने ही नगरी पुन्हा एकदा चर्चेत आली. या ऐतिहासिक नगरीचे चीन बरोबर सतराशे वर्षाचे नाते आहे असं सांगतात. अठराव्या शतकात तत्कालीन पल्लव आणि चीनचे शासक यांच्यात सुरक्षा करार झाला होता.

महाबलीपुरम येथील भव्य मंदिरे, स्थापत्यकला आणि सुंदर सागर तटासाठी जग भरात प्रसिध्द असलेले शहर आहे. बंगालच्या खाडीच्या तटावर वसलेले हे शहर पूर्वी माम्ल्लापुराम नावाने ओळखले जात असे. सातव्या शतकातील हे शहर पल्लव राजांच्या राजधानीचे शहर होते. येथील द्रविड शैलीतील वास्तुकला जगभरात प्रसिध्द असून दरवर्षी येथे हजारो देशी-विदेशी पर्यटक हजेरी लावत असतात. सत्तावीस मीटर लांब व नऊ मीटर रुंदीच्या भव्य खडकावर कोरीव नक्षीकाम हे महत्त्वाचे आकर्षण आहे. अर्जुन पॅलेस नावाने हा खंड ओळखला जातो. या विशाल शिलाखंडावर ईश्वर, मानव, पशु, पक्षी

अतिशय सुंदर रीतीने कोरले गेले आहेत. समुद्र किनाऱ्यावर प्राचीन मंदिर असून ते शोर टेम्पल म्हणून ओळखले जाते. महाबलीपुरम येथील मंदिरे, लेण्या या आठव्या शतकातील द्रविड वास्तुशैलीचा उत्तम नमुना आहे. तीन मंदिरांचा समूह असून मधले मंदिर श्री विष्णूचे आहे, तर त्याच्या बाजूने दोन शिवमंदिरे आहेत. समुद्राच्या लाटा या ठिकाणापर्यंत धडकतात.

याच भागात महाभारतातील पाच पांडवांच्या नावाने पाच दगडी रथ आहेत, त्यांना पांडव रथ असचं म्हणतात. या पाच पैकी चार रथ अखंड शिळेतून कोरले गेले आहेत. द्रौपदी व अर्जुनाचा रथ चौकोनी आकाराचा आहे. यात धर्मराजाचा रथ सर्वांत उंच आहे. खडकातून कोरुन जी मंदिरे आपल्या देशात बनवली आहेत त्यातील एक या ठिकाणी बघायला मिळते. त्याला कृष्ण मंडप असं म्हणतात. येथील भिंतीवर कोरीव कामात ग्रामीण जीवनाची झलक पाहायला मिळते. त्याचप्रमाणे गोवर्धन पर्वत उचललेल्या कृष्णाचे शिल्पही येथे आहे. तर गुहेत विष्णूच्या वर आणि वामन या अवतारांचे दर्शन आपल्याला घडते. त्याचप्रमाणे सातव्या शतकातील महिषासुर मर्दिनी गुहा कोरीव कामांच्या नजरेने प्रेक्षणीय आहे. जवळच एक संग्रहालय असून त्यात स्थानिक कलाकारांनी बनविलेल्या मूर्तींचा संग्रह केला गेला आहे. या संग्रहालयात जवळपास तीन हजाराच्या आसपास मूर्ती आहेत. संध्याकाळचे सहा वाजले होते आणि महाबलीपुरमच्या लेण्या बघण्याची वेळ संपलेली होती. आता आमचा तिसरा दिवस तंजावूरसाठी होता. त्याप्रमाणे आम्ही सगळयांनी तंजावूरकडे प्रयाण केलं. साडे चार तास प्रवास करुन आम्ही तंजावूर येथे पोहचलो.

सकाळी ब्रेकफास्ट करुन तंजावूर भ्रमंतीसाठी आम्ही निघालो. तामिळनाडू मधील तंजावूरचा इसवी सन आठशे वर्षापूर्वीचा इतिहास फारसा ज्ञात नाही. पण चोला राजवटीपासून हे गाव जगाच्या



नकाशावर आहे. तंजावूर हे नाव तंजन नावाच्या दैत्याच्या नावावरुन पडले असावे.

नीलमेघ पेरुमल या विष्णूच्या अवताराने त्याचा नाश केला अशी आख्यायिका सांगितली जाते. चोला घराण्यातील राजांनी इथे चारशे वर्षे राज्य केले.

युनेस्को ने जागतिक वारसा म्हणून घोषित केलेले येथील विशाल आणि प्रेक्षणीय ब्रहदीश्वर मंदिर इसवी सन एक हजार ते एक हजार बारा या कालावधीत चोला राजवटीतच बांधले गेले, राजराजे चोला या राजाने चालुक्य, राष्ट्रकुट, पंड्या राजवटीच्या राजांबरोबर युध्द करुन त्यांना जिंकले. तसेच मालदीव, श्रीलंका, ब्रम्हदेश या भारता बाहेरील प्रदेशांवरही विजय मिळवला होता.



आपल्या विजयाचे प्रतिक म्हणून त्याने ब्रह्मदीश्वर मंदिराची उभारणी केली. हे मंदिर जागतिक वारसा म्हणून प्रसिध्द आहे. अनेक राजकीय घडामोडीनंतर १६७४ पासून हा भाग आदिलशहाने व्यंकोजीराजे भोसले यांच्याकडे सोपविला. ब्रिटीश भारतात येईपर्यंत म्हणजेच अठराशे पंचावन्न पर्यंत हे शहर भोसल्यांकडेच. तंजावूर हे सध्या सांस्कृतिक केंद्र आणि प्रेक्षणीय स्थळ म्हणून विशेष प्रसिध्द आहे. येथे पूर्वी चौऱ्याहत्तर मंदिरे होती, त्यातील पस्तीस मंदिरे अजूनही उभी आहेत.

ब्रह्मिदश्वर मंदिर हे ऐतिहासिक आणि धार्मिक, तसेच दक्षिणात्य चोल स्थापत्याचे उदाहरण आहे. दोनशे फुट उंच अशा या मंदिराला जागतिक वारसा स्थळ म्हणून दर्जा आहे. मंदिराच्या परिसरात विविध राजवटींच्या कालावधीतील सुमारे सातशे शीलालेख या ठिकाणी आहे. या मंदिराला राजराजेश्वर मंदिर असेही संबोधले जाते. पाषाण, वास्तुकला, प्रतिमा विज्ञान, चित्रांकन, नृत्य, संगीत आभूषणे याचा खूप मोठा खजिना आहे. या मंदिराचे वैशिष्ठ्य म्हणजे दुपारी या मंदिराच्या शिखराची सावली जमिनीवर पडत नाही, अशी या मंदिराची रचना आहे. भव्य, कलात्मक आणि दक्षिणात्य पध्दतीची उत्तुंग गोपुरे हे या मंदिराचे आणखीन वैशिष्ठ्य. भारावून टाकणाऱ्या मंदिराच्या वातावरणातून जवळच असलेल्या सरस्वती महाल पुस्तक संग्रहालयात आलो. या संग्रहालयात सुमारे तीस हजार पुस्तके आहेत. त्यात जुने ताम्रपट, जुने संस्कृत ग्रंथ, ऐतिहासिक दस्ताऐवज यांचा समावेश आहे. सरस्वती

महाल पुस्तक संग्रहालयाच्या नंतर आम्ही कलादालन बघायला सुरुवात केली. या ठिकाणी चोल, पल्लव, नायक कालीन अनमोल वस्तूंचा खजिना येथील कलादालनात आपल्याला बघायला मिळतो. सरफोजीराजे भोसले यांचा पुतळा, नटराजांच्या विविध राजवटीतील मूर्ती, तसेच अनेक देवी देवतांच्या असंख्य सुंदर कलाकृती बघावयास मिळतात.

अन्य वैशिष्ठ्यामध्ये तंजावूर हे रेशीम उद्योगाचे प्रमुख ठिकाण आहे. तंजावरला तांदुळाचे कोठारही समजले जाते. तंबोरा, वीणा, व्हायोलिन अशा अनेक वाद्यांची निर्मिती या ठिकाणी होते. त्यामुळे संगीत, नृत्य महोत्सवाचे आयोजन नियमितपणे केले जाते. त्याचप्रमाणे तंजावूरची चित्रशैली कला क्षेत्रात खूपच प्रसिध्द असल्याने देशी आणि विदेशी पर्यटकांचा तंजावूरला कायम ओघ असतो.

दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता आम्ही पाँडिचरीला पोहचलो. ज्याला पॉन्डेचेरी किंवा पाँडी असंही म्हणतात. पाँडिचेरी म्हटलं की अध्यात्म गुरु, स्वतंत्राता सेनानी, प्रकांड विद्वान आणि योगी श्री अरबिंदो घोष हे नाव प्रकर्षाने आपल्या समोर आलेच पाहिजे. सर्व प्रथम आम्ही ऑरोव्हीले येथील आश्रम आणि सुप्रसिध्द मातृ मंदिर बघण्यासाठी आलो. आश्रमात येतांना



पाँडिचरीच्या सर्वांग सुंदर पॅरडाईज बीचच्या बाजूने असलेल्या रस्त्याच्या दुतर्फा अनेक युध्द स्मारके, लाईट हाऊस, महात्मा गांधी यांचा पुतळा, विधानसभा, फ्रेंच शैलीतील टुमदार घरं, आणि रेस्टॉरंटस बघायला मिळाली.

युनिवर्सल टाऊनची कल्पना घेऊन अरबिंदो आश्रमाची स्थापना १९२६ मध्ये श्री अरबिंदो घोष आणि त्यांची शिष्या मां च्या नावावर आहे. या योजनेचे भारत सरकारने देखील समर्थन केले आहे. अतिशय सुंदर, शांत, निसर्गरम्य वातावरण असलेल्या या टाऊनशिपमध्ये महत्त्वाचे आकर्षण मातृमंदिर आहे. जगातील सगळया धर्माचे लोक या ठिकाणी अध्यात्मिक आणि पैसा मुक्त जीवनशैलीचा आनंद घेऊ शकतात. अध्यात्माचा शोध घेणाऱ्यांसाठी हे ठिकाण सर्वार्थाने ज्ञानाचा अथांग सागर आहे.

ऑरोविलेमधील भारावलेल्या वातावरणातून बाहेर पडून आम्ही शहराच्या मध्यात असलेल्या श्री अरबिंदो यांच्या आश्रमाकडे आलो. कारण हा आश्रम सायंकाळी पाच वाजता पर्यटकांसाठी बंद होतो. अध्यात्मातील ज्ञान प्राप्तीसाठी हा आश्रम श्री अरबिंदो यांनी स्थापन केला. यांनी आणि त्यांची एक शिष्य मिरा अल्फस्साने या आश्रमाच्या स्थापनेसाठी विशेष सहकार्य केले.

आश्रमाच्या मध्यभागी असलेल्या फ्रांगीपनी झाडाच्या खाली या दोघांची समाधी आहे. ही समाधी चोवीस तास ताज्या फुलांनी आकर्षकरित्या सजवलेली असते. अगदी निरव शांतता आणि अतिशय गंभीर वातावरणात समाधीचे दर्शन घेवून बाहेर आल्यावर जवळच असलेल्या श्री मानकुला विनयागार म्हणजेच श्री गणेशाचे मंदिर आहे. मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ तुम्हाला आशिर्वाद देण्यासाठी गजराज आहेत. या मंदिरात ब्रम्होत्सव आणि विनायकी चतुर्थी भव्य प्रमाणात साजरी केली जाते. अशा रीतीने आम्ही आमचे पद्दुचेरीची ठरलेली भ्रमंती पूर्ण करुन विश्रांतीसाठी हॉटेलमध्ये परतलो. सकाळी आम्हाला मदुराई येथील मीनाक्षी देवीचे दर्शन करुन रामेश्वरला पोहचायचे होते. रामेश्वरमपर्यंत प्रवास जवळपास २५० किलोमीटरचा होता.

सकाळी आम्ही मदुराईला जाण्यासाठी साडेसहा वाजता निघालो. रस्त्यांची चांगली अवस्था, हिरवीगार भात शेती, उंच डोलणारी नारळाची झाडं, त्यामुळे आम्ही



सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास मदुराई येथे पोहचलो देखील. फटाफट फ्रेश होऊन दर्शनासाठी मंदिराकडे निघालो, कारण दुपारी एक ते चार मंदिर दर्शनासाठी बंद असल्याचे कळले. मंदिराच्या परिसरात अनेक छोटी मोठी मंदिरे आहेत. येथेच एका ठिकाणी भगवान शंकर आणि मीनाक्षी देवीची पूर्वाभिमुख मूर्ती आहे. जवळच सोन्याचा मुलामा दिलेला स्तंभ आहे. मंदिराचा परिसर खूप मोठा आणि भव्य असल्यामुळे चांगलीच दमछाक होते. मंदिराच्या आजूबाजूला उंचच उंच अशी

एकूण चौदा गोपुरे आहेत. सगळया मंदिरांना असतात त्याप्रमाणे या ठिकाणीही एक दंतकथा आहे. आणि हो मंदिर परिसरातील एक हजार खांब असलेला मंडप आवर्जुन बघण्यासारखा आहे. दर्शन आटोपल्यावर आम्ही लागलीच पाच वाजता आपले माजी राष्ट्रपती, मिसाईल मॅान, भारतरत्न श्री अब्दुल कलाम यांची जन्मभूमी आणि बारा ज्योर्तिलिंगापैकी एक ज्योर्तिलिंग आणि पौराणिक अशी पार्श्वभूमी असलेल्या रामेश्वरमकडे कूच केले. रामेश्वरमच्या अलीकडे समुद्रावर बांधलेला सुप्रसिध्द पाम्बन पुल लागला. शेजारीच रेल्वेचा पुलही दिसत होता.


रामेश्वरम येथे गेल्यावर ज्योर्तिलिंगाच्या दर्शनासोबत स्फटिक लिंग दर्शनाचे फार महत्त्व आहे. रामेश्वरचे या स्फटिक लिंगाचे दर्शन फक्त पहाटे चार ते पांच या वेळेतच घेता येत असल्याने आम्ही सगळे पहाटे चार वाजताच मंदिरात पोहचलो. आमच्या अगोदर हजारो शिवभक्त हजर होते. रामेश्वरमचं रामनाथस्वामी मंदिर बारा ज्योर्तिलिंगापैकी एक असलेलं शिवमंदिर. आख्यायिका असं सांगते की प्रभू श्रीराम यांनी रावणाविरुध्द झालेल्या युध्दात झालेल्या पापांचे क्षालन करण्यासाठी या ठिकाणी भगवान शंकराची आराधना केली. मंदिरात बावीस कुंड आहेत जे भगवान श्रीराम यांच्या भात्यातील बावीस बाण दर्शवतात. मंदिरातील भक्तांच्या प्रचंड गर्दीमुळे मंदिरातील पुजाऱ्याशी संधान साधून अर्थातच पैसे देवून देव दर्शन आणि प्रसिध्द अशा बावीस कुंडातील पाण्याने स्नान करुन पुण्य आमच्या पदरात हे पाडून घेण्यात



यशस्वी झालो.

देवदर्शन आणि पोटपुजा करुन आम्ही रामेश्वरमच्या दक्षिणेकडे अंदाजे पंधरा किलोमीटर दूर असलेल्या धनुष्यकोडी या गावाकडे निघालो. भारताचे दक्षिणेकडील जमिनीवरील शेवटचे टोक. भाविक रामेश्वरम यात्रेच्या पूर्णत्वासाठी येथे येऊन स्नान करतात, रावणाच्या लंकेवर स्वारी

करण्यासाठी प्रभु श्रीराम यांनी या ठिकाणाहून सेतू बांधला होता. लंकेची स्वारी यशस्वी झाल्यावर बीभीषणच्या विनंतीवरुन धनुष्याचा कोटीने तो तोडून टाकला म्हणून याला धनुष्यकोटी किंवा धनुष्यकोडी असंही म्हणतात. या ठिकाणाहून श्रीलंका हा देश




दिसतो. भारत आणि श्रीलंका यांच्यात ही एकमात्र जमिनी सीमा असुन एकोणीशे चौसष्ट साली आलेल्या चक्रीवादळात धनुष्यकोडी हे गाव पुर्णपणे नष्ट झाले. या ठिकाणी हिंदी महासागर आणि पश्चिम बंगालचा उपसागर यांचा संगम आहे.

धनुषकोडी बघून आम्ही रामेश्वरम येथे स्थापित डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे निवासस्थान बघून त्यांच्या मेमोरीयलला आलो. हे मेमोरियल डॉ. कलाम यांचा संपूर्ण जीवन इतिहास दर्शवितो. डॉ. कलाम यांच्याद्वारे वापरले गेलेले वैयक्तिक सामान, त्यांचे चित्र, मूर्ती यांचा संग्रह आहे. आतापर्यंत म्हणजे रामेश्वरमपर्यंत सगळं ठरल्याप्रमाणे पार पडले होते. कन्याकुमारी हे आमच्या सहलीचा शेवटचा पडाव होता आणि पुढचा प्रवास रेल्वेने करायचा होता.

आमची ट्रेन रात्री दहा वाजताची होती, जी पहाटे चार वाजता कन्याकुमारीला पोहोचली. विवेकानंद केंद्रात मुक्कामासाठी आरक्षण केलेले असल्याने पंधरा मिनिटात केंद्रात पोहचलो. सूर्योदयाच्या वेळेची माहिती घेऊन आम्ही सगळे नियोजित वेळेच्या आधी समुद्र किनाऱ्यावर आलो. निसर्ग सौंदर्याच चाहते अगोदरच आपआपली पोझिशन घेवून आकाशाकडे आपली नजर लावून बसलेले दिसत होते. काही क्षणातच तो क्षण आला. नशिबाने आकाश बऱ्यापैकी निरभ्र होते त्यामुळे पोटभरुन त्या दैवी चित्रकलेचा आनंद घेता आला. सकाळी नऊ वाजता कन्याकुमारी आणि परिसरातील भटकंतीसाठी टॅक्सीने निघालो.

सर्वप्रथम आमची कार रॉक मेमोरियलकडे आली. आपली नजर समुद्राकडे वळली की आपल्याला दिसतात दोन भव्य खडक आणि या दोन खडकांवर

दोन भव्य स्मारके. ही दोन्ही स्मारके बघण्यासाठी बोटीने छोटासा प्रवास करावा लागतो. पहिले स्मारक आहे ते विवेकानंद रॉक मेमोरियल. स्वामी विवेकानंद पोहत जेंव्हा या खडकावर गेले तेंव्हा त्यांना ज्ञानाची अनुभूती झाली असं म्हणतात. त्यानंतरच त्यांनी शिकागो येथील धर्म परिषदेत भाषण



करुन भारताचे नाव अजरामर केले. १९७० मध्ये हे स्मारक उभारण्यात आले. आतील भवनातील स्वामी विवेकानंद यांची मूर्ती एकदम सजीव वाटते. या भवनाच्या समोर गांधी स्मारक आहे. दुसऱ्या खडकावर तामिळ संतकवी तिरुवल्लुर यांची १३३ फुट उंच मूर्ती आहे. दुरुस्तीच्या कामामुळे पर्यटकांसाठी मनाई होती. विवेकानंद रॉक मेमोरियल स्मारकाच्या आणि विवेकानंद केंद्राच्या उभारणीसाठी श्री एकनाथजी रानडे याचे प्रयत्न आणि जिद्द याला आपल्याला सॅल्युट करावाच लागेल.

श्री एकनाथजी रानडे यांच्या अचाट कर्तृत्वाला सॅल्युट करुन आम्ही परत आल्यावर समुद्र संगमाजवळच असलेल्या कन्याकुमारी देवीचे सुंदर मंदिर आहे. मंदिर पूर्वाभिमुख असून भक्तांना प्रवेश हा उत्तर द्वारातूनच आहे. गोपुरातून आत प्रवेश केल्यावर दोन्ही बाजूला सुंदर दगडी कोरीव काम चकित करुन टाकणारे आहे. उपलब्ध माहितीनुसार हे मंदिर पांड्य राजाच्या काळात बांधले गेले. देवीचे दर्शन हा नितांत सुंदर असा अनुभव आहे. दर्शन झाल्यावर अंदाजे चाळीस किलोमीटर दूर असलेल्या किल्ला बघण्यासाठी निघालो. हा किल्ला राजा मरतड १७२९-१७५८.च्या कारकिर्दीत बांधण्यात आला. किल्ला नावाचाच आहे, आतमध्ये बघायला फारसे काहीच नाही. फारसे काय काहीच नाही. जे काही बघण्यासारखे आहे ते म्हणजे सुंदर समुद्र. किल्ल्यावरची स्वारी आटोपून आम्ही

थिरपाराप्पू धबधबा बघायला गेलो. या ठिकाणी गेल्यावर निसर्गरम्य वातावरण आणि पाण्याचे अंगावर उडणारे तुषार यांनी आमचा सगळा शीण घालवला हे नक्की. कन्याकुमारी दर्शन करुन विवेकानंद केंद्रात पोहचेपर्यंत रात्रीचे दहा वाजले होते.

प्रत्येक सहलीतून आपल्याला नेहमीच नवउर्जा मिळतेच. एखादं प्रेक्षणीय ठिकाण



पाहिलेले असतं. निसर्गसौंदर्य अनुभवलेलं असतं. आध्यात्मिक वृत्तीच्या लोकांना देवदर्शन करुन भरभरुन समाधान मिळालेलं असतं. परंतु ही दक्षिणेची सहल या बाबतीत थोडी वेगळी ठरली. कन्याकुमारीला विवेकानंद रॉक मेमोरियल पाहून आणि विवेकानंद केंद्रात राहून आल्यावर एकनाथजी रानडे या दोन शब्दांनी मनावर अक्षरश: गारुड केल आहे. या कर्मयोग्याने आपले आयुष्य पूर्णपणे या कार्यासाठी झोकून दिले. आज या ठिकाणाला तीर्थस्थळाचे स्वरुप आले आहे. जगाच्या कानाकोपऱ्यातून पर्यटक येत असतात. या कर्म योग्याने केलेल्या कार्याच्या वर्णनासाठी शब्द खरंच अपुरे आहे.

सगळी आवरा आवर करुन सकाळी सहा वाजताच्या ट्रेनने परतीचा प्रवास चालू होणार होता. काहीजण चेन्नई, काहीजण त्रिवेंद्रम मार्गे भोपाळला आणि आम्ही दोघं पुण्यासाठी निघणार होतो. एकंदरीत आठवडा सार्थकी लागल्यासारखा झाला. या दिवसांच्या आठवणीवर पुढचे दिवस



घालवायचे आहेत. अशाप्रकारे अविस्मरणीय आणि अपूर्व अशा आमच्या दक्षिणेची देवभूमी असलेल्या तामिळनाडू आणि पाँडिचरीचा प्रवास संपवून आमच्या डोक्याचा तिजोरीत नवीन आठवणी घेवून परतलो.....



# पूर्वेकडील मुशाफिरी...

## सिक्कीम, दार्जीलिंग




अरुण तांबे

सी २१/८, कैवल्य सोसायटी, कोथरुड, पुणे - ३८.

दूरध्वनी-९४२०९०९६५३

सिक्कीम, दार्जीलिंग या उत्तर पूर्व भारतातील निसर्गसौंदर्याची देणगी लाभलेल्या प्रदेशात फिरायला जायचे मनसुबे बऱ्याच काळापासून चालू होते. अखेर डिसेंबर २०१८ च्या पहिल्या आठवड्यात हा योग आला. आम्ही घरातील मंडळीनी सिक्कीम, गंगटोक, दार्जीलिंग आणि परत येताना राजधानी दिल्ली दर्शन असा प्रवासाचा बेत आखला होता.

देशांतर्गत पर्यटनामध्ये विकसित झालेल्या केरळ, अंदमान, गोवा, हिमाचल प्रदेश, पृथ्वीवरील नंदनवन काश्मीर, भव्य महाल, हवेल्या आणि चंदेरी वालुकामय वाळवंट लाभलेल्या राजस्थान इतकंच सुंदर, स्वच्छ, निसर्गरम्य आणि प्रदूषणमुक्त राज्य म्हणजे सिक्कीम. भौगोलिक दृष्ट्या चीन, भूतान आणि नेपाळ या तीन देशांच्या सीमानी वेढलेले आणि दक्षिणेला पश्चिम बंगाल राज्य यांच्यामध्ये असलेलं छोटेखानी सिक्कीम आपल्या महाराष्ट्रातील पर्यटकांच्या दृष्टीने जरा आडवाटेलाच पण हौशी पर्यटकांसाठी पर्वणीच! येत्या काळात पर्यटनाच्या नकाशावर ईशान्येकडील सेव्हन सिस्टर्सपैकी सिक्कीम हॉट डेस्टिनेशन असणार आहे.

आम्ही ७ डिसेंबरला पुण्याहून दुरोंतो एक्सप्रेसने निघालो. वाटेत बडोद्याच्या अलीकडे ट्रेन मधूनच नर्मदेच्या पुलावरुन दिसणारा नयनरम्य सूर्यास्त पाहिला. बडोदा रेल्वेस्टेशनवर अस्सल दुधात बनवलेल्या मसाला चहाचा आस्वाद घेतला तेव्हा रात्रीचे ८ वाजले होते. गाडीतच रात्रीच्या जेवणाची अंगतपंगत झाल्यावर लाईट ऑफ झाले. रतलाम, कोटा, मथुरा एकेक स्टेशन्स मागे टाकत गाडी सकाळी साडेसहाला दिल्लीला हजरत निजामुद्दीन स्टेशनवर पोहचली. बाहेर येऊन आम्ही जवळचे मेट्रो स्टेशन गाठले. दिल्ली मेट्रोबद्दल खूपच ऐकले असल्याने त्यातून प्रवासाची उत्सुकता होतीच. स्वच्छ, चकचकीत, सरकते जिने असणारे मेट्रोच्या शिवाजी स्टेडियम स्टेशनमधील निऑन साइन बोर्ड, जाहिराती पहात प्लॅटफॉर्मवर आलो. सकाळी कडाक्याच्या थंडीत दिल्ली एअरपोर्ट पर्यंतचा मेट्रोचा हा प्रवासही मजेशीर वाटला. दिल्लीहून विमानाने बागडोगरा इथे पोहचलो. तिथून पुढील प्रवासासाठी घ्यायला आलेल्या गाडीतून आम्ही न्यू जलपैगुडी (सिलिगुडी) मार्गे सिक्कीमची राजधानी असलेल्या गंगटोककडे प्रयाण केले. घड्याळात संध्याकाळचे पाच देखील वाजले नव्हते पण दिवस लहान असल्याने त्याही वेळेला तिथे अंधार पडला होता. सिलीगुडी ते गंगटोक हे ११० किलोमीटर अंतर पार करायला घाट रस्त्यामुळे जवळपास पाच तास लागतात. तिस्ता नदीच्या काठाने जाणाऱ्या रस्त्याने बराचसा प्रवास अंधारातूनच झाल्याने जरासा हिरेमोड झाला होता. तिस्ता ही या भागातील प्रमुख नदी. दोन्ही बाजूंनी डोंगरांच्या रांगांमधून वाहणाऱ्या या नदीचे पात्र फार रुंद नाही पण बारमाही पाण्याच्या प्रवाहामुळे कडेच्या डोंगररांगा मात्र वर्षभर गर्द वनराईने बहरलेल्या असतात. जसजसे पुढे जात होतो तसे थंडीनेही आपला करिष्मा दाखवायला सुरुवात केली होती. अक्षरश: कुडकुडतच आम्ही एकदाचे गंगटोकला पोहचलो आणि तेथील हॉटेलमध्ये प्रवेश केला. हसतमुख स्वागतीकेने आमचे अगदी टिपिकल सिक्कीम स्टाईलमध्ये सर्वांना रेशमी स्कार्फ घालून स्वागत केले. पाठोपाठ आलेला गरमागरम लेमन टी गळयातून उतरल्यावर आता जरा उबदार वाटू लागले होते. रुमचा ताबा घेऊन सर्वजण लगेच जेवायला गेलो. अगदी कोल्हापुरी, नागपुरी झटका नसला तरी हा तडका देखील कमी झणझणीत नव्हता. लज्जतदार भोजनाचा आनंद घेऊन आम्ही लगेच रुममध्ये परतलो आणि दिवसभराच्या प्रवासामुळे आलेल्या शिणवट्यामुळे लगेचच निद्राधीन झालो.

दुसऱ्या दिवशी गंगटोक पासून अंदाजे ५६ किलोमीटर दूर पूर्व सिक्किम मधील भारत चीन सीमेवरील नथुला पास इथे निघालो. तिकडे जाण्यासाठी अगोदर परमिट मिळवावे लागते ते काढले होतेच. वाटेत थर्मल वेअर्स, ग्लोव्हज, बूट भाड्याने घेतले. या भागात प्रवासाला लागणारा वेळ हा फक्त अंतरावर (ग्र्ध्र्ह्म्) अवलंबून नसतो हेही लक्षात ठेवायला हवं. म्हणूनच परमिट मिळालं, तरी हवामान बदलल्यास किंवा लँड स्लाईड झाल्यास दक्षता म्हणून बॉर्डर सिक्युरिटी फोर्स ने रस्ता बंद केल्यास आपल्याला आहे तिथेच थांबणे किंवा परत फिरण्याशिवाय पर्याय नसतात. आमच्या बाबतीत दुर्दैवाने हेच घडले. प्रसिद्ध त्सोंगो लेकच्या जरा अलीकडे २ फर्लांग वाटेत अचानक हवा बदलली आणि जोरदार हिमवर्षाव सुरु झाला. खबरदारी म्हणून बीएसएफ ने लगेच वाहतूक थांबवली आणि पुढील रस्ता बंद केला. मन खूप खट्टू झालं; पण निसर्गाच्या मनमानीपुढे कुणाचं काय चालणार? काहीच इलाज नव्हता. पुढे जवळपास दोन एकशे वाहने थांबलेली दिसत होती. मग काय तिथंच कमालीच्या थंडीतही गाडीतून उतरलो आणि स्नो फॉल पाहण्याचा मनमुराद आनंद घेतला. हिमकणांच्या वर्षावात डोंगर आणि त्यावरील वृक्षराजी बर्फाची चादर लपेटून घेतात असा हा अदभुत नजारा गोठवणाऱ्या थंडीतही डोळयांना अनुपम आनंद देऊन जातो. पण नथुला पास आणि त्सोंगो लेक मिस केल्याची हुरहूर मनात होतीच.

ये जवानी है दिवानी चित्रपटात दिपिकाच रणबीर कपूरला म्हणते,

जितना भी ट्राय करो, जिन्दगी मे कुछ न कुछ तो छुटेगा ही बनी, सो जहां हो वहीं का मजा ले लो ना... ये बात भी सही!

उणे ८ डिग्री सेल्सिअस मधील अनोख्या स्नो फॉलचा अनुभव घेऊन आम्ही परत फिरलो. संध्याकाळी गंगटोकमधील मॉल रोडच्या हॅपेनिंग स्पॉटवर टाईमपास करुन मग हॉटेलवर परतलो.

तिसऱ्या दिवशी ताशी टोक, गणेश टोक तसच नामग्याल आणि रुमटेक या अतिशय सुरेख मॉनेस्ट्री पाहिल्या. शुभ्र रंगातील स्तूप, त्यावर सोनेरी रंगाचे कळस आणि उदात्त वातावरणात येथील गरु-शिष्यांचं शांत, तेज:पुंज व्यक्तिमत्त्व नजरेत भरणारे होते. एकूणच मनात एक चेतना जागृत झाल्याचं समाधान इथे मिळते. पुढे रोप-वे मधून सैर करताना गंगटोक शहराचे विहंगम दृश्य दिसते. त्यानंतर पेलींग येथे जाण्याचा आमचा विचार होता. कांचनजुंगाचे जवळून होणारे दर्शन आणि नव्याने झालेल्या काचेच्या स्कायवॉक यामूळे पेलींग हे सिक्कीममधील एक सुरेख पर्यटनस्थळ म्हणून विकसित होतंय. खरंतर सरोवरे आणि आल्हाददायक निसर्गसौंदर्याची मुक्त उधळण असणारी अनेक ठिकाणे सिक्कीममधे आहेत. पण वेळेच्या अभावामुळे अशी काही ठिकाणे मिस केल्याची भावना मनात दडलेली होती. एकूणच सिक्कीम पहाण्यासाठी ५-६ दिवसांच नियोजन हवे.

अखेर गरजा मर्यादित राखून समाधानाने राहण्याची येथील लोकांची शैली आपल्यालाही आत्मसात करता येईल का या विचारात आम्ही गंगटोक सोडले आणि नामचीमार्गे दार्जीलिंगकडे निघालो. इथेही अंतर म्हणाल तर जेमतेम ९५ किलोमीटर; पण वेळ लागतो किमान चार तासांचा. नागमोडी वळणाच्या घाट रस्त्यामुळे गाडीचा वेगही खूप कमी असतो. चहूबाजूला दिसणारे निसर्गाचे लोभसवाणे रुप पाहण्याचा मनमुराद आनंद घेत आम्ही संध्याकाळी दार्जिलिंग इथे पोहचलो.

दुसऱ्या दिवशी ब्रेकफास्ट करुन शहरात फिरलो. रॉक गार्डन, वॉटर पार्क, माउंट एव्हरेस्ट सर

करणारे शेर्पा तेन सिंग यांचं ना दिलेला रॉक पाहिला. तिबेटी निर्वासितांच्या छावणीला भेट दिली. पन्नास एक वर्षांपूर्वी आपल्या स्वत:च्याच देशातून जीव वाचवत निर्वासित म्हणून आलेल्या या तिबेटी नागरिकांच्या कार्यमग्न, आत्मनिर्भर आणि जिंदादिल वृत्तीला सलाम ठोकला आणि प्रसिध्द इंडियन माउंटनरिंग इन्स्टिटयूट पाहण्यासाठी आलो. हिमालयात भ्रमण करु इच्छिणाऱ्या गिरीप्रेमी मंडळीनी न चुकता भेट द्यावी अशी ही इन्स्टिटयूट आहे. येथील संग्रहालयात गिरीमोहीम संदर्भातील भौगोलिक, मोहिमांची ऐतिहासिक माहिती, हिमालयातील पदभ्रमणसाहित्य अतिशय काळजीपूर्वक जतन करण्यात आले आहे. एव्हरेस्ट मोहिमेवर केलेली फिल्महीं आपण अवश्य पहायलाच हवी. येथील दुर्मिळ प्राणी संग्रहालयदेखील आवर्जून पाहण्यासारखे. दिवसभर मनसोक्त स्थलदर्शन करुन संध्याकाळी रुमवर परतलो. दुसऱ्या दिवशी पहाटे ४ वाजता टायगर हिल इथे जायचे होते आणि तिथून जगप्रसिध्द कांचन जुंगा (आपण कांचनगंगा म्हणतो) हे हिमाच्छादित शिखर आणि सूर्योदय पाहण्याचा आनंद घ्यायचा होता.

निसर्गाचा हा अप्रतिम सोहळा पाहण्यासाठी आमच्या अगोदर जवळपास दीड दोन हजार पर्यटक तिथे प्रचंड थंडीतही येऊन बसले होते. खरंच, सूर्योदयाच्या वेळेस येथील अतिसुंदर दृश्य डोळयात साठवण्याचा कितीही प्रयत्न केला तरी तो अपुराच पडतो. पहाटेच्या अंधारात आकाशात चमचम करणाऱ्या चांदण्या सूर्योदय होण्यापूर्वी हळूहळू लुप्त होत जातात अन दिसू लागते आकाशात विविध रंगांची उधळण, दिसतात दूर बर्फामध्ये लपेटलेली हिमशिखरे अन त्यातही सहज नजरेत भरते ते कांचनगंगा शिखर! मोहक केशरी रंगातील सूर्याचं बिंब हळूहळू वर येऊ लागतं तशी सूर्याची सोनेरी किरणं या शुभ्रधवल शिखराकडे झेपावतात आणि मग कांचनगंगा हया किरणांना कवेत घेताना त्यांच्या सोनेरी रंगात अक्षरश: न्हाऊन निघते. या अनुपम सौंदर्याचा आस्वाद घेण्यासाठी आपल्याला इथेच यायला हवं! इथूनच जगप्रसिध्द एव्हरेस्ट शिखरही आम्ही दुर्बिणीतून पाहिले.

दार्जिलिंगमधील आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट म्हणजे येथील रेल्वे! शहरात रस्त्याच्या कडेकडेने नॅरोगेज ट्रक वरुन संथपणे जाणारी ही रेल्वे सर्वांचेच लक्ष वेधून घेते. रेल्वेलाईनच्या बाजूने काही इंच अंतरावर असणारी घरे, घरातील लगबग, तेथील मुलांचे रेल्वे लाईनवर हुंदडणे हे स्तिमित करुन सोडणारे दृश्य असते. ब्रिटिशकाळापासून चालू असलेली ही ट्रेन अजूनही नित्यनेमाने न्यू जलपैगुडी (सिलीगुडी) स्टेशन पर्यंत धावत असते. ९० किलोमीटरच्या प्रवासाला लागतात फक्त आठ तास! इथे प्रोफेसर, जब प्यार किसीसे होता है, आराधना वगैरे अनेक सिनेमाचं चित्रिकरण झालेली स्टीम इंजिनवर चालणारी रॉयल हिमालयन ट्रेनही पर्यटकांच्या दिमतीला आहे पण त्यातून प्रवास करण्यासाठी मोजावे लागतात प्रत्येकी आठशे रुपये.

नंतरच्या दिवशी आम्ही दार्जिलिंग पासून ५० किलोमीटरवर असणाऱ्या मिरिक या पर्यटनस्थळी जायला निघालो. दार्जिलिंग ते मिरिक हा प्रवासही अक्षरश: स्वप्नवतसुंदर आहे. घनदाट झुपकेदार पाईन वृक्षराजी एका बाजूला तर डोंगरउतारावर लांबवर पसरलेले चहाचे मळे एका बाजूला यामधून नागमोडी वळणाच्या रस्त्यावरुन दिसणारे रमणीय दृश्य भान हरपून टाकणारे असते. त्यात प्रोदिपने - आमच्या ड्रायव्हरने लावलेली विदेशी संगीताची ट्यून सर्वांना एका वेगळयाच मूडमध्ये घेऊन गेली. दार्जिलिंगला क्वीन ऑफ हिल स्टेशन म्हणतात ते सर्वार्थाने योग्यच आहे.

दार्जिलिंग आणखी एका कारणासाठी प्रसिध्द आहे ते म्हणजे येथील चहा. मिरिक इथे जाताना वाटेत हिरवी शाल पांघरलेल्या टी इस्टेट मधून आम्ही फेरफटका मारला. कंपनीच्या गाईडने आम्हाला छान माहितीही सांगितली. चहाचे निरनिराळे ईर्ल्दल्ठु आम्ही टेस्ट केले. भरपूर फोटोसेशन केलं आणि खिसेही हलके केले आणि पुढे निघालो. गर्द वृक्षराजी, शांत जलाशय, थंड हवा आणि त्यामानाने तुरळक गर्दी असणारं मीरिक पुढील काही वर्षात आपल्याकडील महाबळेश्वर सारखी गर्दी खेचेल असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही. संध्याकाळी हॉटेलवर आलो आणि विश्रांती घेतली. आता परतीचे वेध लागले होते. सहलीच्या आठवणी शब्दबध्दकरायच्या होत्या.

निसर्गसौंदर्याने नटलेल्या या प्रदेशातून फिरताना जाणवते येथील लोकांना पर्यटकांबद्दल वाटणारी आपुलकी आणि प्रेम! फक्त पर्यटन व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या या शहरात एवढी हॉटेल्स आहेत, प्रसिध्द शैक्षणिक संस्थाही आहेत जे सरकारचे उत्पन्नाचे प्रमुख स्त्रात आहेत. पण येथील सामान्य जनजीवन मात्र रस्ते, पाणी आणि वीज या मूलभूत सुविधांपासून अजूनही वंचित राहिले आहे. आणि याला कारण तेथील राजकीय नेत्यांनी केलेली डोळेझाक! याबाबतची नाराजी येथील नागरिकांच्या बोलण्यातूनही स्पष्ट जाणवते. काही वर्षापूर्वी या कारणाने येथील शांत, सहनशील पण अस्वस्थ जनतेने स्वतंत्र गोरखालँडच्या मागणीसाठी मोठे आंदोलनही केले. ते चिरडले गेले पण त्यामुळे लोकांच्या मनात सरकारविषयी प्रचंड चीड आणि संताप आहे. हे थोडं विषयांतर होतंय पण आपण जिथे जातो तेथील समाजजीवनाचा कानोसा घेणे हाही पर्यटनाचा उद्देश असतोच ना!

दुसरे दिवशी सकाळी आम्ही दार्जिलिंग सोडले आणि बागडोगरा येथून विमानाने दिल्लीला आलो. दोन दिवस देशाच्या राजधानीतील पाहुणचार घेतला. चांदणी चौक, करोल बागमध्ये हिंडलो. लाल किल्ला, लोटस टेम्पल, बिर्ला मंदिर, इंडिया गेट, राजघाट, रेल्वे म्युझियम, अक्षरधाम, तेथील लाईट अँड साऊंड शो पाहिले. शेवटी दिल्लीचाटची चव चाखून राजधानीला अलविदा केला आणि दिल्ली पुणे विमानाने पुण्याला परतलो ट्रीपमधील रम्य आठवणी घेऊनच....


मित्रहो, सिक्कीम मधील स्नो फॉल, रोप वे राईड, दार्जिलिंगचे चहाचे मळे, टायगर हिलवरुन पाहिलेलं कांचनगंगा या साऱ्या रमणीय आठवणींना उजाळा देताना न विसरता उल्लेख करायला हवा दार्जिलिंग मधील चार दिवस आमच्याबरोबर राहून आम्हला स्थलदर्शन घडवणाऱ्या ड्रायव्हर प्रोदिप चा. अत्यंत सालस, सभ्य, विश्वासू आणि मितभाषी प्रोदिपने आम्हाला खूप छान ठिकाणे दाखवली. आम्हाला सोडून तो परत निघाला तेव्हा जाणवलं की पहिल्या भेटीत त्याच्याशी झाली ती होती एका ड्रायव्हरची औपचारिक ओळख अन् आता निरोप देताना त्याचा हात हातात घेताना जाणवत्येय त्याच्याबरोबर झालेल्या मैत्रीच नातेबंध!!

पाठमोऱ्या प्रोदीपकडे एकटक पहाताना मनात गाणे घोळत होते....

आदमी मुसाफिर है, आता है जाता है

आते जाते रस्ते मे, यादें छोड जाता है!....

प्रोदिप असेल, गंगटोकच्या हॉटेलमधील हसतमुख स्टाफ असेल, मॉनेस्ट्रीतील धर्मगुरु, तिबेटी छावणीतील ती सत्तरीच्या पुढील तरुण कार्यमग्न मंडळी असतील, किंवा दिल्लीतील सायकल रिक्षा चालवणारा रिक्षावाला असेल.... या फक्त व्यक्ती नाहीयेत तर तेही आहेत माझ्यासारखेच मुसाफिर... माझे सहप्रवासी..... साहित्यसम्राट पु.लं.च्याच शब्दात म्हणायचे तर आम्ही सारे प्रवासी घडीचे!



# करोना व्हर्सेस इजिप्त...



[३ मार्च ते १२ मार्च २०२०]

श्री. मोरेश्वर हुताश बागडे,

पत्ता - रामदर्शन को-ऑप. हौ. सोसायटी,

११, पहिला मजला, पारशीवाडी, बेकरी लेन, कोपरी, ठाणे (पूर्व).

मो.क्र.८१०८४३९९९९ ई-मेल : bag.more.eeshwar@gmail.com

टूर कंपन्या डिसेंबर अखेरीस पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी बोनांझा ऑफर जाहीर करुन विदेश प्रवासाचे प्लॅान प्रवाशांसाठी



प्रस्तावित करत असतात. यावेळी मिडल इस्ट मधला इजिप्त प्रवास दौरा करण्याचे मनात घोळत होते. इजिप्तचा प्राचीन इतिहास, तेथील संस्कृती, पिरॅमिड, नाईल नदी, तिथल्या वेगवेगळया डायनेस्टी या विषयी आकर्षण होतेच. पिरॉमिड बाबत काही गुढ कथा ऐकण्यात आल्या होत्या. त्याबाबत प्रत्यक्ष जाणून घ्यावे असे वाटत होते. एस.ओ.टी.सी. या टूर कंपनीने निवड केलेली साईट सिइशगची ठिकाणे पसंतीची व आकर्षक वाटल्यामुळे इजिप्त टूरवर शिक्कामोर्तब केले. तसेच टूरचा जाण्यायेण्याचा खर्च खिशाला परवडणारा होता. इजिप्तमध्ये विंटर संपण्याचा व समर सुरु होण्याचा मोसम मार्च महिन्याचा असतो. म्हणून मार्चच्या पहिल्या आठवडयासाठी जाण्याचे बुकींग केले. स्पॉट डिस्काऊंट असल्याने तीन महिने अगोदर बुकींगची रक्कम देऊन नोंदणी केली. फेब्रुवारी फर्स्ट विक पर्यंत सर्व पेमेंट झाले होते. इजिप्तसाठी विसा चार्ज भरावा लागत नाही. ऑन अरायव्हल ग्यारेंटेड विसा मिळतो. फक्त एक साधे पत्र इजिप्त वकीलातीच्या कार्यालयाकडून तुम्हाला जाताना दिले जाते. मित्र व नातेवाईक यांच्याकडून टूरसाठी फेब्रुवारीपासून शुभेच्छा मिळायला सुरुवात झाली होती. तीन मार्च ते अकरा मार्च हा आमचा इजिप्त पर्यटन काळ होता. अगदी प्रवासाच्या आदल्या दोन दिवसापर्यंत शुभेच्छा मिळत होत्या. तोपर्यंत करोनाच्या बातम्या टिपेला पोहोचल्या नव्हत्या. आम्हालाही त्याचे गांभीर्य वाटत नव्हते. फक्त कार्पोरेट जगतात काम करणाऱ्या लोकांचे परदेश प्रवास, एक धोरण म्हणून त्या-त्या कंपन्यांनी बंद केले होते. अचानक आदल्या दिवशी मोबाईल खणखणू लागले व प्रवास टाळा असं जो तो सांगू लागला. मित्र नातेवाईक यांनी टुरचे पैसे परत घ्या, पैसे परत मिळत नसतील तर टुर पुढे ढकला, काहींनी तर पैसे वाया गेले तरी चालतील पण अजिबात जाऊ नका, जीव महत्त्वाचा आहे असे सांगितले. चिंता व भयाने

मन ग्रासले. टूर कंपनीला फोन करुन विचारले. त्यांनी काळजी करण्याचे कारण नाही असे सांगून, त्यांचे इजिप्तमध्ये काम करणारे टूर लिडर हे टूर प्रोग्रॉम करत आहेत आणि इजिप्तमध्ये कोरोना लागण नाही असा हवाला दिला. आम्हालाही पटत होते की जाण्याच्या दिवशी टूर कशी रद्द होणार! इंटरनेटवर सर्च केले व कोणत्या कोणत्या देशात कोरोना लागण झाली आहे हे पाहून घेतले. चायना, फ्रान्स, इटली, इराण व अमेरिकेच्या काही ठिकाणी कोरोना संशयित रुग्ण आढळल्याचे दिसून आले. इजिप्तचे नांव काही रिपोर्टमध्ये दिसले नाही. ती बाब टूरवर जाण्याच्या निर्णयाला बळ देऊन गेली. आपल्या मुलाबरोबर शेजाऱ्याचाही मुलगा नापास झाल्यावर जसे समाधान वाटते तसा हा प्रकार होता. किरकोळ बाबी सुध्दा माणसाला कधी कधी धीर देऊन सकारात्मकता देतात याचे ते उदाहरण होते.

अनेक समाधानाच्या सबबी शोधून आम्ही आमचा जाण्याचा मार्ग आमचा आम्हीच सुकर केला. मुंबई विमानतळावर गेलो सगळयांनी मास्क घातला आणि सेल्फी घेऊन ग्रुपवर सगळयांसाठी पोस्ट केला. मास्क घातल्यामुळे सगळयांचे चेहरे माकडासारखे दिसत होते. एका विषाणूने माणसाला त्याची उत्क्रांतपूर्व वंशावस्था दाखवून दिली. सकाळी पावणेसहा वाजता इजिप्तच्या कैरो विमानतळावर उतरलो. अजून उजाडले नव्हते, फारशी लगबग व गर्दी दिसून आली नाही. शांतपणे पहुडल्यासारखे सुस्तावलेपण कैरोच्या वातावरणात भरुन होते. कैरो ही इजिप्तची राजधानी. पण तिचे राधानीचे रुप ठळकपणे अजून दिसायचे होते. झोप पुरी झाली नसल्याने व्होल्वो बसमध्ये बसल्या बसल्या कधी डोळा लागला समजलं नाही. नाईल नदीच्या काठावर असलेल्या फाईव्ह स्टार हॉटेल हिलटन रामसेसजवळ कधी पोहोचलो कळलेच नाही. कैरोच्या डाउन टाऊन स्वेअर जवळ हे हॉटेल आहे. सहा फ्लाय ओव्हर व दहा मोठे रस्ते मिळणारा अवाढव्य परिसर व्यापलेला तो भाग पाहून राजधानी कैरो सिटीचा अंदाज आला. पंचतारांकित हॉटेल्सनी तो गजबजलेला भाग होता.

इजिप्तचा प्रवास आम्ही नात्यातली तीन कुटुंबे एकत्र करत होतो. कैरोमधील हॉटेलच्या रुमसची अलोटमेंट तिघांना वेगवेगळया मजल्यावर झाली होती. मला दहावा, आमचे बंधु यांना विसावा मजला तर तिसऱ्या फॉमिलीला बाविसाव्या मजल्यावर रुम दिली होती. शक्यतो आपल्या फॉमिली एकाच मजल्यावर असल्या तर सर्व दृष्टीने चांगले असते. वासरात लंगडी गाय शहाणी या

म्हणीनुसार तिन्ही कुटुंबांनी परदेश वारीतले नेतृत्व मला बहाल केलेले होते. त्यामुळे मोठे बंधु यांनी माझ्यामागे टुमणे लावले, बघ रुम बदलून देतात का? रिसेप्शनचे सर्व काऊंटर बिझी होते. आमच्या टूर गाईडला पण सांगितले, त्यानेही हात वर केले. टूर लिडर अजून आलेला नव्हता. प्रयत्नांती परमेश्वर या उक्तीनुसार मीच निर्णय घेऊन फ्रंट ऑफिस काऊंटरकडे डायरेक्ट गेलो. त्यांना आम्ही


फेमस कैरो म्युझियम

नातेवाईक एकाच मजल्यावर असणे कसे आवश्यक आहे याची जाणीव करुन दिली. अशावेळी नम्रसूर, आर्जव व सेल्फ प्रेझेंटेशन उपयोगी येते. काऊंटरवरच्या कर्मचाऱ्यांना मिळालेल्या कस्टमर हँडलिंग प्रशिक्षणाचा आपण कसा उपयोग (Exploitation) करुन घ्यायचा याचे जरासे कसब आपल्याकडे सुध्दा हवे. ते असले तर आपले प्रश्न सुटतात हा माझा अनुभव आणि कोणत्याही देशात परदेशी व्यक्तीला मदत करण्याची सहजवृत्ती असतेच असते. काऊंटरवरच्या गोऱ्या गोमट्या गोड इजिप्शियन मुलीला मी समजावून सांगत असताना एक सुटाबुटातला पस्तिशीतला तरुण पुढे आला, त्याने मला प्रॉब्लेम विचारला, मी त्याला पुन्हा तेच समजावून सांगितले. त्याने आमच्या गाईडशी संपर्क केला, दोघांचे इजिप्शियन मध्ये काहीतरी बोलणे झाले. नंतर तो माझ्याजवळ येऊन मला म्हणाला सर, अर्धातास तुम्हाला वाट पहावी लागेल, तोपर्यंत दहाव्या मजल्यावर काही रुमस् एम्प्टी होत आहेत. आनंदाच्या भरात आम्ही चटकन होकार दिला. प्रयत्नांना फळ मिळाले होते.

प्रकरण....२

आजचा लंच आमचा आम्हाला बाहेर करायचा होता. आम्ही सगळं आटपून लंच ला जायला खाली आलो. व्हेज रेस्टॉरंट असेल का? असले तर इंडियन पध्दतीचे मिळेल का? इजिप्शियन फुडमध्ये व्हेज काय खायला मिळेल? पचनी पडण्यापेक्षा जिभेला रुचेल का? असे प्रश्न घेऊन मुख्य रस्ता धरला. दुपारची वेळ, डोक्यावर सूर्य आलेला पण जराही ऊन्हाची झळ जाणवत नव्हती, कारण गार वारा वातावरणात मस्ती करत खेळत होता. त्याची शितलता आम्हाला ऊन्हाची रन्हाळी लागू देत नव्हती. गाईड ने माहिती देताना फेलाफल व ब्राऊन राईस अशी दोन

व्हेज नावे सांगितली होती. आम्हाला वाटले ती रेस्टाँरंटची नावे आहेत. आम्ही ह्याच्या त्याच्याकडे चौकशी करताना त्या नावांचा गजर करत होतो. भाषेचाही प्रश्न होताच. इजिप्शियन लोक ती नांवे सांगितल्यावर गोंधळून जात. पण लोकल व्हेज फुड खायचा आम्ही कुटुंबियांनी निर्धारच केला होता. आणखी जास्त लांब पायी जाण्यात अर्थ नव्हता.

एका स्ट्रीटमध्ये एका टेक्निकल कॉलेज समोर एक साधा फुड स्टॉल दिसला. बाहेर एकच बाकडे होते. त्यावर एक इजिप्शियन जोडपे बसले होते. इजिप्शियन लोक उंचपुरे, लालसर गोरे आणि नाकी डोळी नेटके




असतात. आफ्रिकन वंशाचे इजिप्शियन थोडे काळपट व गहुवर्णीय रंगाचे व उंचपूरे आढळतात. मध्यम वयस्क पुरुष सूटपँटमध्ये तर मध्यमवर्गीय व गरीब लोक डबल कपडयाचा लांब हाताचा पायघोळ सदरा घालतात. तरुण तरुणी फॅशनेबल कपडयात वावरताना दिसल्या. मुली खुपच देखण्या आहेत. पण त्यांच्या वागण्या बोलण्यात शहरी बेधडकपणा व चटपटीतपणा दिसून आला नाही. त्या बाकडयावर बसलेल्या जोडप्यातील महिला गरोदर होती. आम्हाला पाहून तिला खुप आनंद झाल्याचे जाणवले. ती हसत होती. माझ्या पत्नीकडे पाहून तिने दोन्ही हाताचे अंगठे व तर्जनी एकमेकांत गुंतवून हार्ट शेप करुन आम्ही तिला आवडल्याची खूण केली. आय लव्ह इंडिया असं खुणा करुन तिने सांगितले. इजिप्शियन प्रेमाची अशी आगळी वेगळी व्यक्त होण्याची रीत बघून आम्ही दोघेही भारावून गेलो. इतक्यात एक कॉलेज तरुणी पुढे आली आणि आम्हाला तिने मागच्या स्ट्रीटवर खाण्यासाठी जायला सांगितले. मागच्या स्ट्रीटवर खुले आम हुक्का पान चालू होते. एक कपडयाचे दुकान सोडून एक फुड स्टॉल दिसला. फ्रेंच फ्राईज, बटाटा चिप्स, वेफर, ग्रिन सलाड, आणखी एक-दोन पदार्थ एक माणूस गरम गरम तळून काढत होता. त्यातले एका पातेल्यातले भिजवण हिरवगार होतं, त्याचे सांडग्यासारखे गोळे करुन तो कढईतून तळून काढत होता. तो पदार्थ काय आहे हे आम्हाला माहीत नव्हता. पाहताक्षणी तो खाण्याची इच्छा झाली. पण त्या स्टॉलमध्ये टेबल खुर्च्या नसल्याने बसून खायची सोय नव्हती आणि आम्हाला तर

निवांत बसून उदरभरण करायचे होते. मालक पिशव्यांतून पार्सल बांधून गिऱ्हाईकांना देत होता. आम्हाला बघून मालकाने काऊंटरवरुन एका मुलाला काहीतरी सूचना केल्या. तो मुलगा लगेचच बाकी गिऱ्हाईके सोडून आमच्या व्यवस्थेत गुंतून गेला. बहूतेक त्याला हातातले सर्व काम सोडून आमचे आदरातिथ्य करण्याच्या सूचना दिल्या असाव्यात, कारण त्याने इतकी लगबग केली की विचारायची सोय नाही. त्याच्या स्टॉलच्या बाजूची जागा त्याने मोकळी केली. एक टेबल लावले व बाजुच्यांच्या दुकानातून सहा खुर्च्या आणून त्याने आमची बसायची सोय केली.

पदार्थांची नांवे व भाषेचा प्रश्न ऑर्डर करताना आलाच. मी खाणाखुणा व पदार्थांकडे बोटे दाखवून ऑर्डर केली. सगळयाच पदार्थांचा आस्वाद आम्ही घ्यावा असे त्याला वाटत होते. वेटरचा व माझा खाणाखुणांचा खेळ रस्त्यावरचे जाणारे येणारे कुतूहलाने पहात होते. ऑर्डर करताना त्यात त्या हिरवट काळपट पदार्थाचाही समावेश केला. बटाटा वेफर चवीला वेगळेच लागले. मऊसूत नरम व चवदार बटाटा वेफर मी प्रथमच खात होतो. फ्रेंच फ्राईज खुपच मस्तच होत्या. सलाडमधले काकडी, कोबी, गाजरचे तुकडे पुष्ट व पोष्टीक होते. त्यावर वेगळयाच जाड्याभरड्या मसाल्याच्या पावडरचा हलकासा शिडकावा केला होता, त्यामुळे खाताना तोंड लाळेने भरुन जात होते. आणि तो हिरवट काळपट पदार्थ तर इतका खुशखुशीत व लज्जतदार होता की विचारायची सोय नाही. दुसऱ्या दिवशी हिल्टन मधल्या ब्रेकफास्टमध्ये तो आयटेम होता. तेव्हा लेबल पाहून कळले की त्या पदार्थाचे नाव फेलाफल होते. पण त्या स्टॉलमध्ये बनविलेल्या फेलाफलला जो खुशखुशीतपणा व स्वादिष्ट चव होती ती फाईव्हस्टारच्या शेफने बनविलेल्या फेलाफल पदार्थाला नव्हती. त्याहीपेक्षा त्यांचे प्रेम व आदरातिथ्याची ढब चिरंतन लक्षात राहण्यासारखी. आज सायंकाळी चार वाजता आम्हाला इजिप्त आणि तिथल्या पिरॅमिड्सची पाच हजार वर्षे दक्षतेने सुरक्षा करणाऱ्या स्फिंक्स ची कथा साऊंड अँड लाईट शोद्वारे ऐकण्यासाठी गिझा प्लाटुकडे निघायचे होते.

प्रकरण....३

इजिप्तच्या गिझा पठारावर असलेल्या जगप्रसिध्द स्पिंक्झ या मोन्युमेंटवरील साऊंड अँड लाईट शो पहाण्यासाठी आम्ही सर्व प्रवासी व्होल्वो बसने सायंकाळी चार वाजता जायला निघालो. सायंकाळी सात वाजता शो सुरु होणार होता. ज्या जागेमधून शो चांगला दिसतो ती जागा मिळण्यासाठी तिकडे अगोदर पोहोचणे आवश्यक होते. त्या हिशोबाने दूर



लिडरच्या मार्गदर्शनानुसार आमचा प्रवास सुरु झाला. रस्त्याने दीड-दोन तासाचा प्रवास होता. कैरो शहर सायंकाळी कसे दिसते हे पहायला मिळणार होते. इजिप्त टूरच्या साईट सिइशगची सुरुवात साऊंड अँड लाईट शो या कार्यक्रमाने होणार होती. कैरोमध्ये दळणवळणाच्या मुलभूत सोयी खूप चांगल्या दिसून आल्या. रेल्वे, प्रायव्हेट कॅब, बस, सार्वजनिक वाहने व टांगे अशी व्यवस्था आहे. तसेच काही भागात ट्राम पण दिसली. रस्ते एकदम छान, दोन तासाच्या प्रवासात कुठेही खड्डा नसल्याने गचकाही जाणवला नाही व अनावश्यक हॉर्न वाजविणेही नाही. फ्लाय ओव्हर्स, पुल व जमिनीवरील रस्ते, कमीत कमी सिग्नल अशापद्धतीने रस्त्यांचे जाळे विणून वाहतूकीचे उत्तम सुलभीकरण केलेले आहे. बस धावत होती, माझी नजर काचेतून कैरो शहरावर अधाश्याप्रमाणे पडत होती. काही आगळेवेगळे दिसतंय का हे शोधीत होती. आमच्या बसने एक मोठे वळण घेतले आणि वस्ती नसलेला रस्ता लागला. थोडे अंतर गेल्यावर एका भल्या मोठया मोकळया बस पार्कींग एरियाजवळ बस थांबली. तोपर्यंत आसमंतात सांजेच्या छटा दाटल्या होत्या. त्यामुळे गिझा पठारावर आहोत की कुठे कळायला मार्ग नव्हता. समोर एक मोठे गेट दिसले. तिथे लष्करी गणवेशातील शिपाई उभेच होते. इजिप्तमध्ये प्रेक्षणीय स्थळांचे प्रशासन व सुरक्षा व्यवस्था मिलीटरीकडून करण्यात येते. त्यामुळे शिस्तीचे दडपण पर्यटकांवर असते. बस मधून खाली उतरलो, थंडगार वारे अंगाला झोंबायला लागले. पटापट सगळे गेटकडे चालायला लागले. सायंकाळचा सातचा शो सुरु व्हायला अजूनही अर्धा तास बाकी होता. हवेत गारठा होता, जवळपास एक तासाचा शो होता. शो दरम्यान मध्येच युरीनलकडे जावे लागू नये म्हणून लघुशंका विधी आटोपण्यासाठी टॉयलेटला गेलो. टॉयलेटमधून बाहेर पडताना पाच इजिप्शियन पौंड मोजायला लागले. म्हणजे आपल्याकडचे अंदाजे ४०-४२ रुपये. उगीच गेलो असे वाटले. कारण लघुशंकेसाठी इतकी मोठी रक्कम देण्याची आपल्याला सवय नाही, आपल्याकडे त्यासाठी अगदी फार फार तर दोन रुपये खर्च होतात. असो, आधी पैसा जातो मग अक्कल येते या उक्तिची प्रचीती आली.

आम्ही शोच्या भव्य प्रांगणात प्रवेश केला. आत भव्य पटांगणात जवळजवळ १००० खुर्च्यांची आसनव्यवस्था होती. सर्व पटांगण पेवर ब्लॉक बसवून समतल केलेले होते. पहिल्या तीन रांगा विशेष व अतिमहत्त्वाच्या व्यक्तींसाठी होत्या. आम्ही अगदी डाव्या बाजूला जाऊन बसलो. लोखंडाच्या खूर्च्या मजबूत आणि खाली जमिनीत गाडून कायम केल्या होत्या. सगळीच रांग मजबूतपणे दोन खूर्चीत जरासे अंतर ठेवून एकात एक गुंतवून पक्की केलेली होती. प्रत्येक खूर्चीला हॅन्ड रेस्ट होता. खुर्च्या स्थिर असल्यामुळे व कुशन नसल्यामुळे थोडयावेळातच बसायला त्रास वाटू लागला. समोर लांबलचक ऐसपैस पठार आणि दोन ते तीन किलोमीटर अंतरावर गिझा पिरॅमिड्स, गिझा स्फिन्स दिसत होते. हळुहळु धुसर काळोख व्हायला लागला. आकाश निरभ्र होते. अजून चांदण्या बाहेर यायला वेळ होता. मनात शंका आल्या, इतक्या लांब असणाऱ्या पिरॉमिडसवर लाईट कसे टाकणार? मोकळया मैदानात स्पष्ट आवाज ऐकायला येईल का? समोर जे दिसत आहे ते प्रकाश टाकून सांगण्यासाठी एक तास कशाला हवा? वगैरेवगैरे प्रश्न पडले. हळूहळू गारठा अंगाला झोंबू लागला. जॉकेटच्या पॉकेटमध्ये हात घातले पण थंडगार हवेमुळे गारठा कमी व्हायच नाव नाही. एक तास काढायचा होता. थंडीमुळे आमच्या कुटुंबाची चुळबूळ वाढायला लागली. आमच्या समोरच्या रांगेत टांझानिया मधून आलेल्या गुजराती कुटुंबाने मेन गेट जवळ थिएटरकडून भाडयाने ब्लँकेट द्यायची व्यवस्था केली असल्याचे सांगितले. मी व आमचे बंधु ब्लँकेट आणण्याच्या मोहिमेवर निघालो. गेटजवळ पोहोचलो पण भाडयाचे रेट ऐकून चक्रावून गेलो. एका ब्लँकेटला एक तासासाठी पन्नास इजिप्शियन पौंड द्यावे लागणार होते. आम्ही एकमेकांच्या तोंडाकडे पाहतच बसलो. हवेतील गारवा असतानाही हात हलवत परत गेलो तर आमच्या बायका आणि ते गुजराती काय म्हणतील या विचाराने जास्तवेळ एकमेकांची तोंड न पाहता बेधडक एक निर्णय घेतला. सोबत आणलेले इजिप्शियन पौड, व्यवहार आणि थंडी या सगळयाचे काटकसरी व्यवहाराचे गणित मांडून एकच ब्लँकेट घ्यायचे ठरविले. हा निर्णय घेताना आम्ही मांडलेल्या व्यवहाराचे गणित आम्हाला आजही हसायला लावते. ते गणित म्हणजे, खुर्चीला पाठ असल्यामुळे फक्त पुढून लागणाऱ्या गार हवेचा विचार करुन चौघांनी फक्त समोरुन ब्लँकेट ओढून घ्यायचे असे ठरवून एकच ब्लँकेट घेतले. शो संपेपर्यंत आम्ही चौघेही तासभर ते ब्लँकेट एकमेकांकडे खेचत होतो. वार कुठून कुठून

आत शिरुन आम्हाला गारठवत होता आणि हसवतही होता. शो बद्दल आणि शो दरम्यान हरवलेल्या चष्म्याची कथा पुढे वाचण्यासारखी आहे.

प्रकरण....४

हलकासा काळोख व्हायला लागला. वर आभाळ सांजनिळे झाले होते. आकाशात तुरळक चांदण्या लखलखू लागल्या होत्या. बरोबर सात वाजता शो सुरु झाला. दहा आंतरराष्ट्रीय भाषांतून सदर शो ऐकता येतो. आम्ही बसलेल्या प्रांगणापासून दोन ते तीन किलोमीटर परिसरात गिझाचे तीन मोठे व एक पडझडीचा असे चार पिरॅमिडस दिसत होते. बीबीसी इंग्लिश आवाजात शो सुरु झाला. प्रकाश शलाका आणि आवाजात चढ उतार करत शोच्या खेळाला सुरुवात झाली. स्पष्ट व खणखणीत आवाज आसमंत व्यापत तुमच्या कानावर येत राहतो. रंगीबेरंगी प्रकाश झोत पिरॅमिडसवर टाकत इजिप्तच्या गतकाळातील वैभवाची आणि पिरॅमिडसच्या गुढ माहितीची कॉमेंटरी सांगितली जाते. लेझर किरणांचा वापर करत विविध आकृत्या आणि राजाराण्यांची रंगीत प्रकाशचित्रे समोर दाखवून फेरो राजवटी व त्यांचे वैभव तुमच्यासमोर उलगडले जाते. रात्रीच्या अंधारात पिरॅमिडसच्या छाया आणि लांबून सोडलेल्या रंगीत प्रकाश शलाका आणि घनगंभीर आवाज यामुळे पिरॅमिडबाबतची गुढता व कुतूहल वाढत जाते. चार हजार वर्षांचा इतिहास इजिप्तला आहे. एक खंत जाणवत होती की इजिप्त बाबतची ऐतिहासिक माहिती अगोदर वाचून यायला हवी होती म्हणजे इजिप्तच्या प्रेक्षणिय स्थळांची अनुभूति ऐतिहासिक दृष्टीने घेता आली असती. त्यामुळे शो पाहताना व आकलन करताना जरा अवघड जात होते. तरीही चांदण्यारात्री थंडगार झोंबणाऱ्या वाऱ्याच्या साक्षीने निळया आकाशाखालच्या चांदण्या रात्री त्या प्रांगणात जे पाहिले ते थक्क करणारे आणि अविस्मरणीय होते. दिवसाउजेडी ही पिरॅमिडस् केव्हा पाहतो असे वाटले. बरोबर एक तास हा खेळ चालला. खेळ संपल्यावर घेतलेले ब्लॅंकेट परत केले आणि बसकडे निघालो. बस मध्ये बसल्यावर डोळयावरचा चष्मा त्या प्रांगणात पडल्याचे लक्षात आले. एक क्षणच बसमध्ये येऊन झाला होता अजून काही मंडळी यायची होती. टूर लिडरला चष्मा तिकडे पडल्याचे सांगितले. मी पळत पळत जिथे आमची आसन व्यवस्था होती तिकडे गेलो. अंधारात मला नेमके कुठे बसलो होतो ते कळेना. पहिल्या तीन रांगा सोडून मागच्या चार सर्व रांगा मोबाईल बॅटरीचा वापर करत धुंडाळल्या. बसमधल्या लोकांची खोटी आपल्यामुळे होते आहे, ही टोचणी मनाला

होती आणि स्वत:च्या वेंधळेपणाची लाज सुध्दा. चष्मा काही सापडायला तयार नाही. शेवटी शोधणे सोडून निराश मनाने बसमध्ये लवकर पोहोचण्यासाठी परत धावत निघालो.

इतक्यात एका उंच धिप्पाड सुटाबुटातल्या सुरक्षा अधिकाऱ्याने मला हटकले. ए यू! व्हाय आर यु रनिंग? मी दचकलो, कारण मागे मी एकटाच होतो. त्याने विचारले व्हाट ह्यापन? मी त्याला चष्मा शोधायला आल्याचे सांगितले. त्याने विचारले, आर यु फ्राम इंडिया? मी म्हणालो, यस सर! प्लीज लेट मी गो, माय कलीग्ज आर वेटींग इन द बस! त्यावर तो म्हणाला. ए इंडिया, वेट! यु सिट हिअर! यु विल रिमेंबर मी! मी चरकलो. म्हटलं आता चौकशीचे काय शुक्लकाष्ठ हा मागे लावतो की काय? मी निमुटपणे त्याने दिलेल्या खूर्चीत बसलो. त्याने हातातल्या वाकीटाकी वरुन कंट्रोल रुम शी संपर्क केला आणि तिथल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांशी अरबीमधून काहीतरी बोलणे केले. ते अरबीमध्ये बोलत असल्यामुळे तो काय बोलला हे मला कळायला मार्ग नाही. माझ्या छातीत धडधडायला लागले, कारण माझा टुर लिडर, माझी बस, माझे सहप्रवासी हे सर्वजण बाहेर होते. संपर्क करावा तर माझ्याकडे मोबाईल पण नव्हता. मती गुंग झाली. त्या बोचऱ्या थंडीत देखील मला घाम फुटला. इतक्यात एक सुरक्षा रक्षक पळत आला, त्याने त्या अधिकाऱ्याला सलाम केला आणि एक बॉक्स त्याच्याकडे दिला. त्या बॉक्समधून त्याने माझा चष्मा बाहेर काढला आणि विचारले, इझ ईट युवर्स? सर! गॉड इज ग्रेट सर, इटस् माईन! क्षणभर मी गांगरलो. माझा चष्मा मला परत मिळेल ही आशाच मुळी मी सोडून दिली होती. तो प्रसंग अविश्वसनीय व अविस्मरणीय सुध्दा! मी त्या अधिकाऱ्यापुढे नतमस्तक झालो. प्रेक्षक बाहेर पडल्यावर क्षणार्धात सर्व प्रांगण ते तपासतात काय, प्रेक्षकांच्या सापडलेल्या वस्तू भांडारगृहात जमा करतात काय, हे सगळ नवल करण्यासारखे होते. मी मनोमन त्या अधिकाऱ्याचे व त्यांच्या व्यवस्थापनाचे कौतुक केले आणि आभार मानत बाहेर पडलो. त्याने माझा खांदा थोपटून प्रतिसाद दिला आणि मस्त अंगठा दाखवत एक डोळा मिचकावला. तोपर्यंत आनंदाच्या भरात सापडलेला चष्मा डोळयाला लावून मी त्या अधिकाऱ्याला डोळे भरुन पाहून घेतले.

मला डोळयाला चष्मा लावून बसमध्ये चढताना पाहून, आमची टिम लिडर म्हणाली, मिस्टर बागडे यु आर ड्याम लकी हं! बस सुटायला माझ्यामुळे उशीर झाला होता, पण कोणाच्या चेहऱ्यावर नाराजी दिसली नाही. ही बाब मला समाधान देणारी होती.

प्रकरण....५

सकाळी आठ वाजता मस्त भरपेट ब्रेकफास्ट करुन निघालो. कैरोमध्ये कोरोनाचा तितकासा प्रसार अद्याप झालेला नव्हता. त्यामुळे जनतेमध्ये भीतीचे वातावरण दिसले नाही. सरकार तर्फे तशी काही प्रतिबंधात्मक उपाययोजना योजल्याचेही दिसून येत नव्हते. जनजीवन नेहमीसारखे चालू असल्याचे दिसले. कोणीही इजिप्शियनने मास्क घातल्याचे पाहिले नाही. सार्वजनिक ठिकाणी फक्त सॉनिटाइझींग शिवाय कोणतीही उपाययोजना नव्हती. तरीही आम्ही बरोबर मास्क घेऊन, घालून नव्हे बाहेर पडायचो. स्थळे पाहताना चायनीज किंवा तसे दिसणारे दिसले की मास्क घालायचो. असा सगळयांचा गमतीदार प्रकार चालायचा. विषाणूपेक्षा त्या चायनीज दिसणाऱ्या लोकांचीच सगळयांनी धास्ती घेतली होती.

दिड ते दोन तासाचा रस्त्याने प्रवास केल्यावर आम्ही गिझा वाळवंटातील पठारावर पोहोचलो. कैरो शहरातील प्रमुख रस्ते फारच चांगले आहेत. वाहतूक सुरळीत व शिस्तित चालू असते. पठारावर पोहोचल्यावर जेथे एकाच रेषेत तीन मोठे व छोटे पिरॅमिडस दिसतात त्या स्पॉटवर आम्ही पोहोचलो. हे वाळवंट असले तरी वाळवंटात जशी वाळू असते तशी वाळू तेथे नव्हती. पुळणी सारखी रवाळ माती सगळीकडे होती. छोटया छोटया खडयांचे तुकडे सर्वत्र पसरलेले होते. हा स्पॉट फोटो घेण्यासाठी प्रसिध्द आहे. ओळीने दिसणाऱ्या पिरॅमिडसचे फोटो याच स्पॉटला घेता येतात. अन्य ठिकाणाहून असे दृश्य पहायला व फोटो काढायला सोईचे नाही. त्यामुळे पर्यटकांना प्रथम येथे आणले जाते. जवळजवळ दिड बाय दोन किलोमीटर लांबी रुंदी असलेले हे पठार आहे. येथून उंटावरुनही सफारी करता येते. त्यासाठी उंटावर बसता यायला पाहिजे आणि कंबरेला बसणारे दणके सहन करण्याची सहनशक्ती हवी. पिवळसर पुळणीची चढ उताराची जमीन, वर स्वच्छ निळे आकाश आणि उन्हाची किरणे सोडणारा तळपता पूर्ण दिसणारा सूर्यनारायण हे सगळे वातावरण गिझा प्लाटू आणि पिरॅमिडसची शोभा वाढवतातच. पिरॅमिडस लांबून चांगले दिसत असले तरी जसजसे आपण पिरॅमिडच्या जवळ जातो तसतशी त्याची भव्यता व कुतूहल आपल्याला दिपवून टाकते. प्रचंड मोठया टनात वजन असणाऱ्या चौकोनी दगडांनी एकावर एक रचलेले खालून वर निमुळते होत जाणारे पिरॅमिडस पाहून त्यांच्या निर्मितीबाबत व तंत्रज्ञानाबाबत निश्चितच आश्चर्य वाटते. पुरातत्त्व विद्येचा उत्कृष्ट नमुना म्हणजे ही पिरॅमिडस होय. चुनखडी दगड व ग्रेनाईट

दगडांचा वापर करत हे पिरॅमिडस तयार करण्यात आलेले आहेत. ख्रिस्तपूर्व काळात इतके प्रचंड मोठे टनावारी वजन असणारे चौकोनी आकाराचे दगड कसे तोडले असतील, ते आणले कसे, रचले कसे आणि यासाठी मजूर व कारागीर कोठून आणले याबाबतची ठोस माहिती कोणीच सांगत नाहीत. पूरातत्त्व शास्त्रज्ञांच्या मते हे दगड इजिप्त मधलया आसवान या प्रांतातून नाईल नदी मार्गे आणले असावेत. झाडाचे मोठे ओंडके वापरुन त्याची वाहतूक करण्यात आली असावी. तसेच एक दगड आत ढकलून त्याच्या नंतर एकेक पुढे व वर दगड रचून हे पिरॅमिड बनवले असण्याची शक्यता आहे. या पिरॅमिडच्या आतमध्ये राजा व राणी यांचे चेंबर आहेत, त्यांच्या ममीज म्हणजे मृतदेह येथे ठेवले जायचे. तसेच त्यांच्या परिवारातील जवळचे नातलग व खास नोकर यांचे मृतदेह देखील येथे ठेवले जात असत आणि मृतदेहासोबत त्यांचे दागदागिने व जडजवाहीर हे देखील त्या पिरॅमिडमध्ये वेगळया कक्षात सुरक्षित ठेवले जायचे. त्यावेळचे फॅरो राजे मृत्यू नंतरही एक जीवन असते असे मानायचे. त्यासाठी ही संपत्ती तेथे ठेवली जायची. या संपत्तीचा शोध घेण्याचे प्रयत्न अनेकांनी केले. पण त्यात त्यांचा शेवट झाला अशा दंत कथा सांगितल्या जातात.

ग्रेट पिरॅमिड ऑफ गिझा असे ज्याचे



वर्णन केले जाते ते गेल्या चार हजार वर्षातले, लिंकन कॉथेड्रल बांधले जाण्यापूर्वीचे जगातले सर्वांत उंच एकमेव मानवनिर्मित दगडाचे बांधकाम गणले जाते. दोन मोठया पिरॅमिड बरोबर बांधलेला हा सर्वांत मोठा पिरॅमिड असून हे सर्व पिरॅमिडस इजिप्तचा फेरो राजा खुफू याने बांधले. या पिरॅमिडचे बांधकाम वीस वर्षे चालू होते. अद्यापही जगातील सात आश्चर्यांत याची गणना आहे. ग्रेट पिरॅमिडच्या बाजूला राणीचा छोटा पिरॅमिड आहे तर एक पिरॅमिड टेंपल म्हणून ओळखला जातो. तेथे आणखी तीन फार छोटे पिरॅमिड आहेत. पण ते पूर्णत: मोडकळलेल्या अवस्थेत आहेत. सूर्य डोक्यावर आला होता, पण पठारावरुन वाहणारे थंड वारे उन्हाच्या झळा अंगाला बिलकूल चटके देत नव्हत्या. जिकडे पहावे तिकडे ग्रेनाईटचा पिवळसर कातिव दगड आणि त्यावर पडणारी सूर्यकिरणे यामूळे सर्व पठाराला सुवर्णझळाळी आली होती. सगळा परिसर चुन्याचे सफेदसर आणि ग्रेनाईटचे

तांबूस पिवळसर दगड व छोटे मोठे विविध आकाराचे दगड यांनी व्यापला होता. पाषाणालाही तेज असते याची खातरजमा करणारा तो परिसर. ती नैसर्गिक संपत्ती पाहून मन लुब्ध होते.

यानंतर आमचा मोर्चा जगप्रसिध्द स्फिंक्झच्या पुतळयाकडे वळला. संपूर्ण अंग सिंहाचे आणि चेहरा मानवी असलेला हा उभा आडवा भव्य पुरातन पुतळा. इजिप्शियन लोकांनी हा पुतळा कबरी, थडगी, पिरॅमिडस आणि मंदिरांचे रक्षण करण्यासाठी बांधला असा प्रवाद आहे. सदर पुतळा ख्रिस्तपूर्व २५०० वर्षांपूर्वी दगडात कोरण्यात आल्याचे पुरातत्वशास्त्रज्ञ सांगतात. हया पुतळयाचे पुर्वेकडे तोंड असून तो रोज सूर्योदयाला सामोरा जातो. हा पुतळा इतका प्रचंड मोठा आहे की, तो २४१ फुट लांब, ६६ फूट उंच आणि २० फूट रुंद आहे. चेहऱ्यावरील डोळयाची उंचीच सहा फुट आहे तर कान ३ फुट व नाक ५ फुट लांब आहे. हा पूतळा गिझा पठारावरील दगडांच्या साठयातील दगड कोरुन बनविण्यात आलेला आहे. मुळ पुतळयावर लाल, पिवळ्या आणि निळया रंगाचे रंगकाम केलेले होते. पुतळयाला दाढी होती व ती ब्रिटिश म्युझियममध्ये अँटिक म्हणून जतन करण्यात आली आहे. पण या पुतळयाच्या हनुवटीला काही इजा नसल्यामुळे काही पुरातत्त्वशास्त्रज्ञ ते मानायला तयार नाहीत. हा पुतळा सूर्योपासक मानला जातो. याचे तोंड पूर्वेकडे थेट सूर्याकडे आहे. हा पुतळा वाळूत गाडला गेला होता. थोतमास नावाचा राजपुत्र गिझा पठारावर विश्रांती घेत असताना स्वप्नामध्ये त्याच्या कानात येऊन सांगण्यात आले की, तू जिथे झोपला आहेस तिथे माझे वास्तव्य आहे. जर तू मला बाहेर काढशील तर तू इजिप्तचा फेरो होशील. फेरो म्हणजे इजिप्तचा सम्राट आणि ईश्वर सुध्दा. थोतमासने त्याच्या सैनिकांना आदेश देऊन वाळूत गाडला गेलेला स्फिंक्झचा पुतळा शोधून होता तिथे स्थापित केला. पुढे हा थोतमास खरोखरच फेरो झाला आणि त्याला पडलेले स्वप्न खरे ठरले.

स्फिंक्झच्या खाली तळघर व अनेक



दालने आहेत. तिथल्या संपत्तीच्या शोधासाठी अनेकांनी दरोडे घातल्याच्या कथा देखील असल्याचे बोलले जाते. सध्या पर्यटकांना पाहण्यासाठी सदर तळघर व दालने खुली नाहीत. इजिप्त सरकारने तो भाग प्रवेशासाठी

बंद केला आहे. पिरॅमिडसमध्ये आत प्रवेश करण्यास देखील बंदी घातली आहे. फक्त एका छोटया पिरॅमिडच्या तळघरात प्रवेश दिला जातो. पण आत शिरताना दडपायला होते. फार उतार असल्यामुळे काही पर्यटक अर्धवट मागे फिरत होते. त्यामध्ये मी ही होतो. सगळे दगड आपल्या उरावर कोसळून हा पिरॅमिड खाली बसणार तर नाही ना याचे भयानक दडपण आत शिरताना येते. तसेच काही अंशी श्वास घ्यायला पण त्रास होतो. जे आत जाऊन पाहून आले ते मात्र आनंदीत होऊन बाहेर येत होते. पिरॅमिडमध्ये काहीतरी गवसल्याचा व पर्यटनाचे चिज झाल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. स्फिंक्झचा पुतळा आणि पिरॅमिडसची भव्यदिव्यता, प्राचीन तंत्रज्ञान आणि बुध्दिमत्ता याबरोबरच त्यांच्या भोवती रुंजी घालणाऱ्या विलक्षण दंतकथा यांच्या प्रभावाने एक अद्भुत भारलेपण घेऊन आम्ही गिझा पठार सोडले. आज आमचा कैरोमधला स्टे संपणार होता. उद्या आम्ही विमानाने इजिप्त मधील आस्वान येथे जाऊन तेथून आमचा नाईल नदीतून क्रुझने प्रवास सुरु होणार होता. जगप्रसिध्द नाईल नदी व क्रुझ मधून प्रवास याचे सर्वांनाच कुतूहल होते त्यामुळे सर्वच उत्साहीत आणि क्रुझ प्रवासाला आतूर झाले होते.

प्रकरण....६

विमानात बसताना कोरोनाचे सावट आणि वेगवेगळया बातम्या यामुळे खुप भीती वाटून दडपण आलेले. त्यात भर म्हणजे एका क्रुझवर बरेच करोना रुग्ण सापडल्यामुळे लोकांना रुग्णालयात पाठवून ती बोट संपुर्ण नष्ट केल्याची बातमी कोणीतरी पसरवली. त्यामुळेही घबराट निर्माण झालेली. जोपर्यंत आम्ही स्थळे बघत होतो तोपर्यंत कोरोनाचा विचारसुध्दा येत नव्हता. पण निवांत व फुरसतीच्या क्षणी खुप काळजी वाटायची व कधी एकदा इजिप्त टूर संपून घरी जातो असे वाटायचे. काहीच ॲक्टिव्हिटी नसल्यामुळे प्रवासाचा दिवस चिंताजनक गेला. आसवान एअरपोर्टवर उतरुन रात्री आठ वाजता आम्ही आमच्या टूया नावाच्या क्रुझवर पोहोचलो. इजिप्त साम्राज्यशाहीतील १९व्या साम्राज्याचा तिसरा फेरो राजा रामासेस टू याच्या आईचे नांव टूया होते. ते नाव या क्रुझला देण्यात आलेले होते. उद्या मध्यरात्री तीन चा वेकअप काल होता. अबु सिंबल टेंपल पहायला सिंबल व्हिलेज येथे जायचे होते. वाळवंटातून रस्त्याने प्रवास करायचा होता, दुपारचे रणरणते ऊन लागायच्या आत परत फिरायचे होते ना! बरोबर तीनला उठलो, अर्धा ते पाऊण तासात आटपून बरोबर पहाटे पावणेचारला निघण्यासाठी आम्ही रिसेप्शन काऊंटरजवळ पोहोचलो. गरमा गरम चहा घेतला. रात्रीच्या

दरम्यान क्रुझ ने कैरो ते आसवान पर्यंतचा प्रवासाचा टप्पा पूर्ण केला होता. जरी आम्ही प्रत्यक्ष नाईल नदीच्या काठावर असलो तरी अजूनही बाहेर काळोख असल्याने नाईल नदीचा नजराणा डोळयांना पाहता येत नव्हता. आमच्या क्रुझच्या बाजूला अनेक क्रुझ नांगर टाकून उभ्या होत्या. किनाऱ्यावर पोहोचण्यासाठी बाजूच्या क्रुझमधून जायला परवानगी असते. आम्ही चार-पाच क्रुझ पार करुन किनाऱ्यावर आलो. बरोबर पहाटे चार वाजता आम्ही आसवान सोडले. बाहेर खुपच गारठा व झोंबणारी हवा पण होती. अपुऱ्या झोपेमुळे बसमध्ये बसल्या बसल्या डोळा लागला.

आसवान ते अबू सिंबल हा जवळजवळ २९० कि.मी.चा प्रवास होता. जाऊन येऊन एकूण प्रवाह ५८० कि.मी.चा, बाय रोड होणार होता. अबू सिंबलला जाणारा रस्ता न्युबियन डेझर्ट मधून जातो. जगप्रसिध्द सहारा वाळवंटाचे ते विस्तारीत वाळवंट आहे. सुदान या देशाच्या हद्दीपासून अबू सिंबल फक्त ४० कि.मी. वर आहे. त्यामुळे वाटेत एक सिक्युरिटी पोस्ट लागते, तेथे चेकिंग होते. जाताना वाटेत आम्ही एकच हॉल्ट घेतला. रस्ता अतिशय चांगला आहे, रस्त्यावर वाहनांची वर्दळ नव्हती तुरळक एखादे वाहन दिसले तर. त्यामुळे बस वेगाने मार्गक्रमण करीत होती.

चार तासात आम्ही सिंबल व्हिलेजला पोहोचलो. अबू सिंबल टेंपलपर्यंत वाहन जात नाही. दोन अडीच कि.मी. चालत जावे लागते. रस्ता सिमेंट कॉंक्रीटचा आहे. टांग्याने पण जाता येते. चार तास बसचा प्रवास केल्यामुळे अंग व पाय आखडले होते म्हणून आम्ही पायी जाण्याचा निर्णय घेतला. नाझेर लेकच्या पाण्याच्या बाजुने हा रस्ता जातो. अबू सिंबल टेंपलची कहाणी रंजक व अविश्वसनीय असली तरी सत्य आहे. इजिप्त साम्राज्यशाहीतील १९व्या साम्राज्याचा तिसरा फेरो राजा रामासेस टू याने ही ऐतिहासिक देवळे मोठया प्रमाणात इजिप्त आणि न्युबियामध्ये बांधली. रामासेसला ७ बायका आणि ४८ मुलगे व ५३ मुली होत्या. रामासेसच्या काळात इजिप्तची राजधानी थेबीस होती. इजिप्तवर अरब राज्यकर्ते आल्यावर त्यांनी इजिप्तची पूर्वीची राजधानी बदलून कैरो केली. रामासेसने अनेक साम्राज्य जिंकून तिथली साधनसंपत्ती इजिप्तमध्ये आणून इजिप्तला श्रीमंत केले. रामासेसचा राज्यकाळ वैभवशाली सुवर्णकाळ गणला जातो. म्हणून त्याला रामासेस द ग्रेट आणि फेरो साम्राज्यशाहीचा सर्वात मोठा वारसदार संबोधिले जाते. तो निधन पावला तेव्हा त्याचे वय ९० वर्षाचे होते. त्याची ममी कैरोमधल्या

इजिप्शियन म्युझियममध्ये जतन करण्यात आली. ती पाहण्याचे भाग्य आम्हाला मिळाले.

रामासेसने इजिप्तचा प्रभाव न्युबियन यांना दाखविण्यासाठी आणि त्यांचे इजिप्तिकरण करण्यासाठी अबू सिंबल हे टेंपल व अन्य टेंपल बांधली. अबू सिंबल टेंपल बांधण्यासाठी वीस वर्षे लागली. बराच काळ उलटून गेल्यामुळे ते मंदिर असेच पडुन राहिले आणि हळुहळू त्यावर वाळू जमा होऊन ते गाळ व वाळूत गाडले गेले. सन



१८१३ पर्यंत हे टेंपल विस्मृतीत गेलेले होते. स्विस कला अभ्यासक जोहान लुडविक आणि इटालियन संशोधक जिओवनी बेलझोनी यांनी या मंदिराचा शोध लावला. नाईल नदीला येणाऱ्या भरत्या आणि आसवान धरणाचे बांधकाम यामुळे मंदिराला धोका निर्माण होऊ लागला. त्याचवेळी रामासेस सेंकडचा समृद्ध वारसा लाभलेले हे मंदिर कसे वाचविता येईल याचा विचार करण्यात आला.

युनेस्कोच्या सहाय्याने हे मंदिर अन्यत्र हलवायचे ठरले. विविध देशांचे पुरातत्त्व शास्त्रज्ञ, अभियंते आणि मोठी यंत्रसामग्री हाताळणारे कुशल ऑपरेटर्स यांच्या प्रयत्नाने जुने मंदिर व पुतळे काही भागात कट करुन मुळ जागेपासून २०० मिटर हलवून ६५ मिटरच्या ऊंचीवर पुर्नस्थापित करण्यात आले. पुरातत्त्व शाखेच्या अभियंते व शास्त्रज्ञ यांना हे काम फार मोठया जोखिमीचे व आव्हानात्मक होते. काही अवशेष नाझेर लेकमधून बाहेर काढून ते वाचविण्यासाठी शिकस्त करण्यात आली. आज हे मंदिर दिमाखात नव्या जागेत उभे आहे. विशेष म्हणजे हे मंदिर जसेच्या तसे एक एका कृत्रिम दगडांच्या टेकडीत पुर्नस्थापित करण्यात आले आहे. अभियांत्रिकी शाखेच्या उत्कृष्ट कामगिरीचा नमूना म्हणजे हे पुर्नस्थापित मंदिर होय.

प्रकरण....७

अबू सिंबल येथे बाजुबाजुला दोन टेंपल असून एक टेंपल राजा रामासेस याला समर्पित केले आहे तर दुसरे रामासेस याची बायको राणी नेपरत्री हिला समर्पित करण्यात आलेले आहे. मंदिर आतमध्ये निमुळते होत जाणाऱ्या त्रिकोणी आकाराचे आहे. प्रवेशद्वार अतिशय भव्य आहे. आतमध्ये दोन्ही बाजुला दालने आहेत. दगडाच्या भिंतीवर युध्दाचे प्रसंग कोरण्यात आलेले आहेत. मंदिर पाहताना ते

पुर्नस्थापित केल्याच्या कोणत्याही खुणा सापडत नाहीत इतके ते चपखलपणे मुळ स्वरुपात असल्यासारखे स्थापित केलेले आहे. याचे श्रेय तत्कालीन अभियंते आणि पुरातत्त्व शास्त्रज्ञ यांना आहे. हजारो वर्षापूर्वीचा प्राचीन वारसा धरण बांधकामात बरबाद होऊ नये म्हणून इजिप्त सरकारने केलेले प्रयत्न आणि याबाबतची युनेस्को या संस्थेची कामगिरी कौतुकास्पद आहे. कारण काही वास्तुंचे मुल्य हे त्या देशापुरते सिमित नसते तर त्याला जागतिक महत्त्व देखील असते. फेरो सम्राटांच्या प्राचिन दैवतांच्या चार मुर्ती टेंपलमध्ये आहेत. दरवर्षी २२ ऑक्टोबर आणि २२ फेब्रुवारी रोजी सुर्याची किरणे सरळ आत जातात व मंदिराचा आतला गाभारा उजळून टाकतात. हा किरणसोहळा पाहण्यासाठी पर्यटकांची या दिवशी मोठया प्रमाणात गर्दी होत असते. अबू सिंबल टेंपल पाहून झाल्यावर आम्ही आसवानकडे परतीच्या प्रवासाला निघालो तेव्हा सकाळचे अकरा वाजले होते. मार्गात आसवान हाय डॅम पाहून पुढे जाणार होतो. धरणामुळे विस्थापित झालेल्या न्युबियन लोकासांठी सिंबल व्हीलेजमध्ये पुर्नवसन कॉलनी तयार करण्यात आलेली आहे. न्युबियन लोकांना घुमटाकार आकाराची बैठी घरे बांधून देण्यात आल्याचे दिसून आले. एकीकडे नाईल नदीचा मोठा जलाशय आणि दुसरीकडे न्युबियन डेझर्टमुळे कृषी उत्पन्न काहीच नसलेला कोरडा भाग अस विरोधाभासी चित्र दिसले. बहूतेक न्युबियनस पर्यटन व्यवसायावर गुजराण करतात. इजिप्तमध्ये आसवान या ठिकाणी सन १९६० ते १९७० या दहा वर्षांच्या कालावधी दरम्यान बांधून पूर्ण करण्यात आलेले जगातील ते सर्वात मोठे धरण आहे. सन १९६० पूर्वी तिथे एक छोटे धरण होते. परंतु पूर्व आफ्रिकेतील नद्या दुथडी भरुन वाहू लागल्या की नाईल नदीला पूर येत असे. पुराचे पाणी वाहत्या पाण्याबरोबर वाहत आलेली खनिजे आणि अन्य पोषक घटक इजिप्तच्या भूमीवर व पठारांवर पसरत आणि इजिप्त भूमी सुपिक, जननक्षम व समृध्द बनवत असे. परंतू खुप पाऊस झाल्यावर पिके वाहून जात आणि नुकसान होत असे. पाऊस कमी पडला तर दुष्काळ पडत असे. जसजशी इजिप्तची लोकसंख्या वाढू लागली तसतशी ही परिस्थिती गंभीर होत चालली. ही परिस्थिती बदलण्यासाठी इजिप्त सरकारला हे धरण बांधताना महत्प्रयासातून जावे लागलेले आहे. अगदी या धरणाचा वाद तिसरे महायुध्द होण्याच्या टोकापर्यंत गेलेला. इजिप्तचे तत्कालीन प्रेसिडेंट नासेर यांनी सुएझ कालव्याचे केलेले राष्ट्रीयकरण आणि त्यामुळे फ्रान्स, ब्रिटन व इस्त्रायल यांच्यासमोर

पडलेला पेचप्रसंग, इजिप्तला मिळालेला रशियाचा पाठिंबा, मागाहून अमेरिकेने बदललेले धोरण व अन्य देशांवर टाकलेला दबाव, यामुळे ब्रिटन, फ्रान्स, ईस्त्रायल यांनी नमते घेत धरणाला असलेला विरोध मागे घेतला. या घटनांचा परिपाक म्हणजे तिसरे महायुद्धही टळले आणि इजिप्तचे आसवान हाय डॅम देखील पूर्ण झाले. त्या संपूर्ण राजकीय ऐतिहासिक घडामोडींचा तपशील या प्रवासवर्णनात दाखल करणे उचित होणार नाही. परंतु जगात प्रसिध्द असलेल्या या धरणाचा इतिहास किती रोमहर्षक आहे हे कळून येते. एखादे महत्वाकांक्षी नेतृत्त्व आपल्या देशासाठी काम करताना जागतिक पातळीवर कशा प्रकारे मुत्सद्देगिरी करुन यश मिळवते याचे उदाहरण म्हणजे इजिप्तचे अध्यक्ष नासेर हे होय. आसवानचे हाय डॅम पहात असताना कैरोच्या जगप्रसिध्द लायब्ररीमध्ये एका दालनात मिलिटरी गणवेशातील नासेर हुसेन यांचा पाहिलेला फोटो डोळयासमोर आला.

दुपारचे साडेबारा झाले होते, वाळवंटातले ऊन जाणवायला लागले होते. आसवानला पोहोचायला अजून तरी अर्धा पाऊणतास बाकी होता. वाळवंटातून बस धावताना बाहेर लांबवर मृगजळ दिसत होते. हे वाळवंट वालूकामय नाही पण उजाड व रखरखीत आहे. रस्त्याच्या दोन्हीही बाजूला जमीन फोडून बाहेर आलेल्या ज्वालामुखींचे छोटे छोटे पसरट भाग शेणाच्या पोच्या काळया रंगासारखे पडलेले दिसत होते. ती दृश्य पाहता पाहता मध्येच एक डुलकी लागली. अखेर आठ तासाचा प्रवास संपून आम्ही सर्व क्रुझवर पोहोचलो. सगळेच भूकेलेले असल्याने गेल्या गेल्या लंच केला.

आमच्या केबिनच्या वरतीच टॉप डेक असल्यामुळे लंच करुन लगेच वर आलो. प्रशस्त नाईल नदीचे पात्र, निळे हिरवे पाणी, सुर्याची किरणे थेट पाण्यात पडून परावर्तीत होत होती. लाटेबरोबर परावर्तित किरणे उसळी घेत होती. त्या परावर्तनाला सोनेरी झळाळी होती. खूप आनंददायी दृश्य होते ते. नाईल नदीच्या दोन्ही बाजूला बागाइती लागवडी केलेल्या होत्या. केळी, संत्री, आंबे व मोसंबी या फळांची लागवड मोठया प्रमाणात करण्यात येत असल्याचे दिसले. अन्नधान्याची शेती क्वचित दिसली. दोन्ही किनाऱ्यावर कृषी संपन्नता स्पष्ट दिसत होती. बोटीचे स्पीड मंद होते. ऊन खात येणारा मंद वारा नाईलच्या स्पर्शाने थंड होऊन वाहत होता. फारच आल्हाददायक अनुभव होता. ज्या नदीतून बोटी जातात तीचे पात्र किती खोल असेल? ज्या नदीमध्ये प्रचंड मोठया मगरी आहेत. ज्या नदीतून चाचेगिरी करुन

लुटालूट केली जाते, त्याच नदीतून आम्ही प्रवास करत होतो यावर विश्वास बसत नव्हता. पर्यटनाद्वारे मोठे उत्पन्न मिळत असल्याने इजिप्त सरकार पर्यटकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देते. त्यामुळे तो धोका आता जवळपास नाहीसा झाला आहे.

डेकवरुन नाईल नदी पाहत असताना अचानक दोन तीन छोटया बोटी वेगाने आमच्या बोटीभोवती फिरु लागल्या, त्या प्रत्येक बोटीमध्ये पूर्ण अंगभर काळे व पांढरे पायघोळ लांब बाह्याचे सदरा घातलेली दोन दोन माणसे होती. त्यांनी पटापट त्यांच्या बोटी आमच्या बोटीजवळ आणून दोरीने टाकून बांधल्या. काय चालले आहे ते कळेना, मन



थोडे चरकले कारण त्यांच्या बोटीची पोझिशन आमच्या क्रुझच्या दोन्ही बाजूला होती. इतक्यात एकाने त्यांच्या बोटीवरच्या स्टँडींग डेकच्या खाली ठेवलेले मोठे गाठोडे काढले. त्या गाठोडयात प्लॉस्टिकच्या पारदर्शक पिशवीत रंगीबेरंगी डिझाइनच्या चादरी, टॉवेल व शाली असल्याचे दिसून आले. त्यामुळे आणखी कुतूहल वाढले. मग क्षणात सुरु झाली दुकानदारी. त्यातला एक माणूस खालून प्रत्येक मजल्यावर केबिनमधून पाहणाऱ्या पर्यटकाला आवाज द्यायचा. ए, यू, वांट! ए इंडिया! लूक! दिस इज बेस्ट फार इंडिया! कुणी जरा प्रतिसाद दिला की, ती पिशवी ते अशा अचूकतेने फेकत की, ती डायरेक्ट गॅलरीतून केबिनमध्ये पडत असे! मग सुरु व्हायचा ही नको ती नको असा अदलाबदलीचा खेळ! कधी नेम चुकत असे. मग ते पिशवी पडली तिकडे बोट नेत व पाण्यात पडलेला माल आत घेत. परत बार्गेन सुरु! ए इंडिया! इजिप्शियन काटन! यु वांट अदर कलर! वेट! वेट! गिव्हींग! खुप मजेशीर शॉपिंग! मग डेकवरुन आमच्या बरोबर इतरांनी वरुन आवाज द्यायला सुरुवात केली. मग ते पाच सहा पाकीटे एका पिशवीत घालून उंच वर आमच्या डेकच्या दिशेने भिरकावून देत व कॉच म्हणून जोरात ओरडत. खालून फेकलेले पाकीट झेलायला आमच्यात स्पर्धा सुरु व्हायला लागली. ते पटापट पाकिटात चादरी, टॉवेल व शाली भरुन फेकत. काही खाली पाण्यात पडत पण त्याची त्यांना पर्वा नसायची. ते पाकीट पाण्यातून चटकन वर काढण्यात एकदम कुशल होते. तसेच वर फेकलेल्या

मालाचे पैसे मिळतील ना मिळतील याची त्यांना बिलकूल काळजी नसायची. त्यांच्या अशा बेफिक्रीवरुन त्यांना कोणी फसवणार नाही याची त्यांना खात्री होती. ह्या खेळात पर्यटकांना आकर्षित करुन गुंतवत. ते त्यांचा माल घासाघीस करुन विकत. आपण त्यांच्या भावापेक्षा फार कमी फरकाने मागितले तर एक गोड डायलॉग बोलत. ए इंडिया! यु गो अप! आय कम डाउन! अगदी हाताच्या हालचाली खालून दाखवून तो म्हणायचा, मी भाव खाली करतो, तुम्ही थोडे वर चला! शेवटी कुठेतरी सौदा ते तोडत. सौदा ठरला की, नको असलेल्या चादरीच्या पाकीटात इजिप्शियन पौंड भरुन पाकीट खाली फेकायचे. ते बरोबर पकडत. बहुतेक न्युबियनस लोक अशी शॉप ऑन बोट द्वारे चादरींची विक्री करतात. दिड दोन तासाभरात त्यांचा माल संपून ते पटापट दोऱ्या सोडून निघूनही गेले. आपण फसविले जाणार नाही हा आत्मविश्वास घेऊन कापडविक्रीचा धंदा करुन उदरनिर्वाह करणाऱ्या त्या गरीब कष्टाळू न्युबियनसच्या जाणाऱ्या बोटींकडे मी ममत्वाने पाहत राहिलो. वेगळाच अनुभव घेऊन समृद्ध झाल्यासारखे वाटले.

प्रकरण....८

आसवान, एस्ना आणि लक्झर असा क्रुझचा प्रवास नाईल नदीच्या किनाऱ्यावरील लक्झर या शहराजवळ संपणार होता. लंच



नंतर सगळेच नाईल नदीची विहंगम दृश्य पाहण्यासाठी टॉप सनडेक वर जमा झाले. आजही कालच्या सारखा शॉप ऑन बोट हा दुकानदारीचा खेळ सुरु झाला. अगदी महिलांनी पण हिरहिरीने भाग घेऊन खुप खरेदी केली. छोटया बोटीतली माणसे खाली आणि वर आम्ही. टॉसिंग आणि कॉचिंगचा खेळ मस्त रंगला.


इतक्यात हळूहळू सनडेकच्या पुढच्या बाजूला सगळे जमा झाले. नंतर समजले एस्ना लॉकचा स्पॉट जवळ येत होता. आम्ही चटदिशी जिथून पाहता येईल व व्यवस्थित दिसेल अशी जागा पटकावली. एस्ना लॉक म्हणजे काय प्रकार आहे हे माहीतच नव्हते. पाण्याची पातळी कमी करण्याचा काहीतरी प्रकार आहे इतकेच जुजबी कानावर पडले होते, म्हणून उत्सुकता होती. नाईल नदीतून लक्झर येथे जाताना एस्ना नावाचे शहर लागते.

पूर्वी ते शहर क्वेना गर्व्हनरेटकडे होते सन २००९ पासून ते लक्झर गर्व्हनर रेटमध्ये सामिल करण्यात आले. या ठिकाणाहून जेव्हा जेव्हा क्रुझ किंवा बोटी पास होतात त्यावेळी या लॉकींग सिस्टीममधून त्यांना जावे लागते. या लॉक मध्ये दोन मोठे एन्ट्रन्स आहेत. पुढचा उघडणारा एन्ट्रन्स ३२ मीटर लांब आहे तर त्याच्या नंतरचा २९ मीटर लांब आहे. ह्या दोन्ही दरवाजांनी ४० मीटर खोल असलेल्या भिंतीचा वापर क्रुझ लॉक करण्यासाठी केला जातो. या भिंतीवर वरुन एक पुल बांधण्यात आला आहे. या कृत्रिम लॉकमध्ये पाणी भरण्याचे आणि रिकामे करण्याचे काम चार स्वयंचलीत दरवाजे करतात. कंट्रोल टॉवर मधून पाणी भरणे आणि रिकामे करणे याचे



नियंत्रण आणि व्यवस्थापन केले जाते. यासाठी सहा ते सात मिनिटे लागतात. एकावेळी एकच क्रुझ या लॉकमधून पास करतात. नाईल नदीच्या विशाल पात्रातून या लॉकमधून पास होताना तुम्हाला लॉकींग प्रकार जाणून घेण्याची व पाहण्याची उत्सुकता असते. तुमची क्रुझ लॉकमधून पास होताना दिसते खरी, पण पाणी भरले केव्हा किंवा कधी कमी झाले आणि कुठले याचा थांगपत्ता काही लागत नाही. साधारण एकुण पंधरा-वीस मिनिटे यात जातात. पण सगळेच उत्सुकतेपोटी एस्ना लॉक हा तांत्रिक मनोरंजनाचा शो बघतात मात्र. एस्ना लॉक क्रॉस केल्यावर अर्ध्या तासात लक्झरच्या किनाऱ्याला क्रुझ लागली. टी ब्रेक घेऊन लक्झर टेंपल बघायला निघालो. बऱ्याच मंडळींची शॉपिंग करायला मिळाली नाही म्हणून कुरबूर चालू होती. विशेष करुन महिला वर्गाची. एक शिष्टमंडळ टूर लिडरला भेटले आणि त्यांनी त्यांची कैफियत सादर केली. लक्झर टेंपल जवळच प्रसिद्ध लक्झर मार्केट आहे तिथे शॉपिंगसाठी एक तास दिला जाईल अशी घोषणा टूर लिडरने करताच समस्त महिलावर्ग आनंदित झाला. शॉपिंगला अधिकचा वेळ मिळावा म्हणून आनंदाच्या भरात लक्झर टेंपलच्या दिशेने सगळयांची पावले झपाझप पडू लागली. शहर म्हणून असणारी सर्व लक्षणे लक्झर शहरात असल्याचे पाऊल टाकताच जाणवते. शहर देखणे वाटले. लक्झर टेंपल आणि कर्नाक टेंपल ही दोन मोठी प्राचीन वारशाची स्मारके


या शहरात होती. तसेच इजिप्त खोऱ्याची सुप्रसिद्ध राजघराण्यातील राजा आणि राणी यांची थडगी देखील याच शहरात आहेत. प्राचीन इजिप्तची राजधानी थिबेज म्हणजे आत्ताचे आधुनिक लक्झर होय. असा ऐतिहासिक वारसा लाभलेले हे शहर. राजांचे राजवाडे नाहिसे झाले पण लक्झर टेंपल अजूनही दिमाखात उभे आहे. पण इजिप्तचा प्राचीन काळ, त्या पाषाणांची भव्यता ते बनविण्यासाठी वापरलेले तंत्रज्ञान,




वास्तुविशारदांचे शास्त्र, वाहतूकीची उपलब्ध साधने किंवा शास्त्र काय होते आणि बांधकामाचा उद्देश काय या सर्व बाबींचा आवाका विचारात घेतला की अवाक व्हायला होते आणि मतीही गुंग होते. इजिप्तची बहुतांश स्मारके, टेंपल उत्खनन करुन पुर्नस्थापित केलेली आढळतात. मनात विचार आला, या इजिप्तच्या भूमीत काय काय दडलय? विशेष म्हणजे हे उत्खनन अगदी प्राचीन राज्यकर्त्यांपासून आजच्या घडीलाही चालू असल्याचे आढळते. इजिप्त संस्कृतीचा वारसा जगाला उघड करताना आतापर्यंत त्यांचा कितीतरी कोटयावधींचा खर्च झाला असणार यात शंका नाही.

उद्या सकाळी नऊ वाजताचा चेकआऊट होता. आजचे क्रुझवरचे शेवटचे डिनर. डिनर झाल्यावर एक अरेबिक डान्सचा शो पर्यटकांसाठी क्रुझवर आयोजित केलेला होता. अरेबिक डान्स म्हणजे बेली डान्स. इजिप्तमध्ये ती लोककला मानली जाते. सन २००४ पर्यंत फक्त नेटिव्ह इजिप्त महिलांनाच ह्या शोसाठी परवानगी होती. अलिकडे हे निर्बंध काढून टाकण्यात आलेले आहेत. क्रुझवरील मिनी थिएटरमध्ये रात्री दहा वाजता हा शो होणार होता. आम्ही सर्व दहा मिनिटे अगोदरच जाऊन बसलो. इजिप्शियन फॅमिली त्यांच्या लहान मुलांना घेऊन आली होती. अकस्मात काळा गाऊन घालून एक ३०-३५शीची महिला मधोमध आली. ड्रम, बोंगो-कोंगो कडाडायला लागले. क्षणार्धात त्या महिलेने काळा गाऊन वादकाच्या दिशेने भिरकावला. लखख गोरा रंग, सौष्ठव व सौंदर्याने खुललेली ती ललना. अंगावर पारदर्शक झिळमिळते वस्त्र, वर कंचूकी,

कटीवर मागे व पुढे पिवळया रंगाचे चांदण्यांच्या खडीचे पारदर्शक वस्त्र. बेली डान्सचे वैशिष्ट्य म्हणजे डफाच्या तालावर ओटीपोट, उरोज आणि नितंब हे अवयव




विशिष्ठ पद्धतीने नजाकतीने थिरकवणे. कोणताही बिभत्सपणा न दाखविता अवयवांना नजाकतीचा आयाम देऊन नृत्य सादर करणे म्हणजे बेली डान्स. ती ललना थोडी स्थूल असल्याने तिच्या नृत्याच्या अदाकारीत तितकेसे चापल्य नव्हते. पण ठेका पकडून नृत्य अदाकारी सादर करण्याच्या प्रयत्नात ती कमीही पडत नव्हती. शो संपल्यावर सगळयांनी जोरदार टाळया वाजवून तिच्या सादरीकरणाला अभिवादन केले.

उद्याचा चेकआऊट असल्याने बॅगा आजच भरुन तयार ठेवणे आवश्यक होते. जो तो उद्याच्या तयारीसाठी केबिन रुमसकडे शुभ रात्री करत रवाना झाला.

प्रकरण....९

बरोबर सकाळी साडे आठला सर्व काही आटपून व बॅगा रेडी करुन डिजीटल की जमा करण्यासाठी रिसेप्शन काऊंटरजवळ आम्ही सर्वजण जमलो. चाव्या जमा करण्याचे काम चालू असताना इजिप्तच्या मिलीटरीकडून क्रुझला आदेश झाले की, कोणत्याही प्रवासाला वैद्यकीय तपासणी झाल्याशिवाय बाहेर पडता येणार नाही. थोडयाच वेळात सरकारी मेडीकल टीम येऊन सगळयांची



तपासणी करेल. टूर लिडर आणि आम्हाला वाटले की फार तर आता तासाभरात सगळे आटोपेल. पण कसले काय? दहा वाजले तरी तपासणीचे नाव नाही. तशी क्रुझवरच्या सर्वांचीच चुळबूळ सुरु झाली. चाव्या तर दिलेल्या त्यामुळे रुममध्ये पण जाता येत नव्हते. मग क्रुझ मॅनेजमेंटने सर्वांना सन डेकवर जाऊन बसायला सांगितले. सगळे पर्यटक वर आले. सनडेक मोठा होता तसेच

बसायला खुर्च्या व टेबलेही होती. त्यामुळे वरती सगळेच अकोमोडेट झाले. सगळ्या क्रुझ लागून लागून उभ्या होत्या, आमच्या क्रुझच्या पुढे पाच क्रुझ चेकिंगसाठी वेटींगला होत्या. सगळयांनी त्यांच्या जवळच्या खाण्याच्या वस्तू उघडायला सुरुवात केली. हलका फुलका नाष्टा शेअर करत खाऊन झाला, गप्पा झाल्या, भेंडया झाल्या पण सुटका होण्याची चिन्हे दिसत नव्हती. दुपारचे बारा वाजून गेले, सूर्य तापायला लागला तसे डेकवर ऊन लागायला लागले. वर ऊन्हात किती बसणार! टेन्शन यायला लागले, बरेच



प्रश्न व अडचणी समोर उभ्या राहायला लागल्या. वैद्यकीय तपासणीत काही आढळले तर पुढे काय? परत जायला देणार की नाही? व्यवस्था स्वत:ला करावी लागणार की इजिप्त सरकार करणार? आजच्या जेवणाचे काय? वॉशरुम टॉयलेटचे काय? असे अनेक प्रश्न भेडसावू लागले.

कोरोना आणि क्रुझवरील लागण या संदर्भात उलटसुलट बातम्या उडत-उडत येत




TUTANKHAMON

होत्या. एक मन त्या अफवा असतील म्हणून धीर देत होते, तर दुसरे मन म्हणत होते ज्याअर्थी क्रुझ चेकअपसाठी हेल्डअप केल्यात व अडवून ठेवले आहे त्याअर्थी काहीतरी गंभीर आहे. या सर्व गोष्टी तणाव वाढवत होत्या. त्याचबरोबर आजच्या साईटसीइशग मधले व्हॅली ऑफ किंग्ज, क्विन हॉटशेपसूटचे टेंपल आणि प्रसिद्ध कर्नाक टेंपल ही स्थळे बघायला मिळणार नसल्याचे दुखही होत होते. मायदेशी, मुंबईत

आणि स्वत:च्या घरी केव्हा परतू असे क्षणाक्षणाला वाटत होते. आता कोणालाच काही नको होते, आता फक्त हवी होती यातून सुटका आणि घर! दरम्यान आमच्यातील एक ज्येष्ठ गृहस्थ यांनी नेटवर शोध घेऊन इंडियन एंबसीला फोन लावण्याचा प्रयत्नही केला. पण फोन उचलला गेला नाही. नंतर थोडा वेळ गेल्यावर त्यांना एक फोन आला आणि त्यावर त्यांची चौकशी करण्यात आली, तो फोन इंडियन एंबसीतून आला होता. त्या गृहस्थांनी



सगळा घटनाक्रम त्यांना सांगितला, ग्रुपमध्ये बहुतेक वरिष्ठ इंडियन नागरिक असून कोणाला डायबेटिस, ब्लडप्रेशर व अन्य त्रास असून सध्याच्या परिस्थितीत सर्वांचे मानसिक संतुलन बिघडत चालल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तिकडून योग्य ते सहकार्य करु असे सांगण्यात आले. यानंतर जवळजवळ एक तास गेला. दरम्यान सुत्रे फिरली व काहीतरी हालचाली पडद्याआड झाल्या असाव्यात. मुंबईहून एस.ओ.टी.सी. कंपनीच्या वरिष्ठ



अधिकाऱ्यांचा फोन आमच्या टूर लिडरला आला. टूर लिडरने आमचे छोटे छोटे ग्रुप करुन प्रत्येकाला सांगितले की आपल्याला मेडिकल चेंकींग न करता सोडणार आहेत, पण लक्षात ठेवा सिक्युरिटी चेकमध्ये विचारले तर इतकेच सांगायचे की आज रात्रीच्या फ्लाईटने आम्ही इंडियात परतणार आहोत. चुकूनही उद्या परतणार बोलायचे नाही. जास्त विचारले तर टूर लिडरला विचारा असे सरळ सांगा. सायंकाळचे पाच वाजले होते. आम्ही सर्व तयारीत होतोच. सगळयांना बोटीतून बाहेर पडून लक्झरच्या किनाऱ्यावर पोहोचेपर्यंत धास्ती होतीच. सगळे गुपचूप शांतपणे तरीही घाईघाईने बाहेर पडायला लागले. आमच्या क्रुझच्या पुढे सहा क्रुझ उभ्या

होत्या. त्यांच्या पॅसेज मधून आम्हाला जायचे होते. जीव मुठीत घेऊन आम्ही एकेक क्रुझ पास करत होतो. एक क्रुझ पास झाली की वाटायचे आता पुढे विचारतील, चेक करतील. खोटे रेटून बोलायचे पण अवघड काम होते. सततचे धास्तावलेपण घेऊन आम्ही सर्व शेवटची क्रुझ पास करुन लक्झरच्या किनाऱ्यावर आलो. शेवटपर्यंत आम्हाला कुठेच कुणी हटकले नाही. खूप हायसे वाटले. बस पुढच्या प्रवासाला निघायला तयारच होती. आमचे सगळे पर्यटक आल्यावर आणि बॅगा लगेजमध्ये टाकल्यावर आमची बस सुरु झाली. सगळयांनी बस सुटताना गणपतीबाप्पाचा जयघोष केला. अर्ध्या तासाने नाईट हॉल्टच्या हॉटेल जवळ बस थांबली. टूर लिडरने आमच्या संयमाचे



कौतूक करुन आभार मानले आणि आजचे साईटसीइशग मीस झाल्याबद्दल खेद व्यक्त करुन कंपनीच्या वतीने क्षमा मागितली. शेवटी एक गोड अनाऊन्समेंट केली, आज आपण बरेच मिस केले आहे, पण एस.ओ.टी.सी. ने तुम्हाला कर्नाक टेंपलचा साऊंड अँड लाईट शो रात्री दाखवण्याचे ठरविले आहे. सर्वांनी



आनंदाने टाळया वाजवल्या आणि आम्ही सुध्दा टुर लिडर व गाईड यांचे आभार मानले. कर्नाक टेंपलचा साडेसातचा नाईट शो पाहण्यासाठी पोहचलो तेव्हा खुप काळोख झाला होता. आंतरराष्ट्रीय पर्यटकांकडून भेट देण्यात येत असलेले जगातील दुसऱ्या क्रमांकाचे हे ऐतिहासिक टेंपल आहे. दोनशे एकर जागेत हे मंदिर आहे. अनेक स्मारके, प्रार्थनास्थळे, पायलॉन, हॉल मोडकळीस आलेल्या अवस्थेत असल्याचे दिसले. रात्रीच्या अंधारात अनेक स्मारकांवर, खांबांवर, भिंतीवर प्रकाश झोत सोडून स्पष्ट आणि खणखणीत आवाजातील कॉमेंट्रीद्वारे ऐतिहासिक महत्त्व सांगितले जात होते. शेवटी

एका अँफिथिएटरमध्ये गोलाकार बसून प्रकाशझोत आणि लेझर चित्रे यांच्या सहाय्याने समग्र माहिती सांगणारा माहितीपट ऐकला. मायदेशी परतायचे वेध लागले असल्याने तितकेसे लक्ष केंद्रित होत नव्हते. सगळेच उद्याची वाट पहात होते.

अखेर १० मार्चचा दिवस उजाडला. आज मायदेशी परतण्याचा दिवस. विमानाने लक्झर एअरपोर्टवरुन कैरोसाठी झेप घेतली आणि आम्ही सुस्कारा सोडला. कैरो



एअरपोर्टवर काय वाढून ठेवले आहे हे माहिती नव्हते. कैरोहून इजिप्त एअरवेजची संध्याकाळी सहाच्या विमानाची मुंबईसाठी तिकीटे बुक होती. विमानाने वेळेत कैरो सोडले. आता खात्री झाली की आपण नक्की मायदेशी जाणार आहोत. मध्यरात्री साधारण पहाटे दिड वाजता मुंबई विमानतळावर उतरलो. मुंबई विमानतळाबाहेर पडताना तिथल्या वैद्यकीय अधिकाऱ्याने आमच्याकडून वैद्यकीय हिस्टरी एका फॉर्ममध्ये लिहून घेतली, आमचे बॉडी टेंपरेचर चेक केले. मशीनने हिरवा सिग्नल दिला आणि सुटकेचा दिर्घ निश्वास टाकला. ज्याला त्याला घरी जायची घाई होती त्यामुळे जो तो एकमेकांचा निरोप न घेताच पांगला गेला, कोण डोमेस्टीक एअरपोर्टसाठी तर कोण हायर कार शोधण्यासाठी. एका विषाणूने सगळया जगात हाहा:कार माजवून माणसांची



व नात्यांची अशी पांगापांग केली. कोण कोणाला किती दिवस अंतरणार माहीत नाही. घरात पाऊल पडताच जो निर्धास्तपणा आला तो शब्दांत सांगणे कठीण जात आहे. आता १४ दिवस क्वारंटाईन व्हायचे होते, पण परक्या देशात नाही की तिथल्या क्रुझवर नाही, तर स्वत:च्या घरात होणार याचा आनंद वेगळाच होता.

FORTY YEARS

DK PHARMA

## Dr. RAKESH BAKSHI
Founder - A Visionary Entrepreneur

Having a master's degree in chemistry from the University of Bombay, Dr. Rakesh Bakshi belongs to the bracket of pioneers in indian Intermediate and speciality Chemical Manufacturing sector

DK Pharma is one of the largest suppliers of key Intermediates, speciality Chemicals and APIs Across The Globe



## WITH 4 DECADES OF API SUCCESS NOW VENTURED INTO BIO PHARMA

Hi End Manufacturing Facility confirming to cGMP and US FDA guidelines

11,000 Square Feet of State - of - the - Art manufacturing facility

Facility has been designed, built and validated by International Experts in Biopharmaceutical plant design and construction

Production Machinery procured from Global Leaders

## DK FLAG FOUNDATION

**Yet Another Milestone Achievement**

**A FIRST TIME IN INDIA**

**Flew 50 National Flags**

**From All The Balconies At Tivoli CHS Hiranandai Gardens, Powai, Mumbai**

E mail : marketing@dkpharmachem.com
Web : www.dkpharmachem.com